६	सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३	५५	४५	१०	८१.८१%
७	मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३	५५	४५	१०	८१.८१%
८	बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३	५५	४९	६	८९.९%
९	गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३	५५	५०	५	९०.९०%
१०	शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३	५५	४६	९	८३.६३%
११	बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३	५५	५०	५	९०.९०%
१२	गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३	५५	५०	५	९०.९०%
१३	शुक्रवार, दिनांक ४ऑगस्ट, २०२३	५५	४१	१४	७४.५५%

विवरण क्रमांक ४

दिनांक १७ जुलै ते ४ ऑगस्ट, २०२३
महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व
बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी
(मा. उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)
एकूण बैठकांची संख्या – १३

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१	असगावकर, श्री. जयंत दिनकर	१२	१	९२.३०%
२	अडबाले, श्री. सुधाकर गोविंदराव	१३	०	१००%
३	अहिर, श्री. सचिन मोहन	१२	१	९२.३०%
४	आंबटकर, डॉ. रामदास भगवानजी	११	२	८४.६१%
५	कराड, श्री.रमेश काशिराम	१२	१	९२.३०%
६	कायंदे, डॉ.मनीषा शामसुंदर	१३	०	१००%
७	काळे, श्री. विक्रम वसंतराव	१०	३	७६.९२%
८	खडसे, श्री.एकनाथराव गणपतराव	११	२	८४.६१%
९	खापरे, श्रीमती उमा गिरीष	१३	०	१००%
१०	खंडेलवाल, श्री.वसंत मदनलाल	१०	३	७६.९२%
११	गिरकर, श्री.विजय ऊर्फ भाई विठ्ठल	१३	०	१००%
१२	चव्हाण, श्री.सतीश भानुदासराव	१३	०	१००%
१३	जगताप, श्री.अशोक अर्जुनराव ऊर्फ भाई	१३	०	१००%
१४	जानकर, श्री.महादेव जगन्नाथ	१३	०	१००%
१५	ठाकरे, श्री.उध्दव बाळासाहेब	०२	११	१५.३८%
१६	डावखरे, श्री.निरंजन वसंत	१३	०	१००%
१७	तटकरे, श्री.अनिकेत सुनिल	१२	१	९२.३०%
१८	तांबे, श्री.सत्यजीत सुधीर	१२	१	९२.३०%
१९	दटके, श्री.प्रविण प्रभाकरराव	१३	०	१००%
२०	दराडे, श्री.किशोर भिकाजी	१०	३	७६.९२%
२१	दराडे, श्री.नरेंद्र भिकाजी	१३	०	१००%
२२	दरेकर, श्री.प्रविण यशवंत	१२	१	९२.३०%
२३	दुर्राणी, श्री.अब्दुल्ला खान ए.लतिफ खान	१०	३	७६.९२%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
२४	धस, श्री.सुरेश रामचंद्र	१३	०	१००%
२५	नाईक, श्री.नीलय मधुकर	१३	०	१००%
२६	नाईक-निंबाळकर, श्री.रामराजे प्रतापसिंह	०८	०५	६१.५३%
२७	पटेल, श्री.अमरिशभाई रसिकलाल	०६	०७	४६.१५%
२८	पडळकर, श्री.गोपीचंद कुंडलिक	१३	०	१००%
२९	परब, ॲड.अनिल दत्तात्रय	१३	०	१००%
३०	पाडवी, श्री.आमश्या फुलजी	११	२	८४.६१%
३१	पाटील, श्री.कपिल हरिश्चंद्र	१३	०	१००%
३२	पाटील, श्री.जयंत प्रभाकर	१०	३	७६.९२%
३३	पाटील, श्री.रमेशदादा	१३	०	१००%
३४	पाटील, श्री.रामराव बालाजीराव	१२	१	९२.३०%
३५	पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.	१२	१	९२.३०%
३६	पोटे-पाटील, श्री.प्रविण रामचंद्रजी	०५	०८	३८.४६%
३७	पोतनिस, श्री.विलास विनायक	१३	०	१००%
३८	बाजोरीया, श्री.विप्लव गोपीकिसन	०९	०४	६९.२३%
३९	बावनकुळे, श्री.चंद्रशेखर कृष्णरावजी	०५	०८	३८.४६%
४०	भारतीय, श्री.श्रीकांत पंडीतराव	११	२	८४.६१%
४१	मिर्झा, डॉ.वजाहत मिर्झा अथर	१३	०	१००%
४२	मिटकरी, श्री.अमोल रामकृष्ण	१०	३	७६.९२%
४३	मोहिते-पाटील, श्री.रणजितसिंह विजयसिंह	१३	०	१००%
४४	म्हात्रे, श्री.ज्ञानेश्वर बारकू	१३	०	१००%
४५	राठोड, श्री.राजेश धोंडीराम	१३	०	१००%
४६	लाड, श्री.अरुण गणपती	१३	०	१००%
४७	लाड, श्री.प्रसाद मिनेश	११	२	८४.६१%
४८	लिंगाडे, श्री.धिरज रामभाऊ	१२	१	९२.३०%
४९	वंजारी, श्री.अभिजीत गोविंदराव	१२	१	९२.३०%
५०	शिंदे, प्रा.राम शंकर	१३	०	१००%
५१	शिंदे, श्री.शशिकांत जयवंतराव	१३	०	१००%
५२	शिंदे, श्री.सुनिल गोविंद	१२	१	९२.३०%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
५३	सरनाईक, श्री.किरण रामराव	१३	०	१००%
५४	सातव, डॉ.प्रज्ञा राजीव	१३	०	१००%
५५	सिंह, श्री.राजहंस	१३	०	१००%
५६	रिक्त			
५७	रिक्त			
५८	रिक्त			
५९	रिक्त			
६०	रिक्त			
६१	रिक्त			
६२	रिक्त			
६३	रिक्त			
६४	रिक्त			
६५	रिक्त			
६६	रिक्त			
६७	रिक्त			
६८	रिक्त			
६९	रिक्त			
७०	रिक्त			
७१	रिक्त			
७२	रिक्त			
७३	रिक्त			
७४	रिक्त			
७५	रिक्त			
७६	रिक्त			

विवरण क्रमांक ५

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ (जुलै-ऑगस्ट) च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल

सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३

विधानपरिषदेची बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात दुपारी १२-०० वाजता माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ वंदे मातरम् या गीताच्या समूह गायनाने झाला. त्यानंतर राज्यगीताचे समूह गायन झाले.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, "सभागृहातील आसन व्यवस्था व कामकाज" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

१. उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला उप मुख्यमंत्री आणि खालील मंत्र्यांचा परिचय करून दिला :-

(१) श्री. अजित अनंतराव पवार, उप मुख्यमंत्री आणि वित्त व नियोजन मंत्री

(२) श्री. छगन चंद्रकांत भुजबळ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

(३) श्री. दिलीपराव दत्तात्रय वळसे-पाटील, सहकार मंत्री

(४) श्री. हसन मियाँलाल मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री

(५) श्री. धनंजय पंडितराव मुंडे, कृषी मंत्री

(६) श्री. धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम, अन्न व औषध प्रशासन मंत्री

(७) श्री. संजय बाबुराव बनसोडे, क्रीडा व युवक कल्याण तथा बंदरे मंत्री

(८) श्रीमती अदिती वरदा सुनिल तटकरे, महिला व बालविकास मंत्री

(९) श्री. अनिल भाईदास पाटील, मदत व पुनर्वसन तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, सभापती पद हे निःपक्ष असण्याची आवश्यकता इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

उप सभापतींनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

२. (१) उद्योग मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवला.

(२) ग्रामविकास मंत्र्यांनी,—

(अ) सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२३ तसेच

(ब) सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवले.

(३) उद्योग मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवला.

(४) सहकार मंत्र्यांनी,—

(अ) सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२३ तसेच

(ब) सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहासमोर ठेवले.

३. वित्त मंत्र्यानी, सन २०२३-२०२४ करिता खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सभागृहाला सादर केले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ (३) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली असल्याचे सांगितले.

सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्रांच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत. सदर प्रकाशन विधानमंडळाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे उपसभापतींनी सांगितले.

४. सचिव (१)(कार्यभार) यांनी, मा. राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले एक विधानसभा विधेयक व मा. राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या १२ विधानसभा विधेयकांची यादी सभागृहास वाचून दाखविली.

५. उप सभापतींनी विधानपरिषद नियमातील नियम ८(१) अन्वये खालील सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केले :—

(१) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२) श्री. अरुण लाड, वि.प.स.

(३) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

(४) श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.

६. उप सभापतींनी, "डॉ. माणिकराव पद्माण्णा मंगुडकर, माजी वि.प.स. व श्री. प्रभाकर दामोदर दलाल, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल," शोकप्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली व शोकप्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३

१. (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील छपन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

आज म.वि.प. नियम २८९ अन्वयेच्या तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. मात्र आजच्या कामकाज पत्रिकेत असा विषय समाविष्ट नसल्याने सदरहू सूचना फेटाळण्यात आल्या असल्या तरी संबंधित सदस्यांना त्या मांडण्यासाठी संधी देण्यात येत आहे. असे सांगून माननीय विरोधी पक्ष नेते श्री.अंबादास दानवे यांनी सूचना मांडावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, "माजी खासदाराच्या संदर्भात एक पेनड्राईव्ह माझ्याकडे उपलब्ध असणे" इ.बाबतचा मुद्दा उपस्थित करून याबाबतची चौकशी करण्याचे निर्देश राज्य शासनाला द्यावेत अशी विनंती केली.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत सविस्तर खुलासा केला.

माननीय सभापतींनी, त्यांच्यावरील अविश्वासाचा प्रस्ताव सभागृहात मांडण्याच्या संदर्भात चर्चा होणार असल्यामुळे सभागृहातील कामकाज तालिका सभापती यांच्या अध्यक्षतेखाली होईल तसेच यावरील निर्णय देखील माननीय तालिका सभापती देतील असे सांगितले.

ॲड. अनिल परब, श्री. जयंत प्र. पाटील, श्री. शशिकांत शिंदे, श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील वि.प.स. यांनी उपरोक्त विषयांसदर्भात आपली मते मांडली.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत सविस्तर खुलासा केला.

२. उप मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सतरावा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. श्रीमती उमा खापरे (समिती सदस्या) यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम समितीचा सन २०२३ चा अहवाल सभागृहाला सादर केला.

४. श्रीमती उमा खापरे (समिती सदस्या) यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला :—

"विधानपरिषद नियम समितीच्या आज दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील शिफारशींमध्ये सुधारणा करण्याची नोटीस देण्यासंबंधातील नियम २१९(१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती नियम २८९ अन्वये स्थगित करण्यात येऊन सदरहू मुदत उक्त अहवालाच्या बाबतीत पाच दिवसांची करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

ज्या सन्माननीय सदस्यांना नियम समितीच्या अहवालातील सुधारणांवर शिफारशी सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या ५ दिवसांपर्यंत सुचवाव्यात असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

५. आज मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहेत असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी २ वाजून २८ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३-३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

६. ग्राम विकास व पंचायत राज मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १९ महाराष्ट्र ग्रामपंचात आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री.अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेता)
(२) श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील
(३) श्री.शशिकांत शिंदे
(४) श्री.जयंत प्र.पाटील
(५) ॲड. अनिल परब
(६) श्री. भाई गिरकर
(७) श्री. रमेशदादा पाटील
(८) श्री. अरुण लाड
(९) श्रीमती उमा खापरे
(१०) श्री.एकनाथराव खडसे
(११) श्री.अभिजीत वंजारी
(१२) श्री.अनिकेत तटकरे
(१३) श्री.सचिन अहिर

ग्रामविकास मंत्र्यांनी उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

७. (२) सर्वश्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"मरिन ड्राइव्ह, मुंबई येथील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची तेथील सुरक्षारक्षकाने हत्या करून स्वतः आत्महत्या केल्याची संतापजनक घटना दिनांक ०७ जून, २०२३ रोजी उघडकीस येणे, वांद्रे येथील पॉलिटेक्निकल महाविद्यालयात शिकणारी अकोल्याची ही १९ वर्षीय विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले वसतिगृहात चौथ्या मजल्यावर वास्तव्यास असणे, परीक्षा नुकतीच संपली असल्याने दोन दिवसांनी आपल्या मूळ गावी अकोला येथे जाणार असणे, परंतु तत्पूर्वीच वसतिगृहाच्या सुरक्षारक्षकाने तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या करून स्वतः ग्रॅण्ट रोड स्थानकानजिक रेल्वेगाडीखाली आत्महत्या केली असणे, सदरहू घटनेने वसतिगृहाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असणे, संबंधित सुरक्षा रक्षकाने यापूर्वी पहाटेच्या सुमारास तिच्या खोलीत घुसण्याचा प्रयत्न केला असणे, त्याला खोलीत पाहून विद्यार्थिनीला धक्का बसला असणे, याबाबतची तक्रार संबंधित विद्यार्थिनी आणि तिच्या पालकांनी वसतिगृहाच्या वॉर्डन आणि अधीक्षकांकडे करूनही त्यांनी सदर तक्रारीकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले असणे, या वसतिगृहाची क्षमता ४५० विद्यार्थीनींची असून सध्या या वसतिगृहात ४० ते ४५ विद्यार्थीनी वास्तव्यास असून गेल्या वर्षभरापासून तेथील सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्याची बाब उघडकीस येणे, सदरहू वसतिगृहाच्या ढिसाळ कारभारामुळे एका विद्यार्थिनीचा नाहक गेलेला बळी, सदरहू वसतिगृहाच्या वॉर्डन आणि अधीक्षकांना निलंबित करण्याची संबंधित विद्यार्थिनीच्या पालकांनी केलेली आग्रही मागणी, सदरहू घटनेमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी येणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला गहन प्रश्न, परिणामी, मुलींमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, यास्तव सदरहू घटनेची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज, मुंबईसह राज्यातील मुलींच्या वसतिगृहात त्यांच्या सुरक्षिततेबाबत करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर अनुक्रमांक ३ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांची असून त्यांनी सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याची विनंती केली आहे. तसेच अनुक्रमांक ४ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य ॲड. निरंजन डावखरे यांची आहे. परंतु, सदरहू लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावरुन त्यांचे समाधान झालेले आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

८. (१) श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांनी, "मुंबई शहरातील केईएम, नायर आणि शीव येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य रुग्णालयांवर येणारा ताण वाढू नये, यासाठी उपनगरीय रुग्णालये सुसज्ज करण्यासाठी मुंबई महानगरपालिका दरवर्षी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री.अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी, "राज्यातील आरोग्य विभागांर्तगत गट कक आणि गट डड या प्रवर्गासाठी २०२१ मध्ये ६२०५ पदासाठी परीक्षा घेण्यात येणे. परंतु ऐन परीक्षेच्यावेळी पेपरफुटीमुळे आणि उत्तरपत्रिका बाहेर आल्यामुळे परीक्षा रद्द करण्यात येणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

९. (१) श्री. ॲड निरंजन डावखरे वि.प.स. यांनी, "राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील रिक्त जागा भरण्यासाठी निवृत्त शिक्षकांच्या नियुक्तीचा शासनाचा निर्णय निर्गमित करण्यात येणे, तथापि सदरहू निर्णयाबाबतचा विरोध पाहता शासनाने या निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्याबाबत करावयाची कार्यवाही " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(२) श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांनी, " दहिसर (पश्चिम) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सखाराम तरे शाळेच्या नूतन इमारतीचे दि. १५ जून, २०२३ रोजी राज्याचे विद्यमान शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या हस्ते अत्यंत घाईगडबडीत उद्घाटन करण्यात आले आहे. परंतु सदरहू नूतन इमारतीतील असुविधांमुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असणे " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(३) श्री. सुनील शिंदे वि.प.स. यांनी, " सर्वसामान्य मुंबईकरांचे मुंबईतील घराचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी महाहाऊसिंग योजनेंतर्गत मुंबईतच अत्यल्प आणि अल्प उत्पन्न गटासाठी घरे बांधण्याचे काम हाती घेण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(४) श्री. अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी, नागपूर येथील **NMRDA** चा एकूण विस्तारित योजनेचा आवाका लक्षात घेता अनेक ग्रामीण भागातील गोरगरीबांची घरे या योजनेमध्ये येत असल्यामुळे इतक्या मोठ्या स्वरूपामध्ये मोजणीचे शुल्क आकारल्यास सर्वसामान्यांवर मोठा आर्थिक भुर्दंड बसण्याची शक्यता " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(५) श्री. रमेशदादा पाटील वि.प.स. यांनी, " राज्यातील आदिवासी अनुदानित आश्रमशाळांना अनेक आजारांचा विळखा पडल्याने मागील पाच वर्षात विविध कारणांनी सुमारे ४६४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(६) श्रीमती उमा खापरे वि.प.स. यांनी, " कोरोना काळात आई किंवा वडील दगावले असे एकल पालक असलेले किंवा आई-वडील दोघांच्या मृत्यूमुळे जे अनाथ झाले अशा मुलांच्या शिक्षणासाठी व्यवस्था केलेल्या बाल न्याय निधीचे वाटप बहुतांश जिल्ह्यामध्ये संथगतीने सुरू असल्याचे माहे मे, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(७) श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स. यांनी, " दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या संयुक्त गट ब पूर्वपरीक्षा, २०२२ चा निकाल माननीय एमपीएससी आयोगाकडून तब्बल १० महिन्यांनंतर म्हणजेच दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला असणे, तसेच कोरोना काळापासून आजतागायत झालेल्या परीक्षांचा योग्य वेळी निकाल न लागल्याने आतापर्यंत घेतलेल्या प्राथमिक माहितीनुसार साधारणपणे दीड हजारांच्या आसपास उमेदवार इतर शासकीय पदावर नियुक्तीस पात्र ठरलेले असणे, त्यामुळे पोलीस उपनिरीक्षक मुख्य परिक्षेसाठी २० पट प्रमाण निश्चित करण्याची आवश्यकता " इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(८) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेता) यांनी, "छत्रपती संभाजीनगर येथील नारेगावमधील उद्योग नगर येथे लघु उद्योजकांची जवळपास ५०० ते ८०० युनिट असून या भागातील रस्ते, मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते, मलनिःस्सारण वाहिनी नादुरुस्त झाल्याने या भागातील उद्योग व्यवसायावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होत असणे, इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

अर्धा-तास चर्चा व विधेयकाच्या संदर्भात-

आजच्या कामकाजपत्रिकेत ज्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना होत्या, त्यातील सन्माननीय सदस्य श्री. सुनील शिंदे यांचे त्यांच्या चर्चेबाबत समाधान झाले आहे, असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे संबंधित विषयाचे माननीय मंत्री यांच्याशी त्यांची चर्चा होऊन अर्धा-तास चर्चा झाली असे धरण्यात येईल. तसेच विधानसभेत मांडलेल्या विधेयकाची प्रत विधानपरिषदेतील सन्माननीय सदस्यांना अभ्यासासाठी उपलब्ध करून दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी विधेयकाची प्रत पिजन होलमध्ये पहावी. आपल्याला विधेयकाची प्रत तेथे उपलब्ध झाली नाहीतर संबंधित कक्षाकडे विचारणा करावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१०. सर्वश्री विक्रम काळे, प्रवीण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, ॲड. निलय नाईक, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह

मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रवीण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. विक्रम काळे वि.प.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडल व भाषण केले. (भाषण अपूर्ण)

" अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडित असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील " पंचामृत " संकल्पनेत " शाश्वत शेती समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरू ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरू करणे, त्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वित करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात " बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची " स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी " मिशनन२०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने

आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, " मागेल त्याला शेततळे " योजनेच्या धर्तीवर " मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर " हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी " काजू फळपिक विकास योजना " लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून " गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना " आणि " गोमाई मूल्यवर्धन योजना " या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २ टक्के किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात " सलोखा योजना " राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून 'सुविधा संपन्न कुटुंब

मिशन' आणि 'सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना' राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना "

(चर्चा अपूर्ण.)

विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत-

सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी माझ्याकडे विशेषाधिकार भंगाची सूचना दिलेली आहे. आता त्यांनी आपली विशेषाधिकार भंगाची सूचना मांडावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांनी त्यांची विशेषाधिकार भंगाची सूचना उद्या मांडणार असल्याचे सांगितले.

बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३

१. (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार प्रश्न उत्तरीत झाले.

सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर आडबोले यांनी, चंद्रपूर शहरासह आजूबाजूच्या परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणे आणि मुंबईत अतिवृष्टी सुरू असल्यामुळे मुंबईतील शाळा बंद ठेवण्याबाबतचे धोरण ठरवणे याबाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले. तथापि या संदर्भात संबंधित माननीय मंत्र्यांनी दखल घेऊन सभागृहाला आज दुपारी ४.०० वाजण्याच्या आत अवगत करावे , असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

सदरहू मुद्यांची नोंद घेतली असून सभागृहाला या संदर्भातील माहिती देण्यात येईल, असे आपत्ती व्यवस्थापन तथा मदत व पुनर्वसन मंत्री यांनी सांगितले.

सदरहू मुद्यांबाबत दुपारी २.०० वाजण्याच्या सुमारास मध्यंतरानंतर सभागृहाला या संदर्भात अवगत करण्यात येईल, असे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

१. (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक प्रश्न उत्तरीत झाला.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील त्र्याहत्तर प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) पाणी पुरवठा व स्व ता मंत्र्यांनी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक प्रशासनिक अहवाल, लेखे व लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. माननीय उपसभापतींनी, आजजबुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत असल्याचे सांगितले.

४. माननीय उपसभापतींनी, आज नियम २८९ च्या ४ सूचना प्राप्त झालेल्या असून त्या सर्व सूचना दालनात नाकारल्या असून त्यातील काही सूचनांचे विषय महत्वाचे असल्यामुळे व काही प्रश्नांवर लोकांचे आंदोलन सुरू असल्यामुळे त्याची दखल घेऊन त्यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी देणार असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी वेळेचे बंधन पाळावे अशी विनंतीही केली.

(१) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी " राज्यातील गायरान जमिनींवर अनेक वर्षापासून बांधलेली घरे नियमित करण्याबाबत " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. जयंत पाटील, वि.प.स. व श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपापले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने सोमवारपर्यंत निवेदन करावे, असे निदेश माननीय उपसभापतींनी दिले.

तसेच शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या निवेदनामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही तर त्यांनी या विषयावर लक्षवेधी सूचना द्यावी, असेही माननीय उपसभापतींनी सांगितले.

(२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी " राज्यातील बेरोजगारांच्या संख्येत झालेली वाढ " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून विषय कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसला तरीही विषयाचे गांभीर्य लक्षात घेता त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(३) श्री. सचिन अहिर, वि.प.स.यांनी " मुंबईतील परळ येथील टाटा मेमोरियल कर्करोग रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कमिशनच्या नावाखाली रुग्णांच्या नातेवाईकांची फसवणूक होत असणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून विषय कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसला तरीही विषयाचे गांभीर्य लक्षात घेता त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडून या प्रकरणातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची विनंती शासनास केली.

यासंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय उपसभापतींनी दिले.

५. श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"राज्य परिवहन महामंडळाने आरामदायी प्रवासासाठी प्रवाशांच्या सेवेत आणलेली शिवशाही बस सुविधांपेक्षा अपघातांमुळे जास्त चर्चेत येणे, गेल्या काही दिवसांमध्ये शिवशाही बसला आग लागण्याच्या आणि अपघात होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली असणे, शिवशाही बसचे आतापर्यंत छोटे-मोठे ४०० पेक्षा जास्त अपघात झाले असणे, या अपघातांमध्ये महामंडळाच्या मालकीच्या शिवशाही बसचे अपघात जास्त असणे, सध्या महामंडळाच्या स्वमालकीच्या ९०० शिवशाही असून त्यापैकी ६०० बस प्रत्यक्ष रस्त्यावर धावत असणे, ९० शिवशाही भाडेतत्वावर असणे, शिवशाही बसेस प्रामुख्याने मुंबई-सातारा, बोरिवली-सातारा, नाशिक-शिवाजीनगर (पुणे) व कोल्हापूर-स्वारगेट (पुणे) या मार्गावर धावत असणे, शिवशाही प्रवासी भाडे साध्या बसपेक्षा २५ टक्के जास्त असणे, मार्गस्थ बिघाड, छोटे-मोठे अपघात,तखाजगी चालकांचे गैरवर्तन, पुशबॅक सीट, वातानुकूलित यंत्रणा अशा प्रवासीभिमुख सोईसुविधांचा बोजवारा उडाला असणे, शिवशाही बसला नादुरुस्ती व मार्गस्थ बिघाडीचे ग्रहण लागले असणे, कंत्राटी पध्दतीने चालकांची भरती यामुळे वाढते अपघाताचे प्रमाण, शासनाने एस.टी. महामंडळाच्या शिवशाही बसच्या समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

परिवहन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६. उप मुख्यमंत्र्यांनी, मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्रता संग्राम सेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठीचा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ३८ मिनिटांनी दुपारी ०३ वाजून ३० मिनिटांपर्यंत मध्यांतरासाठी स्थगित झाली.

मध्यांतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ०३ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते

(चर्चा अपूर्ण)

मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापननमंत्र्यांनी, 'चंद्रपूर जिल्ह्यातील ढगफुटी व सदृश्यस्थिती तसेच राज्यातील अतिवृष्टीबाबत केलेल्या उपाययोजना ' इ.बाबत म.वि.प.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करणे यासंदर्भात उप मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव -

चर्चा पुढे सुरूः—

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(२) श्री. सुरेश धस, वि.प.स. (३) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

(चर्चा अपूर्ण)

माननीय उप सभापतींनी, राज्यात पावसामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे सभागृहाचे काम थांबवावे लागत असल्याचे सांगितले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स., श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता व श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी याबाबत आपआपले म्हणणे मांडले.

गुरूवार, दिनांक २० जुलै, २०२३

उपमुख्यमंत्र्यांनी, " इरशालवाडी, ता.खालापूर, जि.रायगड येथे दरड कोसळून झालेले मृत्यू " इ.बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसेनानींना व हुतात्म्यांना अभिवादन करणे यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

प्रस्तावावरील चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. अरूण लाड (२) श्री.विक्रम काळे

(३) श्री. महादेव जानकर

माननीय उप सभापतींनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रस्ताव एकमताने संमत झाला.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५९ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक १२ वाजून ०५ मिनिटांनी माननीय उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सर्वश्री अंबादास दानवे, विलास पोतनीस, सचिन अहिर, सतेज उर्फ बंटी डी. पाटील, आमश्या पाडवी, भाई जगताप, वि.प.स. यांनी, "रायगड जिल्ह्यातील खालापूरजवळील इरशालवाडी येथे दरड कोसळून चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. प्रत्येक पक्षाच्या वतीने एकेक सदस्य नियम २८९ वर आपले विचार मांडतील असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

यासंदर्भात संसदीय कार्य मंत्र्यांनी सविस्तर खुलासा केला.

उपरोक्त सूचनेसंदर्भात सर्वश्री.सचिन अहिर, भाई जगताप, शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

श्री. प्रवीण दरेकर, "इरशालवाडी, माळीण व तळीये येथील घटनेच्या अनुषंगाने दरड प्रवण क्षेत्रामध्ये टप्प्या-टप्प्याने चार-पाच निवारा केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

भूगर्भशास्त्रानुसार शासनाने दरड-प्रवण भाग संदर्भातील अहवाल पटलावर ठेवण्यात यावा असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात संसदीय कार्य मंत्र्यांनी खुलासा केला.

आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक १ वर दर्शविण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक १८८३९ हा महिला व बालविकास मंत्री मदतकार्याकरिता घटनास्थळी गेलेल्या असल्यामुळे पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

१. (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात आला.

(३) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणसत्तर प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. कामगार मंत्र्यांनी," अठरा वर्षावरील अनाथांना लागू असलेल्या आरक्षण पद्धतीत सुधारणा करणे " या विषयावरील श्री.श्रीकांत भारतीय व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५५८ वरील चर्चेच्या वेळी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

सदनामध्ये मंत्री महोदय अनुपस्थित असल्यास त्यांच्या विभागातील अधिकाऱ्यांनी सदनामध्ये उपस्थित राहण्याची आवश्यकता आहे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.

गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या नियम ९३ अन्वये सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

३. डॉ. प्रज्ञा सातव, समिती सदस्या यांनी, शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास वेळ नेमून देण्यासंबंधीचे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत सभागृहाला सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

४. (ग) विधानसभेने संमत केल्यास विधेयक विचारात घेणे :-

उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

(१) श्री. विक्रम काळे (२) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील

विधेयकावरील चर्चेस उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहाला सादर करण्यात आले.

खंड २ ते २३ (दोन्ही सम्मिलित), खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री. अंबादास दानवे खालापूर येथे घटनास्थळी गेलेले असल्याने त्यांच्यासंबंधीची लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल यानंतर लक्षवेधी क्रमांक ३ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

५. (१) श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"सोनावडे (ता.फलटण, जि.सातारा) या गावातील कोळसा भट्टीवर काम करणाऱ्या महिला मजूरावर सामूहिक अत्याचार करण्यात आल्याची घटना दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, कोळसा उत्पादन करणाऱ्या भट्टीचा मालक व त्याच्यासह ५ व्यक्तींनी हे कृत्य केल्याचा आरोप पीडित महिलेने केला असून यासंदर्भातील तक्रार एका सामाजिक संस्थेने पीडित महिलेसह मांडवी पोलिस स्टेशन येथे नोंदविणे, भट्टीच्या मालकाने पीडित महिलेच्या मुलांना त्याच्या घरी डांबून ठेवून तिच्या पतीलासुध्दा धमकाविणे, नवऱ्याला व मुलांना जिवे मारण्याची धमकी देऊन या पीडित महिलेवर अत्याचार करणे, या भट्टीच्या मालकाविरुध्द या पूर्वीसुध्दा बालगुन्हेगारीच्या व अवैध कोळसा जमा केल्याचा गुन्हा नोंदविलेला असणे, याप्रकरणी गुन्हेगारांविरुध्द कडक कारवाई करण्याची व गरीब कातकरी कुटुंबाला कोळसा उत्पादन करणाऱ्या भट्टीच्या मालकांपासून संरक्षण देण्याची होत असलेली मागणी, याप्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना. "

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे विशेष सहाय्य मंत्र्यांचे लक्ष वेधले

"राज्यातील संजय गांधी योजनेतील अपंग लाभ धारकांच्या मुलाचे वय २५ वर्षे झाल्यावर तसेच त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास त्यांचे अनुदान बंद करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, दिनदुबळ्या शरीराने कमकुवत असणाऱ्या ज्यांना कामधंदा करता येत नाही, अशा अपंगांना जगणे अतिशय अवघड झालेले असणे, यामुळे त्यांना अर्थसहाय्य देण्याची नितांत आवश्यकता असणे, कायद्यानुसार अपंगांना शासकीय नोकऱ्या दिल्या असत्या तर आज एकही अपंग बेरोजगार व निराधार दिसला नसता व त्यांच्यावर भीक मागण्याची वेळ आली नसती, याकरीता अपंगांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्यास कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी त्यांच्या मुलाच्या वयाची तसेच वार्षिक उत्पन्नाची अट रद्द करण्यात यावी, यासाठी मागील पाच वर्षापासून लाभधारकांनी सर्व संबंधित मंत्री व अधिकारी यांचेकडे वारंवार निवेदने दिली असणे, तसेच मोर्चे काढले असणे, उपोषण केले असणे, तरीसुध्दा शासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात

आली नसल्यामुळे दिनांक ११ जून, २०२३ रोजी तपोवन मैदान, कोल्हापूर येथे शंखध्वनी व ठिय्या आंदोलन करण्यात येणे, सबब शासनाने अपंगाच्या मुलांच्या वयाची तसेच उत्पन्नाची अट रद्द करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

विशेष सहाय्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक ५ ही नगर विकास विभागाशी संबंधित आहेत, नगर विकास विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे ती लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असून लक्षवेधी सूचना क्रमांक ६ घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (एमडब्ल्यूआरआरए) राज्यात घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत केलेली वाढ दिनांक १ जुलै, २०२२ पासून लागू करण्यात आली असणे, त्यानुसार कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ३३० रुपये मोजावे लागणार असणे, डिस्टलरीकडील अल्कोहल व इथेनॉल उत्पादनाकरिता होणारा पाणीवापर हा कच्चा माल गृहीत धरुन सुधारित दराने पाणी बिलाची आकारणी होणाररअसणे, सन २०१८ च्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होत असणे, उद्योगात शितपेये, आसवानी (ब्रुअरिज) मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग यांचा समावेश असल्याने डिस्टलरी करिता रेग्युलर दराने पाणीपट्टी आकारण्यात येत असणे, पण शासनाच्या सन २०२२ च्या परिपत्रकामध्ये बाटलीबंद पिण्याचे पाणी, शितपेये, स्पिरीट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरिज, आसवानींना (डिस्टलरीज) व तत्सम उद्योगांचा पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होणाऱ्या उद्योगात समावेश केलेला असणे, त्यामुळे डिस्टलरीकरिता प्रति हजार लिटरमागे रु. ११.५२ वरुन रु. ३३० दरवाढ झालेली असणे, सदरची दरवाढ डिस्टलरी उद्योगास परवडणारी नसल्याने त्याचा डिस्टलरी उद्योगावर विपरित परिणाम होऊन उत्पादन निर्मितीला फटका बसणे, त्यामुळे डिस्टलरी उद्योगात पाण्याचा वापर हा थेट कच्च्या मालासाठी होत नसून तो प्रक्रियेसाठी होत असल्याने म्हणजेच औद्योगिक कारणासाठी होत असल्याने डिस्टलरी युनिटसाठी औद्योगिक पाणीवापर दरानुसार पाणीपट्टी आकारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधल :—

"अकोला जिल्ह्यातील २३६७ शेतकऱ्यांचे ११२ सहकार सोसायटी व जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांचे संमतीपत्र न घेता परस्पर पुनर्गठन करण्यात आल्याचे आढळून येणे, त्यामुळे नवीन कर्ज मिळण्याप्रकरणी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यानुसार संबंधित सर्व शेतकऱ्यांची मिळून १३.६४ कोटी थकीत कर्जे शेतकरी लाभापासून वंचित राहिल्यामुळे थकीत कर्जास माफी मिळणेसाठी मागणी केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी केलेल्या चौकशीअंती उघडकीस आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे संबंधित ११२ सहकारी सोसायट्या तात्काळ बरखास्त करून या सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द तसेच अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक व्यवस्थापनाविरुध्द पोलिसात गुन्हे दाखल करण्याची शेतकरी वर्गाकडून तसेच काही राजकीय पक्ष कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेली मागणी, परिणामी पर्यायाने शासनाची व जनतेची करण्यात आलेली फसवणूक, यामुळे सदर रक्कमेची कर्जे माफ करण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात येणे, त्यामुळे संबंधित सहकारी सोसायट्या बरखास्त करून त्यावर प्रशासकीय मंडळे स्थापन केल्यास, तरुणवर्गाला नोकरीची संधी मिळण्याची शक्यता लक्षात घेता त्याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले -

"राज्यातील ओबीसी विभागांतर्गत केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या अनेक प्रकारच्या योजना विद्यार्थ्यांकरिता सुरू असताना तशा प्रकारच्या योजना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अधिक फायद्याच्या ठरत असल्यामुळे दुसरीकडे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारा लाभ त्या तुलनेमध्ये कमी प्रमाणात असून ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राज्यात कुठल्याही शिक्षण संस्थेमध्ये शिकत असताना त्या ठिकाणी राहण्याकरिता व्यावसायिक अभ्यासक्रम अथवा पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला जाणे, राज्य शासनाच्या वतीने मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणे, तसेच ज्या तालुक्यामध्ये अथवा जिल्ह्यामध्ये तशा पध्दतीची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये मोफत राहण्याची व्यवस्था न झाल्यास

बार्टीच्या माध्यमातून स्वाधार योजनेंतर्गत वसतिगृहाच्या व्यतिरिक्त इतरत्र राहण्याकरिता तेव्हा त्यांच्या त्या विद्यार्थ्यांना वसतिगृह भत्ता दिला जातो, परंतु ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राज्य शासनाने गेल्या तीन वर्षापासून प्रत्येक जिल्ह्यामध्ये ७२ वसतिगृहाची घोषणा केल्यावर सुध्दा प्रत्यक्षात राज्याच्या वतीने या वसतिगृहाची प्रत्यक्षात उभारणी न करणे, अथवा भाड्याने इमारत घेऊन हे वसतिगृह सुरू करण्यात आले नसणे, माहे मार्च, २०२३ च्या अधिवेशनामध्ये आणि अनेक सार्वजनिक सभेमध्ये संबंधित मंत्री महोदयांनी सत्र २०२३-२४ पासून विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी या ७२ वसतिगृहाची सोय करून देण्याचे आश्वासन देऊन सुद्धा अद्याप कुठल्याही प्रकारच्या वसतिगृहाची तयारी शासनाच्या वतीने करण्यात आली नसणे, सत्र २०२३-२४ च्या सर्व वसतिगृहामार्फत पारंपारिक अथवा व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून अद्यापही शासनाच्या वतीने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची तयारी करण्यात आली नसणे, हे अन्यायकारक असणे, त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, या संदर्भात शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला असणे, परंतु प्रत्यक्षात त्याची सुध्दा अंमलबजावणी करण्यात आली नसणे, परंतु व्यावसायिक अभ्यासक्रमाशिवाय पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश मिळण्याकरिता संबंधित शासन निर्णयामध्ये उल्लेख नसल्याने तसा शासन निर्णयामध्ये बदल करणे आवश्यक असणे, तसेच बार्टीच्या माध्यमातून स्वाधार योजना राबविल्या जाते, त्याच धर्तीवर वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळणाऱ्या आणि स्वतः इतरत्र राहण्याची सोय करणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना दर महिन्याला वसतिगृह भत्ता महाज्योतितर्फे तात्काळ प्रभावाने लागू करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

इतर मागास बहुजन कल्याणणमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, “ बेडग, ता. मिरज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची स्वागत कमान पाडणाऱ्यावर कारवाई करणे ” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

शासनाने या गंभीर विषयाच्या संदर्भात निवेदन करावे असे माननीय तालिका सभापती यांनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ३ वाजून ०५ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

६. (१) उच्च व तंत्र शिक्षणणमंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ८ - एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) उच्च व तंत्र शिक्षणणमंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ९ - डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(१) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, राज्यातील मूर्तीकारांमधील संभ्रम दूर करण्यासाठी पीओपी वापराबाबतचे धोरण शासनाने तातडीने जाहीर करण्याची आवश्यकता इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, वि.प.स. यांनी, कोल्हापूर महानगरपालिकेत शासनाने तातडीने आयुक्तांची नियुक्ती करण्याची आवश्यकता इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, महाराष्ट्र राज्य निवासी डॉक्टर्स राज्यव्यापी मध्यवर्ती मार्ड संघटनेच्या मागण्या प्रलंबित असणे इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(२) श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स. यांनी, राज्यात धुळे जिल्ह्यातील आदिवासी कोळी ढोर - टोकरी कोळी, मल्हार कोळी, महादेव कोळी आदी समाज बांधवांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी विरंगणा झलकारी बाई कोळी श्री शक्ती सामाजिक संस्थेच्या वतीने गीतांजली कोळी यांनी सुरू केलेले उपोषणण इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(३) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये राज्य सरकारने एकूण तरतुदीच्या ७२.४ टक्के एवढाच खर्च केल्याचे स्पष्ट होणे इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(४) श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, सन २०२१ मध्ये झालेल्या एम.पी.एस.सी. मार्फत पोलीस उपनिरिक्षक पदाकरिता शारीरिक चाचणी घेण्यात यावी इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(५) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, गोराई गावातील कल्वेम तलाव आणि आसपासच्या पाणथळ परिसरामध्ये बांधकाम किंवा काँक्रीटीकरण योग्य नसताना या ठिकाणी बांधकाम करण्यात येणे इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(६) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी, राज्यात सन २०१० पासून शिक्षक भरती झालेली नसणे इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(७) श्री.महादेव जानकर, वि.प.स. यांनी, "जम्मू-काश्मीर येथील अनंतनाग लाल चौक येथे गलाई व्यवसायानिमित्त गेलेला अक्षय पाटोळे, मौजे राजेवाडी, ता.आटपाडी जि.सांगली येथील तरुण दहशतवाद्यांच्या हल्ल्यात जखमी होणे" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(८) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "बोरीवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात नाटक पाहण्यासाठी येणाऱ्या प्रेक्षकांकडून वाहन पार्किंगसाठी भरमसाठ शुल्क आकारण्यात येत असणे ' इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(९) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना विविध दैनंदिन व महत्त्वाच्या सोयी-सुविधा देण्यासाठी कर्मचारी वर्ग अपुरा पडत असल्याने सद्यःस्थितीत ठेका पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा विचार करता भरती प्रक्रियेत ठेका पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्याची आवश्यकता" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१०) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, "मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थी पट संख्या कमी होणे तसेच पट कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांना सेवासंरक्षण देऊन रिक्त होणाऱ्या तुकड्यांवर समायोजन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(११) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, "मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील क्रीडा संकुलात १७ वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही जलतरण तलावाचे बांधकाम अपूर्ण असणे, या जलतरण तलावाच्या बांधकाम नियोजनातील त्रुटी दूर करून सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१२) श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स. यांनी, "राज्यात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात माळशेज घाट आदिवासी वाड्यांवर कुपोषणाचा बाल विकास विभागाने केलेल्या सर्वेक्षणात २४१ बालके कुपोषित आढळणे" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१३) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी, राज्यामध्ये दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या सवलती आणि योजनेमध्ये एकूण २१ पैकी ९ दिव्यांग प्रवर्गातील लोकांनाच प्रत्यक्षात लाभ देण्यात येत असणे" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१४) श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, "महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी चालवित असलेल्या मत्स्य व्यवसाय विभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांना सहकार्य होत नसल्याचे दिसून येणे" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१५) श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी, "राज्यात नुकत्याच चालू झालेल्या शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याचे दर २५ ते ३५ टक्क्यांपर्यंत वाढले असल्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला शैक्षणिक साहित्यांच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी एखादी समिती नियुक्त करण्याची आवश्यकता." इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, "परळ येथील कॅन्सर रुग्णालयांमध्ये रुग्णांची पिळवणूक होत असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

ॲड. निरंजन डावखरे, तालिका सभापती यांनी, मंगळवार दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी सभागृहात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते, ॲड. अनिल परब, वि.प.स., श्री. जयंत पाटील, श्री. शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांनी, माननीय उपसभापती यांच्या सदस्यत्वाच्या अपात्रतेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या काही मुद्यांचा परामर्श थोडक्यात नमूद केला तसेच त्या परामर्शाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेमध्ये श्री.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व श्री.सुधीर मुनगंटीवार, वने मंत्री यांनी मांडलेल्या संविधानिक तरतुदी व पक्षांतराच्या बाबतीत घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत महाराष्ट्र विधान परिषद सदस्य (पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता) नियम, १९८६ आणि भारतीय संविधानातील १० व्या अनुसूची मधील तरतुदी (अनुच्छेद १०२ (२) आणि १९१ (२) पक्षांतराच्या कारणावरून निरर्ह होण्यासंबंधी उपबंध) सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊन संविधानातील १० व्या अनुसूची मधील परिच्छेद ५ मध्ये काय म्हटले आहे ते नमूद करून यासंदर्भात निर्णय दिला असल्याचे सांगितले.

शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३

सर्वश्री विक्रम काळे, प्रवीण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, निलय नाईक, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :—

" अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या

सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील " पंचामृत " संकल्पनेत " शाश्वत शेती-समृध्द शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरू ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरू करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वीत करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात " बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची " स्थापना करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी " मिशन २०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षात ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान राबविण्यात येणे, " मागेल त्याला शेततळे " योजनेच्या धर्तीवर " मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर " हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी " काजू फळपिक विकास योजना " लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर

पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईल द्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून "गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना" आणि "गोमाई मूल्यवर्धन योजना" या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून "सुविधा संपन्न कुटुंब मिशन" आणि "सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना" राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी "माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी" हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी "एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुरेश धस (२) श्री. एकनाथराव खडसे

(३) श्री. गोपीचंद पडळकर (४) श्री. नरेंद्र दराडे

श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, "रायगडमधील इर्शाळवाडी येथे झालेली भूस्खलनाची घटना आणि पुनर्वसन" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनीदेखील उक्त मुद्याच्या अनुषंगाने आपले मत मांडले.

कृषी मंत्र्यांनी उपरोक्त मुद्याबाबत सभागृहाला माहिती केली.

म.वि.स. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू)

प्रस्तावावरील चर्चेत श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी भाग घेतला.

(भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजू ५० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२-०० वाजता स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

१. (१) माननीय उपसभापतींनी एक तारांकित प्रश्न क्र. (१९१०५) पुकारला.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, "मणिपूरमध्ये महिलांवर झालेला अत्याचार" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय उपसभापतींनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

१. (१) पाच तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकावन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. आज शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २२ मिनिटांनी मध्यंतरासाठी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

३. (१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ८- एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ९—डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

४. सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, जयंत पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, कपिल पाटील, किशोर दराडे, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले :—

" राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे, राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता असणे, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, " शासन आपल्या दारी " उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना-नांदेड महामार्गाचे काम कूर्मगतीने सुरू असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड- लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बुलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या " ना उद्योग " भागातील सहकारी साखर कारखान्याना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड-औरंगाबाद- परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरूवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे, मराठवाडा व विदर्भात

नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण ऊर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, राज्यात वाढलेला वीज दर, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करूनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या व अंगणवाडी सेविकांचा पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्याच्या शिक्षणाचा दर्जा खालावला असणे, राज्यात कोयता गॅंगची वाढलेली दहशत, सोशल मिडीयावर लोकांना धमक्या देण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा मध्यम वर्गाला होणारा त्रास, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, बार्टी, महाज्योती व सारथी विभागाच्या गलथान कारभारांमुळे लाखो विद्यार्थी प्रशिक्षणा पासून वंचित रहाणे पर्यायाने त्यांचे शैक्षणिक व रोजगार संदर्भात नुकसान होणे, ग्रामपंचायत व जिल्हापरिषदेच्या निवडणुका घेण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या थकीत मागण्या, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे ४० हजार कोटी येणे बाकी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या कामाचे अद्यापही पैसे न मिळणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, राज्य सरकारने पुरवणी मागणी व अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विविध खात्यामध्ये जाहीर केलेली तरतूद तथापि प्रत्यक्षात निधी मिळण्यास होत असलेला विलंब, त्याची पूर्तता करण्यास आलेले अपयश, विविध विकासकामांना मंजुरी तथापि निधी अभावी कामे प्रलंबित असणे, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(चर्चा अपूर्ण)

सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३

आज दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी व श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी " निधी मंजूर करताना विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना सापत्न वागणूक देण्यात येणे " या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना थोडक्यात व प्रातिनिधीक स्वरुपात बोलण्याची परवानगी देण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

सर्वश्री. भाई जगताप, सचिन अहिर, वि.प.स. यांनी देखील उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

१. (क) (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पन्नास प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ख) सचिव-२ (कार्यभार) यांनी, सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(ग) सचिव-२ (कार्यभार) यांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी व नववी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

२. (१) उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी, (अ) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल, (ब) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (क) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल, (ड) महाराष्ट्र विद्युत नियमक आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) उप मुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री यांनी, शासनाच्या नगरविकास विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमीविषयीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

३. (१) श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांनी, " अकोला जिल्ह्यातील ६ मंडळांत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. रामराव पाटील वि.प.स.यांनी, " नांदेड जिल्ह्यातील ६८ मंडळांपैकी ४५ मंडळांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांनी, सातारा पुणे येथे होत असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला मुलांना बसू देण्यात आलेले नसणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

याबाबत उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी खुलासा केला.

(३) श्री.अनिकेत तटकरे वि.प.स. यांनी, " रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात १९,२० व २१ जुलै, २०२३ रोजी अतिमुसळधार पाऊस झाल्याने हमरापूर येथील गणेशमूर्ती कार्यशाळांचे तसेच भातशेती व मत्स्यशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) डॉ.मनिषा कायंदे वि.प.स. यांनी, " नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील पोहणे येथील रविवारी १६ जुलै, २०२३ रोजी कृष्णा सोनावणे या मुलाची झालेली हत्त्या हा नरबळीचा प्रकार असल्याचा संशय गावकरी व्यक्त करीत असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री यांनी याबाबत नोंद घेतली.

(५) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी, " गडचिरोली जिल्ह्यात शेकडो गावे पाण्याखाली आलेली असणे, त्याचप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील जवळपास ५०० ते ७०० घरांमध्ये पुराचे पाणी शिरले असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

४. आज सोमवार दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी नियम ९३ अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्यापैकी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

(१) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, " मुंबई शहर व उपनगरातील पालकमंत्र्यांना मुंबई महानगरपालिकेत कार्यालय उपलब्ध करून देण्यात येणे " या विषयाबाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात आली आहे. परंतु विषय महत्वाचा असल्यामुळे त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सुनिल शिंदे, ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात खुलासा केला.

(२) श्री.भाई जगताप वि.प.स. यांनी, " विदर्भातील यवतमाळ, अकोला, भंडारा आणि बुलढाणा येथे दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या अतिवृष्टीमुळे आर्थिक व जीवितहानी होणे " या विषयाबाबत

नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात आली आहे. तथापि, सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.भाई जगताप वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात खुलासा केला.

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " मराठवाड्यात पेरणी योग्य पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांना तत्काळ मदत करणे " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५. (१) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातर्फे जे कामगार मंडळाचे सदस्य आहेत अशा कामगारांसाठी मध्यान्ह भोजन देण्याचा निर्णय घेण्यात येणे, या कामगारांना शासनातर्फे मोफत पोटभर भोजन देण्याची व्यवस्था असून कामगारांना मोफत भोजन देण्यात येत असणे, या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून ज्या कामगारांनी नोंदणी केलेली आहे अशा कामगारांना दोन्ही वेळेचे मोफत भोजन न देता काही ठिकाणी ऊसतोड कामगाराचे बनावट नावे देऊन केलेला भ्रष्टाचार, जळगाव जिल्हयात या योजनेचे तब्बल ४७,००० बोगस लाभार्थी दाखवून होत असलेला कोट्यवधीचा गैरव्यवहार, एकटया जळगांव जिल्हयात सप्टेंबर, २०२२ ते एप्रिल, २०२३ दरम्यान ५४ कोटीची बोगस बिले काढणे, जळगाव व शहर परिसरातील गावांमध्ये या योजनेस कामगारांची बनावट यादी देण्यासाठी काही राजकीय पक्षांशी संबंधित कार्यकर्ते या कार्यक्रमात बोगस बनावट कामगारांची नोंदणी करीत असून राज्यातील हा सर्वात मोठा घोटाळा असल्यामुळे या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबतची यादी पुरविणारे एजंट सक्रिय असणे, जळगाव जिल्हयात या योजनेसाठी सरसकट मतदार यादीच जोडण्यात येणे, जेवणाच्या यादीत अनेक प्रतिष्ठित व मयत लोकांची यादी जोडणे, भुसावळ रस्त्यावरील गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेल्या एका बांधकाम साईटवर दिडशेपेक्षा जास्त कामगारांना जेवण दिल्याचा दावा करण्यात येत असणे, दिननगर येथील औष्णिक वीज केंद्रात दररोज २००० कामगारांना दोन्ही वेळेचे जेवण दिल्याचे दाखवून बोगस बिले काढणे, २५९ दिवसात एकही कामगार गैरहजर नसल्याचे दाखविणे, प्रत्यक्षात फक्त ३८ डबे पुरविण्याचे सिध्द होणे, परंतु येथील सर्व मजूर घरुन स्वतःचे भोजन सोबत आणत असून ते या योजनेचा लाभ घेत नसल्याची बाब उघडकीस आलेली असणे, राज्यात या योजनेत कोट्यवधीचा गैरव्यवहार होत असल्याची शक्यता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया.

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३२ मिनिटांनी मध्यंतरासाठी स्थगिती झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी स्थगिती झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

"देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्र मोदी यांनी माननीय मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेले ट्विट " इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(२) श्री.अमोल मिटकरी वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"इंडिक टेल्स व हिंदू पोस्ट या वेबसाईटवर स्त्री शिक्षणाच्या जनक आद्यसमाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी अत्यंत खालच्या पातळीचे लिखाण करण्यात आलेले असणे, या लेखातील भाषा अत्यंत अपमानास्पद असून याचा धिक्कार राज्यातील सर्व स्तरातून होत असणे, स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले असून शिक्षण देत असताना २० व्या शतकातील काही जातीय व्यक्तींकडून त्यांच्यावर दगडधोंडे व शेणाचा मारा त्यांनी अंगावर झेललेला असणे, २१ व्या शतकात देखील काही जातीयवादी शक्ती पुन्हा एकदा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंवर चिखलफेक करीत असून या पोर्टलवर 'इतिहासाची पुनर्मांडणी' या नावाखाली इतिहासाची अक्षरशः मोडतोड सुरू असून ही समाजविघातक वृत्ती ठेचण्याची होत असलेली मागणी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविरोधात आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्या 'इंडिक टेल्स' व 'हिंदू पोस्ट' या वेबसाईट तात्काळ बंद करून वेबसाईट चालविणाऱ्या व लिखाण प्रसार करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबत बऱ्याच लोकप्रतिनिधींनी मुंबईचे पोलिस आयुक्त यांची भेट घेऊन देण्यात आलेले निवेदन, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील आयुर्वेदिक कॉलेजमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम (एमडी, एमएस) आयुर्वेद प्रवेशासाठी मराठी विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय, यासंदर्भात विद्यार्थी व लोकप्रतिनिधी यांनी माहे मे व जून, २०२३ मध्ये शासनाला दिलेली लेखी निवेदने, फक्त महाराष्ट्र राज्यातून पदवी घेणाऱ्यांनाच राज्य राखीव जागातून प्रवेश देणे, मात्र मूळ महाराष्ट्रीयन विदयार्थ्यांनी केवळ राज्याबाहेरून पदवी घेतल्याने स्टेट कोट्यातून प्रवेश नाकारणे, त्यामुळे त्यांना केवळ १५ टक्के जागा उपलब्ध होणे, सन २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षांत एमडी आयुर्वेदच्या ८४९ जागा रिक्त ठेवून इच्छुक मराठी विद्याथ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे, आयुष मंत्रालय भारत सरकारने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी सूचनेव्दारे ८५ टक्के जागांबाबत नियम करण्याचे राज्य सरकारला दिलेले अधिकार, कर्नाटक व मध्यप्रदेशने तेथील मूळच्या विद्यार्थ्यांना स्टेट कोट्यातून प्रवेश देण्यासाठी केलेले नियम, महाराष्ट्र राज्य सरकार नियमात सुधारणा करण्याबाबत करीत असलेली टाळाटाळ, शासन कारवाई करीत नसल्याने आयुर्वेद विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष यावर शासनाकडे तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

उप मुख्यमंत्र्यांनी," यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर व इतर जिल्हे येथील पूर परिस्थितीच्या आढावा व उपाययोजा " इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

६. उद्योग मंत्री यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) सन २०२३ चे वि.स.विधेयक क्रमांक -२० महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते)
(२) श्री. सुनील शिंदे
(३) श्री. एकनाथराव खडसे
(४) श्री. शशिकांत शिंदे
(५) श्री. अभिजीत वंजारी
(६) श्री. सचिन अहिर
(७) श्री. जयंत प्र. पाटील
(८) श्री.राजेश राठोड

(९) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (१०) श्री.प्रवीण दरेकर

(११) डॉ.मनिषा कायंदे

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(५) डॉ. वजाहत मिर्झा वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील भटक्या व विमुक्त जाती जमाती अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष सुरू होताच जून महिन्या दरम्यान मिळणारे ४०% व ६०% अनुदान अद्याप मिळालेले नसणे, या महाविद्यालयांना अद्याप अनुदान न मिळाल्याने या संस्था आर्थिक विवंचनेत असणे, अनुदाना अभावी या शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन रखडलेले असणे, तसेच या महाविद्यालयांमध्ये भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयातील प्राध्यापकांची पदे अनेक वर्षे रिक्त असणे, या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होत असणे, शासनाकडून भटक्या व विमुक्त जाती जमाती अंतर्गत या महाविद्यालयांना अनुदान मिळत नसल्याने येथील ही पदे भरणे महाविद्यालयांना दुरापास्त झालेले असणे, या सर्वांचा परिणाम या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असणे, भटक्या व विमुक्त जाती जमाती महाविद्यालयांना अनुदान मिळावे आणि भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र ही रिक्त असलेली पदे तातडीने भरावी याबाबत विद्यार्थी व संस्थेकडून सातत्याने शासनाकडे मागणी होत असणे, अद्याप या मागणीबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नसल्याने विद्यार्थी व संस्थाचालकांमध्ये शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, भटक्या व विमुक्त जाती जमाती महाविद्यालयांमध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांची भरती तातडीने करण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांनी," पत्रकारितेच्या नावाखाली आर्थिक लाभ होत आहे म्हणून एखाद्या व्यक्तीला बदनाम करणे, त्या आर्थिक लाभापोटी अशा पध्दतीने त्या व्यक्तीची प्रतिमा समाजात मलिन करणे " या विषयासंदर्भात खाजगी युटयूब वाहिनीच्या पत्रकारांविरूद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना मांडली.

सन्माननीय सदस्यांनी जी विशेषाधिकार भंगाची सूचना दिलेली आहे ती मला प्राप्त झाली असून त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(६) श्री. श्रीकांत भारतीय वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत ब्रेन डेड रूग्ण किंवा जिवंत व्यक्ती यांच्याकडून अवयवदान घऊन राज्यात अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पाडण्यात येत असणे, ब्रेन डेड रूग्णाकडून अवयवदान मिळण्याकरिता संबंधित रूग्णांच्या नातेवाईकांना झोनल ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटीकडे नोंदणी करणे आवश्यक असणे, तसेच सद्यःस्थितीत मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत जिवंत व्यक्तीकडून अवयवदान स्विकारताना सदरहू जिवंत व्यक्ती संबंधित रूग्णाचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी असणे आवश्यक तथा बंधनकारक असणे, जिवंत व्यक्तीकडून सदरहू कायद्याच्या अंतर्गत अवयवदान संपन्न होण्यासाठी संबंधित रूग्णालयातील स्थानिक प्राधिकरण समिती (LOCAL A THORISATIONS COMMITTEE) समोर संबंधित रूग्णाला / नातेवाईकांना त्यांचे प्रकरण सादर करून रूग्णाचे व अवयव दात्याचे नाते प्रस्थापित करणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच रूग्णांमध्ये व अवयव दात्यांमध्ये कोणत्याही स्वरूपाची आर्थिक देवाण घेवाण होत नाही, इत्यादी बाबतची पडताळणी प्रक्रिया पार पाडावी लागत असणे, बहुतांशवेळा संबंधित रूग्णाचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी यांच्यापैकी कोणीही अवयवदान करण्यास उपलब्ध नसल्यास अथवा वैद्यकीय निकषांवर पात्र नसल्यास आणि संबंधित रूग्णाचे अन्य नातेवाईक अवयवदान करण्यास इच्छुक / उपलब्ध असल्यास केवळ मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने लोकल ऑथोरायझेशन कमिटीला याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याने अशा रूग्णांना अनेक वर्षे ब्रेन डेड रूग्णांकडून अवयवदान मिळण्याच्या प्रक्रियेकडे वाट पहावी लागत असणे, तसेच लोकल ऑथोरायझेशन कमिटीने एखादे प्रकरण नामंजूर केल्यास संबंधित रूग्णाचे नातेवाईकांना अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दाद मागता येत असणे, तथापि अपिलीय प्राधिकारी यांना मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत त्यांच्या सांविधानिक पदास मर्यादित अधिकार असल्याने बहुतांशी प्रकरणात लोकल ऑथोरायझेशन कमिटीचाच निर्णय कायम ठेवण्यात येत असणे, त्यानंतर रूग्णाचे नातेवाईक जरी मा.उच्च न्यायालयात दाद मागू शकत असले तरी त्यामध्ये अनिश्चित कालावधी लागत असल्याने व अवयव प्रत्यारोपणासंबंधीचा निर्णायक कालावधी वाया जात असल्याने या प्रकरणी संबंधित रूग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांना अतोनात मानसिक, शारीरिक व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, सदरहू बाब

लक्षात घेता या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे एक निवृत्त न्यायाधीश तसेच एक निवृत्त प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी व मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण या विषयातील एका ज्येष्ठ तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या एका त्रिसदस्यीय आयोगाची स्थापना केल्यास सदरहू बाब उपयुक्त ठरणे, या आयोगाने त्रैमासिक पध्दतीने त्यांच्यासमोरील सादर प्रकरणांची नियमितपणे सुनावणी घेतल्यास व सदरहू आयोगास निर्णय घेण्याच्या अनुषंगाने राज्य गुप्तचर विभाग किंवा अवयव प्रत्यारोपणासंबंधीच्या शासकीय यंत्रणेचे सहाय्य दिल्यास या प्रकरणी अनेक गरजू रूग्णांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण होणे, सबब अशा आयोगाची निर्मिती करण्याबाबत व तसेच अवयवदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या ज्या रूग्णांचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी यांच्यापैकी कोणीही अवयवदान करण्यास उपलब्ध नसल्यास अथवा वैद्यकीय निकषांवर पात्र नसल्यास संबंधित रूग्णाचे अन्य इच्छुक नातेवाईक यांना अवयवदानाची मान्यता देण्याचे अनुषंगाने प्रस्थापित कायद्यात बदल / सुधारणा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची याबाबतची नेमकी भूमिका."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७. शुक्रवार, दि. २१ जुलै व सोमवार, दि. २४ जुलै, २०२३ रोजी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

८. शुक्रवार दि. २१ जुलै व सोमवार दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी नियम १०१ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

९. "शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाला विद्यमान शासनाने दिलेले परमोच्च स्थान " इ. बाबत दिलेला सर्वश्री विक्रम काळे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव,

तसेच

"राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह इतर विविध विषयांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष " इ. बाबत दिलेला सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव.

उपरोक्त दोन्ही प्रस्तावावरील एकत्रित चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते) (२) श्री. प्रवीण दरेकर

(३) श्री. अभिजीत वंजारी (४) श्री. रमेशदादा पाटील

(५) श्री. अरून लाड (६) श्री. राजेश राठोड

(७) श्री. सुरेश धस (८) श्री. शशिकांत शिंदे

चर्चा अपूर्ण.

मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३

"शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाला विद्यमान शासनाने दिलेले परमोच्च स्थान" या विषयावर सर्वश्री विक्रम काळे, प्रवीण दरेकर, चंद्रशेखर बावनकुळे, रामराजे नाईक-निंबाळकर, ॲड. निलय नाईक, सर्वश्री प्रसाद लाड, सतीश चव्हाण, सुरेश धस, रामराव पाटील, अनिकेत तटकरे, रणजितसिंह मोहिते-पाटील, अमोल मिटकरी, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रवीण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेश कराड, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

तसेच

"राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह इतर विविध विषयांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी डी. पाटील, एकनाथराव खडसे, जयंत पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, कपिल पाटील, किशोर दराडे, नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाले)

उपरोक्त प्रस्तावांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. प्रज्ञा सातव (२) श्री. महादेव जानकर

(३) श्री. सुधाकर अडबाले (४) प्रा. राम शिंदे

कृषी मंत्र्यांनी उपरोक्त प्रस्तावांवरील चर्चेस उत्तर दिले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते, यांनी उत्तरादाखल भाषण केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाने दोन्ही प्रस्तावांवर विचार केला आहे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४६ मिनिटांनी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पस्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. शालेय शिक्षण मंत्र्यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. माननीय उप सभापतींनी, आज मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत असल्याचे सांगितले.

४. (१) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी " कृषणार (ता. भामरागड, जि. गडचिरोली) येथील अतिदुर्गम भागात रुग्णवाहिका न मिळाल्याने मृतदेह दुचाकीला खाट बांधून मूळ गावी घेऊन जाणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने अधिवेशन संपण्याअगोदर निवेदन करावे, असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

(२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी " मुंबईतील पोलिसांची रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा घेतलेला निर्णय " या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले .

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी देखील यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने गांभीर्याने निवेदन करावे, असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, " नवी मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी शिक्षक ठोक मानधनावर अनेक वर्षापासून काम करीत असून त्यांना ठोक मानधन न देता वेतनवाढदेखील न दिल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेतील अनेक महिला शिक्षिकांनी सुरू केलेले आमरण उपोषण. " इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी, असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, "मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या चळवळीसंदर्भात गिरणी कामगारांच्या शिष्टमंडळाला बोलावून घेऊन त्यांच्याशी चर्चा करून त्यांचा प्रश्न समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची आवश्यकता." इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी, असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

५. (१) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरण महापालिका आणि एमएमआरडीएने करण्याचे ठरविले असले तरी गेल्या १७ वर्षापासून मिठी नदी गोड होणाच्या प्रतिक्षेत असून यावर १३०० कोटी रुपये खर्च करूनही मिठीचे सौंदर्यीकरण पूर्ण झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या व्यतिरिक्त आणखी १ हजार कोटी विविध कामांसाठी खर्च केले जाणार असून या दोन्ही प्राधिकरणांनी मिठीसाठी बहुतांश कामे केली असली तरी प्रत्यक्षात मात्र प्रदूषणापासून मिठी नदीला मुक्ती मिळाली नसणे, प्रत्यक्षात जी कामे होती ती झालीच नसल्याने यामध्ये सर्विस रोड, नालेसफाई, सुशोभीकरणाचा समावेश असणे, सदर कामाकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहराला पावसाळ्यात पुरापासून वाचविण्यासाठी मिठी नदीच्या पुनर्जीविताचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे अंतर्गत अनुसूचित जातीतील मुलांना संशोधनाचे प्रशिक्षण देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आगामी ५ वर्षासाठी ९० हजार विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम मंजूर करण्यात आलेले असणे, उक्त शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या ३० प्रशिक्षण संस्थाद्वारे प्रशिक्षण देण्याचे काम सुरू असताना त्यांना डावलून अधिकाऱ्यांचे हितसंबंध असलेल्या नवीन संस्थांची निवड करण्यासाठी नियमबाह्यरित्या निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असणे, अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यातील तीन अपात्र असलेल्या संस्थांनी बनावट कागदपत्रे, अशैक्षणिक शिक्षकेतर

कर्मचारी, बोगस विद्यार्थी याद्या व बनावट देयके सादर करूनही सचिव, सामाजिक न्याय विभाग, तत्कालीन महासंचालक, बार्टी, येथील निविदा गुणांकन समितीतील अधिकारी व योजना विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने अपात्र संस्थांच्या गुणांमध्ये वाढ करून सदरहू संस्थांना पात्र केल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेनंतर मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी बोगस पध्दतीने काढण्यात आलेली निविदा/ कामाचे आदेश रद्द करण्याचे आदेश दिलेले असणे, तथापि उक्त प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्याने त्यांनी अशाप्रकारे यवतमाळ व पुणे येथील IBPS व MPSC चे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यास मंजुरी दिलेली असणे, तसेच बार्टी या संस्थेने गत ४ महिन्यांच्या कालावधीत शासन निर्णयाचे उल्लंघन व मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका डावलून सुमारे १२० निविदा प्रक्रिया राबविल्या असणे, उक्त निविदा वारंवार काढून रद्द करून परत नव्याने निविदा प्रक्रिया राबवित असणे, अशाप्रकारे सचिव,वसामाजिक न्याय विभाग यांनी अवैध संपत्ती जमा केली असणे, त्यामुळे अनुसूचित जातीचे अनेक विद्यार्थी नोकरी व रोजगारापासून वंचित राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, उक्त प्रकरणी व सदरहू निविदा प्रक्रियांची चौकशी करून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या संपत्तीची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची नेमणूक करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ३३ मिनिटांनी मध्यांतरासाठी स्थगित झाली.

मध्यांतरानंतर दुपारी ०३ वाजून ३० मिनिटांनी सभागृहाची बैठक सुरू झाली.

(३) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करातून आणि पाणीपट्टीतून शाळा, महाविद्यालयांसह सर्व प्रकारच्या शिक्षण संस्था वगळण्यासाठी महापालिका प्रशासनास आदेश देण्याची आवश्यकता असणे, शासनाने यु डायस क्रमांक दिलेल्या मुंबई शहर व उपनगरातील प्रामुख्याने झोपडपट्टीतील महापालिका प्रशासनाने अनधिकृत ठरवलेल्या २६९ खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील दंडात्मक कारवाई त्वरीत रद्द करून त्यांना अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्याची आवश्यकता असणे, नामांकित व प्रयोगशील शिक्षण संस्थांना महानगरपालिकेच्या इमारती नाममात्र भाडयाने (लीजवर) उपलब्ध करण्याची गरज असणे, खाजगी अनुदानित आणि विनाअनुदानित

प्राथमिक शाळांतील तसेच यु डायस क्रमांक मिळालेल्या तथापि मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत ठरविलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना भेदभाव न करता सरसकट सर्वांना शालोपयोगी २७ वस्तू मोफत देण्याची आवश्यकता असणे, क्रिसेंट हायस्कूल, पायलीपाडा, ट्रॉम्बे आणि निर्मल विद्यालय, वडाळा, मुंबई अशा झोपडपट्टीतील अपघातग्रस्त व क्षतीग्रस्त शाळांना महानगरपालिकेच्या शाळेत अत्यंत तातडीने पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मुंबई मनपा क्षेत्रातील १०४ शाळांना मुंबई मनपाने १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करण्याची गरज असणे, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही. "

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता)निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्यापी रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प धोरणात्मक निर्णयासाठी रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालीन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, पुनर्विकास प्रकल्पांतर्गत क आणि ड वर्ग कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या २००० घरांचे बांधकाम संथगतीने सुरू असणे, धोकादायक स्थितीमधील इमारतींमधील कर्मचाऱ्यांचे ३ महिन्यांमध्ये अन्यत्र स्थलांतरण करण्याचे आदेश दिनांक २ मार्च २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी दिलेले असणे, परंतु सदर प्रक्रियादेखील संथगतीने सुरू असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षांचेच असल्याने सद्यःस्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीचा काही भाग कोसळलेला, तर काही छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, वारंवार बैठका घेण्याचे आश्वासित करून देखील बैठका न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यःस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरवस्था व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुनर्विकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील ८५ टक्के पत्रकारांना रुपये २० हजार इतके कमी वेतन मिळत असून त्यामध्ये कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालविणे कठीण असल्याने बदलत्या काळानुसार पत्रकारांना जोडधंदा करणे आवश्यक आहे, परंतु बँकांमधून कर्ज उपलब्ध होत नसणे, पत्रकारांना नोकरीचे कोणतेही संरक्षण नसणे, त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, पत्रकारांसाठी कर्ज उपलब्ध व्हावे व लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात यावे, यासाठी विविध प्रसार माध्यमांचे काम करणारे पत्रकार व कर्मचारी यांच्याकडून सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता)निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. सुनील शिंदे,वि.प.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मुंबईत दिनांक १ जून ते २९ जून, २०२३ या २९ दिवसांच्या कालावधीत तब्बल ४३५ झाडे, फांद्या पडण्याच्या घटना घडल्या असून त्यात आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू आणि ४ जण जखमी झाले असणे, यामध्ये मुंबई शहरात झाडे आणि फांद्या तुटण्याच्या ११२ घटनांमध्ये एकाचा मृत्यू आणि १ जण जखमी झाला असणे, मुंबई पश्चिम उपनगरात झाडे आणि फांद्या पडण्याच्या सर्वाधिक २१४ घटना घडल्या असून त्यात सात जणांचा मृत्यू व १ जण जखमी झाला असणे, पावसाळ्यात वादळवाऱ्याने झाडांच्या आणि फांद्यांच्या तुटण्याने रहिवाशी भागातील जीवांचे आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पावसाळापूर्व कामांमध्ये मुंबईतील धोकादायक झाडे आणि फांद्या तोडण्याचे काम, तसेच धोकादायक झाडे आणि फांद्या तुटून पडण्याचा धोका असल्यास,सत्याची माहिती महानगरपालिकेला देण्याचे आवाहनही मुंबईकरांना केल्याचा दावा बृहन्मुंबई महानगरपालिकेने केला असणे, तसेच जी झाडे कमी धोकादायक आहेत, त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने छाटणी केली असल्याचे देखील महानगरपालिकेने जाहीर केले असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका अखत्यारीतील झाडे आणि फांद्या कोसळून निष्पाप नागरिकांना जीव गमवावा

लागल्याच्या घटना सातत्याने घडलेल्या असणे, भविष्यात देखील अशा प्रकारच्या घटनांत वाढ होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करताना झाडांपासून किमान दोन ते तीन मीटर जागा सोडणे आवश्यक असतानाही महानगरपालिकेने नियुक्त केलेले रस्त्यांच्या कंत्राटदारांकडून याची खबरदारी घेण्यात न येणे, परिणामी, झाडांना लागुनच करण्यात येत असलेल्या कॉंक्रिटीकरणामुळे झाडांच्या मुळांना धोका निर्माण होणे, याकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास्तव मुंबईत झाडे आणि फांद्या तुटून नागरिकांना जीव गमवावा लागू नये, याकरिता शासनाने तातडीने करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री.रमेशदादा पाटील , वि.प.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"उरणच्या ओएनजीसी प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणात दूषित वायू हवेत सोडण्यात येत असून या परिसरातील नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होऊन त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाने दुर्लक्ष केल्याने उरण परिसरातील रहिवाशांमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, उरण परिसरातील जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल, उरण-पनवेल रस्त्यावर २४ तास धडधडणाऱ्या दगडखाणी (क्वाऱ्या) व जेएनपीए अंतर्गत असलेल्या रासायनिक प्रकल्पांमुळे याआधीच जल, वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे, ओएनजीसी प्रकल्पामधून मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात हवेत सोडण्यात येणाऱ्या वायूमुळे प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने श्वसनाच्या आणि इतर व्याधीचा त्रास नागरिकांना जाणवू लागलेला असणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे प्रदूषण नियंत्रण ठेवण्याची दक्षता घेतील अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत असणे, मागील दीड वर्षाच्या कालावधीत उरण ओएनजीसी विरोधात वायू प्रदूषणाबाबत नागरिकांकडून वाढत्या तक्रारी बाबत ओएनजीसी प्रकल्पाच्या वरिष्ठांना नागाव ग्रामपंचायतीने नुकतेच पत्र पाठवले असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेली असणे, दिवसा व रात्री हवेतून उग्रदर्पाचा वास येणे, यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनाचा तसेच इतर शारीरिक व्याधी निर्माण होण्याची भीती एका डॉक्टरांनी व्यक्त केली असणे, याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचेही सांगण्यात येणे, त्यामुळे उरण परिसरातील रासायनिक कंपन्यांमधून २४ तास अखंडपणे वायू प्रदूषण होत असून याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने

नागरिकांमध्ये शासनाप्रती नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. जयंत पाटील ,वि.प.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“राज्यासह देशात घरोघरी देवांच्या मूर्तीचे पूजन केले जात असून विधिवत त्याचे विसर्जन जलाशयात केले जात असणे, रायगड जिल्ह्यातील पेण, हमरापूर हे गणेश मुर्तीचे माहेरघर समजले जात असणे, महाराष्ट्रात कोकणासह,हमराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह देश विदेशात या मुर्तींची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असणे, या वर्षी दिनांक १९ ते २८ सप्टेंबर, २०२३ रोजी गणेशोत्सव महाराष्ट्रासह देश विदेशात साजरा होत असणे, परंतु केंद्र शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घातली असल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पेण, पनवेल, हमरापूर अशा विविध ठिकाणी असणाऱ्या मूर्तीकारांचे रोजगार व दैनंदिन उपजिवीकेवर त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, येत्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या घरगुती गणेशमूर्तीवर बंदी घालण्याचा निर्णय नुकताच मुंबईसह राज्यातील इतर महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केला असणे, या निर्णयाला मूर्तिकारांकडून व मूर्तिकार संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, गणेशोत्सव हा महत्त्वाचा मोठा पारंपरिक उत्सव असून यासाठी लागणाऱ्या पीओपी मूर्ती बनवण्याच्या व्यवसायावर अनेक कुटुंबे अवलंबून असणे, सबब राज्य सरकारच्या वतीने नेमण्यात आलेल्या तांत्रिक समितीचा अंतिम अहवाल येत नाही तोपर्यंत पीओपीच्या मूर्तीवर सरसकट बंदी घालणे अशास्त्रीय, असंविधानिक आणि अयोग्य ठरेल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, “सन २००३-०४ पासून सन २०१८-२०१९ च्या अखेरपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव शिक्षकांच्या पदांना मान्यता देण्याचा विषय प्रलंबित असून या करिता ते आंदोलन करीत असणे ” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप सभापतींनी, आज मंगळवार, दि. २५ जुलै, २०२३ रोजी म.वि.प.नियम १०१-अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, आज मंगळवार, दि. २५ जुलै, २०२३ रोजी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

६. वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ३१- महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे असे सांगून सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " आमदार निधी वाढवणे गरजेचे आहे " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सहकार मंत्र्यांनी, " सदनात केलेली चर्चा कोणत्याही कोर्टात पुरावा म्हणून मांडता येत नाही, ग्राह्यधरता येत नाही. तथापि हा आपला नियम व शिरस्ता असल्याने रेकॉर्डवर चुकीचे राहू नये, ते दुरुस्त करण्यात यावे, " असे सांगितले.

७. माननीय उपसभापतींनी, पुरवणी मागण्यांवरील चर्चेची कायपद्धती विशद केली आणि खालील माननीय मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील, असे सांगितले :—

(१) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - ए-१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-७, बी-३, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, आय-५, एन-२, एन-३, एन-४, झेडआय-३.

(२) उप मुख्यमंत्र्यांच्या गृह, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - बी-१, बी-४, बी-५, आय-३, जे-१, जे-२, के-११.

(३) उप मुख्यमंत्र्याच्या वित्त व नियोजन विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - जी-१, जी-५, जी-८, जी-१०, ओ-१२, ओ-८२.

(४) अन्न,ननागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एम-२, एम-३, एम-४.

(५) सहकार मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - व्ही-२, व्ही-५.

(६) महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - सी-१, सी-४, डी-४, डी-५.

(७) वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - सी-३, सी-७, डी-६, डी-९, झेडडी-१, झेडडी-२.

(८) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एन-३, एस-१.

(९) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - व्ही-२, व्ही-५, डब्ल्यू-२, डब्ल्यू-३, डब्ल्यू-४, डब्ल्यू-६.

(१०) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - टि-५, टि-६.

(११) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एल-१, एल-२, एल-३, एल-८.

(१२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - वाय-२.

(१३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक- एच-७.

(१४) मृद व जलसंधारण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - झेडएच-३.

(१५) कृषी मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - डी-३.

१६) उद्योग मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - के-३, के-७.

(१७) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - आर-१.

(१८) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक- एच-७.

(१९) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - व्ही-२.

(२०) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - ई-२, ई-४, झेडएफ-१.

(२१) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - एस-१.

(२२) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक - क्यू-३, झेडजी-३.

(२३) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - बी-२.

(२४) महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - एक्स-१.

(२५) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक - ई-३.

(२६) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक झेडए-२.

(२७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांच्या विभागांची पुरवणी मागणी क्रमांक-सी-५.

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते (२) श्री. प्रसाद लाड

(३) श्री. अरूण लाड (४) श्री. जयंत असगावकर

(५) श्री. सुधाकर अडबाले (६) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील

(७) श्री. प्रवीण दटके

(चर्चा अपूर्ण)

बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

(१) श्री.जयंत प्र.पाटील (२) श्री.नरेंद्र दराडे

(३) श्री.अभिजीत वंजारी (४) श्री. प्रविण दरेकर (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तर प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, (क) विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक २५ मार्च, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ४०२ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १३५ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह, (ख) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल, (ग) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे, (घ) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे, (ङ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे, (च) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे, ( ) स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (ज) फ्लेम विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (झ) संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ट) अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (ठ) डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल, (ड) सोमय्या विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ढ) एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (ण) डी.वाय.पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (त) सिम्बॉयोसिस स्किल ॲण्ड प्रोफेशनल विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (थ) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागूपर यांचे सन २०१६-०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (द) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल, (ध) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पासष्टावा वार्षिक अहवाल, (न) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (प) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (फ) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल, (ब) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, कोल्हापूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचा

एकोणसाठावा वार्षिक अहवाल आणि (भ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) सहकार मंत्र्यांनी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) बंदरे विकास मंत्र्यांनी महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१) श्री कपिल पाटील, वि.प.स. यांनी," तळोघ जुनवणेवाडी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील एका गर्भवती महिलेला चांगला रस्ता नसल्यामुळे अर्भकासह जीव गमवावा लागणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून या विषयावर सन्माननीय सदस्यांनी काल म्हणणे मांडले आहे. शासनाने या संदर्भात निवेदन करावे तसेच माननीय सार्वजनिक व कुटुंब कल्याण मंत्री यांना निवेदन करण्याबाबत अवगत करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

(२) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांनी," अलमट्टी धरणातून दोन लक्ष क्युसेक्स विसर्ग वाढविण्याबाबत कर्नाटक शासनाला सूचित करणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सन्माननीय सदस्य श्री.सतेज पाटील यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी देत आहे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

शासनाने याची गांभीर्याने दखल घेतली असून याबाबत शासनाकडून सदनामध्ये निवेदन केले जाणार आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्र्यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

(३) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी," राज्यात चिनी तंत्रज्ञानाचा वापर करून कॉपी करण्याच्या प्रकारात झालेली वाढ " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यावर सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

आजच्या कामकाजामध्ये हा विषय नसल्यामुळे नियम २८९ अन्वये दिलेल्या सदर सूचनेस अनुमती नाकारीत आहे परंतु शासनाने या विषयी निवेदन करावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(४) श्री.भाई जगताप,पवि.प.स. यांनी," राज्य शासनाने दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे बाह्ययंत्रणेमार्फत कामे करून घेण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थेच्या एजन्सीच्या पॅनल

नियुक्तीची मान्यता रद्द करणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यावर सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना क्रमांक ५ ही "राज्यात बोगस बियाणांच्या प्रमाणात झालेली वाढ इ.बाबत व सूचना क्रमांक ६ ही खरीपाचा दीड महिना उलटूनही नागपूर जिल्ह्यात ५५ टक्के कर्जवाटप होणे" इ.बाबत श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांची असून दोन्ही सदर विषय गंभीर असल्याने याबाबत शासनास निवेदन करण्याबाबत सांगण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, लोणेरे, जि.औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठाच्या परीक्षेत झालेला गैरव्यवहार इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

३. (१) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतर्गत सुरू असलेल्या व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या परीक्षेत सलग सातव्या पेपरला विद्यार्थ्यांना जुनीच प्रश्नपत्रिका देण्यात आल्याची घटना दिनांक १० जून, २०२३ रोजी उघड होणे, दुसरा पेपर झाल्यानंतर ही चूक विद्यापीठाच्या लक्षात आणून देण्यात येणे, परंतु त्यानंतर ही चुकांची मालिका न थांबणे, या सर्व प्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारुन कुलगुरू व परीक्षा नियंत्रकांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची मागणी विविध विद्यार्थी संघटनांनी करणे, जुन्याच प्रश्नपत्रिका देण्याची चूक विद्यापीठामार्फत झाली असल्याने पुनर्परीक्षेचे परिपत्रक रद्द करून व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याची मागणी सुद्धा विद्यार्थी संघटनांनी करणे, परीक्षा पद्धतीमध्ये गंभीर चुका आढळून आल्याने विद्यापीठ प्रशासनाबरोबरच विद्यार्थ्यांचा वेळ श्रम व पैसा वाया जाणे, विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, विद्यापीठ प्रशासनाच्या या गंभीर चुकीची शासनाकडून सखोल चौकशी होण्याची गरज तसेच याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री.अरुण लाड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"सांगली जिल्ह्यात बनावट, भेसळयुक्त कृषी औषधांची विक्री राजरोसपणे सुरू असणे, यातून द्राक्ष उत्पादक, भाजीपाला उत्पादक तसेच सामान्य शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचे निदर्शनास येणे, बोगस आणि बनावटगिरीचा धंदा चालू असणे, अनेक ठिकाणी पॅकिंग मुंबई, बंगळूरचे आणि औषध मात्र स्थानिक अशा प्रकारे गैरप्रकार सुरू असणे, जिल्ह्यात वारणा टापूसह मिरज पश्चिम भाग, आटपाडी-जत तालुक्यांचा पश्चिम भाग, तासगाव, खानापूर, लेंगरे परिसर, वाळवा-शिराळा तालुक्यात मोठ्या प्रमाणात भाजीपिके लागवडीचे क्षेत्र असून या भागांतील अनेक शेतकऱ्यांना असा बनावट औषधांचा फटका बसल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांची बोगस किटकनाशकांमधून फसवणूक मोठ्या प्रमाणात होत असून आर्थिक आणि पिकांचे असे दुहेरी नुकसान होत असणे, सबब सांगली जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करून भेसळयुक्त शेती औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी शेतकरी वर्गाकडून होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, लडाख येथील त्रिशुल वॉर म्युझियमकरिता माननीय मुख्यमंत्री व दोन्ही माननीय उप मुख्यमंत्री यांनी लडाख सरकारकडून आलेल्या प्रतिनिधीला पहिला ३ कोटी रुपयांचा धनादेश दिला असल्याचे सांगून याबद्दल सभागृहाच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले असे सांगितले.

(१) कृषी मंत्र्यांनी, पंतप्रधान किसान सन्मान निधी इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.प. नियम ४६६ अन्वये निवेदन केले.

(५) सर्वश्री अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"सांगली येथील वैद्य योगेश माहिमकर हे गेली १८-१९ वर्षे आयुर्वेदिक प्रॅक्टिस करीत असून अनेक रुग्णावर त्यांचेकडून औषधोपचार करण्यात येत असणे, त्यांनी केलेल्या एका प्रयोगात त्यांच्याकडे येत असलेल्या मधुमेहग्रस्त रुग्णांचे रक्त सांगलीमधील वेगवेगळ्या ४ नामांकित लॅबमध्ये तपासणीसाठी त्यांनी पाठविणे, त्यानंतर या चारही लॅबचे रिपोर्ट हे वेगवेगळे असल्याचे धक्कादायक

प्रकार निदर्शनास येणे, एका लॅबमध्ये १२६ शुगर, दुसऱ्या लॅबने ३००, तिसऱ्या लॅबने ३९० व चौथ्या लॅबने ४२१ या सर्व लॅब जुन्या असून तज्ज्ञ डॉक्टर येथे कार्यरत असणे, सदर चाचणीच्या रिपोर्टमधील तफावत पाहता नक्की कोणत्या लॅबचा अहवाल विश्वसनीय आहे याबाबत रुग्णांमध्ये व त्यांचे नातेवाईकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, त्यामुळे लॅबमार्फत रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असून असेच रिपोर्ट येत राहिले आणि त्यावर रुग्ण औषधोपचार घेऊ लागले तर चांगले रुग्णही आजारी पडून त्यांच्या जीवावर बेतण्याची परिस्थिती निर्माण झाली असणे, यावर गंभीर दखल घेऊन शासनाने प्रामुख्याने तात्काळ या ४ लॅबची तसेच जिल्ह्यातील अन्य लॅबची चौकशी करून त्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक मध्यांतराकरिता दुपारी २ वाजून ३७ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यांतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ३७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(२) उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्र्यांनी, “अलमट्टी धरणासंदर्भात ” म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी, “बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांच्या आस्थापनेवर ३ हजार मनुष्यबळाच्या सेवा महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून घेणे” इ.बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री किरण सरनाईक, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“राज्यात एक जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू झालेला असणे, परंतु प्रत्यक्षात त्याचा लाभ सप्टेंबर, २००९ पासून डी.सी.पी.एस./एन.पी.एस धारकांना मिळणे, तसेच सातवा वेतन आयोग जानेवारी, २०१६ पासून लागू करण्यात आलेला आहे परंतु, सातवा वेतन आयोग प्रत्यक्षात जानेवारी, २०१९ पासून रोखीने लागू करण्यात आला आहे. तसेच दिनांक १ जानेवारी २००६ ते सप्टेंबर २००९ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम जीपीएफ धारकांना पाच समान हप्त्यांमध्ये त्यांच्या जीपीएफ खात्यामध्ये प्रत्यक्षरित्या देण्यात आलेली असणे व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ही थकबाकी रोख स्वरूपात मिळालेली असणे, सन २०१२ पर्यंत डी.सी.पी.एस./एन.पी.एस.

धारकांचे जी.पी.एफ., डी.सी.पी.एस., एन.पी.एस. असे कोणत्याही प्रकारचे खाते सुरू करण्यात आलेले नसणे, डी.सी.पी.एस/एन.पी.एस. खाते नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना जी.पी.एफ. फरकाप्रमाणे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नसणे किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रमाणे रोख स्वरूपात सुद्धा मिळाली नसणे, राज्यात डी.सी.पी.एस./एन.पी.एस./जी.पी.एफ. खाते नसणाऱ्या धारकांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी तातडीने मिळण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश असलेला ‘राजपूत भामटा’ या जमातीतील ‘भामटा’ हा शब्द वगळण्यात येईल अशी घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे, २०२३ रोजी औरंगाबाद येथील जाहीर सभेत करण्यात येणे, सदर आश्वासनामुळे राजपूत भामटा, बंजारा, लमान, कैकाडी, मानस जोगी, माकडवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, छप्पर बंद यासारख्या जमातीचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता असून विमुक्त ‘अ’ गटातील आरक्षणावर अतिक्रमण असलेल्या तक्रारी शासनाकडे आले असणे, राजपूत भामटा समाजाची लोकसंख्या राज्यात अत्यल्प असून राजपूत भामटा नसलेल्या अनेक व्यक्तींनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर आरक्षण मिळवण्याच्या तक्रारीबाबत तसेच भटके विभक्तीच्या ‘अ’ आणि ‘ब’ गटातील अत्यंत मागासलेल्या जमातींना संरक्षण देणे त्याच्या आरक्षणावरील अतिक्रमण थांबवणे आणि त्यांच्या शैक्षणिक आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखणे या आणि अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली नसणे, त्यामुळे या समाजाच्या लोकांमध्ये पसरलेला असंतोषाची भावना निर्माण होणे, शासनाने याबाबतत तातडीने करावयाची कारवाई व राज्य शासनाची प्रतिक्रिया.”

इतर मागास व बहुजन कल्याणणमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सदर लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

४. (च) ग्रामविकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी भाग घेतला.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा-चर्चा पुढे सुरू

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी भाषण पूर्ण केले.

(चर्चा अपूर्ण)

श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांनी १२ वर्षा"पूर्वी पनवेलमध्ये गृहनिर्माण सोसायटीसाठी जागा घेतली होती. परंतु, आजतागायत त्यामध्ये कोणतीही प्रगती झाली नसल्यामुळे त्या विरोधात ५ हजार सेवा निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांनी आझाद मैदानावर सुरू केलेले आंदोलन इ.बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सरकारने याविषयी दखल घ्यावी असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

या विषयाच्या संदर्भात निवेदन केले जाईल असे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

४. पशुसंवर्धन व मत्स्य व्यवसाय मंत्र्यांनी, " सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री.शशिकांत शिंदे
(२) श्री.सचिन अहिर
(३) डॉ.मनिषा कायंदे
(४) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील
(५) श्री.सुरेश धस
(६) श्री.प्रवीण दटके
(७) श्री.अरूण लाड

पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा-चर्चा पुढे सुरू

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(५) श्री.महादेव जानकर	(६) श्री.सचिन अहिर
(७) श्री.सत्यजित तांबे,	(८) श्री.शशिकांत शिंदे
(९) श्री.विलास पोतनीस	(१०) श्री.किरण सरनाईक
(११) श्री.सुरेश धस	(१२) श्री.अनिकेत तटकरे
(१३) श्री.रमेशदादा पाटील	(१४) श्री.सुनील शिंदे
(१५) श्रीमती उमा खापरे	(१६) डॉ.मनिषा कायंदे
(१७) श्री.गोपिचंद पडळकर	(१८) ॲड.निलय नाईक

(चर्चा अपूर्ण)

शालेय शिक्षण मंत्र्यांनी खालील घोषणा केली

" मुंबईत रात्री ८.०० वाजेपासून अतिवृष्टीमुळे रेड अलर्ट सुरू झाला असल्यामुळे शालेय शिक्षण विभागामार्फत उद्या दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी मुंबईतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करीत आहोत."

माननीय उप सभापतींनी, बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ (अ) अन्वये मान्य केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

माननीय उपसभापतींनी उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. सुरेश धस व श्री. अभिजित वंजारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात सविस्तर खुलासा केला.

(डः) गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर तक्रार निवारण समितीच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ मागे घेण्यासंदर्भात सभागृहाची अनुमती मागितली.

सभागृहाच्या अनुमतीने उपरोक्त विधेयक मागे घेण्यात आले.

सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा-चर्चा पुढे सुरू

पुरवणी मागण्यांवरील चर्चेस शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्र्यांनी उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली

सन २०२३-२४ च्या पूरक मागण्यांवर सभागृहाने विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले

गुरूवार, दिनांक २७ जुलै, २०२३

(१) प्रा. राम शिंदे, श्री. प्रवीण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा.

प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले :—

" अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड औद्योगिक वसाहतीची स्थापना सन १९९६ मध्ये झाली असणे, जामखेड औद्योगिक क्षेत्र भूखंड क्र.ए१ व ए२ असून क्षेत्रफळ १९.७२ हे.आर. असणे, तसेच कर्जत तालुक्यात औद्योगिक वसाहत सुरू करण्याबाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी विशेष पुढाकार घेतलेला असणे, त्यासंदर्भात तत्कालीन उद्योगमंत्री यांच्या समवेत माहे एप्रिल, २०१६ मध्ये संबंधित लोकप्रतिनिधींनी त्या कालखंडात बैठक घेवून व तद्संबंधी शासनाकडे पाठपुरावा केलेला असणे, कर्जत तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी औद्योगिक वसाहत निर्माण करणे व त्या ठिकाणी उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणे, परंतु सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीत सदर प्रस्तावास कोणतीही चालना तत्कालीन शासनाने दिली नसणे, जामखेड औद्योगिक वसाहतीत जमीन संपादन केल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मावेजा दिला आहे किंवा कसे सद्यःस्थितीत जामखेड औद्योगिक वसाहतीमधील उद्योग आणण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही गेल्या २७ वर्षांपासून जामखेड येथील औद्योगिक वसाहत सुरू असताना त्या ठिकाणी कोणकोणते उद्योग सुरू आहेत, याबाबत शासनाने माहिती देण्याची आवश्यकता, तसेच सदर औद्योगिक वसाहतीमध्ये कोणकोणत्या गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक नवीन उद्योग उभारण्यासाठी केली असल्याची संपूर्ण माहिती शासनाने देण्याची आवश्यकता, कर्जत व जामखेड हे तालुके जवळपास असून सुद्धा जामखेड येथील सुरू असलेल्या औद्योगिक वसाहतीत कोणतेही नवीन उद्योग आले नसणे, कर्जतमध्ये औद्योगिक वसाहतत सुरू करण्यासाठी व या भागातील नव युवकांना रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती भूमिका घेतलेली असणे, या नवीन औद्योगिक वसाहत मंजुरीबाबत सद्यःस्थिती काय आहे व नवीन औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग उभारण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागणार आहे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही. "

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. अरुण लाड (२) श्री. सत्यजीत तांबे

उपरोक्त चर्चेस उद्योग मंत्र्यांनी उत्तर दिले.

प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी उत्तरादाखल भाषण केले.

(२) सर्वश्री. श्रीकांत भारतीय, प्रवीण दरेकर व गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा.

श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले :—

" समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्यासाठी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेले राज्यातील अनाथ युवक-युवती सर्वस्वी राज्य शासनाच्या धोरणावर अवलंबून असणे, त्यानुषंगाने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या राज्यातील अनाथ युवक-युवतींना पुढील महाविद्यालयीन व उच्च शिक्षण मोफत देण्याची तसेच त्यांच्या पुनर्वसन व रोजगार निर्मितीसाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता, तसेच अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणे, अनाथांकरिता असलेले आरक्षण हे फक्त शिक्षण आणि नोकरी पुरते मर्यादित न ठेवता शासनाच्या सर्व विभागातील कल्याणकारी योजनांमध्ये या आरक्षणाचा लाभ अनाथांना देण्याची आवश्यकता, तसेच राज्यस्तरीय अनाथ सल्लागार समिती तातडीने कार्यरत करणे, तसेच संजय गांधी निराधार योजनेचा लाभ बालगृहातील / अनाथालयातील बालकांना लागू करून त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संबंधित शासन निर्णयात नमूद अनाथांच्या तरतूदींमध्ये आवश्यक तो बदल करण्याची तसेच या योजनेच्या लाभाकरिता १५ वर्षाच्या रहिवासाची अट शिथिल करून त्याऐवजी अनाथ मुलांचा जन्म दाखला ग्राह्य धरण्याची आवश्यकता, तसेच संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारी रक्कम बालगृहातील लाभार्थीच्या आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या संयुक्त बँक खात्यात ठेवून वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांस ती रक्कम व्याजासहित दिल्यास अनाथांना वयाच्या १८ व्या वर्षी रोजगारनिर्मितीसाठी बीज भांडवल मिळण्याची शक्यता, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात २५ बेडचे अनुरक्षणगृह स्थापन करणे, १८ वर्षानंतरच्या HIV बाधित अनाथ मुले/मुलींच्या पुनर्वसनासाठी महिला व बालविकास विभागांतर्गत कल्याणकारी योजना राबविण्याची आवश्यकता, तसेच सामाजिक न्याय विभागाची स्वाधार योजना अनाथ मुलांना लागू करून १८ वर्षानंतर उच्च शिक्षण आणि व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या अनाथ मुलांना प्रवासाकरिता मोफत पास सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, तसेच १८ वर्षानंतरच्या अनाथ मुलांकरिता ग्रामीण व शहरी भागात घरकुल योजना राबविण्यासह म्हाडा आणि सिडकोमार्फत राबविण्यात

येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अनाथांकरिता सदनिका आणि व्यवसायासाठी गाळे राखीव ठेवण्याची आवश्यकता, तसेच शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये अनाथ मुलांना राखीव जागा ठेवून धर्मादाय तसेच महात्मा फुले योजनेअंतर्गत अनाथ मुलांना रेशन कार्ड ऐवजी अनाथ प्रमाणपत्रावर उपचार देण्याची आवश्यकता, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत त्यांच्या उत्पन्नाचा एक टक्का निधी त्यांच्या क्षेत्रातील अनाथांसाठी राखीव ठेवण्यात आल्यास त्याद्वारे अनाथ मुलांचे अनेक प्रश्न निकाली लागण्याची शक्यता, तसेच अनाथ मुलांच्या शिक्षण, रोजगार तसेच इतर समस्यांबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० तसेच दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा सुमारास महिला व बालविकास विभागांतर्गत बैठकांचे आयोजन करण्यात येणे, तथापि सदरहू बैठकांमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्न व समस्यांच्या निवारणाकरिता अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी राज्यातील अनाथ मुलांमध्ये शासनाप्रती निर्माण होत असलेली नकारात्मकतेची भावना, राज्यातील अनाथ युवक-युवतींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या आयुष्यास योग्य ती दिशा दाखविण्याच्या दृष्टीकोनातून उपरोक्त नमूद प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची नेमकी भूमिका. ”

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. सचिन अहिर (२) श्री. अभिजीत वंजारी

(३) डॉ. मनिषा कायंदे

महिला व बाल विकास मंत्र्यांनी उपरोक्त चर्चेस उत्तर दिले.

श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी उत्तरादाखल भाषण केले.

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (क) गुरुवार दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पुढे ढकलण्यात आलेला एक तारांकित प्रश्नाचे उत्तर देण्यात आले.

(१) सहा तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पन्नास प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ग) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

आदिवासी विकास मंत्र्यांनी, “ अकोला जिल्ह्यातील आदिवासी विभागात विकास मंडळातर्फे जनरेटर

खरेदीमध्ये सुमारे ६७ लाख रुपयांचा अपहार झाल्याबाबत " या विषयावरील श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६५८ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

२. (१) उद्योग मंत्र्यांनी,—

(अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल " , आणि

(ब) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवले.

(२) ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी,—

(अ) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक वित्तीय अहवाल " , आणि

(ब) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक वित्तीय अहवाल " सभागृहासमोर ठेवले.

(३) उद्योग मंत्र्यांनी,—

(अ) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ब) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षांचा अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल " ,

(क) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल " आणि

(ड) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवले.

३. ॲड. निरंजन डावखरे, समिती सदस्य यांनी, शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयक व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व ते संमत करावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

४. (क) आज गुरूवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

(ख) (१) सर्वश्री विलास पोतनीस, सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या दागिन्यांच्या मोजणीत मौल्यवान व शिवकालीन दागिने गायब होणे," इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उपसभापतींच्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

(१) श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी, "मुंबईतील धारावी प्रकल्पाच्या माध्यमातून विकासकाला अनेक सवलती दिल्या जात असणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. उपरोक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे या सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची अनुमती देण्यात येत असल्याचे माननीय उपसभापतीनी सांगितले.

श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

(२) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, यांनी "राज्यात शासकीय योजना सामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शासन आपल्या दारी या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. उपरोक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे या सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची अनुमती देण्यात येत असल्याचे माननीय उपसभापतीनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

(३) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " मुंबईतील गिरणी कामगार हक्काच्या घरापासून वंचित असणे या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. उपरोक्त विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे या सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची अनुमती देण्यात येत असल्याचे माननीय उपसभापतीनी सांगितले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त मुद्याच्या अनुषंगाने सरकारने दखल घ्यावी, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(१) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, "जळगाव जिल्ह्यामध्ये अल्पवयीन मुलींवर बलात्कार होण्याच्या घडलेल्या घटना" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

ग्राम विकास मंत्र्यांनी उपरोक्त मुद्याबाबत खुलासा केला.

(२) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, "कातकरी समाजातील सर्व व्यक्तींची आधार कार्ड नोंदणी करणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(३) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स. यांनी, "कोल्हापूर, सांगली येथे आलेल्या पूरामुळे लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविणे, तसेच अभियांत्रिकीची प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

परीक्षेबाबत मुख्यमंत्र्यांशी बोलून योग्य निर्णय घेण्यात येईल, असे ग्राम विकास मंत्र्यांनी सांगितले.

(४) श्री. अरुण लाड, वि.प.स. यांनी, "सांगली जिल्ह्यातील परिचारिका महिलांचे मागण्यांसाठी सुरू असलेले आंदोलन" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची दखल घ्यावी, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

हा विषय तपासून, शिष्टमंडळाला बोलवून मार्ग काढला जाईल, असे ग्राम विकास मंत्र्यांनी सांगितले.

(५) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, माझगाव येथील तडे गेलेल्या जीएसटी भवनाची तातडीने दुरुस्ती करणे इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत दखल घेण्यात येईल, असे ग्राम विकास मंत्र्यांनी सांगितले.

(६) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, मुंबईच्या झोपडपट्ट्यांबाबत महत्त्वाचे विधेयक आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात न येणे इ. बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

५. (१) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३.

उद्योग मंत्र्यांनी उपरोक्त विधेयक मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) ॲड. निरंजन डावखरे (२) श्री. सतेज पाटील

(३) श्री. प्रवीण दरेकर (४) श्री.शशिकांत शिंदे

(५) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते

(चर्चा अपूर्ण)

(२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे विधेयक, २०२३.

वने मंत्र्यांनी उपरोक्त विधेयक मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे व अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते (२) श्री. सतेज पाटील

(३) श्री. सचिन अहिर (४) श्री. अभिजीत वंजारी

(५) श्री. शशिकांत शिंदे (६) श्री. सुरेश धस

वने मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३. (चर्चा पुढे सुरू)

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) श्री. अनिकेत तटकरे (७) श्री. सुरेश धस

(८) श्री. नरेंद्र दराडे (९) श्री. अभिजीत वंजारी

(१०) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (११) श्री. सचिन अहिर

(१२) श्री. जयंत प्र. पाटील (१३) श्री. भाई जगताप

उद्योग मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर व इतर तक्रार निवारण समित्यांच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुर्नअधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३.

गृहनिर्माण मंत्र्यांनी, उपरोक्त विधेयक मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून २८ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ३८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे -

संसदीय कार्यमंत्र्यांनी, शुक्रवार दिनांक २८ जुलै, २०२३ ते शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ पर्यंतच्या सभागृहाच्या कामकाजाबाबतचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व ते संमत करावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना उद्या सकाळच्या सत्रात घेण्यात येतील. उद्या सकाळी १०.३० ते ११.४५ वाजेपर्यंत विशेष बैठक घेण्यात येईल. विशेष बैठकीमध्ये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. माननीय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांचेशी संबंधित विधेयक क्रमांक २७ हे उद्या चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर व इतर तक्रार निवारण समित्यांच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुर्नअधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३. (पुढे सुरू)

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी भाग घेतला.

विधेयकावरील चर्चेला उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

आज गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांपैकी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

आज गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३

(१) श्री. राजहंस सिंह,वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने वने मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील काही झोपडीवासियांनी सन २००१ मध्ये वन खात्याच्या नियमानुसार सन १९९५ पूर्वीचे म्हणून ७ हजार रुपये भरले असून त्यांना चांदवली येथे घरे मिळालेली असणे, त्यानंतर अंदाजे १५ हजार रहिवाशांनी सन २००८ मध्ये नियमानुसार ७ हजार रुपये भरले, परंतु त्यांना १५ वर्षे होऊन सुद्धा त्यांना अद्यापपर्यंत घरे मिळाली नसणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आंबेडकर नगर, गौतम नगर, सिद्धार्थ नगर, संजय नगर, कालीमाता नगर, आप्पापाडा, जामऋषी नगर, बंजारी पाडा, शांती नगर, पिंपरी पाडा, मातंग गड, सावित्रीबाई फुले नगर, क्रांती नगर, दामू नगर पासून मागाठाणे पर्यंत सदर जागा वन विभागामध्ये असणे, या उर्वरित झोपडीवासीयांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांचेही पुनर्वसन करावे, अशी मागणी केली असणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील अंदाजे पात्र १५ हजार लोकसंख्येला, वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

वने मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश असलेला "राजपूत भामटा" या जमातीतील 'भामटा' हा शब्द वगळण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे, २०२३ रोजी औरंगाबाद येथील जाहीर सभेत करण्यात येणे, सदर आश्वासनामुळे राजपूत भामटा, बंजारा, लमान, कैकाडी, मानस जोगी, माकडवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, अप्पर बंद यासारख्या जमातीचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता असून विमुक्त अ गटातील आरक्षणावर अतिक्रमण असलेल्या तक्रारी शासनाकडे आले असणे, राजपूत भामटा समाजाची लोकसंख्या राज्यात अत्यल्प असून राजपूत भामटा नसलेल्या अनेक व्यक्तींनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर आरक्षण मिळवण्याच्या तक्रारीबाबत तसेच भटके विभक्तीच्या अ आणि ब गटातील अत्यंत मागासलेल्या जमातींना संरक्षण देणे त्याच्या आरक्षणावरील अतिक्रमण थांबवणे आणि त्यांच्या शैक्षणिक आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखणे या आणि अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली नसणे, त्यामुळे या समाजाच्या लोकांमध्ये पसरलेला असंतोषाची भावना निर्माण होणे, शासनाने याबाबतत तातडीने करावयाची कारवाई व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री.नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील निवृत्त शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांना वेळवर निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळत नसणे, दर महिन्याच्या १ तारखेला पेन्शन बँक खात्यात जमा होणे आवश्यक असताना अनेक वेळा २० ते २५ तारखेनंतर पेन्शन जमा होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषतः नाशिक जिल्ह्यातील अनेक पेन्शनधारकांच्या लोकप्रतिनिधींकडे तक्रारी प्राप्त होणे, परिणामी पेन्शनधारकांची होणारी आर्थिक कोंडी, पेन्शनधारक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना आजारपणात औषधोपचार वेळेवर घेणे आवश्यक असतानाही पेन्शन वेळेवर होत नसल्यामुळे त्यांना औषधोपचारासाठी योग्य त्यावेळी पैसे उपलब्ध न होणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना व त्यांच्यात निर्माण झालेली वाढती असुरक्षितता, शासनाने यासंदर्भात तातडीने चौकशी करून पेन्शनधारकांची आर्थिक कुचंबणा होऊ नये याकरीता दर महिन्याच्या १ तारखेला त्यांच्या बँक खात्यात पेन्शनची रक्कम जमा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

ग्रामविकास मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट -ब पूर्व परीक्षा दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेली असणे, सदर परीक्षेचा निकाल जवळपास १० महिन्यानंतर दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी जाहीर होणे, या परीक्षेमध्ये हजारो उमेदवार PSI पदावर पुन्हा पुन्हा पात्र ठरल्यामुळे PSI परीक्षेचा आजपर्यंतचा सर्वात जास्त कट ऑफ जाहीर होणे, संयुक्त गट-ब पूर्व परीक्षा २०२२ मध्ये PSI करिता निवड झालेले जवळपास दीड हजार विद्यार्थी यापूर्वी पासून शासनात विविध वरिष्ठ पदावर कार्यरत असणे, यापूर्वी निवड झालेल्या उमेदवारांनी विविध पदांवर जॉईन होऊन देखील आजपर्यंत ऑप्टिंग आऊट केले नसल्यामुळे सदर परीक्षेत PSI पदाकरिताचा कटऑफ जास्त येऊन हजारो इच्छुक उमेदवार थोड्याफार मार्कांनी अपात्र ठरत असणे, तसेच येत्या २०२३ पासून आयोगाच्या अभ्यासक्रमात देखील बदल होत असल्याने परीक्षार्थींमध्ये नाराजी असणे, संयुक्त गट -ब पूर्व परीक्षा २०२२ करीता ASO पदासाठी २१.१४ टक्के, Sub Registrar's पदासाठी १८.४२ टक्के व STI पदासाठी २१.७७ टक्के उमेदवारांना मुख्य परीक्षेची संधी दिलेली जात

असतानाच PSI पदासाठी केवळ १६.६४ टक्के उमेदवारांनाच मुख्य परीक्षेची संधी दिली जाणे, त्यामुळे PSI इच्छुक उमेदवारांनी आयोगाने विशेष अधिकार वापरून २० टक्क्यापर्यंत उमेदवारांना मुख्य परीक्षेची संधी देण्याची मागणी करणे, तसेच यापूर्वी प्रशासनात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांकरिता ऑप्टिंग आऊट पर्यायासाठी कालमर्यादा निश्चित करण्याची गरज असणे, त्यामुळे सर्वसामान्य परीक्षार्थींमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत राज्य शासनाने आयोगाकडे संयुक्त गट- ब पूर्व परीक्षा २०२२ च्या निकालाबाबत उचित मागण्यांसहह योग्य पाठपुरावा करून संबंधित विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी घेतलेली भूमिका व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्री यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री.सतीश चव्हाण वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"खुलताबाद शहर हद्दीत ३ कि.मी. अंतरावर लिंगमळा (लालमाती वस्ती) येथे मागासवर्गीय वस्ती असून तेथे ३५ ते ४० कुटुंब वास्तव्यास असून जवळपास २७५ लोकसंख्या असणे, सदर ठिकाणचे नागरिक मोल मजुरी करून उदरनिर्वाह करत असणे, या वस्तीकडे नगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले असून तेथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना, रस्ते, पथदिवे या नागरी सोयी-सुविधा दिलेल्या नसणे, वस्तीतील नागरिक हे शेत वस्तीवर राहत असल्याने त्यांच्या नावाची ७/१२ मध्ये नोंद असणे, सन २०१७ मध्ये ७ ते ८ कुटुंबाना घरकुल मंजूर झाले असणे, मात्र त्यांच्याकडे नमुना नं.८ चा उतारा नसल्यामुळे सदर घरकुल रदद करण्यात आले असणे, वस्तीवर जाण्या-येण्यासाठी रस्ता नसणे, डोंगराळ भाग असल्यामुळे कायम हिस्त्र पशुंची भीती असणे, सदर वस्तीवर किमान २५ मुले-मुली १ ते ४ वयोगटातील असणे, सदर बालके शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झालेली असणे, बालकांना अंगणवाडीची नितांत गरज असणे, तसेच अंगणवाडी नसल्यामुळे बालकांना पोषण आहार मिळत नसल्याने २५ बालके कुपोषणाच्या विळख्यात सापडण्याची शक्यता असणे, खुलताबाद नगरपरिषद प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असणे, खुलताबाद नगरपरिषद हद्दीत प्रभाग क्र.१ मध्ये सदर वस्तीतील नागरिकांची मतदान यादीत नावाची नोंद असणे, या बाबतीत शासनाने तात्काळ चौकशी करून खुलताबाद नगरपालिका प्रशासनाने लिंगमळा (लालमाती वस्ती) तील नागरिकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याविषयी कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) प्रा.राम शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मे. कॅनकेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत उभारण्यात येणाऱ्या कर्करोग रुग्णालयाच्या नावामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचा उल्लेख करण्याबाबत महापालिका मुख्यालयातील अध्यक्ष, स्थायी समिती दालनामध्ये दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीतत निर्णय घेण्यात येणे, सदर सभेच्या निर्णयानुसार रे रोड, माझगाव येथील न.भु. क्र. २५४ (भाग) येथील अहिल्याबाई होळकर रुग्णालयाच्या जागेवर मे. कॅनकेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत उभारण्यात आलेल्या रुग्णालयाचे नामकरण पूर्वीच्या नावांसह म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कॅनकेअर ट्रस्ट असे नामकरण करण्यात यावे व रुग्णालयाच्या इमारतीवर दर्शनी भागावर तसा नाम फलक लावण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांच्याकडे एका पत्राद्वारे करण्यात येणे, परंतु, अद्यापपर्यंत सदर मागणीवर कोणत्याही स्वरुपाची कार्यवाही न होणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक योगदान विचारात घेता शासनाने तातडीने सदर मागणीवर निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

उद्योग मंत्री यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"गायरान जमिनीवर केलेले अतिक्रमण हटवण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक मिळकत धारकांना महसूल विभागामार्फत माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्याच्या दरम्यान नोटीस बजावण्यात येणे, कोल्हापूर जिल्ह्यातील आनंदनगर, वैभवनगर, सारखवाडी या भागातील जमिनीवर १९८० पासून शासनामार्फत गरीब व बेघर लोकांना इंदिरा घरकुल योजनेअंतर्गत घरे बांधून देण्यात असून काही नागरिकांना जागा उपलब्ध करून देण्यात येणे, ग्रामपंचायतीने बजावलेल्या नोटीसला उत्तर देऊनही महसूल विभागाकडून पुन्हा नोटीस बजावण्यात येणे, त्यामुळे गरीब व बेघर स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नाराजीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून गायरान जमिनीवर घरकुल योजनेतून दिलेल्या घरांना संरक्षण देऊन गरीब व बेघर जनतेला दिलासा देण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया. "

महसूल मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. भाई गिरकर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"महाराष्ट्र राज्यात बहुतांश शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करावे लागत असते, त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता विविध सवलती मिळविण्यासाठी देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्यात अधिवास प्रमाणपत्र काढण्यासाठी असणाऱ्या जाचक अटींमुळे नागरिकांना सदर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यात जन्म झालेल्या नागरिकांना देखील अधिवास प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मागील दहा ते पंधरा वर्षांची कागदपत्रे सादर करावी लागत असणे, सदर कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे अनेक विद्यार्थी हक्काच्या शिक्षणापासून वंचित राहत असणे, त्याचप्रमाणे सध्या बारकोड प्रणालीचे अधिवास प्रमाणपत्र आल्यामुळे जुनी अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरली जात नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, राज्यातील नागरिकांना सुलभतेने अधिवास प्रमाणपत्र मिळविण्यासाठी असलेल्या जाचक अटी शिथिल करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

महसूल मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५६ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांनी, संदिप विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) आदिवासी विकास मंत्री यांनी, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांनी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१७-२०१८ या वर्षाचा बावीसावा वार्षिक अहवाल तसेच त्यांच्या दुय्यम कंपन्यांचे एकत्रित वार्षिक अहवाल तसेच दुय्यम कंपन्यांचे वित्तीय वर्ष व सन २०१८ पर्यंतचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(४) रोजगार हमी योजना मंत्री यांनी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांनी (उद्योग मंत्री यांचेकरीता), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे सन २०२१-२०२२ सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ चे मूळ अर्थसंकल्प व कामाचे कार्यक्रमविषयक पत्रक तसेच सन २०२० २०२१ सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे सुधारीत अंदाजपत्रक सभागृहासमोर ठेवले.

३. आज शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी म.वि.प.नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " भिमा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त आंदोलक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत " इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार मदत व पुनर्वसन मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी, बारसु (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) येथे रिफायनरी प्रकल्पाच्या उभारणीबाबत स्थानिक नागरिकांचा व शेतकऱ्यांचा असलेला तीव्र विरोध " इ. बाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांनी याबाबत थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शासनाने याबाबत नोंद घेतली असल्याचे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

(२) श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी, " शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई विभाग या कार्यालयात होत असलेला भ्रष्टाचार " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना असून वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांनी याबाबत थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने याबाबत नोंद घेतली असल्याचे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, पालघरच्या वेवूर येथील रुग्णालयात सर्पदंश झालेल्या तरुणीला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दिनांक २७ जुलै,२०२३ रोजी जीव गमवावा लागणे " इ. बाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांनी याबाबत थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने यावर निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, राज्यात निर्माण झालेला कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नन इ. बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांनी याबाबत थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

शासनाने यावर निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शासनाने नोंद घेतली असल्याचे संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले.

(१) श्री. अनिकेत तटकरे वि.प.स. यांनी, " रायगड जिल्ह्यातील पेण, सुधारगड, पोलादपूर या तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान तसेच दरडग्रस्त गावातील लोकांना मदत मिळण्याची आवश्यकता " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(२) श्री. प्रसाद लाड वि.प.स. यांनी, " अहमदनगर जिल्ह्यातील, राहुरी येथे उंबरे गावात अल्पवयीन मुलींचे सेल्फी घेऊन सेल्फीतील छायाचित्राचा दुरूपयोग करून त्या मुलींना ब्लकमेल केले जात असणे " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

याबाबत गृह मंत्री यांनी निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री. विक्रम काळे वि.प.स. यांनी, " अधिवेशन कालावधीत विधान भवनमध्ये येण्याकरिता देण्यात येणाऱ्या प्रवेशिका " या संदर्भात माहितीविषयक मुद्दा मांडला.

श्री. प्रवीण दरेकर वि.प.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी, " विधानमंडळ परिसरातील स्वच्छतागृहे अस्वच्छ असणे तसेच उपहारगृहाच्या संदर्भात " माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

याबाबत गांभिर्याने दखल घ्यावी असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

(५) श्री. भाई जगताप वि.प.स. यांनी, " मंत्रालयाच्या परिसरात माननीय मंत्री, अधिकारी यांचे बंगले असलेल्या ठिकाणी विचित्र पध्दतीने लावण्यात येणारे प्रसिध्दी फलक " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(६) श्री. सचिन अहिर वि.प.स. यांनी, " नागपूरमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास ७५ वर्षे झाल्याचा उत्सव साजरा करण्याचे ठरविण्यात आले असून त्यासाठी आजी-माजी विद्यार्थ्यांकडून अमृत महोत्सवी कार्यक्रम करण्यासाठी पैसे वसूल केले जात असणे " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

शासनाने यासंदर्भात दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी याबाबत नोंद घतली.

(७) श्री. नरेंद्र दराडे वि.प.स. यांनी, " अधिवेशन कालावधीत विधान भवनमध्ये प्रवेश करण्याकरीता देण्यात येणाऱ्या प्रवेशिका " या संदर्भात माहितीविषयक मुद्दा मांडला.

(८) श्री. एकनाथराव खडसे वि.प.स. यांनी, " जळगाव शहरात गावठी कट्ट्याने गोळीबार होऊन लोकांवर केलेला हल्ला " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(९) श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांनी, " डहाणू पालघरमध्ये राहणाऱ्या अमृत केशव पडवले या आदिवासी तरुणाच्या नावे सोलापूरमध्ये जनकल्याण मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीतून २ कोटी १० लाख रुपयांचे कर्ज काढलेले असणे " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(१०) श्री. किरण सरनाईक वि.प.स. यांनी, " राज्यातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांतील तुकड्यामधील ६० विद्यार्थी प्रवेशित करण्याची अट शिथिल करण्याची आवश्यकता " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

(११) श्री.अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी, " नागपूर शहरात दोन व्यापाऱ्यांची गोळी घालून हत्या करण्यात येणे " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

शासनाने यासंदर्भात निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी याबाबत नोंद घतली असल्याचे सांगितले.

(१) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मौजे पुसेगाव / नेर (ता.खटाव, जि.सातारा) येथील औद्योगिक वसाहतीसाठी शासनाने सन १९९२-९३ मध्ये तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या असणे, जमीन संपादित करताना संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता किंवा त्यांची परवानगी न घेता शासनाने जमिनी संपादित

केल्या असून जमिनी संपादित केल्यानंतर शेतकऱ्यांना त्याची कल्पना देऊन शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर एम.आय.डी.सी. चे शिक्के मारण्यात येणे, सध्या या क्षेत्रावर बागायती पिके ऊस, कांदा, बटाटा इत्यादी शेतकरी घेत असणे, शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर एम.आय.डी.सी. चे शिक्के असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा व्यवहार करता येत नसणे, त्यामुळे संबधित शेतकऱ्यांनी त्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील एम.आय.डी.सी. चे शिक्के काढून टाकण्याबाबत सन २०१८ पासून सातत्याने शासनाकडे पत्रव्यवहार करूनसुध्दा ते शिक्के काढण्यात न आल्यामुळे सर्व शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, हे शिक्के शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरुन काढण्याबाबत शेतकऱ्यांनी दिनांक १४ एप्रिल, २०२३ रोजी पुन्हा लेखी पत्रा ारे शासनाकडे केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“दर्जाच्या निकषांवरून असंख्य प्रकारच्या वादांत अडकलेल्या जॉन्सन ॲण्ड जॉन्सन बेबी पावडरच्या मुलुंड येथील उत्पादक कंपनीने अखेर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाला परत केलेला परवाना, बाळाचा जन्म आणि बेबी पावडरचा सुवास यांचे एक घट्ट नाते जॉन्सन बेबी पावडरने पिढ्यान् पिढ्या तयार केले असणे, मात्र, या नात्याला तडा देणाऱ्या अनेक घटना घडल्या असणे, जॉन्सनच्या पुणे व नाशिक येथील कारखान्यांमधील नमुने महाराष्ट्र एफडीएच्या तपासणीत सदोष आढळून येणे, त्यावरूनच सन २०२२ मध्ये एफडीएने त्यांच्यावर उत्पादन व विक्री थांबविण्याची कारवाई केली असणे, अमेरिका, कॅनडा या देशांमध्येही या कंपनीच्या पावडरच्या वापरामुळे सामान्यांना त्रास झाल्याची अनेक प्रकरणे पुढे आली असणे, अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये या कंपनीने नुकसानभरपाई दिलेली असणे, परंतु राज्यात मात्र या पावडरचा वापर केल्याने ज्यांना आरोग्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले, त्यांना या कंपनीने कोणतीही नुकसानभरपाई दिली नसणे, राज्य आणि केंद्र स्तरावर औषध-प्रसाधन नियामक यंत्रणांचा अशा प्रकारच्या कंपन्यांवर कोणताही अंकुश नसल्याचे अधोरेखित होणे, त्याचा त्रास मात्र सर्वसामान्य ग्राहक व रुग्णांना सहन करावा लागणे, यास्तव या कंपनीच्या उत्पादनांमुळे ज्या ग्राहक व रुग्णांना त्रास झाला आहे त्यांना सदरहू कंपनीकडून नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

अन्न व औषध प्रशासन मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री.महादेव जानकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांना ३६५ दिवस नियमित करण्याबाबत पावसाळी अधिवेशनात तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, नागपूर येथे दिनांक २८ जानेवारी २०१९ ला महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांनी ३६५ दिवसांचे केलेले आंदोलन, मागील १५ वर्षांपासून होमगार्ड सैनिकांनी नियमित रोजगार मिळावा म्हणून सातत्याने शासनाकडे केलेले निवेदन, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी आंदोलनाचा पवित्रा गांभीर्याने घेऊन दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी पोलीस रेगुलर कॉलाऊट या नावाने शासन निर्णय काढून होमगार्डस् यांना कमीत कमी १८० दिवसाचे नियमित काम दिनांक १३ ऑगस्ट,२०१९ पासून सुरू करणे, परंतु ६ महिन्यांनंतर होमगार्ड सैनिकांकरिता फंड उपलब्ध नसल्याचे कारण सांगून दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी होमगार्डचे १८० दिवसांचे बंदोबस्ताचे काम बंद करण्यात येणे, होमगार्ड सैनिकांना फक्त खोटे आमिष आश्वासन देऊन होमगार्ड सैनिकांच्या संविधानिक न्यायिक मागण्यांना दाखविण्यात येत असलेली केराची टोपली, महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांनी आपल्या न्याय्य १७ मागण्यांसंदर्भात शासनाकडे केलेले निवेदन, बॉम्बे होमगार्ड ॲक्ट १९४७ ची सुधारणा अथवा बदल करणे, दिनांक १७ जानेवारी, १९८४ च्या आदेशाची अंमलबजावणी करून होमगार्डना ३६५ दिवस नियमित करणे, दर ३ वर्षांनी होणाऱ्या पुनर्नोंदणी पुनर्नियुक्ती प्रणाली अथवा पध्दत कायमस्वरुपी बंद करणे, साप्ताहिक परेड चा भत्ता, कर्तव्य भत्त्याचा दर समप्रमाणानुसार देयक असावा, होमगार्ड सैनिकांना कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, होमगार्ड सैनिकांच्या तसेच होमगार्ड विभागाचा दर्जा व वर्ग ठरविण्यात यावे, होमगार्ड पाल्यांना प्रशासकीय सेवाभरती मध्ये अनुकंपा तत्व प्रणालीने स्थान मिळावे या व अन्य मागण्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी होमगार्ड सैनिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांच्या प्रमुखख १७ मागण्यांसंदर्भात शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. जयंत आसगावकर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"महाराष्ट्रात सन २००१ पूर्वी स्थापना झालेल्या ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मंजूर करावे या प्रमुख मागणीसाठी विनाअनुदानित, शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी असोसिएशन, कल्याण, जि.ठाणे, यांचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ पासून मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरू असल्याचे माहे जुलै,

२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, राज्यातील सन २००१ पूर्वी स्थापना झालेल्या एकूण ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना शासनातर्फे १०० टक्के अनुदान मिळावे याकरिता हे आंदोलन सुरू असणे, मागील ४७ वर्षापासून राज्यात एकाही शिक्षणशास्त्र महाविद्यालयाला अनुदान दिले गेले नसणे, अनुदानाची वाट पाहून एक पिढी सेवानिवृत्त होऊनही जाणे, सन २०१४ मध्ये शिक्षण विभागाने सकारात्मक शिफारससुध्दा केली असणे, परंतु दुष्काळी परिस्थितीचे कारण दाखवून वित्त विभागाने प्रस्ताव नाकारणे, अशाप्रकारे वारंवार सकारात्मक बैठका घेऊन कर्मचाऱ्यांना प्रलोभने दाखवणे, शिक्षकांना अनुदानाअभावी आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागणे, मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांच्या मागण्यांबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली चीड व असंतोषाची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री.अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“नागपूर म्हाडा विभागांतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील गोधणी रोड येथे म्हाडाद्वारे विकसित भूखंड MIG-20 / MIG26/EWS२१० यातील २१० भूखंडाकरिता दिनांक २० जुलै, १९९५ रोजी वर्तमानपत्रामधील जाहिरातीनुसार भूखंड आवंटित करण्याकरिता LIG आणि EWS प्रवर्गातील लोकांचे अर्ज मागविण्यात येणे, त्यानुसार सन १९९९-२००० या वर्षामध्ये MIG प्रवर्गात २०, LIG प्रर्वगामध्ये ७६ आणि EWS प्रर्वगामध्ये २१० असे एकूण ३०६ भूखंड नियमाप्रमाणे लोकांना आवंटित करण्यात येणे, यासंबंधी संबंधित लोकांनी म्हाडामध्ये आवंटित केलेल्या भूखंडा ऐवजी संपूर्ण रक्कम जमा करण्यात येणे, परंतु गेल्या २७ वर्षांपासून म्हाडाच्या या भूखंडावरील आवंटित केलेल्या भूखंडाचा प्रत्यक्षात ताबा वरील ३०६ लोकांना देण्यात आला नसणे, LIG आणि EWS प्रवर्गातील नागपूर विभागातील अनेक कामगारांनी आपल्या मिळकतीच्या पैशातून आवंटित केलेल्या भूखंडाकरिता नियमानुसार रक्कम जमा केल्यावरही अजूनपर्यंत प्रत्यक्षात त्या भूखंडाचा ताबा मोजणी करून संबंधित लोकांना दिला गेला नसणे, त्यामुळे २७ वर्षांपासून हे लोक आपल्या भूखंडासाठी आणि घरासाठी अजूनही प्रतीक्षा करीत असणे, यासंबंधी संबंधित लोकांनी शेकडो वेळा म्हाडाच्या कार्यालयामध्ये लेखी व तोंडी निवेदन देऊन सुध्दा त्यांना प्रत्येकवेळी उडवाउडवीचे उत्तरे देण्यात येणे, या ३०६ लोकांपैकी ६ लोक मृत्यू पावले असून त्यांच्या वारसदारांना सुध्दा भूखंड मिळाले नसणे, अनेकदा म्हाडाच्या कार्यालयातून संबंधित लोकांना या

जागेवर रेल्वेचे आरक्षण असल्याचे सांगण्यात आले असणे, कधी नागपूर सुधार प्रन्यासच्या वतीने संबंधित लेआऊट मंजूर झाले नाही तर कधी या सर्व जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे त्याचे प्रत्यक्षात SLR कार्यालयामार्फत मोजणी होऊ शकली नसणे, या वेगवेगळ्या कारणास्तव हे भूखंड देण्यासाठी म्हाडा असमर्थ ठरली असणे, परंतु प्रत्यक्षात म्हाडाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार ही प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी आणि लोकांकडून संबंधित भूखंडाचे नियमाप्रमाणे पैसे वसूलल करण्यापूर्वी संबंधित लेआऊट अभिन्यास मंजूर करून घेणे गरजेचे असून त्या जागेवर कुठल्या प्रकारचे शासकीय आरक्षण आहे किंवा कसे याची खात्री करायला पाहिजे होती, तसेच लोकांकडून पैसे स्वीकारल्यानंतर आणि कागदोपत्री भूखंड आवंटित केल्यानंतर ३ महिन्याच्या आत SLR कडून संपूर्ण अभिन्यासाची रीतसर मोजणी करून भौतिकरित्या भूखंड संबंधित व्यक्तींना हॅन्डओवर आवश्यक असणे, परंतु म्हाडाच्या गलथान कारभारामुळे ३०० पेक्षा जास्त लोकांचे जीवन उध्वस्त झाले असणे, २७ वर्षांपासून अजूनही म्हाडाच्या कार्यालयामध्ये पायऱ्या झिजवून त्यांना न्याय न मिळणे, याबाबतीत शासनाने त्वरित चौकशी करून ज्या अधिकाऱ्यांच्या हातून ही अक्षम्य चूक झाली, त्यांचेवर कायदेशीर करावयाची कारवाई तसेच संबंधित जमिनीचा अतिक्रमणविरहित ताबा घेऊन तात्काळ मोजणी करून आणि त्या अभिन्यासाला संबंधित प्राधिकरणाकडून मंजुरी मिळवून ज्या लोकांनी २७ वर्ष पहिले पैसे भरून आवंटन करून घेतले त्यांना तात्काळ भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी तसेच २७ वर्षामध्ये प्रत्यक्ष भूखंडाचे आवंटन न केल्यामुळे जितके पैसे लोकांनी म्हाडामध्ये जमा केले त्यावर १८ टक्के व्याज त्या सर्व लोकांना भरपाईच्या स्वरूपामध्ये देण्याचे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

गृहनिर्माण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५. उप मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री यांनी, सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ३७ - मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयकाच्या संदर्भात खालील सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडले.

(१) श्री. एकनाथराव खडसे, (२) ॲड. अनिल परब

(३) श्री. सचिन अहिर (४) श्री. शशिकांत शिंदे

उप मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

६. शुक्रवार, दि. २८ जुलै, २०२३ रोजी म.वि.प.नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

७. शुक्रवार, दि. २८ जुलै, २०२३ रोजी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

बुधवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३

(१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"देशात दर दहा हजार व्यक्ती मागे एक हेमोफिलिया ए चा रुग्ण असून दर चाळीस हजार व्यक्ती मागे बी चा रुग्ण आणि दर दोन लाख व्यक्तींमागे सी या प्रकारचा रुग्ण आढळत असणे, सदर रुग्ण तपासण्याची सोय भारतामध्ये अतिशय कमी ठिकाणी असून तपासणी करण्याच्या प्रयोगशाळा कमीच असणे, त्यामुळे अनेक वेळा आजाराचे नेमके निदान होऊ शकत नसल्याने हेमोफिलिया याविषयी जागृती आणि उपचार केंद्र वाढवण्याची गरज असणे, हेमोफिलियाची भारतासाठी एक नोंदणी असून त्यामध्ये प्रत्येक रुग्णांची नोंद केली जात असून नव्या नोंदीनुसार भारताची लोकसंख्या १४२ कोटी असतानाही हेमोफिलियाचे प्रमाण १०,००० मागे एक याप्रमाणे एक लाख ४२ हजार रुग्ण असायला हवेत मात्र केवळ २० हजार रुग्ण नोंदवले जात जात असणे, याचा अर्थ इतरांचे अजून निदान झालेले नसल्याने तसेच बी चे प्रमाण लोक लोकसंख्येनुसार किमान ३५००० अपेक्षित असणे, राज्य शासनाच्या वतीने हिमोफिलिया आजाराविषयी जागृती आणि उपचार केंद्र सुरू करण्याकरीता शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयात, उपजिल्हा रुग्णालयात डे केअर सेंटर सुरू करण्याकरता प्रशासनाकडून कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही न करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील गृह विभागाच्या राज्य उत्पादन शुल्काच्या क्रमांक इएसटी-२०२१/प्र.क्र.९३/ राउशु-१, दिनांक २५-०५-२०१९ च्या अनुषंगाने गणवेशधारी अधिकारी व कर्मचारी यांच्या बदलीबाबतचे धोरण निश्चित करण्यासाठी आदेश पारित करण्यात आले असून या आदेशात नमूद केल्याप्रमाणे एका महसूल विभागात ९ वर्षे पूर्ण झालेल्या निरीक्षकांना दुसऱ्या महसूल विभागात बदली करण्यात

यावे, असे असताना निरीक्षक पदावरील चाररर‌अधिकाऱ्यांच्या संगनमताने सन २०२३ ते सन २०२६ साठी करण्यात येणे, शासनाने जारी केलेल्या पत्रात नऊ वर्षे पूर्ण झालेल्या निरीक्षकांना एका महसूल विभागातून दुसऱ्या महसूल विभागात बदली करण्यात यावी, असे स्पष्टटट‌असताना चारही अधिकाऱ्यांच्या बदल्या नियमबाह्य पद्धतीने करण्यात येऊन याबद्दल बदली प्रक्रियेमध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने फार मोठा करोडो रुपयांचा घोटाळा व भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले असून या प्रकरणी सखोल चौकशी करून नियमबाह्य झालेल्या बदल्या रद्द करण्याबाबत करावयाची कार्यवाही व या प्रकरणातील दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सुरेश धस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

“भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका येथे भुयारी गटारीसाठी स्कीम फेस-२२ अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत भिवंडी महापालिकेला भुयारी गटारी योजनेचे योग्य प्रकारे व नियोजनबद्ध भिवंडी शहरातील मलःनिसारणाचे काम करता यावे म्हणून सल्लागार व शासनाकडून देखरेख म्हणून ५ संस्थेची नेमणूक केलेली असणे, भुयारी गटारी योजना निविदा ४६२ कोटी रुपयांची असून त्यापैकी ६ एचटीपी व १०० पंपींग स्टेशन व नादुरुस्त केलेली रस्ते बांधण्याची निविदा झालेली असणे, ते बांधण्यापूर्वी ४ संस्थांनी व महानगरपालिकेने ३३७ कोटी रुपये ठेकेदारास ईगल कन्स्ट्रक्शन यास गैरव्यवहारातून गैरलाभ मिळून अदा केलेले असणे, भुयारी गटार योजना ही सरकारी योजना न राबवता भिवंडीच्या जनतेसाठी फसवी योजना राबवण्यात येऊन सदर निविदेमध्ये ५० कोटी रुपये परस्पर गैरव्यवहारातून गैरलाभ मिळवून देण्यात आलेला असणे, याच्या सखोल चौकशीसाठी कमिटी नेमूननसंबंधितांवर कारवाई करणे गरजेचे असून या भुयारी गटार फसव्या योजनेमध्ये अनियमितता व अगुणवत्ता आढळून आल्याने ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्ते नादुरुस्त होऊन २००० लोकांचे अपघात झालेले असणे, त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखीही पडलेले असणे, यास सर्वस्वी जबाबदार ठेकेदार व महानगरपालिकेचे अधिकारी असून सदर निविदेमध्ये व निकृष्ट दर्जाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळा झालेला असून याची सखोल चौकशी होण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असून संबंधित संस्थानी केलेले गैरव्यवहार व ठेकेदार यांच्यावरती कठोरात कठोर कारवाई करण्यासाठी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व प्रखर संतापाची भावना यावर शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कार्यवाही. ”

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४८ मिनिटांनी दुपारी १२-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील दहा प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एक्केचाळीस वरील प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) संसदीय कार्य मंत्र्यांनी, " महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनाक ३१ मार्च, २०२१ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(२) संसदीय कार्य मंत्र्यांनी, " कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(३) संसदीय कार्य मंत्र्यांनी, " गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास, महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल व सन २०२०-०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(४) सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, " महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, " गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

माननीय उप सभापतींनी, मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाच्या शुभारंभ कार्यक्रमासंदर्भात पुढील घोषणा केली :—

" सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, मुंबई येथील मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, माननीय उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते तसेच माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, माननीय उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, माननीय संसदीय कार्य मंत्री, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी १०-०० वाजता मनोरा

आमदार निवास भूखंड, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी १०-०० वाजता मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाच्या शुभारंभ कार्यक्रमास मनोरा आमदार निवास भूखंड, मुंबई येथे उपस्थित रहावे, आपल्याला असे आग्रहाचे निमंत्रण आहे. "

३. (१) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/साऊथ विभागातील वरळी व प्रभादेवी या परिसरातील मलेरिया रुग्णवाढ रोखणे " इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी, "मुंबई व मुंबई उनपगरातील दरडी कोसळण्याच्या घटनेमुळे जीवितहानी होऊ नये यासाठी उपाययोजना" इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय उप सभापतींनी, " आजच्या कामकाजातील लक्षवेधी सूचना क्रमांक ९ व १३ या संबंधित मंत्रीमहोदयांच्या सभागृहातील अनुपस्थितीमुळे नंतर घेण्यात येतील. तसेच म.वि.प. नियम २८९ च्या एकूण सहा सूचना आलेल्या आहेत. त्या अगोदर घेण्यात येतील. त्यानंतर नियम ३५चा मुद्दा सन्माननीय सदस्य थोडक्यात मांडतील व त्यानंतर त्यावर निर्णय देण्यात येईल. त्यानंतर पाच ते सहा सन्माननीय सदस्यांचे पॉईंट ऑफ इन्फर्मेशन महत्वाचे आहेत. त्यानंतर लक्षवेधी सूचना व विधेयके घेण्यात येतील. " असे सभागृहास सांगितले.

४. (१) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी " ता.धारुन, जि.बीड येथील श्री. दिलीप नामदेव माने यांच्या पत्नीशी भोगलवाडी बीट अंमलदार संजय गुंड यांनी गैरवर्तन करणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सदरहू घटना अतिशय गंभीर असून यासंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

(२) सर्वश्री. सुनील शिंदे व अंबादास दानवे, वि.प.स. यांनी , " मुंबई-नागपूर समृद्धी महार्मावर सरलंबे (ता.शहापूर, जि.ठाणे) गावाजवळ गर्डर कोसळून १७ जणांचा मृत्यू होणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सदरहू विषय लक्षवेधी सूचनेमध्ये परिवर्तित करून ती लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेणार असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(३) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " पेण (जि.रायगड) येथील म्हाडा वसाहतीत डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम पॅरामेडिकल व सायन्स या नावाने अनधिकृत महाविद्यालय सुरू असणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

(४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " सत्ताधारी पक्षातील विधानसभा सदस्यांनी महिलांविषयी केलेले अपमानजनक वक्तव्य " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून या सूचनेस अनुमती नाकारली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(५) श्री. सर्वश्री भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, वि.प.स. यांनी, " शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक व प्रमुख संभाजी भिडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधान करणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करावे, असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ५४ मिनिटांनी दुपारी ०१.५९ वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी ०१ वाजून ५९ मिनिटांनी सुरू झाली.

गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ०१ मिनिटांनी दुपारी ०२-०६ वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी ०२ वाजून ०६ मिनिटांनी सुरू झाली.

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी, "संभाजी भिडे यांनी केलेले वादग्रस्त वक्तव्य " इ. बाबत म.वि.प.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(१) श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"श्री संत बाळूमामा देवस्थान,नआदमापूरर(जि.कोल्हापूर)रहे देवस्थान महाराष्ट्रातील एक जागृत देवस्थान असणे, संपूर्ण भारतातून तसेच परदेशातून भक्त मंडळी या देवस्थानाच्या दर्शनासाठी येत असणे, तसेच भक्तीभावाने दान दक्षिणा देत असणे, सदरचा न्यास हा कोल्हापूर येथील धर्मादाय उपायुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असणे, या न्यासाच्या संदर्भात धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर यांनी व्यवस्थापन समितीच्या भ्रष्ट आचरणामुळे विश्वस्त पददरिक्त केलेले असणे, सदर देवस्थानची नावलौकिकता पाहता व्यवस्थापन समितीकडून होत असलेले भ्रष्टाचार न सांगण्यासारखे असणे, देश परदेशातून येणाऱ्या भक्तमंडळींची होत असलेली गैरसोय,यदेवस्थानच्या मालकीच्या मिळकतीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार,रजंगम व स्थावर मालमत्तेचा होत असलेला गैरवापर रोखण्याची आवश्यकता, कोल्हापूर येथील करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर संदर्भात शासनाकडून स्पेशल कायदा **The Shree Karveer Niwasini Mahalaxmi (Ambabai) Mandir Kolhapur Act,** २०१८ हा कायदा करण्यात येणे, त्यानुसार श्री संत बाळूमामा देवस्थान, आदमापूर जि.कोल्हापूर या न्यासास देखील कायदा करण्यात यावा अशी मागणी राज्यातील भक्त मंडळी व लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे उप मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे दिनांक २८ जून, २०२३ रोजी केलेली असणे, या मागणीच्या अनुषंगाने अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे उक्त मागणीच्या अनुषंगाने भाविकांसाठी तातडीने उपाययोजना व कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, " पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ५ लाख रूपयापर्यंतच्या ठेवी सुरक्षित करणे " इ.बाबत मुद्दा मांडला.

सहकार मंत्र्यांनी, " सन्माननीय सदस्यांकडून या संदर्भात असलेली माहिती घेऊन योग्य तो निर्णय करण्यात येईल. " असे सांगितले.

५. (१) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, 'राज्यातील सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या ऑनलाईन नोंदणी माध्यमातून होणारी फसवणूक ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

याबाबत कठोर कारवाई करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(२) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी , 'जागतिक बँकेच्या मदतीने राबविण्यात येणाऱ्या जलस्वराज्य योजना-२ मध्ये ४ वर्षांपूर्वी निवड झालेली ५८ गावे आजपर्यंत तहानलेल्या परिस्थितीत

असून पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील नोकरशहांच्या मनमानी कारभारामुळे सदर योजना बारगळल्याचे उघडकीस येणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(३) श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, ' जिल्हा अकोला, तालुका पातुर, शिर्लाअंधारे परिसरातून दिनांक २७ जुलै, २०२३ पासून कुमारी किरण अर्जुन बळकार वय वर्षे १९ ही मुलगी बेपत्ता असून दिनांक २९ जुलै, २०२३ रोजी या तरुणीचा शिर्लाअंधारे परिसर शिवारात अंधारे कृषी विद्यालयाच्या परिसराला लागून निमकडे यांच्या शेताजवळ काटेरी घनदाट झुडपात विद्युत रोहित्राजवळ ओढणीने बांधलेल्या अवस्थेत मृतदेह आढळणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

सदर विषयाची दखल माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी घ्यावी, असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, 'मुंबई-गोवा महामर्गाचे काम गेल्या १४वर्षांपासून पूर्ण झालेले नसून विशेषत : पनवेल-इंदापूर मार्गाची पूर्णपणे दुरवस्था झालेली असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांना देखील याबाबत बैठक घ्यावी, अशी विनंती करण्यात येईल . तसेच आझाद मैदान येथे जे शिष्टमंडळ आले त्यांची भेट घेण्याबाबत सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांना सांगण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ४५ मिनिटांनी दुपारी ४-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ४-०० वाजता सुरू झाली.

(४) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, ' सद्यःस्थितीत शिक्षकांना फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा धाक दाखवून त्यांच्याकडून BLDचे काम करून घेतले जात असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(५) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी, ' राज्यात सामाजिक भूमिका अदा करून मराठा समाजासाठी सारथी, ओबीसी समाजासाठी महाज्योती आणि दलित समाजासाठी स्थापन केलेल्या ' बार्टी ' संस्थेप्रमाणे अल्पसंख्याक समाजासाठी ' मार्टी ' संस्था स्थापन करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(६) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, ' महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या १६५ निवासी आश्रमशाळेच्या (शाहू, फुले, आंबेडकर गुरुकुल योजना) प्रचलित वेतन श्रेणीनुसार शंभर टक्के अनुदान मंजूर करण्याची केलेली मागणी इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(७) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी, ' राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेळी, मेंढी महामंडळ कायम ठेऊन महासंघ निर्माण करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(८) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, ' राज्यातील मूल्यांकन झालेल्या परंतु दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पात्रता यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना त्वरित पात्र घोषित करून अनुदान देणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(९) श्री. प्रवीण दटके, वि.प.स. यांनी, ' दिनांक २९ जुलै, २०२३ रोजी बीड येथे इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीचा हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(१०) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, ' रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील मौजे गागोदे (खुर्द) येथे बोगस डॉक्टर कार्यरत असून ते रुग्णांना सेवा देण्याचा प्रयत्न करत असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(११) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, ' आई-वडिलांची पेन्शन त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची विधवा मुलगी, परित्यक्ता किंवा अविवाहीत मुलीला मिळावी या संदर्भातील विषय वित्त विभागाकडे प्रलंबित असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(१२) श्री. रामराव पाटील, वि.प.स. यांनी, ' नांदेड जिल्ह्यात दिनांक २० ते २८ जुलै, २०२३ दरम्यान विविध ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस, अतिवृष्टी झाल्यामुळे या क्षेत्रातील शेतजमिनी उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा योजनेचा लाभ देणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(१३) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, ' कांदिवली (पूर्व) येथे सिंग इस्टेट वसाहत असून तेथे मध्यम वर्गीय, कष्टकरी लोकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यासंबंधी तेथे पर्यायी जागा देऊन त्यांना तेथील विकासामध्ये समाविष्ट करण्यासंबंधी शासनाने भूमिका घेणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(१४) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, राज्यातील खाजगी व इंग्रजी शाळांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी RTE कायद्याअंतर्गत विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत असल्याची बाब माहे जुलै, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात उघडकीस येणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

(१) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, ' महाराष्ट्र शासनाने राज्यातील विनानुदानित शाळांना अनुदान देण्यासंबंधी दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णय जाहीर केल्याच्या धर्तीवर

राज्यातील ग्रामीण व डोंगरी भागांमधील विद्यार्थी पटसंख्या कमी असणाऱ्या शाळांमधील पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना अनुदान देणे ' इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, ' बार्टीच्या समतादूत व प्रकल्प अधिकार यांचे समाजकल्याणमध्ये गट-क प्रवर्गामध्ये समायोजन करून गट-क प्रवर्गाकरिता लागू असलेल्या शासनाच्या सर्व सुविधा व नियमावली त्यांना लागू करणे ' इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(३) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, ' रायगड जिल्हयातील पेण तालुक्यामधील कोर्पोली विशेषतः विभागात मागील आठवडयात अंतुरे भागातील खारबंदिस्ती उद्धस्त झाल्या असल्यामुळे ८०० ऐकरपेक्षा जास्त भात पिकांचे नुकसान होणे ' इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(४) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, ' राज्य शासनाने राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर व एअर ॲम्ब्युलन्सची व्यवस्था उभारण्याकरिता तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता' इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(५) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी, ' छत्रपती संभाजी नगर येथील सिडको वाळुंज महानगर येथे तीसगाव परिसरात देवगिरी नदीवर सिडको प्रशासनाने सन २०१८ मध्ये लाखो रुपये खर्च करून बांधलेल्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी तसेच कामगारांना दळणवळणाच्या कामांमध्ये अडचणी येणे ' इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

७. आज बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी माझ्याकडे प्राप्त झालेल्या औचित्यांच्या मुद्यांपैकी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय तालिका सभापतींनी घोषित केले.

८. सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, सतीश चव्हाण, विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रवीण दटके, अनिकेत तटकरे, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, प्रवीण पोटे-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री निलय नाईक, राजहंस सिंह, रामराव पाटील, रमेशदादा पाटील, वसंत खंडेलवाल, रमेश कराड, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव-

श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले :—

" राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील

अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झाले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ॲन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीकच्या संदर्भात शासनाने झिरो टोलरन्स पॉलीसी सुरू केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथिल केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकतो परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलिसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून, २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पूर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दीर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८

टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासानाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांपत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरू असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरीक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना. "

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. प्रसाद लाड (२) श्री. अनिल तटकरे

(३) श्री. प्रवीण दटके (४) श्री. सत्यजीत तांबे

(५) श्री. सुरेश धस

(चर्चा अपूर्ण)

गुरूवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३

(१) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " नांदेड जिल्ह्यातील लोहा शहरात साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी होत असताना त्यांना अभिवादन करण्यासाठी लावण्यात आलेले बॅनर्स फाडण्यात येणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने या संदर्भात दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी," मुंबई बेस्टच्या कंत्राटी कामगारांनी संप केला असणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने या संदर्भात दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू असणे, सदर चारा छावण्यांमध्ये दाखल जनावरांची गुरे छावणी व्यवस्थापन यंत्रणेमध्ये नोंदणी करून आठवड्यातून एकदा बारकोड द्वारे स्कॅनिंग केल्यानंतर ऑनलाईन हजेरीद्वारे अनुदान वितरित करण्याबाबत निर्देश देण्यात आले असणे, सदर ऑनलाईन हजेरीप्रमाणे ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशू संख्येचे २२ कोटी ५४ लाख २७ हजार २९९ इतके अनुदान शासनास समर्पित करण्यात आले असणे, सदर समर्पित झालेले अनुदान मिळण्याच्या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दिनांक २८ एप्रिल, २००६ व दिनांक १० जुलै, २०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य कार्यकारी समिती गठीत करून सदर समितीने सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे कळविले असणे, त्या अनुषंगाने समितीच्या निर्णयामध्ये असे म्हणण्यात आले आहे की ज्या पशुधनाच्या यंत्रणेमध्ये कधीतरी स्कॅनिंगनुसार उपस्थितीची नोंद झाली असणे, त्याची इतर नोंदीच्या आधारे पडताळणी उपस्थितीची संख्या ग्राह्य धरण्यात यावी व त्यानुसार किती निधी देणे आवश्यक आहे हे प्रमाणित करून सुधारित प्रस्ताव राज्य शासनास तत्काळ सादर करण्यात यावा असे निर्णय घेण्यात येऊनही अद्याप जिल्हाधिकारी, सोलापूर विभागीय आयुक्त, पुणे यांनी यासंदर्भात कोणताही प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात न येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१ कोटी ४७ लाख १४ हजार ९२२ रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२ कोटी २० लाख ९६ हजार २५१ रूपये इतक्या अनुदानाची रक्कम चारा छावण्यांना देण्याचे प्रलंबित असल्याने, छावणी चालकास शेतकऱ्यांना, सावकारांना बँकेचे पैसे देता येत नसल्यामुळे छावणी चालकांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली असणे, त्यामुळे तहसील कार्यालयासमोर दिनांक २६ जुलै, २०२३ पासून

सर्व शेतकरी व चारा छावणी चालक जनावरांसह बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेणे, चारा छावणी चालकांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील अनुदानाची रक्कम राज्य शासनाकडून तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही. "

मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी, " मौजे वांद्रे (ता.मुरुड जंजिरा, जि.रायगड) येथील वांद्रे ग्रामस्थांकडे असलेल्या शासकीय जमिनीवरील शेत जमिनीचे निष्कासन रद्द करून शेती प्रयोजनासाठी जमीन प्रदान करणे " इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार महसूल मंत्र्यांनी निवदेन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, " राज्यातील पशुवैद्यक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ७ दिवसांपासून क्लासेस, प्रॅक्टीकल आणि ओपीडीवर बहिष्कार टाकलेला असणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यास महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी उत्तर दिले.

(४) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी, " शासनाने प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या गणपती मूर्तींच्या संदर्भात दिलासा देण्याची आवश्यकता " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " कर्नाटक राज्यातील सराफांच्या खोट्या तक्रारीवरून कर्नाटक पोलीस महाराष्ट्र-कर्नाटक सीमेलगत असलेल्या गावातील सराफांकडून वसुली व दमदाटी करीत असणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर बाब उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल असे महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी सांगितले.

(६) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, " रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे ओंबळी, ता.चिपळूण येथील भगिनी कु.निलीमा सुधाकर चव्हाण हिचा मृतदेह खाडीमध्ये आढळून येणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री.महादेव जानकर, वि.प.स. यांनी, " श्री.अशोक धोंडगे, पाणीपुरवठा विभागामध्ये इंजिनियर पदावर काम करीत असून त्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला असणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री.किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, " वाशिम जिल्ह्यात मान्यता मिळालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला संत सेवालाल महाराज यांचे नाव देणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४४ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (क) (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बत्तीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

(ख) उप सचिवांनी सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३ व मंगळवार दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवल्या.

(ग) उप सचिवांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची दहावी, अकरावी व बारावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवल्या.

२. (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल व (ख) नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, (क) " सत्र परीक्षा पद्धती बंद करून एक परीक्षा घेण्यासाठी उपाययोजना करणे " या विषयावरील माजी विधानपरिषद सदस्य श्री.मितेश भांगडिया व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३९६ वरील चर्चेच्यावेळी दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली तसेच (ख) एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ग) श्री बालाजी विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल व (घ) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे विद्यमान प्रबंधक (अतिरिक्त कार्यालय) यांच्याकडून कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांचा मानसिक, लैंगिक छळ सुरू असल्याबाबत "

दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, " श्री.नितीन देसाई, कला दिग्दर्शक यांचे दुःखद निधन " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

उपरोक्त मुद्यासंदर्भात सर्वश्री भाई जगताप, सचिन अहिर, प्रसाद लाड, वि.प.स. यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

माननीय उप सभापतींनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या.

आज सकाळी साडे आठ वाजता ज्येष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार ना.धो.महानोर यांचे दुःखद निधन झालेले आहे, त्यांचा साहित्यिक, राजकारणी तसेच व्यक्तिगतरित्या देखील आपल्या सर्वांशी परिचय होता, त्यामुळे शोक प्रस्तावाच्या वेळी आपण सर्वजणांनी भावना जरुर व्यक्त कराव्यात असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

नियम २८९ अन्वये दिलेल्या सर्व सूचना दालनात फेटाळलेल्या आहेत. दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा नियम २८९ अन्वयेच्या सूचनेचा गायरान जमिनीविषयीचा विषय होता, त्यावर निवेदन करण्याबाबतचे निर्देश आहेत. दिनांक १९ जुलै,२०२३ रोजी सन्माननीय सदस्य श्री.सचिन अहिर यांनी परळ-टाटा मेमोरियल रुग्णालयाबाबत निवेदन करण्याबाबतचे शासनाला निर्देश देण्यात आलेले आहेत. दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांच्या गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्याच्या अतिदुर्गम भागातील कृष्णार येथे रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे मृतदेह दुचाकीला खाट बांधून मूळ गावी नेण्यात आल्याबाबत या विषयावर शासनाला निवेदन करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी विरोधी पक्ष नेते, श्री.अंबादास दानवे यांच्या नियम २८९ अन्वये सूचनेच्या " पोलिसांची रिक्त पदे कंत्राटी तत्त्वावर भरणे " या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निर्देश देण्यात आलेले आहेत. दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी तळोक, जुनवणेवाडी, नाशिक येथे गर्भवती महिलेला चांगला रस्ता नसल्यामुळे अर्भकासह जीव गमवावा लागणे या विषयावर देखील शासनाने निवेदन करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सतेज ऊर्फ बंटी डी पाटील यांच्या अलमट्टी धरणासंदर्भातील विषयावर शासनाने निवेदन केलेले आहे. विरोधी पक्ष नेते, श्री.अंबादास दानवे यांच्या चीनी तंत्रज्ञानाचा वापर करून कॉपी करण्याच्या प्रकारात वाढ झाल्यासंदर्भात शासनाने निवेदन केलेले आहे. उर्वरित पाच विषयांवरील निवेदने उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी त्या त्या विभागाने करण्याबाबत निर्देश देत असून याखेरीज आठ, नऊ, दहा, अकरा, बारा, तेरा व चौदा या विषयांवरील निवेदनासंदर्भात संसदीय कार्य विभागांनी अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " पुरंदर तालुक्यातील जिल्हा पुणे एकाच व्यक्तीला दिव्यांगाचे वेगवेगळ्या टक्केवारीचे शेकडो बोगस प्रमाणपत्र वाटप करणे " या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची अनुमती देत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने दखल घेऊन पुढील कारवाई करावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " राज्यात कापसाला हमी भाव देणे " या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची अनुमती देत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी उत्तर दिले.

(३) श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी, " मुंबई-गोवा महामार्गाचे काम प्रलंबित असणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची अनुमती देत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

हा गंभीर प्रश्न असून शासनाने याची दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

या संबंधी अतिशय गांभीर्याने दखल घेतली जाईल असे ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्र्यांनी सांगितले.

(४) श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी, " मुंबई बोरीवली येथील गोराई विभागातील स्थानिक भूमीपुत्रांच्या समस्या " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची अनुमती देत आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या भूमिकेची नोंद शासनाने घेतली आहे असे
माननीय उद्योग मंत्र्यांनी सांगितले.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, " विधानपरिषदेतील ३ सन्माननीय सदस्यांसंदर्भात देण्यात आलेल्या अपात्रतेच्या नोटीशीबाबत विधिमंडळाकडून कोणत्याही प्रकारची माहिती न येणे " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यास संसदीय कार्य मंत्र्यांनी उत्तर दिले.

३. (ख) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, " सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १० महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंदर्भातील प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ग) (१) महसूल मंत्र्यांनी, " सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांनी, " सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ " विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. " इ.बाबतचा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.अंबादास दानवे यांनी विधेयकावरील चर्चेत भाग घेतला व हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत मांडलेला प्रस्ताव सभागृहाच्या अनुमतीने मागे घेण्यात येत असल्याचे सांगितले.

(२) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील

(३) श्री.एकनाथराव खडसे

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंदर्भातील प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उद्योग (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्षी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियमन व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२३ विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.सचिन अहिर (२) श्री.एकनाथराव खडसे

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उद्योग मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंदर्भातील प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) उद्योग (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.अंबादास दानवे (२) श्री.सचिन अहिर

(३) श्री.प्रवीण दटके (४) श्री.अनिकेत तटकरे

(५) श्री.सुरेश धस

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उद्योग मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंदर्भातील प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

उद्योग मंत्र्यांनी, " परराज्यात गेलेल्या वेदांता-फॉक्सकॉन, एअर बस प्रकल्प, सॅफ्रन प्रकल्प व बल्क ड्रग पार्क प्रकल्प " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ३ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून १५ मिनिटांनी सुरू झाली.

(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३' दोन्ही सभागृहाच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतच्या प्रस्तावास विधानपरिषदेच्या सहमतीसंबंधी विधानसभेकडून आलेला संदेश सचिव वाचून दाखवतील असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उप सचिवांनी, मला आपणास असे कळविण्याचा निदेश आहे की, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम १२९ व १९८(२) अन्वये पुढील मला पुढील प्रस्ताव पाठविण्याचा निदेश देण्यात आला आहे.

"सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ३४- महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्ततसमितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. "

कामगार मंत्र्यांनी, " सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांतील २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे. " इ.बाबतच्या प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

कामगार मंत्र्यांनी, विधानसभेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मांडला

(१) श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स.

(२) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(३) श्री.प्रवीण दटके, वि.प.स.

(४) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.

(५) श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.

(६) श्री.भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सत्यजित तांबे, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने श्री.भाई जगताप, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्य श्री.सचिन अहिर यांचे नाव स्वीकारावे व पुन्हा प्रस्ताव करून आणावा किंवा हाताने नाव लिहून मंत्री महोदयांनी वाचावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

कामगार मंत्र्यांनी, विधानसभेच्या नियुक्त करावयाच्या संयुक्त समितीवर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री. प्रवीण दटके, डॉ.मनिषा कायंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.भाई जगताप, श्री.सत्यजीत तांबे, यासह आता श्री.सचिन अहिर यांचे नाव घेत असल्याचे सांगितले.

श्री.अब्दुल्लाह खान दुर्राणी, वि.प.स. यांनी, " शासकीय वाहनांचे लोकप्रतिनिधींच्या हस्ते केलेले लोकार्पण " या विषयाबाबत श्री.शैलेश लाहोटी, प्रशासक व श्री.देविदास जाधव, मुख्याधिकारी, नगर परिषद पाथरी यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.अब्दुल्लाहखान दुर्राणी, वि.प.स. यांनी उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना संबंधित समितीकडे पाठवीत असून त्यामध्ये त्यांची संपूर्ण बाजू समजून घेऊन त्यावर योग्य ती कारवाई होईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ३८ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ४८ मिनिटांनी सुरू झाली.

४. श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव तसेच म.वि.प. नियम २६० अन्वये पुढील एकत्रित प्रस्ताव मांडले व भाषण केले :—

"राज्यातील महिला-मुलींवरील अत्याचार व बेपत्ता होण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुम माफियांची वाढलेली मुजोरी, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न,नपोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर सुडबुध्दीने होणारी कारवाई, लव्ह जिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात अपरिमित वाढ झालेली असणे, मा. मुख्यमंत्री यांच्या मतदारसंघातच चोरीच्या व लुटमारीच्या घटना झाल्या असून सदरहू घटनांकडे पोलिसांकडून होत असलेले दुर्लक्ष, समाज माध्यमातून (Social Media) करण्यात येणारी आक्षेपार्ह टिका, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करूनही संबंधितावि‍रुद्ध अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, सन २०२२ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांच्या प्रकरणांत वाढ झालेली असून त्यावर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, राज्यातील कारागृहात क्षमतेपेक्षा दुप्पट कैदी असणे ही समस्या, जामीन मिळूनही अनेक कैदी कारागृहात असणे, महिलांविषयी अपमानजनक होत असलेली वक्तव्य, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीने आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवण्यापूर्वी पोलिसांनी वारकऱ्यांवर केलेला लाठीचार्ज व पालखी सोहळ्यास लागलेले गालबोट, समृध्दी महामार्गावर नियोजनाअभावी होत असलेले अपघात, मरोळ, मुंबई औद्योगिक वसाहतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडपट्टीधारकांना घरे न देता स्थानिक दलालामार्फत घरांची अवैधपणे विक्री करून बोगस झोपडपट्टी धारकांनी घरांचा ताबा घेऊनही अद्याप कोणती कारवाई करण्यात आलेली नसणे, राज्यातील सुरू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाकरिता भूसंपादन केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला मिळालेला नसणे, शासन सेवेतील सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या एका वारसास सेवेमध्ये घेण्याची होत असलेली मागणी, तसेच जुनी पेन्शन संदर्भात शासनाची उदासिनता, राज्यात मागासवर्गीय व आदिवासींवर होत असलेला अन्याय व अत्याचार, आदिवासी मुलांचे वाढते कुपोषण, अदिवासींच्या योजनांच्या निधी अन्य विभागाच्या विकासकामांसाठी वळविणे, महागाईत वाढ झाली असून मध्यम वर्गाला त्रासाला सामोरे जावे लागणे, टाटा समूहाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीचा राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला नेमका परिणाम, राज्यात वाढलेली बेरोजगारी, नव्याने आलेल्या माहिती तंत्रज्ञान धोरणांमध्ये राज्यातील अनेक भागांवर अन्याय झाला असून त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता, मुलांना अधिवास प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला

विलंब, गीग अर्थव्यवस्थेच्या (Gig Economy) माध्यमातून काम करताना व काम करणाऱ्यांना येणाऱ्या समस्या, सेबीचे निर्बंध असूनही राज्यात दाम दुप्पट करण्याच्या आमिषाने होणारी गुंतवणूक, आर्थिक पाहणीमध्ये ६.८ टक्क्यांची वाढीची फसवी घोषणा, महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा, टॅक्सी कॉर्पोरेशनची घोषणा करूनही अद्याप कार्यवाही करण्याकडे होत असलेला विलंब, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ”

तसेच

“राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका झालेल्या नसल्यामुळे वाढता भ्रष्टाचार, मुंबईतील रस्ते, फूटपाथ, उद्याने, पूल, समुद्रकिनारे यांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरणाच्या कामाच्या नावाने जनतेच्या पैशांची सुरू असलेली लुट व त्यामध्ये झालेली अनियमितता, सुशोभीकरण करण्यासाठी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केलेला असणे, पदपथाची व रस्त्यांची कामे अपुर्णावस्थेत असल्याने पावसाळ्यात पाणी साचल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसणे, मुंबई उपनगरातील पिण्याच्या पाणी समस्येवर मात करण्यासाठी समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्प राबविण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, वॉर्डच्या लोकसंख्येप्रमाणे निधीचे वाटप न करणे, मुंबईत साथीच्या रुग्णसंख्येत दुपटीने झालेली वाढ, ठाण्यात विकासाच्या नावाखाली हजारो झाडांची करण्यात आलेली कत्तल, ठाणे शहरातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलांना नागरिकांचा असलेला विरोध, नैना प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या जमिनी संपादित करून विकासकांच्या घश्यात टाकण्याचा सुरू असलेला प्रयत्न, एमएमआरडीए अंतर्गत विकासकामांसाठी जमिनी संपादित करताना बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकडे होत असलेले दुर्लक्ष, सततचा पाऊस, गारपीट आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, राज्यात सिंचनाचा अभाव, शेतीमालाला भाव नसल्याने कर्जबाजारीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण, राज्यात दरड कोसळण्याच्या घटनेत झालेली वाढ, प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कक्ष तयार करण्याची आवश्यकता, राज्यावर आज ६ लाख कोटींचे कर्ज असणे, कर्ज फेडायला परत कर्ज आणि व्याज फेडायलाही कर्जच अशी अवस्था राज्याच्या आर्थिक रचनेची झालेली असणे, देशात सर्वाधिक कर भरणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव असणे, मात्र, महाराष्ट्राच्या वाट्याला फारसा निधी केंद्राकडून दिला जात नसणे, महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्ट्ये पाहिली असता कर्जावरील चक्रवाढ व्याज वाढत चालले असणे, राज्यात कॅन्सर व इतर आजारांच्या प्रमाण वाढले असून त्याकरिता करण्यात येणारे उपचार महाग झाले असणे, सदर उपचाराकरिता रुग्णालयांकडून

नागरिकांची लूट होत असल्याने गरीबांची अडचण होत असणे, त्याकरिता धोरण निश्चित करण्याची गरज,जटाटा रुग्णालयाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, मुख्यमंत्री सहाय्यता निधी गरिबांना मिळत नसणे, धर्मादाय रुग्णालयात अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना खाटा उपलब्ध न होणे, एम्स च्या धर्तीवर विभागनिहाय रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळण्यासाठी गृहनिर्माण धोरण राबविण्याची आवश्यकता, महारेरामध्ये नोंदणी न करता विकासक नागरिकांची फसवणूक करणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकास करताना विकासकांनी जास्तीच्या झोपडपट्टी दाखवून एफ.एस.आय. वाढवून घेऊन शासनाची केलेली फसवणूक,ककेंद्र शासनाच्या अखत्यारितीतील जमिनी वरील झोपड्यांचा पुनर्विकास,सबी.डी.डी च्या पुनर्विकासास होत असलेला विलंब, बी.डी.डी चाळीची दुरवस्था झाली असून दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ”

प्रस्ताव प्रस्तुत झाले.

एकत्रित प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

(१) श्री. भाई जगताप (२) श्री. एकनाथराव खडसे

(३) श्री. कपिल पाटील (४) ॲड. अनिल परब

(५) श्री. अरूण लाड (६) श्री. महादेव जानकर

(७) श्री. नरेंद्र दराडे (८) डॉ. प्रज्ञा सातव

(चर्चा अपूर्ण)

कामगार मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक - ३४ संदर्भात आपण निदेश दिल्याप्रमाणे विधानसभेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा सुधारित प्रस्ताव मांडला.

(१) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स.

(२) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(३) श्री. प्रवीण दटके, वि.प.स.

(४) श्री. सचिन अहिर, वि.प.स.

(५) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.

(६) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. विशेष निमंत्रित

(८) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

"राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती " यासंबंधी सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव.

तसेच

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित असणे " यासंबंधी सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव.- चर्चा पुढे सुरू.

एकत्रित प्रस्तावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

(९) श्री. अमोल मिटकरी (१०) ॲड. निलय नाईक

(११) श्री. धीरज लिंगाडे (१२) श्री. सचिन अहिर

(१३) श्री. सुधाकर अडबाले (१४) श्री. आमश्या पाडवी

(चर्चा अपूर्ण)

गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

गुरुवार दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३

" राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती" यासंबंधी सर्वश्री अंबादास कपिल दानवे, एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, जयंत प्र. पाटील, किरण सरनाईक, डॉ. वजाहत मिर्झा, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनिल शिंदे, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, अरुण लाड, आमश्या पाडवी, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव.

तसेच

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याकरिता शासनाकडून सुरु असलेली कार्यवाही " यासंबंधी सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, काळे, श्रीमती उमा खापरे, ॲड निरंजन डावखरे, सर्वश्री प्रवीण दटके, अनिकेत तटकरे, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, रामदास

आंबटकर, रणजितसिंह मोहिते पाटील, प्रा. राम शिंदे, सर्वश्री निलय नाईक, राजहंस सिंह, रामराव पाटील, रमेशदादा पाटील, वसंत खंडेलवाल, रमेश कराड, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव.

तसेच

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित असणे" यासंबंधी सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी डी पाटील, एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, विलास पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० प्रस्ताव.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अभिजीत वंजारी (२) श्री. शशिकांत शिंदे

माननीय उपमुख्यंत्र्यांनी उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाने तिन्ही प्रस्तावांवर विचार केला आहे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक दुपारी १२.०० वाजता स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. ज्येष्ठ साहित्यिक कै.नामदेव धोंडो महानोर, माजी वि.प.स.यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ज्येष्ठ साहित्यिक कै. नामदेव धोंडो महानोर, माजी वि.प.स.यांच्या दुःखद निधनाबदद्ल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून २२ मिनिटांनी दुपारी ०१ वाजून ३२ मिनिटांपर्यंत १० मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची दुपारी ०१ वाजून ३२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

३. (१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, " विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, " कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल व सन २०२०-२०२१ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, " महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(४) उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी. " भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) " मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन लेखापरीक्षा अहवाल" तसेच (२) " इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, " महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची उपकंपनी दि प्रताप स्पिनिंग, विव्हींग आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपनी मर्यादित, अमळनेर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अनुक्रमे चोपन्नावा व एकशे एकोणीसावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(६) गृहनिर्माण मंत्र्यांनी, " महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ व महामंडळाची उपकंपनी दि प्रताप स्पिनिंग, विव्हींग आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपनी मर्यादित, अमळनेर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अनुक्रमे चोपन्नावा व एकशे एकोणीसावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

४. सचिव-२ (कार्यभार) यांनी, महाराष्ट्र विधानपरिषदेने पारित केलेल्या व विधानसभेकडून संमत करण्यात आलेली ३ वि.प. विधेयके, माननीय राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले १ वि.स. विधेयक आणि माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या ३ वि.स. विधेयकांची नावे सभागृहास वाचून दाखवली.

५. (१) सर्वश्री. विलास पोतनीस, भाई जगताप, सचिन अहिर व श्री. शशिकांत शिंदे. वि.प.स. यांनी " ठाणे येथील जोशी बेडेकर महाविद्यालयात एनसीसीच्या कनिष्ठ विद्यार्थ्यांना मारहाण करणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यावर सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चा करण्याएवजी श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सदरहू घटना अतिशय गंभीर असून यासंदर्भात शासनाने निवेदन करावे. असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

(२) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी " मुंबईतील वीज ग्राहक तसेच बेस्ट उपक्रमातील प्रवाशांची होत असलेली गैरसोय " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये दिली सूचना असून त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे निर्देश माननीय तालिका सभापतींनी दिले.

(१) वने मंत्र्यांनी, " वन्यप्राण्यांचे हल्ल्यामुळे मनुष्य मृत्यू, अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी झाल्यास द्यावयाच्या अर्थसहाय्यामध्ये वाढ करणे " इ. बाबत म.वि.प.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(२) मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी, " मत्स्यधोरणाबाबत उपस्थित केलेला प्रश्न " इ. बाबत म.वि.प.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

६. (१) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांनी " राज्यात ४१७ अनधिकृत शाळा सुरु असणे " इ. बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय तालिका सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले. काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स. यांनी " संग्रामपूर (जि. बुलढाणा) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसान " इ. बाबत दिलेल्या म. वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय तालिका सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी " मुंबईतील शासकीय जमिनीवरील गृह निर्माण संस्थांच्या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाबाबत " सूचना क्रमांक १६ दिलेली असून या वरील निवेदन अप्राप्त असल्यामुळे ती सूचना आज घेता येणार नसल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनांना अनुलक्षून निवेदने (पुढे सुरु)

५. (३) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी " मौजे वेळे, ढेण, धनगरवाडा, ठोसेघर ता. जावळी जि. सातारा येथील कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाने बाधित झालेल्या रहिवाशांचे पुनर्वसन" इ.बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय तालिका सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी " अलिबाग जि. रायगड तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठ्याचे थकीत वीज देयक एमआयडीसीने भरणे" इ.बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय तालिका सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला :—

"महाराष्ट्र विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावर पूर्ण विश्वास व्यक्त करीत आहे."

श्री. भाई गिरकर, वि.प.स. यांनी उपरोक्त प्रस्तावाला अनुमोदन दिले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ०९ मिनिटांनी ३-०० वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

७. (१) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई विभाग यांच्या कार्यालयातील गलथान आणि गैरकारभारामुळे भ्रष्टाचार बोकाळला असून वारंवार तक्रारी करुनही अनेक प्रकरणांना मान्यता न देणे, शालार्थ आयडी न देणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांना मान्यता न देणे, निवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे व पी. एफ. चे प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, संचमान्यता दुरुस्ती न होणे, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, सह्यांचे अधिकार न दिल्याने शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन थकणे, पी. एफ. खात्यातील विना परतावा पैसे काढण्याचे प्रस्ताव महिनों महिने प्रलंबित ठेवणे, मा. हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पैशाची मागणी करणे, संस्थाचालक, शिक्षक यांना अपमानास्पद वागणूक देणे, सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या शिक्षिका यांच्याकडे पुरस्काराच्या मानांकनासाठी पैशाची मागणी केल्याची लेखी तक्रार संबंधित शिक्षकाने करणे, यामुळे आदर्श शिक्षकांच्या राज्य पुरस्कारांबद्दल विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होणे, वामनराव मुरंजन हायस्कूल, मुलुंड या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पैशाची मागणी करणे, खान शबाना परवीन, उस्मानीया उर्दू हायस्कूल, गोवंडी यांच्याकडे शालार्थ आयडी मिळण्यासाठी पैसे मागण्याची लेखी तक्रार संबंधित शिक्षिकेने करणे, रात्रशाळेतील दुबार शिक्षकांना हजर करून न

घेणे, एका शिक्षकाकडून पैसे गोळा करण्यासाठी संबंधित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना फोन करणे, या कथित शिक्षकाच्या फोनचा CDR रिपोर्ट काढून तपासण्याची आवश्यकता असणे, या प्रकरणी शिक्षण उप संचालक, मुंबई व राज्य शिक्षण यांच्याकडे वारंवार आयुक्त तक्रारी होऊनही अद्याप कारवाई न होणे, खुद्द मा. हायकोर्टाने कडक ताशेरे दिलेले व चॅरिटी कमिशनरने डीरेकगनाईज्ड केलेल्यांमार्फत संस्थाना ब्लॅकमेल करणे, शिक्षकांना खर्चात टाकणे असे प्रकार विभागाच्या संगनमताने वारंवार घडणे, शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई या कार्यालयातील संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांना तात्काळ पदावरून हटवण्याची आवश्यकता असणे, या गंभीर प्रकरणी शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी शालेय शिक्षण मंत्री यांचेकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहराचा विकास आराखडा ३५ वर्षांपूर्वी तयार झाला असून सध्या कागल शहराचा नविन विकास आराखडा दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी प्रसिद्ध होणे, त्यामध्ये अनेक गोरगरिब शेतकऱ्यांच्या शेतीवर चुकीच्या पध्दतीने आरक्षण पडलेले असणे. विकास आराखडा विरोधी कृती समितीने लाक्षणिक उपोषण केल्याने शासनाने डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग पुणे मार्फत ४ सदस्यीय कमिटी नेमणे, या कमिटीने दिनांक २३ ते २५ मे, २०२३ रोजी शेतकऱ्यांच्या हरकतीवर सुनावणी घेणे, तपासणी करून नगरपालिकेस अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले व या कमिटीने अहवाल नगरपालिकेस दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी सादर करणे, सदर अहवाल व विकास आराखडा नगरपरिषदेमध्ये बॉडी नसल्याने २० जुलैच्या दरम्यान हा विकास आराखडा शासनास सादर करणे ज्यावेळी दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दैनिकांमध्ये कागल शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण होणे, यामध्ये प्रशासकाने मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन काही महत्त्वाची आरक्षणे वगळली व काही अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतावर आरक्षण टाकणे, काही औद्योगिक कंपन्यांच्या आर्थिक देवाणघेवाणीतून कागलच्या पिण्याचे पाणी असलेल्या जयसिंगराव तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये औद्योगिक झोन तयार करण्यात येणे, या कमिटीकडून आरक्षण उठविण्या करिता मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढालीची चर्चा शेतकऱ्यांमध्ये व मोठ्या बिल्डरांमध्ये सुरु असणे, अशा चुकीच्या पध्दतीने आर्थिक व्यवहारातून जमिनीची आरक्षणे काढणे व टाकणे, तसेच गडहिंग्लज नगरपरिषदेचा देखील सध्या याच कमिटीकडून विकास आराखडा तयार करण्याचे काम चालू

असणे, त्यामुळे तिथे देखील चुकीचा विकास आराखडा तयार होण्याचा संभव असणे, त्यामुळे या कमिटीचे व तत्कालीन कागलचे प्रशासक तथा मुख्याधिकारी यांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करून कागल व गडहिंग्लज नगरपरिषदेचा विकास आराखडा रद्द करावा व नव्याने फेरसर्वेक्षण करावे अशी स्थानिक नागरिकांमधून आग्रहाची मागणी होत असणे, परंतु या मागणीकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय निवासी २८८ आश्रमशाळांना राज्य शासनाने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरु असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, अशी सातत्याने मागणी होत असणे, मराठवाड्याच्या शिक्षक लोकप्रतिनिधिंनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधलेले असणे, तत्कालीन मंत्री महोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करून अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करुन अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणी नूसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षार्चा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीनुसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षककर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. रामराव पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

"नांदेड महानगरपालिकेने शासनाच्या मान्यतेशिवाय महात्मा फुले व्यापारी संकुल व शिवाजीनगर जनता मार्केटची तीन संकुले पीपीपी आणि बीओटी तत्वावर शासनाची पूर्वमान्यता न घेता एकाच विकासकाला देण्यात येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या मूळ निविदेतील प्रिमियम ३५ कोटी असणे, परंतू फेरनिविदेत खाजगी सल्लागाराने फिरविलेल्या सल्ल्यानुसार केवळ १५ कोटी प्रिमियम निश्चित करण्यात येणे, सदर व्यापारी संकुलाच्या निविदा भरणाऱ्या सन्मान बिल्डकॉन

या विकासकाने केवळ १० लाख रुपये भागभांडवलाची स्वतःची जय सन्मान प्रा.लि. ही नवीन कंपनी स्थापन करुन महानगरपालिकेकडून सदर कामाचे कार्यारंभ आदेश मिळवून घेणे, मूळ निविदेपेक्षा अधिक जागेवर वाढीव बांधकामासाठी नव्याने निविदा न काढता सदर काम जय सन्मान प्रा. लि. या मूळ निविदा न भरलेल्या विकासकाला जागेचे कोणतेही मूल्य न आकारता देण्यात येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलातील गाळेधारकांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यासाठी लाखो रुपयांचे काम विकासकाला विनानिविदा देण्यात येणे, संकुलातील गाळेधारकांच्या तात्पुरत्या पुनर्वसनाचे काम विकासकाच्या करारात नमूद नसल्याने त्यांचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड महापानगरपालिकेवर पडणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या कामाला /कराराला शासनाने स्थगिती दिली असताना देखील काम सुरुच ठेवण्यात येणे, तसेच सदर कामाच्या ठिकाणी एका कामगाराचा कोसळून मृत्यू झाला असणे, त्याबाबत महानगरपालिकेने कोणतीही तक्रार न करणे तसेच विकासकावर गुन्हा नोंदविण्यात न येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या जागेची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन न घेता कामास सुरुवात करण्यात येणे, उक्त मार्केटमधील महात्मा फुले मंगल कार्यालयात गोरगरीब कुटुंबातील लग्नसमारंभ कमी शुल्कात/भाड्यामध्ये होत होती, परंतु सदर इमारत विकसित करताना तेथे मंगल कार्यालय वगळून संपूर्ण वाणिज्य वापर करण्यास परवानगी देण्यात येणे, शिवाजीनगर जनता बाजार मार्केटच्या १० हजार चौरस मीटर (१.०७ लाख चौरस फुट) बांधकामाच्या निविदा विकासकाला केवळ एक कोटी रुपयांमध्ये देण्यात आलेली असणे, प्रस्तुत महानगरपालिकेच्या जागेवर अनधिकृतपणे वसलेल्या कुटुंबांना निवासी गाळे (घरे) विकासकामार्फत मोफत बांधून दिली जाणार असणे, नांदेड महानगरपालिकेने महात्मा फुले मंगल कार्यालय व व्यापारी संकुल तसेच शिवाजीनगर जनता मार्केट क्र. १, २ व पाठीमागील बाजूचे बांधकाम व पुनर्विकास करण्याचे काम हाती घेताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९ तसेच कलम ७९ (क) मधील परंतुकात नमूद नियमानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नसणे, तसेच वरील सर्व व्यापारी संकुले संबंधित विकासकाला शासनाच्या कोणत्याही कायद्यात अस्तित्वात नसलेल्या ९० वर्षासाठी लिजवर देण्यात येणे, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे तक्रार केल्यानंतरही याप्रकरणी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता सदर कामावरील स्थगिती उठविण्यात येणे, एकीकडे नांदेड महानगरपालिकेने रस्ते, नाल्यांच्या कामातील लोकसहभागाची रक्कम भरण्यासाठी १५० कोटीचे कर्ज घेतले आणि आता ड्रेनेज, रस्ते व पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी ३५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचे प्रस्तावित केलेले असताना दुसरीकडे विकासकाच्या फायद्यासाठी ३५ कोटीचे प्रिमियम १५ कोटी करुन महानगरपालिकेने स्वतःचे २० कोटीचे नुकसान करुन घेणे, तसेच राज्यातील इतरत्र जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात येत असून त्यात मोठ्या प्रमाणात स्पर्धा होत असल्याचे दिसून येत असताना मात्र दुसरीकडे नांदेड महापानगरपालिकेस विकासक मिळत नसल्याचा देखावा करुन

एकाच विकासकाला फेरनिविदा काढून कामे देण्यात येत असल्यामुळे या सर्व प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न होत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्यासाठी एसआयटी व एसीबी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह निर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले–

"म्हाडा प्राधिकरण मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून जवळपास ५० वर्षांपूर्वी पाडण्यात आलेली मौलाना आझाद रोड, भंडार वाडा, क्रॉस लेन, गिरगाव येथील इमारत आता खाजगी कंत्राटदार नेमून म्हाडाने नव्याने बांधली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, मात्र सायन येथील प्रतिक्षा नगरातील संक्रमण शिबिरात गेली ५० वर्षे या प्रकल्पातील राहणाऱ्या रहिवाश्यांना अद्याप हक्काचे घर मिळाले नसून याउलट नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या डागडुजीसाठी आता नव्याने ३० लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याची माहिती उघडकीस येणे, इमारतीमधील रहिवासी वर्गाने म्हाडाकडे आपली मूळ कागदपत्रे जमा केली असणे, मात्र कित्येक वर्ष उलटूनही येथील रहिवाश्यांना आजही संक्रमण शिबिरात राहावे लागत असणे, याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने रहिवाश्यांच्या मनात शासनाविषयी संताप पसरला असल्याने अशा प्रकारे म्हाडाच्या इमारतींच्या होणाऱ्या निकृष्ट कामाबाबत शासनाने सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, सदरहू इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांना तातडीने त्यांची घरे मिळण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले–

"राज्यातील शेतकरी, उद्योजक, विधवा, परितक्त्या, यथास्थिती पूरबाधित, भुकंपग्रस्त, इ. विविध घटकांना शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अनुदान / सवलत / आरक्षण / आर्थिक मदत / सानुग्रह अनुदान देण्यात येत असणे, शासनाच्या या योजनांच्या माध्यमातून राज्यातील अनेक पात्र लाभार्थ्यांना यामुळे अमुल्य लाभ मिळत असणे, तथापि या घटकांपैकी काही घटक हे आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने राज्य शासनाच्या विविध योजनांमधून मिळणाऱ्या लाभ, मदत घेण्यास इच्छुक नसतानाही बहुतांशी वेळा शासनाची मदत, लाभ हे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा

होत असणे, परिणामी त्यांना सदरहू लाभ, मदत नाकारण्याकरिता सद्यःस्थितीत शासकीय यंत्रणेमध्ये कोणताच पर्याय उपलब्ध नसल्याने इच्छा असतानाही अशा घटकांना शासनाची मदत, लाभ शासनास परत करण्याचा किंवा शासनाची मदत, लाभ नको असल्याबाबत शासनास कळविण्याचा पर्याय सहज उपल करून देण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून Give it up LPG Subsidy हा उपक्रम राबविला असता देशातील लाखो नागरिकांनी / घटकांनी या उपक्रमास भरघोस प्रतिसाद देऊन एलपीजी सबसिडीचा त्याग केलेला असणे, याच धर्तीवर राज्य शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून मिळणारा लाभ, मदत स्वेच्छेने सोडू इच्छिणाऱ्या घटकांकरिता / नागरिकांकरिता तसा पर्याय राज्य शासनाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, सदरहू बाब अमलात आणल्यास राज्य शासनाच्या अमूल्य अशा विविध संसाधनांची बचत होवून या संसाधनांचा वापर अन्य लोकोपयोगी कामांसाठी करणे शक्य असणे, समाजहित, देशहिताची अशी भावना मनात ठेवून आजपर्यंत काही लोकप्रतिनिधींनी, सज्ञान नागरिकांनी त्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांच्या लाभाचा, मदतीचा स्वेच्छेने त्याग केलेला असणे, परंतु ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे दृष्टीकोनातून शासनाच्या विविध योजनांद्वारे मिळणारे लाभ, मदत स्वेच्छेने सोडू इच्छिणाऱ्या सज्ञान नागरिकांना असा पर्याय सहज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"ठाणे शहरात नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारण्यात येणार असणे, या मेट्रो मार्गाला ठाणे रेल्वे स्थानक व नियोजित नवे ठाणे रेल्वे स्थानकाबरोबर जोडण्यात येणार असणे, या मार्गाचा अद्याप अंतिम आराखडा निश्चित झालेला असणे, परंतु तत्पूर्वी महामेट्रो कंपनीकडून नौपाडा परिसरात होत असलेल्या १८ इमारतींच्या बांधकामांना हरकत घेण्यात येणे, परिणामी वर्षानुवर्षे अधिकृत इमारतीत राहणाऱ्या व आता धोकादायक स्थितीतील इमारतींचा पुनर्विकास रखडला असणे, सध्या नौपाड्यातून जाणाऱ्या अंतर्गत मेट्रोचा मार्ग रेल्वे यार्डखालून नेल्यास इमारतींच्या पुनर्वसनाला अडथळा येणार नसणे, त्याचबरोबर या प्रकल्पाचे काम वेगाने होणार असणे, या यार्डखालून दोन्ही रेल्वे स्थानकेही सहजपणे जोडता येऊ शकणे, नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्प महामेट्रो कंपनीकडून राबविण्यात येत आहे मात्र, या प्रकल्पाचे काम अजूनही कागदावरच असणे, मुंबई महानगर क्षेत्रात "एमएमआरडीए" कडून सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांची

कामे वेगाने सुरू असणे, या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील अंतर्गत मेट्रोचे काम पूर्ण होण्यासाठी हा प्रकल्प' 'एमएमआरडीए"कडे सोपविण्याची गरज,जयावर शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकरिता निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८. (१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३चे वि.स.वि. क्रमांक ३८- लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापी" नागपूर विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे,अभिजीत वंजारी, ॲड.अनिल परब, श्री. भाई जगताप वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. प्रवीण दटके २) श्री. अभिजीत वंजारी

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) सहकार मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २९- महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे,अभिजीत वंजारी, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

माननीय तालिका सभापतींनी, विधानसभेकडून आलेला पुढील संदेश माननीय उप सचिव वाचून दाखवतील असे सांगितले.

उप सचिवांनी, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ०४ ऑगस्ट,२०२३ रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम १२९ व १९८(२) अन्वयेचा पुढील संदेश वाचून दाखविला-

प्रस्ताव

सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४०- महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ४२ बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३, सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४३- अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक; सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४१-कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक ववसन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४४-महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतत (सुधारणा) विधेयककही विधेयके विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावीत.

कृषी मंत्र्यांनी, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ रोजी विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी, असा प्रस्ताव मांडला.

सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४० - महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक,सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ४२ बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३, सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४३- अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४१-कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक व सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४४-महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार,धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स), वाळू

तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक ही विधेयके विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

कृषी मंत्र्यांनी, विधानसभेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा प्रस्ताव मांडला.

१. श्री. रमेश कराड, वि.प.स.

२. श्री. वसंत खंडेलवाल, वि.प.स.

३. श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

४. श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

५. डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.

६. श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

७. श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.

८. श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

ॲड. अनिल परब, वि.स.स. यांनी, "माननीय सभापती किंवा उपसभापती यांना दूर करण्यासंबंधातील विश्वासदर्शक प्रस्ताव" इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा मांडला.

श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स.यांनी, "श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांना औरंगाबाद जिल्ह्यातील व्हॉट्स ॲप ग्रुपच्या माध्यमातून धमकी मिळणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

सदरहू विषय अतिशय गंभीर असून शासनाने याबाबत दखल घेऊन कार्यवाही करावी, असे निर्देश माननीय तालिका सभापतींनी दिले.

९. (२) सहकार मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २९- महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ (चर्चा पुढे सुरु)-

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. एकनाथराव खडसे (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनांना अनुलक्षून निवेदने-(पुढे सुरु)-

(६) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "डोंगर विकास नियमन प्राधिकरणाची स्थापना करणे" इ. बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींनी दिलेल्या निदेशानुसार महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "मुंबईतील शासकीय जमिनीवरील गृहनिर्माण संस्थांच्या जीर्ण इमारतींचा पुनर्विकास" इ.बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींनी दिलेल्या निदेशानुसार महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय उप सभापतींनी, आज शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी प्राप्त झालेले व मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, आज शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या व मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, आज दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी कामकाजपत्रिकेवरील अनुक्रमांक अकरा येथील अशासकीय कामकाज हे पुढे ढकलण्यात येत असून ते पुढील अधिवेशनात घेण्यात येईल, असे घोषित केले.

"महसूल मंत्र्यांनी , 'सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - विवक्षित प्रकरणांमध्ये, महाराष्ट्र शासनाने अथवा महाराष्ट्र राज्यातील विवक्षित सार्वजनिक प्राधिकरणांनी किंवा त्यांच्या वतीने केलेल्या प्रशासकीय कारवायांची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्या विरुध्दच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी व अन्वेषण करण्याकरिता लोक आयुक्त संस्थेची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्यासाठी २५ मार्च २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी," असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(८) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्राम विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"रायगड जिल्हा परिषदेने कामगारांच्या पुढील भविष्यासाठी व त्यांच्या हितासाठी कामगार विमा कायद्यांतर्गत प्रत्येक कंत्राटदाराच्या बीलामधून कामगार विम्याची एक टक्का रक्कम

उपकर म्हणून वसूल करण्यात येत असणे, मात्र शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीचे उल्लंघन करुन एका टक्क्याऐवजी दोन टक्के रक्कम वसूल केली जात असणे, ही वसूल करण्यात आलेली ३७ कोटी २५ लाख ६८ हजार १५१ ही रक्कम मागील तीन वर्षे शासनाकडे जमा केलीच नसल्याचे आढळून येणे, या तीन वर्षांतील ३७ कोटी २५ लाख ६८ हजार १५१ इतकी रक्कम जिल्हापरिषदेकडे पडून असल्याने याचा कोणताही फायदा कामगारांना होत नसल्याने आढळून येणे, मागील तीन वर्षात फक्त बांधकाम व ग्रामीण पाणीपुरवठा या दोन विभागामध्ये जर सदरील कामगार विम्याची रक्कम या जिल्हापरिषदेने भरलेली नसेल तर गेल्या १० वर्षांतील सर्व विभागातील कामगार विम्याची रक्कम भरली नसल्यास ती १०० कोटींवर असण्याची शक्यता असणे, या जिल्हा परिषदेकडे पडून असलेली कोट्यवधीची ही रक्कम राजकीय हितासाठी वापरली जात असल्याचा आरोप होत असणे, या संशयास्पद व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी कामगार वर्गातून होत असतानाही त्यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी येथील कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना, त्यामुळे गरीब व सर्वसामान्य कामगारांची विम्याची रक्कम त्यांना परत मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकासस मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात हेतूपूरस्सर अनियमितता व आर्थिक घोटाळा केल्याचे आढळून येणे, अनुसुचित जाती / नवबौध्द उपयोजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ८१ लाभार्थी तसेच जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटप योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनधिकृतरित्या व नियमबाह्यपणे लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्याशिवाय विशेष घटक योजनेअंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी, पशुपालकांना शासन नियमानुसार शासनाने ४५०००/-इतका दर ठरवून दिलेला असताना, सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये रुपये ४५००० ऐवजी रुपये ६८०००/-नियमबाह्य पध्दतीने शेळी गट खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप केले असल्याचे आढळून येणे, तसेच सदर दोन्ही योजनांतर्गत, सन २०२०-२१ मधील काही लाभार्थ्यांकडून जमा झालेला लाभार्थ्यांचा हिस्सा शासन तिजोरीत जमा न करता, स्वतःजवळ ठेवून लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे खोटे दाखवून शासन निधीचा गैरवापर करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, त्याबाबत लाभार्थ्यांनी

व नागरिकांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागवूनही लाभार्थ्यांना, नागरिकांना माहिती देण्यात न येणे, त्यामुळे गोरगरीब व लाभार्थी जनतेमध्ये जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांचा आर्थिक घोटाळा केला असल्याचा संशय निर्माण होणे, परिणामी, लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्येची भावना, याप्रकरणी, शासनाने सविस्तर चौकशी करुन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. अकोला यांचेविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, विशेषाधिकार भंगाची सूचना सदनामध्ये मांडली असून त्याबाबतची कागदपत्रे माननीय उप सभापतींकडे पाठवित आहे व उर्वरित प्रक्रिया उपसभापती कार्यालयामध्ये करीत आहे, असे सांगितले.

माननीय उप सभापती यांनी, ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली कागदपत्रे विशेषाधिकार भंग समितीकडे पाठवून देत असल्याचे सांगितले.

(१०) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांसाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे नुकतेच माहे जुलै,२०२३ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे केलेल्या तक्रारी, सदर तक्रारीच्या अनुषंगाने राज्य स्तरीय चौकशी दिनांक ११ मे, २०२३ च्या पत्रानुसार शासनाच्या संबंधित विभागामार्फत कार्यकारी अभियंता यांच्याविरोधात चौकशी लावण्यात येणे, परंतु सदरहू राज्यस्तरीय समिती रद्द करण्यात येऊन दिनांक ३१ मे, २०२३ रोजी प्रधान सचिव कार्यालयाकडून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय नवीन चौकशी समिती स्थापन करण्यात येणे, सदर समितीने निविदा प्रक्रियेसंदर्भात शासनास चुकीचा अहवाल सादर करणे, पूर्वीची राज्यस्तरीय समिती रद्द करुन नवीन जिल्हास्तरीय चौकशी समिती सुरु करताना सदर प्रकरणातील कागदपत्रांचा करण्यात आलेला फेरफार, सदर प्रकरणाची चौकशी सुरु असताना राज्यस्तरीय चौकशी समिती बंद करण्याबाबत निर्माण होत असलेली संभ्रमाची भावना, यात भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याची दाट

शक्यता, त्याकरिता सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, यातील दोषी आढळून आलेले संबंधित विभागाचे भ्रष्ट अधिकारी कार्यकारी अभियंता यांची सखोल चौकशी करुन तात्काळ निलंबित करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

राज्य उत्पादन शुल्कक मंत्र्यांनी पाणी पुरवठा मंत्र्यांच्या वतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"समृद्धी महामार्गावरील अपघाताच्या प्रमाणात प्रचंड वाढ झालेली असणे, त्यातच मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे समृध्दी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम सुरु असताना गर्डर कोसळून झालेल्या अपघातात पाच इंजिनियरसह एकूण २० जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाल्याची बाब निदर्शनास आली असणे, सदरहू काम करणाऱ्या नवयुगा इंजिनियरिंग कंपनीचे स्थानिक कॉन्ट्रॅक्टर आणि गर्डर लॉंच करणाऱ्या व्ही.एस.एल.लकंपनीच्या कॉन्ट्रॅक्टरच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणामुळे कामगारांचा मृत्यू झालेला असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ सदरहू कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन मृत व जखमी कामगारांना मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

राष्ट्रीय आमदार संम्मेलन भारत-२०२३ चे उत्कृष्ट आयोजन केल्याबाबत एम.आय.टी.स्कूल ऑफ गव्हर्नमेंट आणि भारतीय छात्र संसद या संस्थांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव-

माननीय उपसभापतींनी उक्त अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला व आपले म्हणणे मांडले.

डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, "मानखुर्द-लिंक रोड-घाटकोपर येथील सरकारी कर्मचारी वसाहतीत पसरलेले घाणीचे साम्राज्य, दूषित हवामान, रस्त्यांवर पडलेले खड्डे, कांदळनातील सरपटते प्राणी, वसाहतीतील गर्दुल्ले यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू विषयावर पुढील महिनाभरात बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलाविण्यात येईल व संदर्भित विषयासंबंधी आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी, "महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने श्वेतपत्रिका काढणे" इ.बाबत विषय उपस्थित करून त्याबाबत विस्तृतपणे आपले म्हणणे मांडले.

उद्योग मंत्र्यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

(८) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, "राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका,जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन, निवृत्तीवेतन तसेच भविष्य निर्वाह निधी देणे" इ.बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींनी दिलेल्या निदेशानुसार ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. भाई जगताप, वि.प.स.यांनी, राजापूर येथील धरणाच्या खालील बांध पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करून शासनाकडे हा बांध तयार करण्यासाठी ७ कोटी रूपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी केली.

शासनाने याबाबत सकारात्मक विचार करावा, असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

(१२) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

६०	**श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** राज्यातील खाजगी विनाअनुदानित इंगजी शाळांना देण्यात येणारे शिक्षण हक्क कायदा (आरटीई) रखडलेले रु १८०० कोटी प्रतीपुर्ती अनुदान वितरित करणेबाबत.	२५ जुलै, २०२३
६१	**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** ठाणे जिल्ह्यातील एस.एस.टी. कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स, माणेरेगाव, ता. अंबरनाथ यांनी मुंबई विद्यापीठाकडून दिलेल्या अधिकृत जागेवर महाविद्यालय सुरू न करता अन्यत्र महाविद्यालय सुरू करण्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६२	**श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागातील प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांची मिळून तब्बल ६१ टक्के पदे रिक्त असल्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६३	**श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** बोरीवली पूर्वेतील देवीपाडा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रकल्प सन २००९ पासून रखडला असल्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६४	**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** नागपुरातील शासकीय रुग्णालयाला ७५ वर्ष पूर्ण होऊन अमृत महोत्सवी वर्षामध्ये रोबोटिक सर्जरी युनिट सुरू करण्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६५	**श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्यामार्फत विविध संवर्गनिहाय पद भरती जाहिरात करून सरळसेवेच्या कोट्यामधील ४१७ पदांसह सुधारित जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६६	**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** राज्यात विधीसंघर्षग्रस्तांची ' केअर ' उपक्रम सुरू करण्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६७	**श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.** अकोला जिल्हा परिषदेमधून सेवानिवृत्त झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या रक्कमा त्यांना प्राप्त झालेल्या नसल्याबाबत.	२५ जुलै, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
६८	**श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** लोअर परळ, सेनापती बापट मार्ग येथील शिवालय मंडळ इमारतीत असलेला मुंबई महानगरपालिकेचा दवाखाना बंद केल्याबाबत.	२५ जुलै, २०२३
६९	**श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.** सीमाभागातील उमेदवार तलाठी भरती पासून वंचित राहत असल्याबाबत.	२५ जुलै, २०२३
७०	**श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** मौज रसुलपूरा, गदाना, ता. रत्नपूर (जि. संभाजीनगर) येथील गट क्रमांक १९ येथे अभ्यासिका केंद्रास लघु दाब वाहिनी उपलब्ध करून देण्याबाबत.	२५ जुलै, २०२३
७१	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत विशेष शिक्षकांना स्वयंसेवक म्हणून सामावून घेण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
७२	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या विनाअनुदान व अंशतः अनुदानावर नियुक्त व २००५ नंतर १००% अनुदानावर आलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
७३	**डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स.** श्री केशवजी गांधी गाला या ज्येष्ठ नागरिकाची महसूल विभागाने भाडेकरारावर घेतलेली जागा रिक्त करून त्यांचे थकीत भाडे व्याजासकट देण्याबाबत व सदर जागा रिक्त करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
७४	**श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.** बार्टीच्या समतादूत व प्रकल्प अधिकारीयांचे शासनाच्या समाजकल्याणमध्ये गट-क प्रवर्गामध्ये समायोजना करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
७५	**श्री. राजेश राठोड, वि.प.स.** मंठा-वाटुर (जि. जालना) या परिसरातील दोन वसतिगृहांत ८० टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
७६	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** धाटाव, ता.रोहा येथील एम.आय.डी.सी. मधील एल.पी.केमिकल्स कंपनीमध्ये कामावर असतांना श्री. तन्वेश सुरेश ढमाले यांना अपघातात अपंगत्व आल्याबाबत.	२६ जुलै, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
७७	**श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** मुंबईतील नैसर्गिक आपत्ती मृत्यू झालेल्या नातेवाईकांना तसेच जखमींना आर्थिक मदत मिळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
७८	**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** राज्यातील मच्छिमारांच्या विविध मागण्यांबाबत.	२६ जुलै, २०२३
७९	**श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.** सोनपेठ परभणी येथील नगरपरिषदेच्या सन १९९९ ते २०११ चे विशेष लेखापरीक्षण अहवालात लेखा परीक्षकाने निदर्शनास आणलेल्या कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ नसलेल्या आक्षेपा असलेल्या ९ कोटी ५५ लक्ष रुपयांची वसुली करून दोषीविरुद्ध कारवाई करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
८०	**श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** जुनी पेन्शन योजना व नवीन राष्ट्रीय पेन्शन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी गठित केलेल्या समितीचा अहवाल स्वीकारून कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
८१	**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ गठीत महाराष्ट्र सुरक्षा बलाचे बळकटीकरण करणेबाबत.	२६ जुलै, २०२३
८२	**श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.** गडचिरोली जिल्ह्यातील झाडे कुणबी या जातीतील लोक कुणबी हा शब्द वगळून झाडे या जातीचा आधार घेऊन भटक्या जमाती-क चे जात व वैधता प्रमाणपत्र मिळवित असल्याबाबत.	२६ जुलै, २०२३
८३	**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** महापालिकेच्या हस्तांतरित झालेल्या ६५ लेआऊटमधील शाळा, मोकळ्या मैदानावर युवकांसाठी क्रीडाक्षेत्रामध्ये सर्व आधुनिक उपकरणासह खेळांचे मैदान विकसित करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३
८४	**श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पांदण रस्त्याची कामे पुर्ण करण्याबाबत.	२६ जुलै, २०२३

२६ जुलै, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
८५	**श्री. प्रसाद लाड, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईच्या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत.	२७ जुलै, २०२३
८६	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत.	२७ जुलै, २०२३
८७	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा कॉलेज व तुकड्यांना २०% अनुदान देण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
८८	**डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स.** भिवंडीत मनमानी कारभार करणाऱ्या टोरंट पॉवर वीज वितरण कंपनी विरोधात तातडीने कारवाई करण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
८९	**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** राज्यात धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील मालपुर येथे प्रधानमंत्री आवास योजना रमाई योजना तसेच शबरी माता घरकुल योजनेचे वेळेत अनुदान प्राप्त होत नसल्याबाबत.	२७ जुलै, २०२३
९०	**श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार भाग व खेड तालुक्यातील गावांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व शेतीच्या सिंचनाची व्यवस्था करण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
९१	**श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सकाळ व सायंकाळी कामाच्या वेळेत पुरेशा प्रमाणात वाहतूक पोलिस तैनात करण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
९२	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** पुणे-बंगलोर ग्रीन फिल्ड हायवेमध्ये शेतकऱ्यांच्या भुसंपादित जागेचा मोबदला चालू बाजार भावाच्या १० पट मोबदला देण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
९३	**श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.** जालना येथील मनोरुग्णालयाच्या बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
९४	**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** राज्यातील महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेत रूग्णालयांची संख्या वाढविण्याबाबत.	२७ जुलै, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
९५	**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत कंत्राटी शिक्षकांना १६००० मानधन देणेबाबत.	२७ जुलै, २०२३
९६	**श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** राज्यातील नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायती संचलित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मागण्यांबाबत.	२७ जुलै, २०२३
९७	**श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर व रावेर तालुक्यातील विमुक्त, भटक्या प्रवर्गातील २९२ लाभार्थ्यांच्या घरकुलाना मंजूर यादीतील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत.	२७ जुलै, २०२३
९८	**श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट- २०२१ ची अंमलबजावणी करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
९९	**श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** सन २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कुटुंब निवृत्तीवेतन व सेवा उपदानाचा लाभ मिळणेबाबत.	२८ जुलै, २०२३
१००	**श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील म्हैसमाळ येथील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०१	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** मातोश्री वृद्धाश्रम, सातारा ही संस्था वृद्धासेवाश्रम, सांगली या संस्थेला हस्तांतरीत करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०२	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** ठाणे-भिवंडी बायपासची दुरावस्था झाल्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०३	**श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उभारण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०४	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** मौजे कडापे (ता. उरण, जि. रायगड) येथे होत असलेल्या अनधिकृत माती उत्खननाबाबत.	२८ जुलै, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
१०५	**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** पारंपरीक हार फुले व तुळशी माळा विक्रेत्या महिलांवर होत असलेल्या अन्यायाबाबत.	२८ जुलै, २०२३
१०६	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** अकरावी वाणिज्य इंग्रजी माध्यम विना अनुदानित तत्त्वावर कनिष्ठ महाविद्यालयांना ६ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुदान देण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करून अनुदान अदा करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०७	**श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापुर तालुक्यातील धूपेश्वर व कोटेश्वर या अतिप्राचीन शिव मंदिरांना जोडणाऱ्या रस्त्यांचा रस्ते विकास आराखड्यात समावेश करून निधी उपलब्ध करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०८	**श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना इमारती बांधणीकरिता निधी देण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१०९	**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** राज्यात बारमाही वाहणाऱ्या नद्यांवर नदी स्वच्छता अभियान राबवून नदीकाठावर ' गंगा आरती उपक्रम ' राबविण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
११०	**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** राज्यातील या घरकुल योजनेसाठी ३५ टक्के लाभार्थ्यांना घरांची प्रतिक्षा असल्याबाबत.	२८ जुलै, २०२३
१११	**श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** राज्यातील शारीरिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
११२	**श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुणे विभागातील नगरपालिका शिक्षण मंडळ आस्थापने वरील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे एप्रिल २०२३ पासून वेतन बंद असलेबाबत.	२८ जुलै, २०२३
११३	**श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.** महानगरपालिकाचे सेवा प्रवेश अट काढून शुद्धीपत्रक काढण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
११४	**श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रत्येक वर्षी ऑडिट करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
११५	**श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** शालेय शुल्काबाबत खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांच्या पालकांना दिलासा देण्यासाठी शिक्षण शुल्क नियमन सुधारणा अहवालाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत.	२८ जुलै, २०२३
११६	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** ४ ते ५ विद्यार्थी पट संख्या कमी असणाऱ्या शाळांना भविष्यात पट वाढविण्याच्या अटीने अनुदान देणेबाबत.	२ ऑगस्ट, २०२३
११७	**श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.** बार्टीच्या समतादूत व प्रकल्प अधिकार यांचे समाजकल्याणमध्ये गट क प्रवर्गामध्ये समायोजना करण्याबाबत.	२ ऑगस्ट, २०२३
११८	**श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.** कोप्रोली ता. पेण विभागातील अंतोरे येथील खारबांधीस्ती उध्वस्त झाल्याबाबत.	२ ऑगस्ट, २०२३
११९	**श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर उभारण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२०	**श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.** वाळुज महानगर तिसगांव परिसरातील नदीच्या पुलाबाबत.	२ ऑगस्ट, २०२३
१२१	**श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुणे पोलिसांनी इसिस या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेशी निगडित दोन दहशतवाद्यांना अटक केल्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२२	**श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.** सोलापूर व पुणे जिल्ह्यांमधील बरेचशा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मान्यतेबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२३	**ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** शहापूर समृद्धी महामार्गावर ट्रामा केअर सेंटर उभारण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२४	**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** पूर्व नागपूर विधान सभा क्षेत्रातील दहा वर्षापासून प्रस्तावित असलेला धान्य गंज मॉल रखडला असल्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
१२५	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** समग्र शिक्षा अंतर्गत करारानुसार कर्मचाऱ्यांच्या मानधनातील नैसर्गिक वाढीबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२६	**श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** राष्ट्रीय सेवानिवृत्ती वेतन योजना व जुनी सेवा निवृत्ती वेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करून तीन महिन्याच्या आत शिफारस सादर करण्याचे आदेश देण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२७	**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** मौजे म्हातोडी ग्रामपंचायत (ता. जि. अकोला) येथे शौचालय बांधकामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२८	**श्री. प्रवीण दटके, वि.प.स.** अहिल्याबाई होळकर बहुउद्देशीय संस्था सिंहोरा, पो. कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर या संस्थेने खसरा क्रमांक ११३ आराजी ३.१२ हेक्टर या जागेचा मुद्रांक शुल्क भरला नसल्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१२९	**श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** मुंबईतील सार्वजनिक गणेश मंडळांना अग्निसुरक्षा शुल्क माफ करण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३०	**श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांप्रमाणे कला, वाणिज्य व इतर शाखेतील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३१	**श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.** गंगापूर जि. औरंगाबाद या तालुक्यातील गावांना स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३२	**श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** मौजे तुळसवडे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील तत्कालीन ग्रामसेवक मंगेश जाधव आणि सरपंच या चुकीच्या पद्धतीने ग्रामपंचायत मध्ये मनमानी कारभाराबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३३	**श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** श्रीवर्धन तालुक्यातील (जि. रायगड) दिघी गावातील समस्या दूर करण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
१३४	**डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स.** औद्योगिक वसाहत सहकार संस्था र.न. ८४१५/१९६१ सातुर्णा (जि. अमरावती) बडनेरा रोड, अमरावती या संस्थेत गैरव्यवहार करणाऱ्या संचालक मंडळावर कारवाई करण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३५	**श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** शासकीय आणि खाजगी दवाखान्यांमध्ये " क्लीनिकल फार्मासिस्ट " या पदांची भरती करणेबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३६	**श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावरील टोलनाके बंद करून ते मुंबई महानगरक्षेत्राच्या सीमेवर स्थलांतरित करण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३७	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** एच.ओ.सी. कॉलनी, रसायनी ता. पनवेल, जि. रायगड मधील ५० वर्ष जूनी मंदिरे उद्ध्वस्त होत असल्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३८	**श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.** महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मार्फत नवी मुंबई प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या न्याय मागण्या प्रलंबित ठेवल्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१३९	**श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** जळगांव जिल्ह्यांतील बोदवड व जामनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी सरदार कंपनीचे सदोष खत वापरल्यामुळे शेतीचे झालेल्या नुकसानीबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१४०	**श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील शिक्षक व अधिकारी वर्गांचे वेतन नियमितपणे अदा करण्याकरिता त्यांची पदे योजनेतील (plan) लेखाशीर्ष मधून योजनेतर (Non-plan) लेखाशीर्षामध्ये बदलणेबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१४१	**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** नागपूर व वर्धा येथील रेल्वे माल धक्क्यावर कार्यरत माथाडी कामगारांच्या समस्येबाबत.	३ ऑगस्ट, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
१४२	**श्री. निलय नाईक, वि.प.स.** ठाणे जिल्ह्यातील वालधुनी नदीतील प्रदूषणाबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१४३	**श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दोन वर्षाचे थकीत बारादानाचे पैसे मिळण्याबाबत.	३ ऑगस्ट, २०२३
१४४	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** मुंबईतील बोरीवली येथील गोराई धारावी बेटावर रहाणाऱ्या स्थानिक भुमिपुत्रांच्या समस्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१४५	**श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी अल्पसंख्याक शाळांतील नियमबाह्य नियुक्त्यांना मान्यता देऊन अनियमितता केल्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१४६	**श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** वसई-विरार महापालिका क्षेत्रात महापालिकेच्या कमीत कमी ५ शाळा सुरू करण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१४७	**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** नागपूर जिल्हा परिषदेमध्ये गट " क " व " ड " संवर्गातील १३ हजार ५०० पदाच्या भरतीची प्रक्रिया गेल्या अनेक वर्षापासून रखडली असल्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१४८	**श्री. सचिन अहिर, वि.प.स.** पोलिस आयुक्त कार्यालयीन आवार वसाहत ए, बी व सी मधील रहिवाशी, गेट नंबर पाच सुरू करण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१४९	**श्री. किरण सरनाईक, वि.प.स.** आदिवासी विकास विभागाअंतर्गत आश्रम शाळेतील अधीक्षक व अधीक्षिका यांच्या कार्यालयीन कामाचे तास किंवा वेळ निश्चित करणेबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५०	**श्री. जयंत पाटील, वि.प.स.** पनवेल तालुक्यातील तळोजा मध्यवर्ती कारागृह हायटेक कारागृह म्हणून बंधत आलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३

विवरण क्रमांक १६—पुढे चालू

(१)	(२)	(३)
१५१	**श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना पीएचडी करण्यासाठी " पीएचडी संशोधन पगारी " रजा मंजूर करण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५२	**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** राज्यात वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ६०५ अभ्यासक्रमात समावेश नसलेल्या अभ्यासक्रमास स्कॉलरशिप तथा फ्रिशिप लागू करण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५३	**श्री. राजेश राठोड, वि.प.स.** पालघर जिल्ह्यात जोरदार अतिवृष्टी होत असल्याने उपाययोजना हाती घेण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५४	**श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** राज्यात आरोग्य संरक्षण योजनेसाठी रुग्णालयांची संख्या वाढविण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५५	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांगांच्या १२३ शाळा/कर्मशाळातील कार्यरत कर्मचाऱ्यांना उर्वरित ५०% टक्के वेतन अनुदानासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५६	**डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स.** उल्हासनगर जिल्हा ठाणे महानगरपालिका हद्दीतील म्हारळ येथे रिजेन्सी ऐन्टीलीया या प्रोजेक्टच्या हॉटेलमध्ये खोट्या दस्तऐवजाच्या आधारे दारू विक्री होत असल्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५७	**श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३
१५८	**श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** विदर्भातील सिंचनासाठी संपादित केलेल्या जमिनींचा शेतकऱ्यांना भूसंपादन कायदा, २०१३ च्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्याबाबत.	४ ऑगस्ट, २०२३

विवरण क्रमांक १७

महाराष्ट्र विधानपरिषद नियम २५९ व २६० अन्वये विचारात घेण्यात आलेले प्रस्ताव

(१) म. वि. प. नियम २५९ अन्वये चर्चा झालेला प्रस्ताव - १

(२) म. वि. प. नियम २६० अन्वये प्राप्त झालेले प्रस्ताव - ४

(३) म. वि. प. नियम २६० अन्वये स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - ४

(४) म. वि. प. नियम २६० अन्वये चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - ४

अ. क्र. (१)	सदस्यांचे नाव (२)	विषय (३)	चर्चेचा दिनांक (४)	शेरा (५)
		म. वि. प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव		
१.	**श्री. अंबादास दानवे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव—	"राज्यातील महिला मुलींवरील अत्याचार व बेपत्ता होण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली मुजोरी, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर सुडबुध्दीने होणारी कारवाई, लव्हजिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात अपरिमित वाढ झालेली असणे, मा. मुख्यमंत्री यांच्या मतदारसंघातच चोरीच्या व लुटमारीच्या घटना झाल्या असून सदरहू घटनांकडे पोलिसांकडून होत असलेले दुर्लक्ष, समाज माध्यमातून	दिनांक ३ व ४ ऑगस्ट, २०२३	एकत्रित चर्चा झाली.

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		(Social Media) करण्यात येणारी आक्षेपार्ह टिका, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करुनही संबंधिताविरुद्ध अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, सन २०२२ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणांत वाढ झालेली असून त्यावर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसणे, राज्यातील कारागृहात क्षमतेपेक्षा दुप्पट कैदी असणे ही समस्या, जामीन मिळूनही अनेक कैदी कारागृहात असणे, महिलांविषयी अपमानजनक होत असलेली वक्तव्य, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीने आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवण्यापूर्वी पोलिसांनी वारकऱ्यांवर केलेला लाठीचार्ज व पालखी सोहळ्यास लागलेले गालबोट, समृध्दी महामार्गावर नियोजना अभावी होत असलेले अपघात, मरोळ, मुंबई औद्योगिक वसाहतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडपट्टी धारकांना घरे न देता स्थानिक दलाला मार्फत घरांची अवैधपणे विक्री करून बोगस झोपडपट्टी धारकांनी घरांचा ताबा घेऊनही अद्याप कोणती कारवाई करण्यात आलेली नसणे, राज्यातील सुरू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाकरिता भुसंपादन केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला मिळालेला नसणे, शासन सेवेतील सेवानिवृत्त चतुर्थश्रेणी		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कर्मचाऱ्यांच्या एका वारसास सेवेमध्ये घेण्याची होत असलेली मागणी, तसेच जुनी पेन्शन संदर्भात शासनाची उदासिनता, राज्यात मागासवर्गीय व आदिवासींवर होत असलेला अन्याय व अत्याचार, आदिवासी मुलांचे वाढते कुपोषण अदिवासींच्या योजनांच्या निधी अन्य विभागाच्या विकासकामांसाठी वळविणे, महागाईत वाढ झाली असून मध्यम वर्गाला त्रासाला सामोरे जावे लागणे, टाटा समूहाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीचा राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला नेमका परिणाम, राज्यात वाढलेली बेरोजगारी, नव्याने आलेल्या माहिती तंत्रज्ञान धोरणांमध्ये राज्यातील अनेक भागांवर अन्याय झाला असून त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता, मुलांना अधिवास प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेला विलंब, गीग अर्थव्यवस्थेच्या (Gig Economy) माध्यमातून काम करताना व काम करणाऱ्यांना येणाऱ्या समस्या, सेबीचे निर्बंध असूनही राज्यात दाम दुप्पट करण्याच्या आमिषाने होणारी गुंतवणूक, आर्थिक पाहणी मध्ये ६.८ टक्क्यांची वाढीची फसवी घोषणा, महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा, टॅक्सी कॉर्पोरेशनची घोषणा करुनही अद्याप कार्यवाही करण्याकडे होत असलेला विलंब, याबाबत शासनाने उपाययोजना विचारात घेण्यात यावी.”		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		म. वि. प. नियम २६० अन्वये प्रस्ताव		
१.	**श्री. विक्रम काळे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव–	"अल निनोचा प्रभाव, सरासरीपेक्षा पाऊस कमी होण्याची शक्यता व उशिराने झालेले पावसाचे आगमन, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांवर दुबार वा तिबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका शासनाने घेतली असणे, याबाबतच्या उपाययोजना युध्दस्तरावर करण्याची आवश्यकता असणे, राज्यातील बहुतांश लोकांचे जीवन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्याने शेती हे अन्नधान्य, रोजगार व उपजीविकेचे साधन असणे, राज्यातील शेतकरी समर्थ व स्वावलंबी व्हावा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे उत्पादन व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास या धोरणाला विद्यमान शासनाने परमोच्च स्थान दिले असणे, शेतकरी स्वयंनिर्भर व्हावा या उद्देशाने विविध नवनव्या योजना विद्यमान शासनाने हाती घेतल्या असणे, जलसंधारणाच्या सर्वाधिक योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले असणे, पाणी अडवून, जमिनीत जिरवणे गरजेचे असल्याने जलयुक्त शिवार योजना टप्पा २ राबवण्याचा निर्णय सरकारने घेतला	दिनांक १८, २१ व २५ जुलै, २०२३	एकत्रित चर्चा झाली.

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असून ५४५ कोटी रुपयांची तरतूद केली असणे, अर्थसंकल्पातील " पंचामृत" संकल्पनेत " शाश्वत शेती– समृद्ध शेतकरी " हे प्रथम अमृत असून त्याअनुषंगाने राज्यातील पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविली जात असणे, कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना पुढे सुरू ठेवणे, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लस निर्मिती सुरू करणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देणे, उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करणे, कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसारण करण्यासाठी नागपूर येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करणे, नागपूर, काटोल, कळमेश्वर, बुलढाणा इत्यादी जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी धोरणे कार्यान्वित करण्यात आली असणे, हळद पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात "बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राची " स्थापना करण्यात		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मिशन–२०२५ " कार्यक्रम हाती घेतला असणे व त्याअंतर्गत पुढील ३ वर्षांत ३० टक्के कृषी वीज वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण अपेक्षित असणे, संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणेस अनुसरून राज्यात महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान राबविण्यात येणे, शेतकऱ्यांच्या घरी जाऊन गोवंश पशुधनाचे संपूर्णतः मोफत प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येणे, नमो शेतकरी महासन्माननिधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या प्रति शेतकरी व प्रतिवर्षी ६ हजार रुपयात राज्य सरकारने आणखी ६ हजार रुपयांची भर घातली असणे, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्त योजनेअंतर्गत नियमित पीक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत राज्य शासनाकडून प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणे, पंतप्रधान पीक विमा योजनेच्या प्रिमियमचा भार शेतकऱ्यांवर पडू नये, यासाठी शेतकरी हिश्याचा भार उचलण्याचा व शेतकऱ्यांना फक्त १ रुपयात पीक विमा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला असणे, शेतीच्या शाश्वत विकासासाठी महाकृषी विकास अभियान		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		राबविण्यात येणे, " मागेल त्याला शेततळे " योजनेच्या धर्तीवर " मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणी यंत्रे व कॉटन श्रेडर " हे घटक उपलब्ध करण्यात येणे, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी " काजू फळपिक विकास योजना " लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असणे, अमरावती येथे महत्वाकांक्षी प्रधानमंत्री मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन अँड अपेरल (PM MITRA) पार्कचे लोकार्पण नुकतेच झाले असणे, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कापूस उत्पादकांना उत्पन्नवाढीची संधी मिळणार असणे, तसेच, या प्रकल्पामुळे राज्यात गुंतवणूक व रोजगार निर्मितीत मोठी भर पडणार असणे, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबवून अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणे, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणे, देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण होण्याकरिता महाराष्ट्र गोसेवा		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आयोगाची स्थापना करण्यात आली असणे, या आयोगाच्या माध्यमातून " गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना " आणि " गोमाई मूल्यवर्धन योजना " या योजना राबविण्याचे प्रस्तावित असणे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी भरीव निधीची तरतूद केली असणे, प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी व मच्छीमार कुटुंबीयांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २% किंवा कमाल ५ कोटी रकमेचा मत्स्य विकास कोष स्थापन करण्यात येणे, मच्छीमारांना डिझेल अनुदानासाठी असलेली यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा काढल्याने सुमारे ८५ हजारापेक्षा अधिक मच्छीमारांना या योजनेचा लाभ मिळणे, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत २७ प्रकल्पांना आणि बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत ९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणे, परिणामी अनुक्रमे ३ लाख २७ हजार हेक्टर सिंचन क्षमता आणि १ लाख ७३ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असणे, शेत जमिनीचा ताबा आणि मालकी हक्क मिळविताना होणारे आपापसातील वाद मिटविताना जमिनीच्या अदलाबदल		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		दस्तावरील मुद्रांक शुल्कात कपात करून ते नाममात्र एक हजार रुपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये करण्यासंदर्भात "सलोखा योजना" राबविण्यात येणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि विविध विभागीय योजनांचे अभिसरण करून "सुविधा संपन्न कुटुंब मिशन" आणि "सर्वांगीण ग्राम संस्कृती योजना" राबविण्यात येणे, प्रशासनातील अधिकारी व पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत राहून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी "माझा एक दिवस, माझ्या बळीराजासाठी" हा उपक्रम राबविण्यात येणे, पूरक व्यवसाय म्हणून मोठ्याप्रमाणावर शेतकरी दूध उत्पादनाकडे वळले असणे, अशा शेतकऱ्यांच्या बाबतीत मदतीची भूमिका घेऊन शासनाने दूध दर वाढविण्याबाबत निर्णय घेतला असणे, शासनाच्या या योजनांचा तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत लाभ मिळण्यासाठी या योजना अधिक कार्यक्षम करण्याची व त्यायोगे महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठी "एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" या उक्तीप्रमाणे करावयाची कार्यवाही व उपाय योजना"		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२.	**श्री. प्रविण दरेकर** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव–	"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झाले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ॲन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीकच्या संदर्भात शासनाने झिरो टोलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे,	दिनांक २, ३ व ४ ऑगस्ट, २०२३	एकत्रित चर्चा झाली.

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकतो परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचा-यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासानाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती	

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांपत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना.”		
३.	**श्री. अंबादास दानवे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव—	“राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते	दिनांक २१, २४ व २५ जुलै, २०२३	एकत्रित चर्चा झाली.

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे, राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता असणे, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना-नांदेड महामार्गाचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्याना		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड-औरंगाबाद-परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली 'दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण ऊर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, राज्यात वाढलेला वीज दर,		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या व अंगणवाडी सेविकांचा पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, शिक्षक भरतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्याच्या शिक्षणाचा दर्जा खालावला असणे, राज्यात कोयता गॅंगची वाढलेली दहशत, सोशल मिडीयावर लोकांना धमक्या देण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, महागाईचा मध्यम वर्गाला होणारा त्रास, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, बार्टी, महाज्योती व सारथी विभागाच्या गलथान कारभारांमुळे लाखो विद्यार्थी प्रशिक्षणा पासून वंचित राहाणे पर्यायाने त्यांचे शैक्षणिक व रोजगार संदर्भात नुकसान होणे, ग्रामपंचायत व जिल्हापरिषदेच्या निवडणुका घेण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या थकीत मागण्या, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे ४० हजार कोटी येणे बाकी, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या कामाचे अद्यापही पैसे न मिळणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, राज्य सरकारने पुरवणी मागणी व अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विविध खात्यामध्ये जाहीर केलेली तरतूद तथापि प्रत्यक्षात निधी मिळण्यास होत असलेला विलंब, त्याची पुर्तता करण्यास आलेले अपयश, विविध विकासकामांना मंजूरी तथापि निधी अभावी कामे प्रलंबित असणे, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."		

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
४.	**श्री. अंबादास दानवे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव–	"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणुका झालेल्या नसल्यामुळे वाढता भ्रष्टाचार, मुंबईतील रस्ते, फूटपाथ, उद्याने, पूल, समुद्रकिनारे यांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरणाच्या कामाच्या नावाने जनतेच्या पैशांची सुरु असलेली लुट व त्यामध्ये झालेली अनियमितता, सुशोभीकरण करण्यासाठी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केलेला असणे, पदपथाची व रस्त्यांची कामे अपुर्णावस्थेत असल्याने पावसाळ्यात पाणी साचल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसणे, मुंबई उपनगरातील पिण्याच्या पाणी समस्येवर मात करण्यासाठी समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्प राबविण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, वॉर्डच्या लोकसंख्येप्रमाणे निधीचे वाटप न करणे, मुंबईत साथीच्या रुग्णसंख्येत दुपटीने झालेली वाढ, ठाण्यात विकासाच्या नावाखाली हजारो झाडांची करण्यात आलेली कत्तल, ठाणे	दिनांक ३ व ४ ऑगस्ट, २०२३	एकत्रित चर्चा झाली.

विवरण क्रमांक १७–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		शहरातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलांना नागरिकांचा असलेला विरोध, नैना प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या जमिनी संपादित करून विकासकांच्या घश्यात टाकण्याचा सुरू असलेला प्रयत्न, एमएमआरडीए अंतर्गत विकासकामांसाठी जमिनी संपादित करताना बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकडे होत असलेले दुर्लक्ष, सततचा पाऊस, गारपीट आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, राज्यात सिंचनाचा अभाव, शेतीमालाला भाव नसल्याने कर्जबाजारीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण, राज्यात दरड कोसळण्याच्या घटनेत झालेली वाढ, प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कक्ष तयार करण्याची आवश्यकता, राज्यावर आज ६ लाख कोटीचे कर्ज असणे, कर्ज फेडायला परत कर्ज आणि व्याज फेडायलाही कर्जच अशी अवस्था राज्याच्या आर्थिक रचनेची झालेली असणे, देशात सर्वाधिक कर भरणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव असणे, मात्र, महाराष्ट्राच्या वाट्याला फारसा निधी केंद्राकडून दिला जात नसणे, महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्ट्ये पाहिली असता कर्जावरील चक्रवाढ व्याज वाढत चालले असणे, राज्यात कॅन्सर व इतर आजारांचे प्रमाण वाढले असून त्याकरिता करण्यात		

विवरण क्रमांक १७–(समाप्त)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		येणारे उपचार महाग झाले असणे, सदर उपचाराकरिता रुग्णालयांकडून नागरिकांची लूट होत असल्याने गरीबांची अडचण होत असणे, त्याकरिता धोरण निश्चित करण्याची गरज, टाटा रुग्णालयाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, मुख्यमंत्री सहाय्यता निधी गरिबांना मिळत नसणे, धर्मादाय रुग्णालयात अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना खाटा उपलब्ध न होणे, एम्सच्या धर्तीवर विभागनिहाय रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळण्यासाठी गृहनिर्माण धोरण राबविण्याची आवश्यकता, महारेरामध्ये नोंदणी न करता विकासक नागरिकांची फसवणूक करणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकास करताना विकासकांनी जास्तीच्या झोपडपट्टी दाखवून एफएसआय वाढवून घेवून शासनाची केलेली फसवणूक, केंद्र शासनाच्या अखत्यारितीतील जमिनी वरील झोपड्यांचा पुनर्विकास, बी.डी.डी च्या पुनर्विकासास होत असलेला विलंब, बी.डी.डी चाळीची दुरवस्था झाली असून दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.”		

विवरण क्रमांक १८
अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये) (सर्वसाधारण)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

(१) एकूण आलेल्या सूचनांची संख्या	...	४१
(२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या	...	२१
(३) सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या	...	०
(४) अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या	...	२०
(५) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या	...	०
(६) बॅलट मध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या	...	१४
(७) विभाग/ सदस्य निर्देशित संख्या	...	०
(८) मा. सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना	...	०
(९) व्यपगत झालेल्या सूचना * (*म.वि.प. नियम २० नुसार)	...	२१*

सन २०२३ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण ४१ सर्वसाधारण अर्धा-तास चर्चेच्यासूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी २१ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलेटमध्ये आलेल्या १४ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या.त्यापैकी एकाही अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

विवरण क्रमांक १९

अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये) (प्रश्नातून उद्‌भवलेल्या)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

(१)	एकूण आलेल्या सूचनांची संख्या	...	१९
(२)	स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या	...	११
(३)	सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या	...	०
(४)	अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या	...	८
(५)	चर्चा झालेल्या सूचनांची संख्या	...	१
(६)	बॅलट मध्ये आलेल्या पंरतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या	...	३
(७)	विभाग/ सदस्य निर्देशित संख्या	...	०
(८)	मा. सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना	...	०
(९)	व्यपगत झालेल्या सूचना * (*म.वि.प. नियम २० नुसार)	...	१०*

सन २०२३ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण १९ अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्तझाल्या असून त्यापैकी ११ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्येआलेल्या ४ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एका अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली.

विवरण क्रमांक २०

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा

(१)	आलेल्या सूचनांची संख्या	...	२०
(२)	स्वीकृत सूचनांची संख्या	...	१८
(३)	अस्वीकृत सूचनांची संख्या	...	-
(४)	सभागृहात चर्चा झालेल्या सूचना	...	०२
(५)	सम्मिलित करण्यात आलेल्या सूचना	...	०२

अ. क्र.	सदस्यांचे नाव व विषय	ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
१.	**प्रा. राम शिंदे,** श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा— " अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड औद्योगिक वसाहतीची स्थापना सन १९९६ मध्ये झाली असणे, जामखेड औद्योगिक क्षेत्र भूखंड क्र.ए१ व ए२ असून क्षेत्रफळ १९.७२ हे.आर. असणे, तसेच कर्जत तालुक्यात औद्योगिक वसाहत सुरू करण्याबाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी विशेष पुढाकार घेतलेला असणे, त्यासंदर्भात तत्कालीन उद्योगमंत्री यांच्या समवेत माहे एप्रिल, २०१६ मध्ये संबंधीत लोकप्रतिनिधींनी त्या कालखंडात बैठक घेऊन व तद्संबंधी शासनाकडे पाठपुरावा केलेला असणे, कर्जत तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी औद्योगिक वसाहत निर्माण करणे व त्या ठिकाणी उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणे, परंतु सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीत सदर प्रस्तावास कोणतीही चालना तत्कालीन शासनाने दिली नसणे, जामखेड औद्योगिक	**२७ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

विवरण क्रमांक २०–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)
	वसाहतीत जमीन संपादन केल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मावेजा दिला आहे किंवा कसे सद्यःस्थितीत जामखेड औद्योगिक वसाहतीमधील उद्योग आणण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही गेल्या २७ वर्षांपासून जामखेड येथील औद्योगिक वसाहत सुरू असताना त्या ठिकाणी कोणकोणते उद्योग सुरू आहेत, याबाबत शासनाने माहिती देण्याची आवश्यकता, तसेच सदर औद्योगिक वसाहतीमध्ये कोणकोणत्या गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक नवीन उद्योग उभारण्यासाठी केली असल्याची संपूर्ण माहिती शासनाने देण्याची आवश्यकता, कर्जत व जामखेड हे तालुके जवळपास असून सुद्धा जामखेड येथील सुरू असलेल्या औद्योगिक वसाहतीत कोणतेही नवीन उद्योग आले नसणे, कर्जतमध्ये औद्योगिक वसाहत सुरू करण्यासाठी व या भागातील नव युवकांना रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती भूमिका घेतलेली असणे, या नवीन औद्योगिक वसाहत मंजुरीबाबत सद्यःस्थिती काय आहे व नवीन औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग उभारण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागणार आहे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही.”		
२.	**सर्वश्री श्रीकांत भारतीय,** प्रविण दरेकर, गोपिचंद पडळकर, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा– “समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्यासाठी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेले राज्यातील अनाथ युवक-युवती सर्वस्वी राज्य शासनाच्या धोरणावर अवलंबून असणे, त्यानुषंगाने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या राज्यातील अनाथ युवक-युवतींना पुढील महाविद्यालयीन व उच्च शिक्षण मोफत देण्याची तसेच त्यांच्या पुनर्वसन व रोजगार निर्मितीसाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता, तसेच अनाथ प्रमाणपत्र पडताळणीसाठी उच्च स्तरीय समिती स्थापन करणे, अनाथांकरिता असलेले आरक्षण हे फक्त शिक्षण आणि नोकरी पुरते मर्यादित न ठेवता शासनाच्या सर्व विभागातील	**२७ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

कल्याणकारी योजनांमध्ये या आरक्षणाचा लाभ अनाथांना देण्याची आवश्यकता, तसेच राज्यस्तरीय अनाथ सल्लागार समिती तातडीने कार्यरत करणे, तसेच संजय गांधी निराधार योजनेचा लाभ बालगृहातील / अनाथालयातील बालकांना लागू करून त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संबंधित शासन निर्णयात नमूद अनाथांच्या तरतूदींमध्ये आवश्यक तो बदल करण्याची तसेच या योजनेच्या लाभाकरिता १५ वर्षाच्या रहिवासाची अट शिथिल करून त्याऐवजी अनाथ मुलांचा जन्म दाखला ग्राह्य धरण्याची आवश्यकता, तसेच संजय गांधी निराधार योजनेतून मिळणारी रक्कम बालगृहातील लाभार्थीच्या आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या संयुक्त बँक खात्यात ठेवून वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांस ती रक्कम व्याजासहित दिल्यास अनाथांना वयाच्या १८ व्या वर्षी रोजगारनिर्मितीसाठी बीज भांडवल मिळण्याची शक्यता, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात २५ बेडचे अनुरक्षणगृह स्थापन करणे, १८ वर्षानंतरच्या HIV बाधित अनाथ मुले/मुलींच्या पुनर्वसनासाठी महिला व बालविकास विभागांतर्गत कल्याणकारी योजना राबविण्याची आवश्यकता, तसेच सामाजिक न्याय विभागाची स्वाधार योजना अनाथ मुलांना लागू करून १८ वर्षानंतर उच्च शिक्षण आणि व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या अनाथ मुलांना प्रवासाकरिता मोफत पास सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, तसेच १८ वर्षानंतरच्या अनाथ मुलांकरिता ग्रामीण व शहरी भागात घरकुल योजना राबविण्यासह म्हाडा आणि सिडकोमार्फत राबविण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अनाथांकरिता सदनिका आणि व्यवसायासाठी गाळे राखीव ठेवण्याची आवश्यकता, तसेच शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये अनाथ मुलांना राखीव जागा ठेवून धर्मादाय तसेच महात्मा फुले योजनेअंतर्गत अनाथ मुलांना रेशन कार्ड ऐवजी अनाथ प्रमाणपत्रावर उपचार देण्याची आवश्यकता, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत त्यांच्या उत्पन्नाचा

विवरण क्रमांक २०–(समाप्त)

(१)	(२)	(३)	(४)
	एक टक्का निधी त्यांच्या क्षेत्रातील अनाथांसाठी राखीव ठेवण्यात आल्यास त्याद्वारे अनाथ मुलांचे अनेक प्रश्न निकाली लागण्याची शक्यता, तसेच अनाथ मुलांच्या शिक्षण, रोजगार तसेच इतर समस्यांबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०२० तसेच दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा सुमारास महिला व बालविकास विभागांतर्गत बैठकांचे आयोजन करण्यात येणे, तथापि सदरहू बैठकांमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्न व समस्यांच्या निवारणाकरिता अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी राज्यातील अनाथ मुलांमध्ये शासनाप्रती निर्माण होत असलेली नकारात्मकतेची भावना, राज्यातील अनाथ युवक-युवतींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या आयुष्यास योग्य ती दिशा दाखविण्याच्या दृष्टीकोनातून उपरोक्त नमूद प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची नेमकी भूमिका.”		

विवरण क्रमांक २१

म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना

(१) प्राप्त झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना	-	**६७७**
(२) स्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना	-	**१४७**
(३) सभागृहात चर्चा झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना	-	**५८**
(४) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या एकूण स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र	-	**८४**

अ.क्र.	लक्षवेधी सूचना क्रमांक	सदस्यांचे नाव व विषय	ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	१३	**सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, विक्रम काळे, सतिश चव्हाण, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— “मरिन ड्राइव्ह, मुंबई येथील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची तेथील सुरक्षारक्षकाने हत्या करून स्वत: आत्महत्या केल्याची संतापजनक घटना दिनांक ०७ जून, २०२३ रोजी उघडकीस येणे, वांद्रे येथील पॉलिटेक्निकल महाविद्यालयात शिकणारी अकोल्याची ही १९ वर्षीय विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले वसतिगृहात चौथ्या मजल्यावर	**१८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)

वास्तव्यास असणे, परीक्षा नुकतीच संपली असल्याने दोन दिवसांनी आपल्या मूळ गावी अकोला येथे जाणार असणे, परंतु तत्पूर्वीच वसतिगृहाच्या सुरक्षारक्षकाने तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या करून स्वतः ग्रँण्ट रोड स्थानकानजिक रेल्वेगाडीखाली आत्महत्या केली असणे, सदरहू घटनेने वसतिगृहाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असणे, संबंधित सुरक्षारक्षकाने यापूर्वी पहाटेच्या सुमारास तिच्या खोलीत घुसण्याचा प्रयत्न केला असणे, त्याला खोलीत पाहून विद्यार्थिनीला धक्का बसला असणे, याबाबतची तक्रार संबंधित विद्यार्थिनी आणि तिच्या पालकांनी वसतिगृहाच्या वॉर्डन आणि अधीक्षकांकडे करूनही त्यांनी सदर तक्रारीकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले असणे, या वसतिगृहाची क्षमता ४५० विद्यार्थीनींची असून सध्या या वसतिगृहात ४० ते ४५ विद्यार्थीनी वास्तव्यास असून गेल्या वर्षभरापासून तेथील सीसीटीव्ही यंत्रणा बंद असल्याची बाब उघडकीस येणे, सदरहू वसतिगृहाच्या ढिसाळ कारभारामुळे एका विद्यार्थिनीचा नाहक गेलेला बळी, सदरहू वसतिगृहाच्या वॉर्डन आणि अधीक्षकांना निलंबित करण्याची संबंधित विद्यार्थिनीच्या पालकांनी केलेली आग्रही मागणी, सदरहू घटनेमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी येणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला गहन प्रश्न, परिणामी, मुलींमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, यास्तव सदरहू घटनेची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची गरज, मुंबईसह राज्यातील मुलींच्या वसतिगृहात त्यांच्या सुरक्षिततेबाबत करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

२ २७ **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.स. प.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मृद व जलसंधारण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :- **१८ जुलै, २०२३** **चर्चा झाली**

'मौजे बोलेगाव गंगापूर. ता), जिपरिसरातून शिवना नदी वाहत असणे (औरंगाबाद., नदीचे पात्र ३०० मीटरचे असणे, शिवना नदीवर बोलेगाव येथे कोल्हापुरी बंधाऱ्याचे बांधकाम सन २००६ मध्ये इंण्डो जर्मन अर्थ सहाय्यातून झाले असणे, बंधाऱ्याच्या बांधकामाचा त्यावेळेचा खर्च १५५ लक्ष रुपये असणे, बंधाऱ्याच्या पाणी साठ्यामुळे परिसरातील किमान ५० विहिरींची पाणी पातळी वाढली असणे, तर किमान २५० हेक्टर सिंचनात वाढ झाली असणे, मागील वर्षी अति पावसामुळे शिवना नदीवरील बोलेगाव येथील कोल्हापुरी बंधारा वाहून गेला असणे, सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यासाठी ग्रामस्थांनी वेळोवेळी मागणी केली असणे, शासनाने बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी माहे मार्च, २०२२ मध्ये ४८८ लक्ष रुपयांची मान्यता दिली असून मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असणे, बंधाऱ्याचे चालू असलेले काम निकृष्ट व दर्जाहीन होत असल्याने काम पूर्ण होण्याआधीच बंधाऱ्याच्या भिंतीस भेगा पडलेल्या असणे, सुरक्षा भिंतीला तडे गेले असणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांनी बांधकाम थांबवले असणे, बंधाऱ्याच्या आतील काम गॅबीयन ऐवजी सिमेंटचे करण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, तसेच बंधाऱ्याची लांबी व उंची वाढविण्याचीही मागणी होत असणे, निकृष्ट काम होत असल्याने बंधारा पुन्हा वाहून जाण्याची भिती असणे, झालेल्या सर्व्हेनुसार काम होत नसणे, बंधाऱ्याच्या भिंतीची लांबी व उंची वाढवणे तसेच गॅबीयन ऐवजी सिमेंटचे बांधकाम करण्यासाठी होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया.'

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३	१११	**ॲडनिरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, **वि.स. प.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम सार्वजनिक उपक्रम) (वगळूनमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- 'पालघर तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी परिसरात येणाऱ्या कोसबाड वरठापाड्यातील शाळकरी मुले व तेथील ग्रामस्थांना पावसाळ्यात नाला ओलांडताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असणे, पूल मंजूर असूनही २० वर्षांपासून तो लालफितीत अडकला असल्याने तेथील आदिवासी शाळकरी विद्यार्थी, गर्भवती माता व तेथील ग्रामस्थांचे प्रचंड हाल होत असणे, प्रशासन देखील कोणतीही दखल घेत नसल्यामुळे सदर ठिकाणी एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता असणे, मनोरविक्रमगड रस्त्यालगत कोसबाड ग्रामपंचायतीच्या हद्दीतील - आदिवासी वस्ती असलेल्या वरठापाड्यातील मुलांना शाळेसाठी कोसबाड काचपाडा येथे तीन किलोमीटर पायपीट करावीलागणे, मात्र पावसाळ्यात चार महिने नदीचे रूप धारण केलेल्या नाल्यामध्ये असलेल्या बंधाऱ्याच्या कठड्यावरून पाण्यातून जीव मुठीत घेऊन शाळेत जावे लागणे, गर्भवती महिला किंवा आजारी व्यक्तीला झोळी करून उपचारासाठी घेऊन जावे लागत असणे, पावसात अनेकदा दुसऱ्या गावाशी संपर्कही तुटणे, तेथील महिलापुरुषांनाही जीवनावश्यक वस्तू- आणण्यासाठी, दवाखान्यात वा इतर कामासाठी त्याच नाल्यातून जीवघेणा प्रवास करावा लागणे, शासनाने या प्रकरणी लवकरात लवकर पुलाचे काम सुरू करुन आदिवासींची होणारी गैरसोय थांबवावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत असणे, याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना. '	**१८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

४ १२१ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— **१९ जुलै, २०२३** **चर्चा झाली**

"राज्य परिवहन महामंडळाने आरामदायी प्रवासासाठी प्रवाशांच्या सेवेत आणलेली शिवशाही बस सुविधांपेक्षा अपघातांमुळे जास्त चर्चेत येणे, गेल्या काही दिवसांमध्ये शिवशाही बसला आग लागण्याच्या आणि अपघात होण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली असणे, शिवशाही बसचे आतापर्यंत छोटे-मोठे ४०० पेक्षा जास्त अपघात झाले असणे, या अपघातांमध्ये महामंडळाच्या मालकीच्या शिवशाही बसचे अपघात जास्त असणे, सध्या महामंडळाच्या स्वमालकीच्या ९०० शिवशाही असून त्यापैकी ६०० बस प्रत्यक्ष रस्त्यावर धावत असणे, ९० शिवशाही भाडेतत्त्वावर असणे, शिवशाही बसेस प्रामुख्याने मुंबई-सातारा, बोरिवली-सातारा, नाशिक-शिवाजीनगर (पुणे) व कोल्हापूर-स्वारगेट (पुणे) या मार्गावर धावत असणे, शिवशाही प्रवासी भाडे साध्या बसपेक्षा २५ टक्के जास्त असणे, मार्गस्थ बिघाड, छोटे-मोठे अपघात, खाजगी चालकांचे गैरवर्तन, पुशबॅक सीट, वातानुकूलित यंत्रणा अशा प्रवासीभिमुख सोईसुविधांचा बोजवारा उडाला असणे, शिवशाही बसला नादुरुस्ती व मार्गस्थ बिघाडीचे ग्रहण लागले असणे, कंत्राटी पद्धतीने चालकांची भरती यामुळे वाढते अपघाताचे प्रमाण, शासनाने एस.टी. महामंडळाच्या शिवशाही बसच्या समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
५	२२८	**श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— "सोनावडे (ता.फलटण, जि.सातारा) या गावातील कोळसा भट्टीवर काम करणाऱ्या महिला मजूरावर सामुहीक अत्याचार करण्यात आल्याची घटना दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, कोळसा उत्पादन करणाऱ्या भट्टीचा मालक व त्याच्यासह ५ व्यक्तींनी हे कृत्य केल्याचा आरोप पिडीत महिलेने केला असून यासंदर्भातील तक्रार एका सामाजिक संस्थेने पिडीत महिलेसह मांडवी पोलिस स्टेशन येथे नोंदविणे, भट्टीच्या मालकाने पिडीत महिलेच्या मुलांना त्याच्या घरी डांबून ठेवून तिच्या पतीलासुध्दा धमकाविणे, नवऱ्याला व मुलांना जिवे मारण्याची धमकी देऊन या पिडीत महिलेवर अत्याचार करणे, या भट्टीच्या मालकाविरुद्ध या पूर्वीसुध्दा बालगुन्हेगारीच्या व अवैध कोळसा जमा केल्याचा गुन्हा नोंदविलेला असणे, याप्रकरणी गुन्हेगारांविरुद्ध कडक कारवाई करण्याची व गरीब कातकरी कुटुंबाला कोळसा उत्पादन करणाऱ्या भट्टीच्या मालकांपासून संरक्षण देण्याची होत असलेली मागणी, याप्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."	**२० जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
६	३४	**सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**२० जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

"राज्यातील संजय गांधी योजनेतील अपंग लाभ धारकांच्या मुलाचे वय २५ वर्षे झाल्यावर तसेच त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास त्यांचे अनुदान बंद करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, दिनदुबळ्या शरीराने कमकुवत असणाऱ्या ज्यांना कामधंदा करता येत नाही, अशा अपंगांना जगणे अतिशय अवघड झालेले असणे, यामुळे त्यांना अर्थसहाय्य देण्याची नितांत आवश्यकता असणे, कायद्यानुसार अपंगांना शासकीय नोकऱ्या दिल्या असत्या तर आज एकही अपंग बेरोजगार व निराधार दिसला नसता व त्यांच्यावर भीक मागण्याची वेळ आली नसती, याकरीता अपंगांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्यास कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी त्यांच्या मुलाच्या वयाची तसेच वार्षिक उत्पन्नाची अट रद्द करण्यात यावी, यासाठी मागील पाच वर्षापासून लाभधारकांनी सर्व संबंधित मंत्री व अधिकारी यांचेकडे वारंवार निवेदने दिली असणे, तसेच मोर्चे काढले असणे, उपोषण केले असणे, तरीसुद्धा शासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे दिनांक ११ जून, २०२३ रोजी तपोवन मैदान, कोल्हापूर येथे शंखध्वनी व ठिय्या आंदोलन करण्यात येणे, सबब शासनाने अपंगाच्या मुलांच्या वयाची तसेच उत्पन्नाची अट रद्द करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

७	३२९	**सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**२० जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (एमडब्ल्यूआरआरए) राज्यात घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत केलेली वाढ दिनांक १ जुलै, २०२२ पासून लागू करण्यात

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आली असणे, त्यानुसार कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रती हजार लिटरला ३३० रुपये मोजावे लागणार असणे, डिस्टलरी कडील अल्कोहल व इथेनॉल उत्पादनाकरिता होणारा पाणीवापर हा कच्चा माल गृहीत धरुन सुधारित दराने पाणी बिलाची आकारणी होणार असणे, सन २०१८ च्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होत असणे, उद्योगात शितपेये, आसवानी (ब्रुअरिज) मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग यांचा समावेश असल्याने डिस्टलरी करिता रेग्युलर दराने पाणी पट्टी आकारण्यात येत असणे, पण शासनाच्या सन २०२२ च्या परिपत्रकामध्ये बाटलीबंद पिण्याचे पाणी, शितपेये, स्पिरीट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरिज, आसवानींना (डिस्टलरीज) व तत्सम उद्योगांचा पाण्याचा कच्चा माल म्हणुन वापर होणाऱ्या उद्योगात समावेश केलेला असणे, त्यामुळे डिस्टलरी करिता प्रति हजार लिटरमागे रु. ११.५२ वरुन रु. ३३० दरवाढ झालेली असणे, सदरची दरवाढ डिस्टलरी उद्योगास परवडणारी नसल्याने त्याचा डिस्टलरी उद्योगावर विपरित परिणाम होऊन उत्पादन निर्मितीला फटका बसणे, त्यामुळे डिस्टलरी उद्योगात पाण्याचा वापर हा थेट कच्च्या मालासाठी होत नसून तो प्रक्रियेसाठी होत असल्याने म्हणजेच औद्योगिक कारणासाठी होत असल्याने डिस्टलरी युनिटसाठी औद्योगिक पाणीवापर दरानुसार पाणीपट्टी आकारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." ८ १२ **श्री.अमोल मिटकरी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**२० जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"अकोला जिल्ह्यातील २३६७ शेतकऱ्यांचे ११२ सहकार सोसायटी व जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांचे संमतीपत्र न घेता परस्पर पुनर्गठन करण्यात आल्याचे आढळून येणे, त्यामुळे नवीन कर्ज मिळण्याप्रकरणी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या		

लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यानुसार संबंधित सर्व शेतकऱ्यांची मिळून १३.६४ कोटी थकीत कर्जे शेतकरी लाभापासून वंचित राहिल्यामुळे थकीत कर्जास माफी मिळणेसाठी मागणी केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी केलेल्या चौकशीअंती उघडकीस आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे संबंधित ११२ सहकारी सोसायट्या तात्काळ बरखास्त करुन या सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध तसेच अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक व्यवस्थापनाविरुद्ध पोलिसात गुन्हे दाखल करण्याची शेतकरी वर्गाकडून तसेच काही राजकीय पक्ष कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेली मागणी, परिणामी पर्यायाने शासनाची व जनतेची करण्यात आलेली फसवणूक, यामुळे सदर रक्कमेची कर्जे माफ करण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात येणे, त्यामुळे संबंधित सहकारी सोसायट्या बरखास्त करुन त्यावर प्रशासकीय मंडळे स्थापन केल्यास, तरुणवर्गाला नोकरीची संधी मिळण्याची शक्यता लक्षात घेता त्याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भुमिका."

९ ३१ **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री रामदास आंबटकर, विलास पोतनीस, सुनिल शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२० जुलै, २०२३ चर्चा झाली**

"राज्यातील ओबीसी विभागांतर्गत केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या अनेक प्रकारच्या योजना विद्यार्थ्यांकरिता सुरू असताना तशा प्रकारच्या योजना अनुसूचित जाती व अनुसूचित

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जमातीच्या विद्यार्थ्यांना अधिक फायद्याच्या ठरत असल्यामुळे दुसरीकडे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारा लाभ त्या तुलनेमध्ये कमी प्रमाणात असून ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता राज्यात कुठल्याही शिक्षण संस्थेमध्ये शिकत असताना त्या ठिकाणी राहण्याकरिता व्यावसायिक अभ्यासक्रम अथवा पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला जाणे, राज्य शासनाच्या वतीने मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणे, तसेच ज्या तालुक्यामध्ये अथवा जिल्ह्यामध्ये तशा पद्धतीची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये मोफत राहण्याची व्यवस्था न झाल्यास बार्टीच्या माध्यमातून स्वाधार योजनेंतर्गत वसतिगृहाच्या व्यतिरिक्त इतरत्र राहण्याकरिता तेव्हा त्यांच्या त्या विद्यार्थ्यांना वसतिगृह भत्ता दिला जातो, परंतु ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राज्य शासनाने गेल्या तीन वर्षापासून प्रत्येक जिल्ह्यामध्ये ७२ वसतिगृहाची घोषणा केल्यावर सुद्धा प्रत्यक्षात राज्याच्या वतीने या वसतिगृहाची प्रत्यक्षात उभारणी न करणे, अथवा भाड्याने इमारत घेऊन हे वसतिगृह सुरू करण्यात आले नसणे, माहे मार्च, २०२३ च्या अधिवेशनामध्ये आणि अनेक सार्वजनिक सभेमध्ये संबंधित मंत्री महोदयांनी सत्र २०२३-२४ पासून विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी या ७२ वसतिगृहाची सोय करून देण्याचे आश्वासन देऊन सुद्धा अद्याप कुठल्याही प्रकारच्या वसतिगृहाची तयारी शासनाच्या वतीने करण्यात आली नसणे, सत्र २०२३-२४ च्या सर्व वसतिगृहामार्फत पारंपारिक अथवा व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून अद्यापही शासनाच्या वतीने ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची तयारी		

करण्यात आली नसणे, हे अन्यायकारक असणे, त्यामुळे ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, या संदर्भात शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह उपलब्ध करून देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला असणे, परंतु प्रत्यक्षात त्याची सुध्दा अंमलबजावणी करण्यात आली नसणे, परंतु व्यावसायिक अभ्यासक्रमाशिवाय पारंपारिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश मिळण्याकरिता संबंधित शासन निर्णयामध्ये उल्लेख नसल्याने तसा शासन निर्णयामध्ये बदल करणे आवश्यक असणे, तसेच बार्टीच्या माध्यमातून स्वाधार योजना राबविल्या जाते, त्याच धर्तीवर वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळणाऱ्या आणि स्वत: इतरत्र राहण्याची सोय करणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांना दर महिन्याला वसतिगृह भत्ता महाज्योतितर्फे तात्काळ प्रभावाने लागू करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

१० ४०७ **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२४ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातर्फे जे कामगार मंडळाचे सदस्य आहेत अशा कामगारांसाठी मध्यान्ह भोजन देण्याचा निर्णय घेण्यात येणे, या कामगारांना शासनातर्फे मोफत पोटभर भोजन देण्याची व्यवस्था असून कामगारांना मोफत भोजन देण्यात येत असणे, या योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून ज्या कामगारांनी नोंदणी केलेली आहे अशा कामगारांना दोन्ही वेळेचे मोफत भोजन न देता काही ठिकाणी ऊसतोड कामगाराचे बनावट नावे देऊन केलेला भ्रष्टाचार, जळगाव

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जिल्ह्यात या योजनेचे तब्बल ४७,००० बोगस लाभार्थी दाखवून होत असलेला कोट्यवधीचा गैरव्यवहार, एकट्या जळगांव जिल्ह्यात सप्टेंबर, २०२२ ते एप्रिल, २०२३ दरम्यान ५४ कोटीची बोगस बिले काढणे, जळगाव व शहर परिसरातील गावांमध्ये या योजनेस कामगारांची बनावट यादी देण्यासाठी काही राजकीय पक्षांशी संबंधित कार्यकर्ते या कार्यक्रमात बोगस बनावट कामगारांची नोंदणी करीत असून राज्यातील हा सर्वात मोठा घोटाळा असल्यामुळे या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबतची यादी पुरविणारे एजंट सक्रीय असणे, जळगाव जिल्ह्यात या योजनेसाठी सरसकट मतदार यादीच जोडण्यात येणे, जेवणाच्या यादीत अनेक प्रतिष्ठीत व मयत लोकांची यादी जोडणे, भुसावळ रस्त्यावरील गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेल्या एका बांधकाम साईटवर दिडशेपेक्षा जास्त कामगारांना जेवण दिल्याचा दावा करण्यात येत असणे, दिननगर येथील औष्णिक वीज केंद्रात दररोज २००० कामगारांना दोन्ही वेळेचे जेवण दिल्याचे दाखवून बोगस बिले काढणे, २५९ दिवसात एकही कामगार गैरहजर नसल्याचे दाखविणे, प्रत्यक्षात फक्त ३८ डबे पुरविण्याचे सिद्ध होणे, परंतु येथील सर्व मजूर घरुन स्वत:चे भोजन सोबत आणत असून ते या योजनेचा लाभ घेत नसल्याची बाब उघडकीस आलेली असणे, राज्यात या योजनेत कोट्यवधीचा गैरव्यवहार होत असल्याची शक्यता, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया.''		
११	२२९	**सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**२४ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"इंडिक टेल्स व हिंदू पोस्ट या वेबसाईटवर स्त्री शिक्षणाच्या जनक आद्यसमाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी अत्यंत खालच्या		

पातळीचे लिखाण करण्यात आलेले असणे, या लेखातील भाषा अत्यंत अपमानास्पद असून याचा धिक्कार राज्यातील सर्व स्तरातून होत असणे, स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून सावित्रीबाई फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले असून शिक्षण देत असताना २० व्या शतकातील काही जातीय व्यक्तींकडून त्यांच्यावर दगडधोंडे व शेणाचा मारा त्यांनी अंगावर झेललेला असणे, २१ व्या शतकात देखील काही जातीयवादी शक्ती पुन्हा एकदा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंवर चिखलफेक करीत असून या पोर्टलवर 'इतिहासाची पुनर्मांडणी' या नावाखाली इतिहासाची अक्षरश: मोडतोड सुरू असून ही समाजविघातक वृत्ती ठेचण्याची होत असलेली मागणी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविरोधात आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्या 'इंडिक टेल्स' व 'हिंदू पोस्ट' या वेबसाईट तात्काळ बंद करुन वेबसाईट चालविणाऱ्या व लिखाण प्रसार करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबत बऱ्याच लोकप्रतिनिधींनी मुंबईचे पोलिस आयुक्त यांची भेट घेऊन देण्यात आलेले निवेदन, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१२ ३८९ **सर्वश्री सचिन अहिर,** शशिकांत शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२४ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"राज्यातील आयुर्वेदिक कॉलेजमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम (एमडी, एमएस) आयुर्वेद प्रवेशासाठी मराठी विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय, यासंदर्भात विद्यार्थी व लोकप्रतिनिधी यांनी माहे मे व जून, २०२३ मध्ये शासनाला दिलेली लेखी निवेदने, फक्त महाराष्ट्र राज्यातून पदवी घेणाऱ्यांनाच राज्य राखीव जागातून प्रवेश देणे, मात्र मूळ महाराष्ट्रीयन विदयार्थ्यांनी केवळ राज्याबाहेरून पदवी घेतल्याने स्टेट कोट्यातून प्रवेश नाकारणे,

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)	
		त्यामुळे त्यांना केवळ १५ टक्के जागा उपलब्ध होणे, सन २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षांत एमडी आयुर्वेदच्या ८४९ जागा रिक्त ठेवून इच्छुक मराठी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करणे, आयुष मंत्रालय भारत सरकारने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी सूचनेद्वारे ८५ टक्के जागांबाबत नियम करण्याचे राज्य सरकारला दिलेले अधिकार, कर्नाटक व मध्यप्रदेशने तेथील मूळच्या विद्यार्थ्यांना स्टेट कोट्यातून प्रवेश देण्यासाठी केलेले नियम, महाराष्ट्र राज्य सरकार नियमात सुधारणा करण्याबाबत करीत असलेली टाळाटाळ, शासन कारवाई करीत नसल्याने आयुर्वेद विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष यावर शासनाकडे तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."			
१३	२९६	**श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२४ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**	२२
		"मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत ब्रेन डेड रूग्ण किंवा जिवंत व्यक्ती यांच्याकडून अवयवदान घेऊन राज्यात अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पाडण्यात येत असणे, ब्रेन डेड रूग्णाकडून अवयवदान मिळण्याकरिता संबंधित रूग्णांच्या नातेवाईकांना झोनल ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटीकडे नोंदणी करणे आवश्यक असणे, तसेच सद्य:स्थितीत मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत जिवंत व्यक्तीकडून अवयवदान स्विकारताना सदरहू जिवंत व्यक्ती संबंधित रूग्णाचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी असणे आवश्यक तथा बंधनकारक असणे, जिवंत व्यक्तीकडून सदरहू कायद्याच्या अंतर्गत अवयवदान संपन्न होण्यासाठी संबंधित रूग्णालयातील स्थानिक प्राधिकरण समिती (LOCAL			

AUTHORISATIONS COMMITTEE) समोर संबंधित रूग्णाला / नातेवाईकांना त्यांचे प्रकरण सादर करून रूग्णाचे व अवयव दात्याचे नाते प्रस्थापित करणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे तसेच रूग्णांमध्ये व अवयव दात्यांमध्ये कोणत्याही स्वरूपाची आर्थिक देवाण घेवाण होत नाही, इत्यादी बाबतची पडताळणी प्रक्रिया पार पाडावी लागत असणे, बहुतांशवेळा संबंधित रूग्णाचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी यांच्यापैकी कोणीही अवयवदान करण्यास उपलब्ध नसल्यास अथवा वैद्यकीय निकषांवर पात्र नसल्यास आणि संबंधित रूग्णाचे अन्य नातेवाईक अवयवदान करण्यास इच्छुक / उपलब्ध असल्यास केवळ मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत असलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने लोकल ऑथोरायझेशन कमिटीला याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याने अशा रूग्णांना अनेक वर्षे ब्रेन डेड रूग्णांकडून अवयवदान मिळण्याच्या प्रक्रियेकडे वाट पहावी लागत असणे, तसेच लोकल ऑथोरायझेशन कमिटीने एखादे प्रकरण नामंजूर केल्यास संबंधित रूग्णाचे नातेवाईकांना अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दाद मागता येत असणे, तथापि अपिलीय प्राधिकारी यांना मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण नियम, २०१४ या कायद्यांतर्गत त्यांच्या सांविधानिक पदास मर्यादित अधिकार असल्याने बहुतांशी प्रकरणात लोकल ऑथोरायझेशन कमिटीचाच निर्णय कायम ठेवण्यात येत असणे, त्यानंतर रूग्णाचे नातेवाईक जरी मा.उच्च न्यायालयात दाद मागू शकत असले तरी त्यामध्ये अनिश्चित कालावधी लागत असल्याने व अवयव प्रत्यारोपणासंबंधीचा निर्णायक कालावधी वाया जात असल्याने या प्रकरणी संबंधित रूग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांना अतोनात मानसिक, शारिरीक व आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, सदरहू बाब लक्षात घेता या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे एकक निवृत्त

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		न्यायाधीश तसेच एक निवृत्त प्रधान सचिव दर्जाचे अधिकारी व मानवी अवयव आणि ऊतींचे प्रत्यारोपण या विषयातील एका ज्येष्ठ तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या एका त्रिसदस्यीय आयोगाची स्थापना केल्यास सदरहू बाब उपयुक्त ठरणे, या आयोगाने त्रैमासिक पद्धतीने त्यांच्यासमोरील सादर प्रकरणांची नियमितपणे सुनावणी घेतल्यास व सदरहू आयोगास निर्णय घेण्याच्या अनुषंगाने राज्य गुप्तचर विभाग किंवा अवयव प्रत्यारोपणासंबंधीच्या शासकीय यंत्रणेचे सहाय्य दिल्यास या प्रकरणी अनेक गरजू रूग्णांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण होणे, सबब अशा आयोगाची निर्मिती करण्याबाबत व तसेच अवयवदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या ज्या रूग्णांचे आई, वडील, सख्खा भाऊ, सख्खी बहीण, बायको, नवरा, मुलगा, मुलगी यांच्यापैकी कोणीही अवयवदान करण्यास उपलब्ध नसल्यास अथवा वैद्यकीय निकषांवर पात्र नसल्यास संबंधित रूग्णाचे अन्य इच्छुक नातेवाईक यांना अवयवदानाची मान्यता देण्याचे अनुषंगाने प्रस्थापित कायद्यात बदल / सुधारणा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची याबाबतची नेमकी भूमिका.''		
१४	३५२	**डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री धीरज लिंगाडे, अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२४ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"राज्यातील भटक्या व विमुक्त जाती जमाती अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष सुरू होताच जून महिन्यादरम्यान मिळणारे ४०% व ६०% अनुदान अद्याप मिळालेले		

नसणे, या महाविद्यालयांना अद्याप अनुदान न मिळाल्याने या संस्था आर्थिक विवंचनेत असणे, अनुदानाअभावी या शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन रखडलेले असणे, तसेच या महाविद्यालयांमध्ये भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयातील प्राध्यापकांची पदे अनेक वर्षे रिक्त असणे, या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होत असणे, शासनाकडून भटक्या व विमुक्त जाती जमाती अंतर्गत या महाविद्यालयांना अनुदान मिळत नसल्याने येथील ही पदे भरणे महाविद्यालयांना दुरापास्त झालेले असणे, या सर्वांचा परिणाम या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असणे, भटक्या व विमुक्त जाती जमाती महाविद्यालयांना अनुदान मिळावे आणि भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र ही रिक्त असलेली पदे तातडीने भरावी याबाबत विद्यार्थी व संस्थेकडून सातत्याने शासनाकडे मागणी होत असणे, अद्याप या मागणीबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येत नसल्याने विद्यार्थी व संस्थाचालकांमध्ये शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, भटक्या व विमुक्त जाती जमाती महाविद्यालयांमध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांची भरती तातडीने करण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१५ २३९ २५ जुलै, २०२३ **चर्चा झाली**

सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—

"मुंबई शहर आणि उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सौंदर्यीकरण महापालिका आणि एमएमआरडीएने करण्याचे ठरविले असले तरी गेल्या

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		१७ वर्षापासून मिठी नदी गोड होणाच्या प्रतिक्षेत असून यावर १३०० कोटी रुपये खर्च करूनही मिठीचे सौंदर्यीकरण पूर्ण झाले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या व्यतिरिक्त आणखी १ हजार कोटी विविध कामांसाठी खर्च केले जाणार असून या दोन्ही प्राधिकरणांनी मिठीसाठी बहुतांश कामे केली असली तरी प्रत्यक्षात मात्र प्रदूषणापासून मिठी नदीला मुक्ती मिळाली नसणे, प्रत्यक्षात जी कामे होती ती झालीच नसल्याने यामध्ये सर्विस रोड, नालेसफाई, सुशोभीकरणाचा समावेश असणे, सदर कामाकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहराला पावसाळ्यात पुरापासून वाचविण्यासाठी मिठी नदीच्या पुनर्जिवीतेचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." १६ २४७ **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२५ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे अंतर्गत अनुसूचित जातीतील मुलांना संशोधनाचे प्रशिक्षण देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आगामी ५ वर्षासाठी ९० हजार विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम मंजूर करण्यात आलेले असणे, उक्त शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या ३० प्रशिक्षण संस्थांद्वारे प्रशिक्षण देण्याचे काम सुरू असताना त्यांना डावलून अधिकाऱ्यांचे हितसंबंध असलेल्या नविन संस्थांची निवड करण्यासाठी नियमबाह्यरित्या

निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असणे, अकोला, अमरावती व बुलडाणा जिल्ह्यातील तीन अपात्र असलेल्या संस्थांनी बनावट कागदपत्रे, अशैक्षणिक शिक्षकेत्तर कर्मचारी, बोगस विद्यार्थी याद्या व बनावट देयके सादर करुनही सचिव, सामाजिक न्याय विभाग, तत्कालीन महासंचालक, बार्टी, येथील निविदा गुणांकन समितीतील अधिकारी व योजना विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने अपात्र संस्थांच्या गुणांमध्ये वाढ करून सदरहू संस्थांना पात्र केल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेनंतर मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी बोगस पद्धतीने काढण्यात आलेली निविदा/ कामाचे आदेश रद्द करण्याचे आदेश दिलेले असणे, तथापि उक्त प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्याने त्यांनी अशाप्रकारे यवतमाळ व पुणे येथील IBPS व MPSC चे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यास मंजुरी दिलेली असणे, तसेच बार्टी या संस्थेने गत ४ महिन्यांच्या कालावधीत शासन निर्णयाचे उल्लंघन व मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिका डावलून सुमारे १२० निविदा प्रक्रिया राबविल्या असणे, उक्त निविदा वारंवार काढून रद्द करून परत नव्याने निविदा प्रक्रिया राबवित असणे, अशाप्रकारे सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी अवैध संपत्ती जमा केली असणे, त्यामुळे अनुसूचित जातीचे अनेक विद्यार्थी नोकरी व रोजगारापासून वंचित राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, उक्त प्रकरणी व सदरहू निविदा प्रक्रियांची चौकशी करून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई व सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या संपत्तीची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची नेमणूक करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१७	३१९	**श्री.कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२५ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

"मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता करातून आणि पाणी पट्टीतून शाळा, महाविद्यालयांसह सर्व प्रकारच्या शिक्षण संस्था वगळण्यासाठी महापालिका प्रशासनास आदेश देण्याची आवश्यकता असणे, शासनाने यु डायस क्रमांक दिलेल्या मुंबई शहर व उपनगरातील प्रामुख्याने झोपडपट्टीतील महापालिका प्रशासनाने अनधिकृत ठरवलेल्या २६९ खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील दंडात्मक कारवाई त्वरित रद्द करून त्यांना अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्याची आवश्यकता असणे, नामांकित व प्रयोगशील शिक्षण संस्थांना महानगरपालिकेच्या इमारती नाममात्र भाड्याने (लीजवर) उपलब्ध करण्याची गरज असणे, खाजगी अनुदानित आणि विनाअनुदानित प्राथमिक शाळांतील तसेच यु डायस क्रमांक मिळालेल्या तथापि मुंबई महानगरपालिकेने अनधिकृत ठरविलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांना भेदभाव न करता सरसकट सर्वांना शालेयपयोगी २७ वस्तू मोफत देण्याची आवश्यकता असणे, क्रिसेंट हायस्कूल, पायलीपाडा, ट्रॉम्बे आणि निर्मल विद्यालय, वडाळा, मुंबई अशा झोपडपट्टीतील अपघातग्रस्त व क्षतीग्रस्त शाळांना महानगरपालिकेच्या शाळेत अत्यंत तातडीने पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मुंबई मनपा क्षेत्रातील १०४ शाळांना मुंबई मनपाने १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करण्याची गरज असणे, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही."

१८ ३२४ **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— **२५ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्यापी रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प धोरणात्मक निर्णयासाठी रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, पुनर्विकास प्रकल्पांतर्गत क आणि ड वर्ग कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या २००० घरांचे बांधकाम संथगतीने सुरू असणे, धोकादायक स्थितीमधील इमारतींमधील कर्मचाऱ्यांचे ३ महिन्यांमध्ये अन्यत्र स्थलांतरण करण्याचे आदेश दिनांक २ मार्च २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी दिलेले असणे, परंतु सदर प्रक्रियादेखील संथगतीने सुरू असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षांचेच असल्याने सद्यस्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीचा काही भाग कोसळलेला, तर काही छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, वारंवार बैठका घेण्याचे आश्वासित करून देखील बैठका न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		दुर्लक्ष, सद्यस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरवस्था व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुनर्विकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."		
१९	२१	**सर्वश्री धीरज लिंगाडे,** अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सुधाकर अडबाले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२५ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"राज्यातील ८५ टक्के पत्रकारांना रुपये २० हजार इतके कमी वेतन मिळत असून त्यामध्ये कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालविणे कठीण असल्याने बदलत्या काळानुसार पत्रकारांना जोडधंदा करणे आवश्यक आहे, परंतु बँकांमधून कर्ज उपलब्ध होत नसणे, पत्रकारांना नोकरीचे कोणतेही संरक्षण नसणे, त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, पत्रकारांसाठी कर्ज उपलब्ध व्हावे व लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर पत्रकार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात यावे, यासाठी विविध प्रसार माध्यमांचे काम करणारे पत्रकार व कर्मचारी यांच्याकडून सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन राज्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."		

२० २७५ **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— **२५ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"मुंबईत दिनांक १ जून ते २९ जून, २०२३ या २९ दिवसांच्या कालावधीत तब्बल ४३५ झाडे, फांद्या पडण्याच्या घटना घडल्या असून त्यात आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू आणि ४ जण जखमी झाले असणे, यामध्ये मुंबई शहरात झाडे आणि फांद्या तुटण्याच्या ११२ घटनांमध्ये एकाचा मृत्यू आणि १ जण जखमी झाला असणे, मुंबई पश्चिम उपनगरात झाडे आणि फांद्या पडण्याच्या सर्वाधिक २१४ घटना घडल्या असून त्यात सात जणांचा मृत्यू व १ जण जखमी झाला असणे, पावसाळ्यात वादळवाऱ्याने झाडांच्या आणि फांद्यांच्या तुटण्याने रहिवाशी भागातील जीवांचे आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने पावसाळापूर्व कामांमध्ये मुंबईतील धोकादायक झाडे आणि फांद्या तोडण्याचे काम, तसेच धोकादायक झाडे आणि फांद्या तुटून पडण्याचा धोका असल्यास, त्याची माहिती महानगरपालिकेला देण्याचे आवाहनही मुंबईकरांना केल्याचा दावा बृहन्मुंबई महानगरपालिकेने केला असणे, तसेच जी झाडे कमी धोकादायक आहेत, त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने छाटणी केली असल्याचे देखील महानगरपालिकेने जाहीर केले असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका अखत्यारीतील झाडे आणि फांद्या कोसळून निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना सातत्याने घडलेल्या असणे, भविष्यात देखील अशा प्रकारच्या घटनांत वाढ होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, रस्त्यांचे काँक्रिटीकरण करताना झाडांपासून किमान दोन ते तीन मीटर जागा सोडणे आवश्यक असतानाही महानगरपालिकेने नियुक्त केलेले रस्त्यांच्या

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कंत्राटदारांकडून याची खबरदारी घेण्यात न येणे, परिणामी, झाडांना लागुनच करण्यात येत असलेल्या काँक्रिटीकरणामुळे झाडांच्या मुळांना धोका निर्माण होणे, याकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास्तव मुंबईत झाडे आणि फांद्या तुटून नागरिकांना जीव गमवावा लागू नये, याकरिता शासनाने तातडीने करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."		
२१	१७२	**श्री.रमेशदादा पाटील,** ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२५ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"उरणच्या ओएनजीसी प्रकल्पामधून मोठ्या प्रमाणात दूषित वायू हवेत सोडण्यात येत असून या परिसरातील नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होऊन त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाने दुर्लक्ष केल्याने उरण परिसरातील रहिवाशांमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, उरण परिसरातील जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल, उरण-पनवेलल रस्त्यावर २४ तास धडधडणाऱ्या दगडखाणी (क्वाऱ्या) व जेएनपीए अंतर्गत असलेल्या रासायनिक प्रकल्पांमुळे याआधीच जल, वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे, ओएनजीसी प्रकल्पामधून मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात हवेत सोडण्यात येणाऱ्या वायूमुळे प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने श्वसनाच्या आणि इतर व्याधीचा त्रास नागरिकांना जाणवू लागलेला		

असणे, याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी हे प्रदूषण नियंत्रण ठेवण्याची दक्षता घेतील अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत असणे, मागील दीड वर्षाच्या कालावधीत उरण ओएनजीसी विरोधात वायू प्रदूषणाबाबत नागरिकांकडून वाढत्या तक्रारी बाबत ओएनजीसी प्रकल्पाच्या वरिष्ठांना नागाव ग्रामपंचायतीने नुकतेच पत्र पाठवले असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेली असणे, दिवसा व रात्री हवेतून उग्रदर्पाचा वास येणे, यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनाचा तसेच इतर शारीरिक व्याधी निर्माण होण्याची भीती एका डॉक्टरांनी व्यक्त केली असणे, याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची प्रक्रिया सुरू केल्याचेही सांगण्यात येणे, त्यामुळे उरण परिसरातील रासायनिक कंपन्यांमधून २४ तास अखंडपणे वायू प्रदूषण होत असून याचा नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

२२ ४६१ **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२५ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"राज्यासह देशात घरोघरी देवांच्या मुर्तींचे पूजन केले जात असून विधीवत त्याचे विसर्जन जलाशयात केले जात असणे, रायगड जिल्ह्यातील पेण, हमरापूर हे गणेश मुर्तींचे माहेरघर समजले जात असणे, महाराष्ट्रात कोकणासह, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह देश विदेशात या मुर्तींची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असणे, या वर्षी दिनांक १९ ते २८ सप्टेंबर, २०२३ रोजी गणेशोत्सव महाराष्ट्रासह देश विदेशात साजरा होत असणे, परंतु केंद्र शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तींवर बंदी घातली

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पेण, पनवेल, हमरापूर अशा विविध ठिकाणी असणाऱ्या मुर्तीकारांचे रोजगार व दैनंदिन उपजिवीकेवर त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, येत्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या घरगुती गणेशमुर्तीवर बंदी घालण्याचा निर्णय नुकताच मुंबईसह राज्यातील इतर महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केला असणे, या निर्णयाला मूर्तिकारांकडून व मूर्तिकार संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, गणेशोत्सव हा महत्त्वाचा मोठा पारंपरिक उत्सव असून यासाठी लागणाऱ्या पीओपी मूर्ती बनवण्याच्या व्यवसायावर अनेक कुटुंबे अवलंबून असणे, सबब राज्य सरकारच्या वतीने नेमण्यात आलेल्या तांत्रिक समितीचा अंतिम अहवाल येत नाही तोपर्यंत पीओपीच्या मूर्तीवर सरसकट बंदी घालणे अशास्त्रीय, असंविधानिक आणि अयोग्य ठरेल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."		०४२
२३	३०६	**श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२६ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतर्गत सुरू असलेल्या व्यवस्थापन शास्त्र विभागाच्या परीक्षेत सलग सातव्या पेपरला विद्यार्थ्यांना जुनीच प्रश्नपत्रिका देण्यात आल्याची घटना दिनांक १० जून, २०२३ रोजी उघड होणे, दुसरा पेपर झाल्यानंतर ही चूक विद्यापीठाच्या लक्षात आणून देण्यात येणे, परंतु त्यानंतर ही चुकांची मालिका न थांबणे, या सर्व प्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारुन कुलगुरू व परीक्षा नियंत्रकांनी		

आपल्या पदाचा राजीनामा देण्याची मागणी विविध विद्यार्थी संघटनांनी करणे, जुन्याच प्रश्नपत्रिका देण्याची चूक विद्यापीठामार्फत झाली असल्याने पुनर्परीक्षेचे परिपत्रक रद्द करून व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याची मागणी सुद्धा विद्यार्थी संघटनांनी करणे, परीक्षा पद्धतीमध्ये गंभीर चुका आढळून आल्याने विद्यापीठ प्रशासनाबरोबरच विद्यार्थ्यांचा वेळ श्रम व पैसा वाया जाणे, विद्यापीठ प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, विद्यापीठ प्रशासनाच्या या गंभीर चुकीची शासनाकडून सखोल चौकशी होण्याची गरज तसेच याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

२४ ६ **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२६ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"सांगली जिल्ह्यातत बनावट, भेसळयुक्त कृषी औषधांची विक्री राजरोसपणे सुरू असणे, यातून द्राक्ष उत्पादक, भाजीपाला उत्पादक तसेच सामान्य शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचे निदर्शनास येणे, बोगस आणि बनावटगिरीचा धंदा चालु असणे, अनेक ठिकाणी पॅकिंग मुंबई, बंगळूरचे आणि औषध मात्र स्थानिक अशा प्रकारे गैरप्रकार सुरू असणे, जिल्ह्यात वारणा टापूसह मिरज पश्चिम भाग, आटपाडी-जत तालुक्यांचा पश्चिम भाग, तासगाव, खानापूर, लेंगरे परिसर, वाळवा-शिराळा तालुक्यात मोठया प्रमाणात भाजीपिके लागवडीचे क्षेत्र असून या भागांतील अनेक शेतकऱ्यांना असा बनावट औषधांचा फटका बसल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांची बोगस किटकनाशकांमधून फसवणूक मोठया प्रमाणात होत असून आर्थिक आणि पिकांचे असे दुहेरी नुकसान होत असणे, सबब सांगली जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांमध्ये

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करून भेसळयुक्त शेती औषधांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी अशी शेतकरी वर्गाकडून होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."		
२५	४३५	**सर्वश्री अनिकेत तटकरे,** सतिश चव्हाण, अमोल मिटकरी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२६ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"सांगली येथील वैद्य योगेश माहिमकर हे गेली १८-१९ वर्षे आयुर्वेदिक प्रॅक्टिस करीत असून अनेक रुग्णावर त्यांचेकडून औषधोपचार करण्यात येत असणे, त्यांनी केलेल्या एका प्रयोगात त्यांच्याकडे येत असलेल्या मधुमेहग्रस्त रुग्णांचे रक्त सांगलीमधील वेगवेगळ्या ४ नामांकीत लॅबमध्ये तपासणी साठी त्यांनी पाठविणे, त्यानंतर या चारही लॅबचे रिपोर्ट हे वेगवेगळे असल्याचे धक्कादायक प्रकार निदर्शनास येणे, एका लॅबमध्ये १२६ शुगर, दुसऱ्या लॅबने ३००, तिसऱ्या लॅबने ३९० व चौथ्या लॅबने ४२१ या सर्व लॅब जुन्या असून तज्ञ डॉक्टर येथे कार्यरत असणे, सदर चाचणीच्या रिपोर्टमधील तफावत पाहता नक्की कोणत्या लॅबबाबत रुग्णांमध्ये व त्यांचे नातेवाईकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, त्यामुळे लॅबमार्फत रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असून असेच रिपोर्ट येत राहिले आणि त्यावर रुग्ण औषधोपचार घेऊ लागले तर चांगले रुग्णही आजारी पडून त्यांच्या जीवावर बेतण्याची परिस्थिती निर्माण झाली असणे, यावर गंभीर दखल घेऊन शासनाने प्रामुख्याने तात्काळ या ४ लॅबची तसेच जिल्ह्यातील अन्य लॅबची चौकशी करून त्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		

२६ ४३ **सर्वश्री किरण सरनाईक,** विक्रम काळे, सत्यजीत तांबे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— **२६ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"राज्यात एक जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू झालेला असणे, परंतु प्रत्यक्षात त्याचा लाभ सप्टेंबर, २००९ पासूनन डी.सी.पी.एस. /एन.पी.एस धारकांना मिळणे, तसेच सातवा वेतन आयोग जानेवारी, २०१६ पासून लागू करण्यात आलेला आहे परंतु, सातवा वेतन आयोग प्रत्यक्षात जानेवारी, २०१९ पासून रोखीने लागू करण्यात आला आहे. तसेच १ जानेवारी २००६ ते सप्टेंबर २००९ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम जीपीएफ धारकांना पाच समान हप्त्यांमध्ये त्यांच्या जीपीएफ खात्यामध्ये प्रत्यक्षरित्या देण्यात आलेली असणे व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ही थकबाकी रोख स्वरूपात मिळालेली असणे, २०१२ पर्यंत डी.सी.पी.एस. / एन.पी.एस. धारकांचे जी.पी.एफ., डी.सी.पी.एस., एन.पी.एस. असे कोणत्याही प्रकारचे खाते सुरू करण्यात आलेले नसणे, डी.सी.पी.एस./ एन.पी.एस. खाते नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना जी.पी.एफ. फरकाप्रमाणे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नसणे किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रमाणे रोख स्वरूपात सुद्धा मिळाली नसणे, राज्यात डी.सी.पी.एस. / एन.पी.एस. / जी.पी.एफ. खाते नसणाऱ्या धारकांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाची थकबाकी तातडीने मिळण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
२७	४९८	**श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— "राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश असलेला 'राजपूत भामटा' या जमातीतील 'भामटा' हा शब्द वगळण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे, २०२३ रोजी औरंगाबाद येथील जाहीर सभेत करण्यात येणे, सदर आश्वासनामुळे राजपूत भामटा, बंजारा, लमान, कैकाडी, मानस जोगी, माकडवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, छप्पर बंद यासारख्या जमातीचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता असून विमुक्त 'अ' गटातील आरक्षणावर अतिक्रमण असलेल्या तक्रारी शासनाकडे आले असणे, 'राजपूत भामटा' समाजाची लोकसंख्या राज्यात अत्यल्प असून राजपूत भामटा नसलेल्या अनेक व्यक्तींनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर आरक्षण मिळवण्याच्या तक्रारीबाबत तसेच भटके विभक्तीच्या अ आणि ब गटातील अत्यंत मागासलेल्या जमातींना संरक्षण देणे त्याच्या आरक्षणावरील अतिक्रमण थांबवणे आणि त्यांच्या शैक्षणिक आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखणे या आणि अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली नसणे, त्यामुळे या समाजाच्या लोकांमध्ये पसरलेला असंतोषाची भावना निर्माण होणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व राज्य शासनाची प्रतिक्रिया."	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
२८	५०६	**श्री.राजहंस सिंह वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— "संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील काही झोपडीवासियांनी सन २००१ मध्ये वन खात्याच्या नियमानुसार सन १९९५ पूर्वीचे म्हणून ७ हजार रुपये भरले असून	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

त्यांना चांदवली येथे घरे मिळालेली असणे, त्यानंतर अंदाजे १५ हजार रहिवाशांनी सन २००८ मध्ये नियमानुसार ७ हजार रुपये भरले, परंतु त्यांना १५ वर्षे होऊन सुद्धा त्यांना अद्यापपर्यंत घरे मिळाली नसणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आंबेडकर नगर, गौतम नगर, सिद्धार्थ नगर, संजय नगर, कालीमाता नगर, आप्पापाडा, जामऋषी नगर, बंजारी पाडा, शांती नगर, पिंपरी पाडा, मातंग गड, सावित्रीबाई फुले नगर, क्रांती नगर, दामू नगर पासून मागाठाणे पर्यंत सदर जागा वन विभागामध्ये असणे, या उर्वरित झोपडीवासीयांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांचेही पुनर्वसन करावे, अशी मागणी केली असणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील पात्र अंदाजे १५ हजार लोकसंख्येला, वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

२९ ३६७ **श्री.नरेंद्र दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२८ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"राज्यातील निवृत्त शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांना वेळवर निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळत नसणे, दर महिन्याच्या १ तारखेला पेन्शन बँक खात्यात जमा होणे आवश्यक असताना अनेक वेळा २० ते २५ तारखेनंतर पेन्शन जमा होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषतः नाशिक जिल्ह्यातील अनेक पेन्शनधारकांच्या लोकप्रतिनिधींकडे तक्रारी प्राप्त होणे, परिणामी पेन्शनधारकांची होणारी आर्थिक कोंडी, पेन्शनधारक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना आजारपणात औषधोपचार वेळेवर घेणे आवश्यक असतानाही पेन्शन वेळेवर होत नसल्यामुळे त्यांना औषधोपचारासाठी योग्य

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		त्यावेळी पैसे उपलब्ध न होणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना व त्यांच्यात निर्माण झालेली वाढती असुरक्षितता, शासनाने यासंदर्भात तातडीने चौकशी करुन पेन्शनधारकांची आर्थिक कुचंबणा होऊ नये याकरीता दर महिन्याच्या १ तारखेला त्यांच्या बँक खात्यात पेन्शनची रक्कम जमा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."		
३०	५०२	**डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट-ब पूर्व परीक्षा दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेली असणे, सदर परीक्षेचा निकाल जवळपास १० महिन्यानंतर दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी जाहीर होणे, या परीक्षेमध्ये हजारो उमेदवार PSI पदावर पुन्हा पुन्हा पात्र ठरल्यामुळे PSI परीक्षेचा आजपर्यंतचा सर्वात जास्त कट ऑफ जाहीर होणे, संयुक्त गट-ब पूर्व परीक्षा २०२२ मध्ये PSI करिता निवड झालेले जवळपास दीड हजार विद्यार्थी यापूर्वी पासून शासनात विविध वरिष्ठ पदावर कार्यरत असणे, यापूर्वी निवड झालेल्या उमेदवारांनी विविध पदांवर जॉईन होऊन देखील आजपर्यंत ऑप्टिंग आऊट केले नसल्यामुळे सदर परीक्षेत PSI पदाकरिताचा कटऑफ जास्त येऊन हजारो इच्छुक उमेदवार थोड्याफार मार्कांनी अपात्र ठरत असणे, तसेच येत्या २०२३ पासून आयोगाच्या अभ्यासक्रमात देखील बदल होत असल्याने परीक्षार्थींमध्ये नाराजी असणे, संयुक्त गट-ब पूर्व परीक्षा २०२२ करिता ASO पदासाठी २१.१४%, Sub Registrar's पदासाठी		

१८.४२% व STI पदासाठी २१.७७% उमेदवारांना मुख्य परीक्षेची संधी दिलेली जात असतानाच PSI पदासाठी केवळ १६.६४% उमेदवारांनाच मुख्य परीक्षेची संधी दिली जाणे, त्यामुळे PSI इच्छुक उमेदवारांनी आयोगाने विशेष अधिकार वापरून २० टक्क्यापर्यंत उमेदवारांना मुख्य परीक्षेची संधी देण्याची मागणी करणे, तसेच यापूर्वी प्रशासनात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांकरिता ऑप्टिंग आऊट पर्यायासाठी कालमर्यादा निश्चित करण्याची गरज असणे, त्यामुळे सर्वसामान्य परीक्षार्थींमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत राज्य शासनाने आयोगाकडे संयुक्त गट- ब पूर्व परीक्षा २०२२ च्या निकालाबाबत उचित मागण्यांसह योग्य पाठपुरावा करून संबंधित विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी घेतलेली भूमिका व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

३१ २६ **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२८ जुलै, २०२३ चर्चा झाली** २४७

"खुलताबाद शहर हद्दीत ३ कि.मी. अंतरावर लिंगमळा (लालमाती वस्ती) येथे मागासवर्गीय वस्ती असून तेथे ३५ ते ४० कुटुंब वास्तवास असून जवळपास २७५ लोकसंख्या असणे, सदर ठिकाणचे नागरिक मोल मजुरी करून उदरनिर्वाह करत असणे, या वस्तीकडे नगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले असून तेथे कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना, रस्ते, पथदिवे या नागरी सोयी-सुविधा दिलेल्या नसणे, वस्तीतील नागरिक हे शेत वस्तीवर राहत असल्याने त्यांच्या नावाची ७/१२ मध्ये नोंद असणे, सन २०१७ मध्ये ७ ते ८ कुटुंबाना घरकुल मंजूर झाले असणे, मात्र त्यांच्याकडे नमुना नं.८ चा उतारा नसल्यामुळे सदर घरकुल रद्द करण्यात आले असणे, वस्तीवर जाण्या-येण्यासाठी रस्ता नसणे, डोंगराळ भाग असल्यामुळे कायम हिस्त्र पशुंची भिती असणे, सदर

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		वस्तीवर किमान २५ मुले-मुली १ ते ४ वयोगटातील असणे, सदर बालके शिक्षणापासून वंचित राहण्याची भिती निर्माण झालेली असणे, बालकांना अंगणवाडीची नितांत गरज असणे, तसेच अंगणवाडी नसल्यामुळे बालकांना पोषण आहार मिळत नसल्याने २५ बालके कुपोषणाच्या विळख्यात सापडण्याची शक्यता असणे, खुलताबाद नगरपरिषद प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करत असणे, खुलताबाद नगरपरिषद हद्दीत प्रभाग क्र.१ मध्ये सदर वस्तीतील नागरिकांची मतदान यादीत नावाची नोंद असणे, या बाबतीत शासनाने तात्काळ चौकशी करून खुलताबाद नगरपालिका प्रशासनाने लिंगमळा (लालमाती वस्ती) तील नागरिकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याविषयी कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."		
३२	४८	**प्रा.राम शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष वेधतील :—	**मुख्यमंत्र्यांचे** **२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**
		"मे. कॅनकेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत उभारण्यात येणाऱ्या कर्करोग रुग्णालयाच्या नावामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचा उल्लेख करण्याबाबत महापालिका मुख्यालयातील अध्यक्ष, स्थायी समिती दालनामध्ये दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात येणे, सदर सभेच्या निर्णयानुसार रे रोड, माझगाव येथील न.भु. क्र. २५४ (भाग) येथील अहिल्याबाई होळकर रुग्णालयाच्या जागेवर मे. कॅनकेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत उभारण्यात आलेल्या रुग्णालयाचे नामकरण पूर्वीच्या नावासह म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कॅनकेअर ट्रस्ट असे नामकरण करण्यात		

यावे व रुग्णालयाच्या इमारतीवर दर्शनी भागावर तसा नाम फलक लावण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांच्याकडे एका पत्राद्वारे करण्यात येणे, परंतु, अद्यापपर्यंत सदर मागणीवर कोणत्याही स्वरुपाची कार्यवाही न होणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक योगदान विचारात घेता शासनाने तातडीने सदर मागणीवर निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

३३	३८	**सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :——	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

"गायरान जमिनीवर केलेले अतिक्रमण हटवण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक मिळकत धारकांना महसूल विभागामार्फत माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्याच्या दरम्यान नोटीस बजावण्यात येणे, कोल्हापूर जिल्ह्यातील आनंदनगर, वैभवनगर, सारखवाडी या भागातील जमिनीवर १९८० पासून शासनामार्फत गरीब व बेघर लोकांना इंदिरा घरकुल योजने अंतर्गत घरे बांधून देण्यात असून काही नागरिकांना जागा उपलब्ध करून देण्यात येणे, ग्रामपंचायतीने बजावलेल्या नोटीसला उत्तर देऊनही महसूल विभागाकडून पुन्हा नोटीस बजावण्यात येणे, त्यामुळे गरीब व बेघर स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नाराजीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून गायरान जमिनीवर घरकुल योजनेतून दिलेल्या घरांना संरक्षण देऊन गरीब व बेघर जनतेला दिलासा देण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३४	५७०	**सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रविण दरेकर,** ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, निलय नाईक, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— "महाराष्ट्र राज्यात बहुतांश शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करावे लागत असते, त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता विविध सवलती मिळविण्यासाठी देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्यात अधिवास प्रमाणपत्र काढण्यासाठी असणाऱ्या जाचक अटींमुळे नागरिकांना सदर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यात जन्म झालेल्या नागरिकांनादेखील अधिवास प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मागील दहा ते पंधरा वर्षांची कागदपत्रे सादर करावी लागत असणे, सदर कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे अनेक विद्यार्थी हक्काच्या शिक्षणापासून वंचित राहत असणे, त्याचप्रमाणे सध्या बारकोड प्रणालीचे अधिवास प्रमाणपत्र आल्यामुळे जुनी अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरली जात नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, राज्यातील नागरिकांना सुलभतेने अधिवास प्रमाणपत्र मिळविण्यासाठी असलेल्या जाचक अटी शिथील करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

३५ ४८७ **श्री.आमश्या पाडवी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— **२८ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"कोकण किनारपट्टी क्षेत्रात अनधिकृत होत असलेल्या मच्छिमारीबाबत विशेषतः रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात पारंपरिक मच्छिमार व पर्ससिन मच्छिमार यांच्यात वाद असणे, उक्त तालुक्यात अनधिकृत पर्ससिन व एल.ई.डी धारक बेकायदेशीररित्या मच्छिमारी करीत असणे, उक्त मच्छिमारांकडून तत्कालीन परवाना अधिकारी यांनी अधिकाराचा गैरवापर करून मच्छिमारांकडून पैसे उकळणे, याबाबत स्थानिक मच्छिमार संघटना व नागरिकांनी तक्रार करूनही त्याकडे करण्यात आलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, त्यामुळे परवानाधारक पारंपरिक मच्छिमार व पर्ससिन मच्छिमार यांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून परवाना अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

३६ ६० **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— **२८ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"मौजे पुसेगाव / नेर (ता.खटाव, जि.सातारा) येथील औद्योगिक वसाहतीसाठी शासनाने सन १९९२-९३ मध्ये तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केलेल्या असणे, जमीन संपादीत करताना संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता किंवा त्यांची परवानगी न घेता शासनाने जमिनी संपादीत केल्या असून जमिनी संपादीत केल्यानंतर शेतकऱ्यांना त्याची कल्पना देऊन शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर एम.आय.डी.सी. चे शिक्के

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
३७	२८८	मारण्यात येणे, सध्या या क्षेत्रावर बागायती पिके ऊस, कांदा, बटाटा इत्यादी शेतकरी घेत असणे, शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर एम.आय.डी.सी. चे शिक्के असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा व्यवहार करता येत नसणे, त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी त्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील एम.आय.डी.सी. चे शिक्के काढून टाकण्याबाबत सन २०१८ पासून सातत्याने शासनाकडे पत्रव्यवहार करूनसुद्धा ते शिक्के काढण्यात न आल्यामुळे सर्व शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, हे शिक्के शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरुन काढण्याबाबत शेतकऱ्यांनी दिनांक १४ एप्रिल, २०२३ रोजी पुन्हा लेखी पत्राद्वारे शासनाकडे केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.'' **सर्वश्री सुनिल शिंदे, विलास पोतनीस, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—— "दर्जाच्या निकषांवरून असंख्य प्रकारच्या वादात अडकलेल्या जॉन्सन ॲण्ड जॉन्सन बेबी पावडरच्या मुलुंड येथील उत्पादक कंपनीने अखेर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाला परत केलेला परवाना, बाळाचा जन्म आणि बेबी पावडरचा सुवास यांचे एक घट्ट नाते जॉन्सन बेबी पावडरने पिढ्यान् पिढ्या तयार केले असणे, मात्र, या नात्याला तडा देणाऱ्या अनेक घटना घडल्या असणे, जॉन्सनच्या पुणे व नाशिक येथील कारखान्यांमधील नमुने महाराष्ट्र एफडीएच्या तपासणीत सदोष आढळून येणे, त्यावरूनच सन २०२२ मध्ये एफडीएने त्यांच्यावर उत्पादन व विक्री थांबविण्याची कारवाई केली असणे, अमेरिका,	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

कॅनडा या देशांमध्येही या कंपनीच्या पावडरच्या वापरामुळे सामान्यांना त्रास झाल्याची अनेक प्रकरणे पुढे आली असणे, अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये या कंपनीने नुकसानभरपाई दिलेली असणे, परंतु राज्यात मात्र या पावडरचा वापर केल्याने ज्यांना आरोग्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले, त्यांना या कंपनीने कोणतीही नुकसानभरपाई दिली नसणे, राज्य आणि केंद्र स्तरावर औषध-प्रसाधन नियामक यंत्रणांचा अशा प्रकारच्या कंपन्यांवर कोणताही अंकुश नसल्याचे अधोरेखित होणे, त्याचा त्रास मात्र सर्वसामान्य ग्राहक व रुग्णांना सहन करावा लागणे, यास्तव या कंपनीच्या उत्पादनांमुळे ज्या ग्राहक व रुग्णांना त्रास झाला आहे त्यांना सदरहू कंपनीकडून नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

३८ ३३ **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२८ जुलै, २०२३ चर्चा झाली**

"नागपूर म्हाडा विभागांतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील गोधणी रोड येथे म्हाडाद्वारे विकसित भूखंड MIG-२० / MIG२६/EWS210 यातील २१० भूखंडाकरिता दिनांक २० जुलै, १९९५ रोजी वर्तमानपत्रामधील जाहिरातीनुसार भूखंड आवंटित करण्याकरिता LIG आणि EWS प्रवर्गातील लोकांचे अर्ज मागविण्यात येणे, त्यानुसार सन १९९९-२००० या वर्षामध्ये MIG प्रवर्गात २०, LIG प्रर्वगामध्ये ७६ आणि EWS प्रर्वगामध्ये २१० असे एकूण ३०६ भूखंड नियमाप्रमाणे लोकांना आवंटित करण्यात येणे, यासंबंधी संबंधित लोकांनी म्हाडामध्ये आवंटित केलेल्या भूखंडाऐवजी

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		संपूर्ण रक्कम जमा करण्यात येणे, परंतु गेल्या २७ वर्षापासून म्हाडाच्या या भूखंडावरील आवंटित केलेल्या भूखंडाचा प्रत्यक्षात ताबा वरील ३०६ लोकांना देण्यात आला नसणे, LIG आणि EWS प्रवर्गातील नागपूर विभागातील अनेक कामगारांनी आपल्या मिळकतीच्या पैशातून आवंटित केलेल्या भूखंडाकरिता नियमानुसार रक्कम जमा केल्यावरही अजूनपर्यंत प्रत्यक्षात त्या भूखंडाचा ताबा मोजणी करून संबंधित लोकांना दिला गेला नसणे, त्यामुळे २७ वर्णांपासून हे लोक आपल्या भूखंडासाठी आणि घरासाठी अजूनही प्रतिक्षा करीत असणे, यासंबंधी संबंधित लोकांनी शेकडो वेळा म्हाडाच्या कार्यालयामध्ये लेखी व तोंडी निवेदन देऊनसुद्धा त्यांना प्रत्येकवेळी उडवाउडवीचे उत्तरे देण्यात येणे, या ३०६ लोकांपैकी ६ लोक मृत्यू पावले असून त्यांच्या वारसदारांना सुद्धा भूखंड मिळाले नसणे, अनेकदा म्हाडाच्या कार्यालयातून संबंधित लोकांना या जागेवर रेल्वेचे आरक्षण असल्याचे सांगण्यात आले असणे, कधी नागपूर सुधार प्रन्यासच्या वतीने संबंधित लेआऊट मंजूर झाले नाही तर कधी या सर्व जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे त्याचे प्रत्यक्षात SLR कार्यालयामार्फत मोजणी होऊ शकली नसणे, या वेगवेगळ्या कारणास्तव हे भूखंड देण्यासाठी म्हाडा असमर्थ ठरली असणे, परंतु प्रत्यक्षात म्हाडाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार ही प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी आणि लोकांकडून संबंधित भूखंडाचे नियमाप्रमाणे पैसे वसूल करण्यापूर्वी संबंधित लेआऊट अभिन्यास मंजूर करून घेणे गरजेचे असून त्या जागेवर कुठल्या प्रकारचे शासकीय आरक्षण आहे किंवा कसे याची खात्री करायला पाहिजे होती, तसेच लोकांकडून पैसे स्वीकारल्यानंतर आणि कागदोपत्री भूखंड आवंटित केल्यानंतर ३	

महिन्याच्या आत SLR कडून संपूर्ण अभिन्यासाची रीतसर मोजणी करून भौतिकरित्या भूखंड संबंधित व्यक्तींना हॅन्डओवर आवश्यक असणे, परंतु म्हाडाच्या गलथान कारभारामुळे ३०० पेक्षा जास्त लोकांचे जीवन उध्वस्त झाले असणे, २७ वर्षांपासून अजूनही म्हाडाच्या कार्यालयामध्ये पायऱ्या झिजवून त्यांना न्याय न मिळणे, याबाबतीत शासनाने त्वरित चौकशी करून ज्या अधिकाऱ्यांच्या हातून ही अक्षम्य चूक झाली, त्यांचेवर कायदेशीर करावयाची कारवाई तसेच संबंधित जमिनीचा अतिक्रमणविरहित ताबा घेऊन तात्काळ मोजणी करून आणि त्या अभिन्यासाला संबंधित प्राधिकरणाकडून मंजुरी मिळवून ज्या लोकांनी २७ वर्ष पहिले पैसे भरून आवंटन करून घेतले त्यांना तात्काळ भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी तसेच २७ वर्षांमध्ये प्रत्यक्ष भूखंडाचे आवंटन न केल्यामुळे जितके पैसे लोकांनी म्हाडामध्ये जमा केले त्यावर १८ टक्के व्याज त्या सर्व लोकांना भरपाईच्या स्वरूपामध्ये देण्याचे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

३९ ५३३ **श्री. महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२८ जुलै, २०२३** **चर्चा झाली**

"महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांना ३६५ दिवस नियमित करण्याबाबत पावसाळी अधिवेशनात तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, नागपूर येथे दिनांक २८ जानेवारी २०१९ ला महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांनी ३६५ दिवसांचे केलेले आंदोलन, मागील १५ वर्षांपासून होमगार्ड सैनिकांनी नियमित रोजगार मिळावा म्हणून सातत्याने शासनाकडे केलेले निवेदन, तत्कालिन मुख्यमंत्री महोदयांनी आंदोलनाचा पवित्रा गांभीर्याने घेऊन दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी पोलीस रेगुलर कॉलाऊट या नावाने शासन निर्णय काढून

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		होमगार्डस्ना कमीत कमी १८० दिवसाचे नियमित काम दिनांक १३ ऑगस्ट,२०१९ पासून सुरू करणे, परंतु ६ महिन्यांनंतर होमगार्ड सैनिकांकरिता फंड उपलब्ध नसल्याचे कारण सांगून दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी होमगार्डचे १८० दिवसांचे बंदोबस्ताचे काम बंद करण्यात येणे, होमगार्ड सैनिकांना फक्त खोटे आमिष आश्वासन देऊन होमगार्ड सैनिकांच्या संविधानिक न्यायिक मागण्यांना दाखविण्यात येत असलेली केराची टोपली, महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांनी आपल्या न्याय १७ मागण्यांसंदर्भात शासनाकडे केलेले निवेदन, बॉम्बे होमगार्ड ॲक्ट, १९४७ ची सुधारणा अथवा बदल करणे, दिनांक १७ जानेवारी, १९८४ च्या आदेशाची अंमलबजावणी करुन होमगार्डना ३६५ दिवस नियमित करणे, दर ३ वर्षांनी होणाऱ्या पुनर्नोंदणी पुनर्नियुक्ती प्रणाली अथवा पद्धत कायमस्वरूपी बंद करणे, साप्ताहिक परेडचा भत्ता, कर्तव्य भत्त्याचा दर समप्रमाणानुसार देयक असावा, होमगार्ड सैनिकांना कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, होमगार्ड सैनिकांच्या तसेच होमगार्ड विभागाचा दर्जा व वर्ग ठरविण्यात यावे, होमगार्ड पाल्यांना प्रशासकीय सेवाभरतीमध्ये अनुकंपा तत्व प्रणालीने स्थान मिळावे या व अन्य मागण्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी होमगार्ड सैनिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांच्या प्रमुख १७ मागण्यांसंदर्भात शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."		
४०	४५७	**सर्वश्री जयंत आसगावकर,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर	**२८ जुलै, २०२३**	**चर्चा झाली**

अडबाले, धीरज लिंगाडे, किरण सरनाईक, विक्रम काळे, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—

"महाराष्ट्रात सन २००१ पूर्वी स्थापना झालेल्या ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मंजूर करावे या प्रमुख मागणीसाठी विनाअनुदानित, शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी असोसिएशन, कल्याण, जि.ठाणे, यांचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ पासून मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरू असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, राज्यातील सन २००१ पूर्वी स्थापना झालेल्या एकूण ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना शासनातर्फे १०० टक्के अनुदान मिळावे याकरिता हे आंदोलन सुरू असणे, मागील ४७ वर्षांपासून राज्यात एकाही शिक्षणशास्त्र महाविद्यालयाला अनुदान दिले गेले नसणे, अनुदानाची वाट पाहून एक पिढी सेवानिवृत्त होऊनही जाणे, सन २०१४ मध्ये शिक्षण विभागाने सकारात्मक शिफारससुद्धा केली असणे, परंतु दुष्काळी परिस्थितीचे कारण दाखवून विभागाने प्रस्ताव नाकारणे, अशाप्रकारे वारंवार सकारात्मक बैठका घेऊन कर्मचाऱ्यांना प्रलोभने दाखवणे, शिक्षकांना अनुदानाअभावी आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागणे, मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांच्या मागण्यांबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोषाची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
४१	४६६	**श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, ज्ञानेश्वर म्हात्रे, महादेव जानकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— "देशात दर दहा हजार व्यक्ती मागे एक हेमोफिलिया ए चा रुग्ण असून दर चाळीस हजार व्यक्ती मागे बी चा रुग्ण आणि दर दोन लाख व्यक्तींमागे सी या प्रकारचा रुग्ण आढळत असणे, सदर रुग्ण तपासण्याची सोय भारतामध्ये अतिशय कमी ठिकाणी असून तपासणी करण्याच्या प्रयोगशाळा कमीच असणे, त्यामुळे अनेक वेळा आजाराचे नेमके निदान होऊ शकत नसल्याने हेमोफिलिया याविषयी जागृती आणि उपचार केंद्र वाढवण्याची गरज असणे, हेमोफिलियाची भारतासाठी एक नोंदणी असून त्यामध्ये प्रत्येक रुग्णांची नोंद केली जात असून नव्या नोंदीनुसार भारताची लोकसंख्या १४२ कोटी असतानाही हेमोफिलियाचे प्रमाण १०,००० मागे एक याप्रमाणे एक लाख ४२ हजार रुग्ण असायला हवेत मात्र केवळ २० हजार रुग्ण नोंदवले जात असणे, याचा अर्थ इतरांचे अजून निदान झालेले नसल्याने तसेच बी चे प्रमाण लोक लोकसंख्येनुसार किमान ३५००० अपेक्षित असणे, राज्य शासनाच्या वतीने हिमोफिलिया आजाराविषयी जागृती आणि उपचार केंद्र सुरू करण्याकरिता शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयात, उपजिल्हा रुग्णालयात डे केअर सेंटर सुरू करण्याकरता प्रशासनाकडून कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही न करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	**२ ऑगस्ट, २०२३**	**चर्चा झाली**

४२ ५६५ **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप,** डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री राजेश राठोड अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

"राज्यातील गृह विभागाच्या राज्य उत्पादन शुल्काच्या क्रमांक इएसटी-२०२१/प्र.क्र.९३/राउशु-१, दिनांक २५-०५-२०१९ च्या अनुषंगाने गणवेशधारी अधिकारी व कर्मचारी यांच्या बदलीबाबतचे धोरण निश्चित करण्यासाठी आदेश पारीत करण्यात आले असून या आदेशात नमूद केल्याप्रमाणे एका महसूल विभागात ९ वर्षे पूर्ण झालेल्या निरिक्षकांना दुसऱ्या महसूल विभागात बदली करण्यात यावे, असे असताना निरीक्षक पदावरील चार अधिकाऱ्यांच्या संगनमताने सन २०२३ ते सन २०२६ साठी करण्यात येणे, शासनाने जारी केलेल्या पत्रात नऊ वर्षे पूर्ण झालेल्या निरीक्षकांना एका महसूल विभागातून दुसऱ्या महसूल विभागात बदली करण्यात यावी, असे स्पष्ट असताना चारही अधिकाऱ्यांच्या बदल्या नियमबाह्य पद्धतीने करण्यात येऊन याबद्दल बदली प्रक्रियेमध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने फार मोठा करोडो रुपयांचा घोटाळा व भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले असून याप्रकरणी सखोल चौकशी करून नियमबाह्य झालेल्या बदल्या रद्द करण्याबाबत करावयाची कार्यवाही व या प्रकरणातील दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
४३	२५४	**श्री.सुरेश धस, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— "भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका येथे भुयारी गटारीसाठी स्कीम फेस-२ अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत भिवंडी महापालिकेला भुयारी गटारी योजनेचे योग्य प्रकारे व नियोजनबद्ध भिवंडी शहरातील मल:निसारणाचे काम करता यावे म्हणून सल्लागार व शासनाकडून देखरेख म्हणून ५ संस्थेची नेमणूक केलेली असणे, भुयारी गटारी योजना निविदा ४६२ कोटी रुपयांची असून त्यापैकी ६ एचटीपी व १० पंपींग स्टेशन व नादुरूस्त केलेली रस्ते बांधण्याची निविदा झालेली असणे, ते बांधण्यापूर्वी ४ संस्थांनी व महानगरपालिकेने ३३७ कोटी रुपये ठेकेदारास ईगल कन्स्ट्रक्शन यास गैरव्यवहारातून गैरलाभ मिळून अदा केलेले असणे, भुयारी गटार योजना ही सरकारी योजना न राबवता भिवंडीच्या जनतेसाठी फसवी योजना राबवण्यात येऊन सदर निविदेमध्ये ५० कोटी रुपये परस्पर गैरव्यवहारातून गैरलाभ मिळवून देण्यात आलेला असणे, याच्या सखोल चौकशीसाठी कमिटी नेमून संबंधितांवर कारवाई करणे गरजेचे असून या भुयारी गटार फसव्या योजनेमध्ये अनियमितता व अगुणवत्ता आढळून आल्याने ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्ते नादुरूस्त होऊन २००० लोकांचे अपघात झालेले असणे, त्यामध्ये अनेक लोक मृत्यूमुखीही पडलेले असणे, यास सर्वस्वी जबाबदार ठेकेदार व महानगरपालिकेचे अधिकारी असून सदर निविदेमध्ये व निकृष्ट दर्जाच्या कामामध्ये मोठ्याप्रमाणावर घोटाळा झालेला असून याची सखोल चौकशी होण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई	**२ ऑगस्ट, २०२३**	**चर्चा झाली**

यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असून संबंधित संस्थानी केलेले गैरव्यवहार व ठेकेदार यांच्यावरती कठोरात कठोर कारवाई करण्यासाठी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व प्रखर संतापाची भावना यावर शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कार्यवाही."

४४ ५१० **श्री.गोपिचंद पडळकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **२ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

"श्री संत बाळूमामा देवस्थान, आदमापूर (जि.कोल्हापूर) हे देवस्थान महाराष्ट्रातील एक जागृत देवस्थान असणे, संपूर्ण भारतातून तसेच परदेशातून भक्त मंडळी या देवस्थानाच्या दर्शनासाठी येत असणे, तसेच भक्तीभावाने दान दक्षिणा देत असणे, सदरचा न्यास हा कोल्हापूर येथील धर्मादाय उपायुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असणे, या न्यासाच्या संदर्भात धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर यांनी व्यवस्थापन समितीच्या भ्रष्ट आचरणामुळे विश्वस्त पद रिक्त केलेले असणे, सदर देवस्थानची नावलौकिकता पाहता व्यवस्थापन समितीकडून होत असलेले भ्रष्टाचार न सांगण्यासारखे असणे, देश परदेशातून येणाऱ्या भक्तमंडळींची होत असलेली गैरसोय, देवस्थानच्या मालकीच्या मिळकतीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, जंगम व स्थावर मालमत्तेचा होत असलेला गैरवापर रोखण्याची आवश्यकता, कोल्हापूर येथील करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी मंदिर, कोल्हापूर संदर्भात शासनाकडून स्पेशल कायदा The Shree Karveer Niwasini Mahalaxmi (Ambabai) Mandir Kolhapur Act, २०१८ हा कायदा करण्यात येणे, त्यानुसार श्री संत बाळूमामा देवस्थान, आदमापूर, जि.कोल्हापूर

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		या न्यासासदेखील कायदा करण्यात यावा अशी मागणी राज्यातील भक्त मंडळी व लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे उप मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे दिनांक २८ जून, २०२३ रोजी केलेली असणे, या मागणीच्या अनुषंगाने अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे उक्त मागणीच्या अनुषंगाने भाविकांसाठी तातडीने उपाययोजना व कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		
४५	६१५	**श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**३ ऑगस्ट, २०२३**	**चर्चा झाली**
		"सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू असणे, सदर चारा छावण्यांमध्ये दाखल जनावरांची गुरे छावणी व्यवस्थापन यंत्रणेमध्ये नोंदणी करून आठवड्यातून एकदा बारकोडद्वारे स्कॅनिंग केल्यानंतर ऑनलाईन हजेरीद्वारे अनुदान वितरित करण्याबाबत निर्देश देण्यात आले असणे, सदर ऑनलाईन हजेरीप्रमाणे ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशु संख्येचे २२ कोटी ५४ लाख २७ हजार २९९ इतके अनुदान शासनास समर्पित करण्यात आले असणे, सदर समर्पित झालेले अनुदान मिळण्याच्या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दिनांक २८ एप्रिल, २००६ व दिनांक १० जुलै, २०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य		

कार्यकारी समिती गठीत करून सदर समितीने सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे कळविले असणे, त्या अनुषंगाने समितीच्या निर्णयामध्ये असे म्हणण्यात आले आहे की ज्या पशुधनाच्या यंत्रणेमध्ये कधीतरी स्कॅनिंगनुसार उपस्थितीची नोंद झाली असणे, त्याची इतर नोंदीच्या आधारे पडताळणी उपस्थितीची संख्या ग्राह्य धरण्यात यावी व त्यानुसार किती निधी देणे आवश्यक आहे हे प्रमाणित करून सुधारित प्रस्ताव राज्य शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे निर्णय घेण्यात येऊनही अद्याप जिल्हाधिकारी, सोलापूर विभागीय आयुक्त, पुणे यांनी यासंदर्भात कोणताही प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात न येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१ कोटी ४७ लाख १४ हजार ९२२ रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२ कोटी २० लाख ९६ हजार २५१ रूपये इतक्या अनुदानाची रक्कम चारा छावण्यांना देण्याचे प्रलंबित असल्याने, छावणी चालकास शेतकऱ्यांना, सावकारांना बँकेचे पैसे देता येत नसल्यामुळे छावणी चालकांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली असणे, त्यामुळे तहसील कार्यालयासमोर दिनांक २६ जुलै, २०२३ पासून सर्व शेतकरी व चाराछावणी चालक जनावरांसह बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेणे, चारा छावणी चालकांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील अनुदानाची रक्कम राज्य शासनाकडून तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

४६ २६५ **सर्वश्री रामदास आंबटकर,** सचिन अहिर, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री सुनिल शिंदे, विलास पोतनीस, विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)

महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—

"सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेली आकृती रायझींग सिटी, सार्वजनिक बांधकाम विभाग मैदान, मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर (पूर्व), या ठिकाणी शासकीय कर्मचारी वसाहती बांधण्यात आलेल्या असणे, सदरहू वसाहतीजवळ सुरू असलेल्या Ready-mix concrete Plant मुळे शासकीय वसाहतीमध्ये तसेच वसाहतीमधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरत असणे, धुळीच्या वातावरणामुळे शासकीय वसाहतीमधील रहिवाशांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने आरएमसी प्लांट दुसऱ्या जागेवर स्थलांतर करावयास सांगूनही अद्यापपर्यंत स्थलांतर करण्यात आले नसणे, आरएमसी प्लांटमुळे सतत अवजड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे वर्षभरापूर्वी तयार केलेल्या डांबरी रस्त्यांची दुरावस्था होऊन रस्त्यावर हलकी वाहने चालविणे धोक्याचे झाले असणे, मानखुर्द लिंक रोड या शासकीय वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्याने बाजूला असलेल्या मॅनग्रोव्हजमुळे वसाहत परिसरात सरपटणाऱ्या प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असणे, घाटकोपर रेल्वे स्थानकापासून ४ कि.मी. च्या अंतरासाठी शासकीय वसाहतीपर्यंत बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांना पायपीट करावी लागत असणे, तसेच पावसाळ्यामध्ये आजुबाजुच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरलेले असल्यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी व प्रवाशांना घाणीच्या रस्त्यावरुनच ये-जा करावी लागत असणे, शासकीय वसाहती

सभोवताली असलेल्या झोपडपट्टीमुळे येथे वास्तव्यास असलेले गुंड प्रवृत्तीचे लोक/ गर्दुल्ले यांच्यामुळे वसाहतीमध्ये ये-जा करणाऱ्या रहिवाशी महिला समवेत छेडछाड, लुटमारीच्या घटना असल्यामुळे शासकीय वसाहतीत वास्तव्यास असलेल्या महिला वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, वसाहतीच्या लगत असलेल्या ओपन स्पेस परिसरात रात्रीच्यावेळी अंधारात दारु पिणारे व नशेची द्रव्ये सेवन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांचा वावर होत असणे, शासकीय वसाहतीत वैद्यकीय सुविधा व रुग्णालय नसल्यामुळे वैद्यकीय सुविधेसाठी परिसर सोडून दोन-तीन किलोमीटर बाहेर यावे लागत असणे, शासकीय वसाहतीत इमारत क्र. ४ ते १० असलेल्या लिफ्ट वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे वसाहतीतील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असणे, लिफ्ट नादुरुस्त झाल्याची तक्रार करुनही लिफ्टची दुरुस्ती करण्यात येत नसणे, इमारत क्र.४ मधील एक लिफ्ट मागच्या पावसाळ्यापासून नादुरुस्त असून अद्याप दुरुस्त झालेली नसणे, सदर शासकीय वसाहतीत स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे वसाहतीत मोठ्या प्रामणात उंदीर आणि डासांचा सुळसुळाट वाढला असून रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, शासकीय वसाहतीत मलनिस्सारण व सांडपाण्यासाठी उभारण्यात आलेल्या पाईपमधून लिकेज होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर परिसरात दुर्गंधी पसरणे, त्यामुळे इमारतीच्या भिंतीला पाणी लागत असल्यामुळे वसाहतीतील इमारतीस धोका निर्माण झाला असणे, शासकीय वसाहतीच्या परिसराला संरक्षण भिंत नसल्यामुळे व सुरक्षारक्षकांची अपुरी संख्या असल्यामुळे वसाहतीत चोरी होण्याच्या घटना घडत असणे, त्यामुळे शासकीय वसाहतीला संरक्षण भिंत लवकरात लवकर बांधणे व पुरेशी सुरक्षारक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असणे, शासकीय वसाहतीला लागून असलेल्या नाल्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्यामुळे नाल्याची पुर्णपणे स्वच्छता करुन कायमस्वरुपी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्रमांक १८६ या शासकीय इमारतीमधील रहिवाशांनी इमारतीची डागडुजी, इमारतीमधील रहिवाशांच्या सुरक्षेकरिता सुरक्षारक्षक नसणे, यासंदर्भात रहिवाशांनी वारंवार विनंती अर्ज सादर करुन सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांचे रहिवाशांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असणे, शासनाच्या उदासिनतेमुळे येथील रहिवाशी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, त्यामुळे उपरोक्त शासकीय वसाहतीच्या इमारतीमधील रहिवाशांच्या मागण्यांची पूर्तता करुन इमारतीची देखभाल, दुरुस्ती, निगराणी व स्वच्छता ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		
४७	६४७	**श्री. कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**	
		"शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई विभाग यांच्या कार्यालयातील गलथान आणि गैरकारभारामुळे भ्रष्टाचार बोकाळला असून वारंवार तक्रारी करुनही अनेक प्रकरणांना मान्यता न देणे, शालार्थ आयडी न देणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांना मान्यता न देणे, निवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे व पी. एफ. चे प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे, वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, संचमान्यता दुरुस्ती न होणे, मुख्याध्यापक, उप		

मुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणे, सह्यांचे अधिकार न दिल्याने शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन थकणे, पी. एफ. खात्यातील विना परतावा पैसे काढण्याचे प्रस्ताव महिनों-महिने प्रलंबित ठेवणे, मा. हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पैशाची मागणी करणे, संस्थाचालक, शिक्षक यांना अपमानास्पद वागणूक देणे, सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या शिक्षिका यांच्याकडे पुरस्काराच्या मानांकनासाठी पैशाची मागणी केल्याची लेखी तक्रार संबंधित शिक्षकाने करणे, यामुळे आदर्श शिक्षकांच्या राज्य पुरस्कारांबद्दल विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होणे, वामनराव मुरंजन हायस्कूल, मुलुंड या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पैशाची मागणी करणे, खान शबाना परवीन, उस्मानीया उर्दू हायस्कूल, गोवंडी यांच्याकडे शालार्थ आयडी मिळण्यासाठी पैसे मागण्याची लेखी तक्रार संबंधित शिक्षिकेने करणे, रात्रशाळेतील दुबार शिक्षकांना हजर करून न घेणे, एका शिक्षकाकडून पैसे गोळा करण्यासाठी संबंधित शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना फोन करणे, या कथित शिक्षकाच्या फोनचा CDR रिपोर्ट काढून तपासण्याची आवश्यकता असणे, या प्रकरणी शिक्षण उपसंचालक, मुंबई व राज्य शिक्षण आयुक्त यांच्याकडे वारंवार तक्रारी होऊनही अद्याप कारवाई न होणे, खुद्द मा. हायकोर्टाने कडक ताशेरे दिलेले व चॅरिटी कमिशनरने डीरेकगनाईज्ड केलेल्यांमार्फत संस्थाना ब्लॅकमेल करणे, शिक्षकांना खर्चात टाकणे असे प्रकार विभागाच्या संगनमताने वारंवार घडणे, शिक्षण निरीक्षक, उत्तर मुंबई या कार्यालयातील संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांना

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तात्काळ पदावरून हटवण्याची आवश्यकता असणे, या गंभीर प्रकरणी शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."		
४८.	६६५	**सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, जयंत आसगावकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**	
		"कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहराचा विकास आराखडा ३५ वर्षापूर्वी तयार झाला असून सध्या कागल शहराचा नविन विकास आराखडा दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी प्रसिद्ध होणे, त्यामध्ये अनेक गोरगरिब शेतकऱ्यांच्या शेतीवर चुकीच्या पद्धतीने आरक्षण पडलेले असणे. विकास आराखडा विरोधी कृती समितीने लाक्षणिक उपोषण केल्याने शासनाने डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग पुणे मार्फत ४ सदस्यीय कमिटी नेमणे, या कमिटीने दिनांक २३ ते २५ मे, २०२३ रोजी शेतकऱ्यांच्या हरकतीवर सुनावणी घेणे, तपासणी करुन नगरपालिकेस अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले व या कमिटीने अहवाल नगरपालिकेस दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी सादर करणे, सदर अहवाल व विकास आराखडा नगरपरिषदेमध्ये बॉडी नसल्याने २० जुलैच्या दरम्यान हा विकास आराखडा शासनास सादर करणे ज्यावेळी दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दैनिकांमध्ये कागल शहराच्या प्रारूप विकास योजनेमधील फेरबदल/बदलांच्या सुचीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिद्धीकरण होणे, यामध्ये प्रशासकाने मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन काही महत्वाची आरक्षणे वगळली व काही अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतावर		

आरक्षण टाकणे, काही औद्योगिक कंपन्यांच्या आर्थिक देवाणघेवाणीतून कागलच्या पिण्याचे पाणी असलेल्या जयसिंगराव तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये औद्योगिक झोन तयार करण्यात येणे, या कमिटीकडून आरक्षण उठविण्याकरिता मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढालीची चर्चा शेतकऱ्यांमध्ये व मोठ्या बिल्डरांमध्ये सुरू असणे, अशा चुकीच्या पद्धतीने आर्थिक व्यवहारातून जमिनीची आरक्षणे काढणे व टाकणे, तसेच गडहिंग्लज नगरपरिषदेचा देखील सध्या याच कमिटीकडून विकास आराखडा तयार करण्याचे काम चालू असणे, त्यामुळे तिथे देखील चुकीचा विकास आराखडा तयार होण्याचा संभव असणे, त्यामुळे या कमिटीचे व तत्कालीन कागलचे प्रशासक तथा मुख्याधिकारी यांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करून कागल व गडहिंग्लज नगरपरिषदेचा विकास आराखडा रद्द करावा व नव्याने फेरसर्वेक्षण करावे अशी स्थानिक नागरिकांमधून आग्रहाची मागणी होत असणे, परंतु या मागणीकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

४९ ३९२ **श्री.विक्रम काळे,** श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

"राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय निवासी २८८ आश्रमशाळांना राज्य शासनाने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरू असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, अशी सातत्याने मागणी

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		होत असणे, मराठवाड्याच्या शिक्षक लोकप्रतिनिधिंनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधलेले असणे, तत्कालीन मंत्री महोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करुन अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करुन अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणीनूसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीनुसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.''		२७०
५०	३१२	**सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**	
		"म्हाडा प्राधिकरण मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून जवळपास ५० वर्षापूर्वी पाडण्यात आलेली मौलाना आझाद रोड, भंडार वाडा, क्रॉस लेन, गिरगाव येथील इमारत आता खाजगी कंत्राटदार नेमून म्हाडाने नव्याने बांधली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, मात्र सायन येथील प्रतिक्षा नगरातील संक्रमण शिबिरात गेली ५० वर्ष या प्रकल्पातील राहणाऱ्या रहिवाश्यांना अद्याप हक्काचे घर मिळाले नसून याउलट नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या डागडुजीसाठी आता नव्याने ३० लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याची माहिती उघडकीस		

येणे, इमारतीमधील रहिवासी वर्गाने म्हाडाकडे आपली मूळ कागदपत्रे जमा केली असणे, मात्र कित्येक वर्ष उलटूनही येथील रहिवाश्यांना आजही संक्रमण शिबिरात राहावे लागत असणे, याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने रहिवाश्यांच्या मनात शासनाविषयी संताप पसरला असल्याने अशा प्रकारे म्हाडाच्या इमारतींच्या होणाऱ्या निकृष्ट कामाबाबत शासनाने सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, सदरहू इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांना तातडीने त्यांची घरे मिळण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

५१ २२२ **श्री.रामराव पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

"नांदेड महानगरपालिकेने शासनाच्या मान्यतेशिवाय महात्मा फुले व्यापारी संकुल व शिवाजीनगर जनता मार्केटची तीन संकुले पीपीपी आणि बीओटी तत्त्वावर शासनाची पूर्वमान्यता न घेता एकाच विकासकाला देण्यात येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या मूळ निविदेतील प्रिमियम ३५ कोटी असणे, परंतु फेरनिविदेत खाजगी सल्लागाराने फिरविलेल्या सल्ल्यानुसार केवळ १५ कोटी प्रिमियम निश्चित करण्यात येणे, सदर व्यापारी संकुलाच्या निविदा भरणाऱ्या सन्मान बिल्डकॉन या विकासकाने केवळ १० लाख रुपये भागभांडवलाची स्वतःची जय सन्मान प्रा.लि. ही नवीन कंपनी स्थापन करुन महानगरपालिकेकडून सदर कामाचे कार्यारंभ आदेश मिळवून घेणे, मूळ निविदेपेक्षा अधिक जागेवर वाढीव बांधकामासाठी नव्याने निविदा न काढता सदर काम जय सन्मान प्रा.लि. या मूळ निविदा न भरलेल्या विकासकाला जागेचे कोणतेही मूल्य न आकारता देण्यात येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलातील गाळेधारकांचे

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तात्पुरते पुनर्वसन करण्यासाठी लाखो रुपयांचे काम विकासकाला विनानिविदा देण्यात येणे, संकुलातील गाळेधारकांच्या तात्पुरत्या पुनर्वसनाचे काम विकासकाच्या करारात नमूद नसल्याने त्यांचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड महानगरपालिकेवर पडणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या कामाला/कराराला शासनाने स्थगिती दिली असताना देखील काम सुरुच ठेवण्यात येणे, तसेच सदर कामाच्या ठिकाणी एका कामगाराचा कोसळून मृत्यू झाला असणे, त्याबाबत महानगरपालिकेने कोणतीही तक्रार न करणे तसेच विकासकावर गुन्हा नोंदविण्यात न येणे, महात्मा फुले व्यापारी संकुलाच्या जागेची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन न घेता कामास सुरुवात करण्यात येणे, उक्त मार्केटमधील महात्मा फुले मंगल कार्यालयात गोरगरीब कुटुंबातील लग्नसमारंभ कमी शुल्कात/भाड्यामध्ये होत होती, परंतु सदर इमारत विकसित करताना तेथे मंगल कार्यालय वगळून संपूर्ण वाणिज्य वापर करण्यास परवानगी देण्यात येणे, शिवाजीनगर जनता बाजार मार्केटच्या १० हजार चौरस मीटर (१.०७ लाख चौरस फुट) बांधकामाच्या निविदा विकासकाला केवळ एक कोटी रुपयांमध्ये देण्यात आलेली असणे, प्रस्तुत महानगरपालिकेच्या जागेवर अनधिकृतपणे वसलेल्या कुटुंबांना निवासी गाळे (घरे) विकासकामार्फत मोफत बांधून दिली जाणार असणे, नांदेड महानगरपालिकेने महात्मा फुले मंगल कार्यालय व व्यापारी संकुल तसेच शिवाजीनगर जनता मार्केट क्र. १, २ व पाठीमागील बाजूचे बांधकाम व पुनर्विकास करण्याचे काम हाती घेताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९ तसेच कलम ७९ (क) मधील परंतुकात नमूद नियमानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नसणे, तसेच वरील सर्व व्यापारी संकुले		

संबंधित विकासकाला शासनाच्या कोणत्याही कायद्यात अस्तित्वात नसलेल्या ९० वर्षासाठी लिजवर देण्यात येणे, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे तक्रार केल्यानंतरही याप्रकरणी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता सदर कामावरील स्थगिती उठविण्यात येणे, एकीकडे नांदेड महानगरपालिकेने रस्ते, नाल्यांच्या कामातील लोकसहभागाची रक्कम भरण्यासाठी १५० कोटीचे कर्ज घेतले आणि आता ड्रेनेज, रस्ते व पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी ३५० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचे प्रस्तावित केलेले असताना दुसरीकडे विकासकाच्या फायद्यासाठी ३५ कोटीचे प्रिमियम १५ कोटी करुन महानगरपालिकेने स्वतःचे २० कोटीचे नुकसान करुन घेणे, तसेच राज्यातील इतरत्र जागतिक स्तरावर निविदा मागविण्यात येत असून त्यात मोठ्या प्रमाणात स्पर्धा होत असल्याचे दिसून येत असताना मात्र दुसरीकडे नांदेड महानगरपालिकेस विकासक मिळत नसल्याचा देखावा करुन एकाच विकासकाला फेरनिविदा काढून कामे देण्यात येत असल्यामुळे या सर्व प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न होत असणे, त्यामुळे शासनाने या सर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्यासाठी एसआयटी व एसीबी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

५२ ३४९ **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

"ठाणे शहरात नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारण्यात येणार असणे, या मेट्रो मार्गाला ठाणे रेल्वे स्थानक व नियोजित नवे ठाणे रेल्वे स्थानकाबरोबर जोडण्यात येणार असणे, या मार्गाचा अद्याप अंतिम आराखडा निश्चित झालेला असणे, परंतु

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		तत्पूर्वी महामेट्रो कंपनीकडून नौपाडा परिसरात होत असलेल्या १८ इमारतींच्या बांधकामांना हरकत घेण्यात येणे, परिणामी वर्षानुवर्षे अधिकृत इमारतीत राहणाऱ्या व आता धोकादायक स्थितीतील इमारतींचा पुनर्विकास रखडला असणे, सध्या नौपाड्यातून जाणाऱ्या अंतर्गत मेट्रोचा मार्ग रेल्वे यार्डखालून नेल्यास इमारतींच्या पुनर्वसनाला अडथळा येणार नसणे, त्याचबरोबर या प्रकल्पाचे काम वेगाने होणार असणे, या यार्डखालून दोन्ही रेल्वे स्थानकेही सहजपणे जोडता येऊ शकणे, नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्प महामेट्रो कंपनीकडून राबविण्यात येत आहे मात्र, या प्रकल्पाचे काम अजूनही कागदावरच असणे, मुंबई महानगर क्षेत्रात 'एमएमआरडीए' कडून सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असणे, या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील अंतर्गत मेट्रोचे काम पूर्ण होण्यासाठी हा प्रकल्प 'एमएमआरडीए' कडे सोपविण्याची गरज, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया." ५३ ४७४ **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— "मुंबईतील माटुंगा रोड रेल्वे स्थानकाजवळ विश्वेश्वरय्या उड्डाणपुलाशेजारी रेल्वेचा भूखंड असणे, सदर भूखंडावर मागील बऱ्याच काळापासून झोपडपट्टी वसलेली असणे, सदर झोपडपट्टी ही रेल्वेच्या नव्हे तर मुंबई मधील पदपथावर असल्याची खोटी माहिती देऊन तत्कालीन महानगरपालिका सहाय्यक आयुक्त जी / उत्तर विभाग व इतर	**४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**	

अधिकारी यांनी संगनमताने सदर भूखंड गैरमार्गाने विकासकास DCPR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब योजने अंतर्गत विकसित करण्यासाठी दिल्याचे निदर्शनास येणे, सदर गैरप्रकाराबाबत लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त यांचेकडे वारंवार तक्रार केलेली असणे याबाबत अतिरिक्त आयुक्त (शहरे) यांना माहिती प्राप्त झाली असता त्यांच्यामार्फत या कामास दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ मध्ये स्थगिती देण्यात आली असणे, परंतु माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये विकासकाने पालिका प्रशासनाला सोबत घेऊन गैरमार्गाने सदर योजनेचा फायदा घेतल्याचे निदर्शनास येणे, विकासकाने महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन सदर जागी राहत असलेल्या झोपडपट्टी धारकांना नाममात्र रक्कम देऊन त्यांना पुन्हा पदपथावर राहायला भाग पाडले असणे, यामुळे झोपडपट्टी धारकांना त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागत असणे, जेणेकरून मुंबई भकास होण्यास मुंबई महानगरपालिका अधिकारीच जबाबदार असल्याचे निदर्शनास येणे, सदर झोपड्या या महानगरपालिकेचा प्रस्तावित रस्ता अथवा पदपथावर उभारलेल्या नसणे यामुळे या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब प्रमाणे पात्र नसणे, तरीही महानगरपालिकेने गैरमार्गाने सदर योजनेत विकासकाला फायदा मिळवून देण्यासाठी या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब मध्ये समाविष्ट केल्या असणे, सदर बाब म्हणजे प्रचंड मोठा FSI घोटाळा असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात महानगरपालिका प्रशासनाबाबत निर्माण झालेले भीतीचे वातावरण व शासनाचे होत असलेले नुकसान लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
५४	४२३	**श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**४ ऑगस्ट, २०२३**	**चर्चा झाली**

"राज्यातील शेतकरी, उद्योजक, विधवा, परितक्त्या, यथास्थिती पूरबाधित, भुकंपग्रस्त, इ. विविध घटकांना शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अनुदान / सवलत / आरक्षण / आर्थिक मदत / सानुग्रह अनुदान देण्यात येत असणे, शासनाच्या या योजनांच्या माध्यमातून राज्यातील अनेक पात्र लाभार्थ्यांना यामुळे अमुल्य लाभ मिळत असणे, तथापि या घटकांपैकी काही घटक हे आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने राज्य शासनाच्या विविध योजनांमधून मिळणाऱ्या लाभ, मदत घेण्यास इच्छुक नसतानाही बहुतांशी वेळा शासनाची मदत, लाभ हे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होत असणे, परिणामी त्यांना सदरहू लाभ, मदत नाकारण्याकरिता सद्य:स्थितीत शासकीय यंत्रणेमध्ये कोणताच पर्याय उपलब्ध नसल्याने इच्छा असतानाही अशा घटकांना शासनाची मदत, लाभ शासनास परत करण्याचा किंवा शासनाची मदत, लाभ नको असल्याबाबत शासनास कळविण्याचा पर्याय सहज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून Give it up LPG Subsidy हा उपक्रम राबविला असता देशातील लाखो नागरिकांनी / घटकांनी या उपक्रमास भरघोस प्रतिसाद देऊन एलपीजी सबसिडीचा त्याग केलेला असणे, याच धर्तीवर राज्य शासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून मिळणारा लाभ, मदत स्वेच्छेने सोडू इच्छिणाऱ्या घटकांकरिता / नागरिकांकरिता तसा पर्याय राज्य शासनाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, सदरहू बाब अमलात आणल्यास राज्य शासनाच्या अमूल्य अशा विविध संसाधनांची बचत होऊन या संसाधनांचा वापर अन्य लोकोपयोगी कामांसाठी करणे शक्य

असणे, समाजहित, देशहिताची अशी भावना मनात ठेवून आजपर्यंत काही लोकप्रतिनिधींनी, सज्ञान नागरिकांनी त्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांच्या लाभाचा, मदतीचा स्वेच्छेने त्याग केलेला असणे, परंतू ही मोहिम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे दृष्टीकोनातून शासनाच्या विविध योजनांद्वारे मिळणारे लाभ, मदत स्वेच्छेने सोडू इच्छिणाऱ्या सज्ञान नागरिकांना असा पर्याय सहज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

५५ ३६३ **सर्वश्री अमोल मिटकरी,** विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

"जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन पशुसंवर्धन विभागातील विविध योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात हेतुपूरस्सर अनियमितता व आर्थिक घोटाळा केल्याचे आढळून येणे, अनुसुचित जाती / नवबौद्ध उपयोजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ८१ लाभार्थी तसेच जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटप योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनधिकृतरित्या व नियमबाह्यपणे लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्याशिवाय विशेष घटक योजनेअंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी, पशुपालकांना शासन नियमानुसार शासनाने ४५००० इतका दर ठरवून दिलेला असताना, सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये रुपये ४५००० ऐवजी रुपये ६८००० नियमबाह्य पद्धतीने शेळी गट खरेदी करुन लाभार्थ्यांना वाटप केले असल्याचे आढळून येणे, तसेच सदर दोन्ही योजनांतर्गत, सन २०२०-२१ मधील

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		काही लाभार्थ्यांकडून जमा झालेला लाभार्थ्यांचा हिस्सा शासन तिजोरीत जमा न करता, स्वतःजवळ ठेवून लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे खोटे दाखवून शासन निधीचा गैरवापर करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, त्याबाबत लाभार्थ्यांनी व नागरिकांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागवूनही लाभार्थ्यांना, नागरिकांना माहिती देण्यात न येणे, त्यामुळे गोरगरीब व लाभार्थी जनतेमध्ये जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी लाखो रुपयांचा आर्थिक घोटाळा केला असल्याचा संशय निर्माण होणे, परिणामी, लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्येची भावना, याप्रकरणी, शासनाने सविस्तर चौकशी करुन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. अकोला यांचेविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."		
५६	४२०	**श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**	
		"रायगड जिल्हा परिषदेने कामगारांच्या पुढील भविष्यासाठी व त्यांच्या हितासाठी कामगार विमा कायद्यांतर्गत प्रत्येक कंत्राटदाराच्या बीलामधून कामगार विम्याची एक टक्का रक्कम उपकर म्हणून वसूल करण्यात येत असणे, मात्र शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीचे उल्लंघन करुन एका टक्क्याऐवजी दोन टक्के रक्कम वसूल केली जात असणे, ही वसूल करण्यात आलेली ३७ कोटी २५ लाख ६८ हजार १५१ ही रक्कम मागील तीन वर्षे शासनाकडे जमा केलीच नसल्याचे आढळून येणे, या तीन		

वर्षातील ३७ कोटी २५ लाख ६८ हजार १५१ इतकी रक्कम जिल्हापरिषदेकडे पडून असल्याने याचा कोणताही फायदा कामगारांना होत नसल्याचे आढळून येणे, मागील तीन वर्षात फक्त बांधकाम व ग्रामीण पाणीपुरवठा या दोन विभागामध्ये जर सदरील कामगार विम्याची रक्कम या जिल्हापरिषदेने भरलेली नसेल तर गेल्या १० वर्षातील सर्व विभागातील कामगार विम्याची रक्कम भरली नसल्यास ती १०० कोटींवर असण्याची शक्यता असणे, या जिल्हा परिषदेकडे पडून असलेली कोट्यवधीची ही रक्कम राजकीय हितासाठी वापरली जात असल्याचा आरोप होत असणे, या संशयास्पद व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी कामगार वर्गातून होत असतानाही त्यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी येथील कामगार वर्गात पसरलेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना, त्यामुळे गरीब व सर्वसामान्य कामगारांची विम्याची रक्कम त्यांना परत मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

५७ ६५३ **श्री. महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**

" जल जीवन मिशन अंतर्गत योजनांच्या कामांसाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे नुकतेच माहे जुलै,२०२३ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे केलेल्या तक्रारी, सदर तक्रारीच्या अनुषंगाने राज्य स्तरीय चौकशी दिनांक ११ मे, २०२३ च्या पत्रानुसार शासनाच्या संबंधित विभागामार्फत कार्यकारी अभियंता यांच्याविरोधात चौकशी लावण्यात येणे, परंतु सदरहू राज्यस्तरीय

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		समिती रद्द करण्यात येऊन दिनांक ३१ मे, २०२३ रोजी प्रधान सचिव कार्यालयाकडून जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय नवीन चौकशी समिती स्थापन करण्यात येणे, सदर समितीने निविदा प्रक्रियेसंदर्भात शासनास चुकीचा अहवाल सादर करणे, पूर्वीची राज्यस्तरीय समिती रद्द करून नवीन जिल्हास्तरीय चौकशी समिती सुरू करताना सदर प्रकरणातील कागदपत्रांचा करण्यात आलेला फेरफार, सदर प्रकरणाची चौकशी सुरू असताना राज्यस्तरीय चौकशी समिती बंद करण्याबाबत निर्माण होत असलेली संभ्रमाची भावना, यात भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याची दाट शक्यता, त्याकरिता सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, यातील दोषी आढळून आलेले संबंधित विभागाचे भ्रष्ट अधिकारी कार्यकारी अभियंता यांची सखोल चौकशी करून तात्काळ निलंबित करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”		२८०
५८	६७७	**सर्वश्री अंबादास दानवे,** अभिजित वंजारी, सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, विलास पोतनीस, सचिन अहिर, किशोर दराडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, सुनिल शिंदे, कपिल पाटील, राजेश राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, श्री.किरण सरनाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—	**४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली**	
		“समृद्धी महामार्गावरील अपघाताच्या प्रमाणात प्रचंड वाढ झालेली असणे, त्यातच मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम सुरू असताना गर्डर कोसळून झालेल्या अपघातात		

पाच इंजिनियरसह एकूण २०० जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाल्याची बाब निदर्शनास आली असणे, सदरहू काम करणाऱ्या नवयुगा इंजिनियरिंग कंपनीचे स्थानिक कॉन्ट्रॅक्टर आणि गर्डर लाँच करणाऱ्या व्ही.एस.एल. कंपनीच्या कॉन्ट्रॅक्टरच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणामुळे कामगारांचा मृत्यू झालेला असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तात्काळ सदरहू कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून मृत व जखमी कामगारांना मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

५९ ४२४ **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :— **४ ऑगस्ट, २०२३ चर्चा झाली नाही.**

"जळगांव सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता यांचे कार्यकाळात जळगांव जिल्ह्यातील रस्ते व इमारतींच्या निविदांमध्ये झालेला शेकडो कोटींचा गैरव्यवहार, जिल्ह्यातील सा.बा. विभागाच्या मागील दिड वर्षाच्या कालावधीत जवळपास ९५ टक्के निविदा ह्या ५ टक्के वाढीव दराने विशिष्ट कंत्राटदारांना देण्यात येणे, यासाठी अधीक्षक अभियंत्याकडून एका कामासाठी फक्त दोनच विशिष्ट ठेकेदारांना डांबरी हॉट मिक्स प्लॅन्ट पासूनचे अंतराचे प्रमाणपत्र देणेबाबत संबंधित उप अभियंत्यावर दबाव आणणे, पर्यायाने जिल्ह्यातील सर्वच निविदांमध्ये स्पर्धा न होता दोनच निविदा येणे, सदर निविदा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा वाढीव ५ टक्के दराने येऊन स्विकारल्या जाणे, परिणामी शासनाचे कोट्यवधींचे झालेले नुकसान, सदर अधीक्षक अभियंत्यास

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नियमबाह्यपणे मागील वर्षी नाशिक येथे असताना जळगांवचा मिळालेला अतिरिक्त पदभार, महिला अधीक्षक अभियंता अर्जित रजेवरुन परत येऊनही पदभार न देणे, जळगांव जिल्ह्यातत यांना १२ ते १४ वर्षाचा कालावधी होणे, सन २०१७-१८ मध्ये अधीक्षक अभियंता असतांना जामनेर येथील निविदा सूचना क्र-२१ मध्ये पात्रतेच्या निकषावर अपात्र ठरवत त्याच मक्तेदारांना वाढीव दराने टेंडर नोटीस क्र. २७ नुसार तीच कामे देण्यात येणे, याबाबत झालेली तक्रार या भ्रष्टाचाराबाबत दक्षता व गुण नियंत्रक मंडळ, नाशिक यांचेकडून चौकशी होणे, मात्र अद्यापही अहवाल प्राप्त न झाल्याने कारवाई करण्यास होणारी दिरंगाई, कृष्णा इंटरप्रायझेस, धुळे यांची भडगांव येथील निविदा क्र. ४२, २०२२-२३ काम क्र. ५ पात्र व कमी दराची असतांनाही अपात्र ठरविणे, जास्त दराची निविदा स्विकारणे, मक्तेदारांची बीड कॅपॅसीटी संपुनही विशिष्ट मक्तेदारांना मर्यादेपेक्षा जास्त निविदा देणे, डांबरी हॉट मिक्स प्लॅन्ट पासून जास्त अंतर असतांनाही निविदा मंजूर करणे, जळगांव जिल्ह्यात शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याप्रकरणी विशेष चौकशी पथक गठीत करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”		
६०	४०९	**श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व **सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :– “ राज्यातील १३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाचे काम करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, नागपूर ते गोवा हा रस्ता शक्तिपीठ महामार्गाने	**४ ऑगस्ट, २०२३**	**चर्चा झाली नाही.**

जोडला जाणार असणे, विदर्भ, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र ते गोवा अशा जाणाऱ्या रस्त्यामुळे १३ जिल्ह्यातील अनेक गावांना त्याचा दळणवळणासाठी फायदा होणे, राज्य रस्ता विकास महामंडळाने प्रस्तावित केलेला हा मार्ग अद्याप पर्यंत कार्यान्वित न होणे, सदरील रस्ता कोणत्या जिल्ह्यातून, कोणत्या विभागातून, कोणत्या गावांना जोडणार आहे याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही गोष्ट शासनाच्या वतीने स्पष्ट न होणे, तसेच यासाठी आवश्यक असणारे भूसंपादन निधी याबाबत जनता अनभिज्ञ असणे, निधी उपलब्धता, विविध विभागाच्या परवानग्याबाबत माहिती मराठवाड्यातील बांधकाम विभागाकडे माहिती नसणे, शक्तीपीठांना जोडणारा हा रस्ता लवकर कार्यान्वित व्हावा अशी मागणी जनतेतून होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

६१ १०८ **ॲड. निरंजन डावखरे**, श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील वि. प. स. **कित्ता**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी ८०२ पदांसाठी संयुक्त पूर्व परीक्षा गट-ब घेण्यात आली असणे, मात्र, तृतीय पंथीय उमेदवारांसाठी निकष ठरवणारा अहवाल तयार असून तो अद्यापही मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये न गेल्याने नऊ महिन्यांपासून या परीक्षेचा निकाल रखडला असणे, हा विषय मुख्य सचिव यांच्यापर्यंत पोहोचला असणे, मात्र, मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाऊन त्याला मंजुरी कधी मिळणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले असणे, एमपीएससीच्यावतीने संयुक्त पूर्व परीक्षा गट-ब परीक्षा घेण्यात आली असणे, जवळपास ४ लाख २०

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		हजार उमेदवारांनी ही परीक्षा देणे, यामध्ये सहायक कक्ष अधिकारी ४२ पदे, पोलीस उपनिरीक्षक ६०३ पदे, राज्य कर निरीक्षक ७७ पदे, दुय्यम निबंधक/मुद्रांक शुल्क ७८ अशी एकूण ८०२ पदे असणे, या पदांसाठी परीक्षा झाल्यावर तृतीय पंथी उमदेवारांसाठी वेगळे निकष ठरवण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, त्यासाठी समितीने अहवालही तयार करणे, मात्र, हा अहवाल अद्यापही मंत्रिमंडळाच्या बैठकीत आलेला नाही. त्यामुळे निकाल रखडला असणे, त्यामुळे उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.		
६२	११३	**ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील वि. प. स.	**कित्ता**	
		ठाणे महापालिकेच्या ३२ शाळांची धोकादायक छत, इमारतीच्या भिंतीना पडलेली छिद्रे, तुटलेले दरवाजे अन खिडक्या, उखडलेल्या फरशा, धोकादायक संरक्षक भिंत, स्वच्छतागृहातील पडझड अशी स्थिती असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, ठाणे शहरातील नऊ प्रभाग समित्यांमधील ३२ शाळा धोकादायक असून त्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव शिक्षण विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेला असणे, सध्या या शाळांच्या दुरुस्तीचे काम केवळ २० ते २५ टक्केच झाल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले असणे, पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होणे अपेक्षित असताना ते न झाल्याने सध्या धोकादायक इमारतींमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असणे, महापालिकेच्या शाळांमध्ये इतर शाळेप्रमाणे सुविधा आणि अद्ययावत रहाव्यात, यासाठी		

ठाणे महापालिकेच्या वतीने दरवर्षी शाळांवर कोट्यवधी रुपये खर्च केला जाणे, मात्र हा खर्च अद्ययावत यंत्रणेसाठी नसून प्राथमिक सुविधांसाठी केला जाणे, गेल्या तीन वर्षांत करोनाकाळातही ठाणे महापालिकेच्या शाळांच्या दुरुस्तीसाठी १३ कोटी ७४ लाख ७९ हजार ५१३ रुपये खर्च झाल्याची बाब उघडीस आली असणे, विशेष म्हणजे, एकाच शाळेवर सातत्याने खर्चही झाल्याचे अहवालातून स्पष्ट झाले असणे, सदरहू प्रकरणाची चौकशी करून तात्काळ शाळांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

६३ १५८ **श्री. राजहंस सिंह वि. प. स.** **कित्ता**

मुंबई शहरांची लोकसंख्या १ करोड ४० लाख असणे, त्या लोकसंख्येला ३ हजार ८५० एमएलडी पाणी पूर्तता केली जात असणे, सन २०४१ पर्यंत मुंबई शहराची लोकसंख्या १ कोटी ७० लाखापर्यंत जाण्याची शक्यता असणे, त्यावेळी मुंबई शहराला प्रतिदिन ६,५३५ एमएलडी पाण्याची आवश्यकता राहील याचा अंदाज करून त्यानुसार मुंबई शहराची पाणी समस्या सोडवण्याच्या दृष्टीने आतापासून काय कार्यवाही करण्यात आलेली असणे, मुंबई पाणीपुरवठा करणारे तानसा, मोडक सागर, अप्पर वैतरणा मध्य वैतरणा व भातसा डॅम हे १५० कि.मी. दूर अंतरावर असल्यामुळे २० ते २५ टक्के गळती व पाण्याची चोरी या कारणामुळे मुंबई शहराला अपुरा पाणी पुरवठा होत असणे, तसेच मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी आणि पाणी माफीयांचे साटेलोटे असल्याची भावना जनतेमध्ये असणे, या बाबीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने तसेच १ करोड ७० लाख लोकसंख्येला पाणी पुरवठा करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
६४	२४५	**श्री. प्रसाद लाड,** श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. महादेव जानकर **वि. प. स.** मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयात सध्या आरोग्य सुविधांचे वनवा असल्याने रुग्णांना मोफत औषधे बंद सिटीस्कॅन आणि एम.आर.आय.साठी तारखाहून तारखा कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णाकडे होणारे दुर्लक्ष आदी सर्व मुद्द्यांच्या पार्श्वाभूमीवर शिवडीतील केईएम रुग्णालयात आरोग्याच्या सुविधांचा वनवा असल्याची बाब माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारासस निदर्शनास येणे, केईएम रुग्णालया मध्ये येणाऱ्या रुग्णाला सिटीस्कॅन आणि एम.आर.आय. सोनोग्राफी करण्यासाठी दोन महिने किंवा त्यानंतरच्या तारखा मिळत असल्याने रुग्णांना मोठा मनस्ताप होत असणे, हा कालावधी कमी करण्याचा प्रयत्न करावा तसेच काही विभागात शस्त्रक्रियासाठी दोन-दोन महिन्याच्या तारखा दिल्या जात असून ते देखील कालावधी कमी करण्यासाठी रोखणारी प्रशासनाने प्रयत्न करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि स्थानिक नागरिकांकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	**कित्ता**	
६५	२५०	**श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** मुंबईतील रस्ते, फूटपाथ, उद्याने, पूल, समुद्रकिनारे यांचे सौंदर्यीकरण, सुशोभीकरणाची रुपये १,७२९ कोटीची १,१७६ कामे बृहन्मुंबई महापालिकेकडून हाती घेण्यात आलेली असणे, हा संपूर्ण प्रकल्प माहे मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असतानाही त्यापैकी ८४२ कामे पुर्ण करण्यात आलेली असणे, सुशोभीकरणाच्या कामासाठी	**कित्ता**	

पालिका विभागस्तरावर २४ विभागात रुपये ३० कोटी रुपयांचा निधी याप्रमाणे रुपये ७२० कोटी खर्च करण्यास उपलब्ध करुन देण्यात आलेला असणे, सदर निधीमधून आयुक्तांनी सर्व कामे पावसाळ्याआधी पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात येवूनही अद्याप कामे अपूर्ण अवस्थेत असणे, करण्यात आलेल्या कामांच्या दर्जाबाबतही प्रश्न निर्माण झालेले असून अनेक ठिकाणी पदपथाची व रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत असल्याने वाहतुक कोंडी होत असल्यामुळे नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत असणे, सुशोभिकरणासाठी लावण्यात आलेले लाईट हे काही दिवसांमध्ये बंद पडल्याचे निदर्शनास येणे, सुशोभिकरणाच्या कामांसाठी महानगरपालिकेने अन्य विभागांतील निधीही वळविलेला असणे, त्यामुळे अन्य विभागांची कामे देखील प्रलंबित राहिलेली असणे, महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून निधीचा गैरवापर करण्यात येत असल्याने शासनाकडून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या कामांची व कामांच्या दर्जाची चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

६६ २६१ **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे **वि. प. स.** **कित्ता**

" मुंबईत दरवर्षी साथीचे आजार वाढत असून दिनांक १ जुलै ते ८ जुलै, २०२३ या कालावधीत मुंबईत स्वाईन फ्लू, डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया, हिपॅटायटीस इत्यादी साथीच्या आजारात लक्षणीय वाढ झाली असल्याची गंभीर बाब दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, दिनांक १ जुलै ते ८ जुलै या कालावधीत मुंबईत स्वाइन फ्लूचे ३४, चिकनगुनियाचे ५, हिपेटायटीसचे ३४, गॅस्ट्रोचे

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		४७४, डेंग्यूचे ९१, लेप्टोचे २९ आणि मलेरियाचे १५६ रुग्ण आढळून येणे, गत महिनाभरात मुंबईत गॅस्ट्रोचे तब्बल १७४४ , डेंग्यूचे ३५३ आणि मलेरियाचे ६७६ रुग्ण आढळून येणे, मुंबईत साथीच्या आजारांच्या रुग्णात दिवसेंदिवस वाढ होणे, मुंबईत स्वाइन फ्लू देखील पसरत असून स्वाइन फ्लूचे तब्बल ९० रुग्ण महिनाभरात आढळून येणे, पावसाचे पाणी साचून राहत असल्याने दुषित पाणीपुरवठ्यामुळे आणि कीटकांच्या प्रभावामुळे साथरोग पसरत चालले असणे, मुंबईकरांच्या आरोग्यासाठी युद्ध पातळीवर उपाययोजना करण्याची असलेली नितांत आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसलेले भीतीचे वातावरण, यास्तव मुंबईतील साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.		
६७	२८९	**श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, वि. प. स.**	**कित्ता**	
		चेंबूर येथील घाटकोपर – मानखुर्द लिंक मार्गालगत पूर्व उपनगराच्या लगत सुमारे १५० झोपड्या खारफुटी क्षेत्रात उभारण्यात आल्या असल्याची गंभीर बाबब दिनांक १४ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, पूर्व द्रुतगती मार्गावर घाटकोपर जंक्शनला चेंबूरकडे जाताना अवघ्या २०० मीटरवर या झोपड्या उभारण्यात आल्या असणे, यासंदर्भात दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात आलेल्या पाहणीत या परिसरात १०० ते १५० अनधिकृत झोपड्या उभारण्यात आल्याचे आढळून येणे, यापूर्वी माहे फेब्रुवारी, २०२० आणि फेब्रुवारी, २०२१ मध्ये या परिसरातील अनधिकृत झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असणे,		

या परिसरातील अतिक्रमण काढून टाकल्यानंतर या ठिकाणी मोठे चरही खणण्यात आले असणे, तरीदेखील या चरांत राडारोडा आणि मातीचे भराव टाकून अनधिकृत झोपड्या पुन:श्च उभारण्यात आल्या असणे, या खारफुटी परिसरात भरतीचे पाणी वर्षानुवर्षे अडविण्यात येवून त्यावर भराव घालण्यात येत असल्याने खारफुटीच्या झाडांना निर्माण झालेला धोका आणि पर्यावरणाची होत असलेली हानी, या सर्व प्रकाराकडे शासकीय यंत्रणांचे होत असलेले सोयीस्कर दुर्लक्ष, त्यामुळे मुंबईकर जनतेत पसरलेली नाराजीची भावना, यास्तव चेंबूर येथील घाटकोपर-मानखुर्द लिंक मार्गालगत खारफुटीचा नाश करून उभारण्यात येत असलेल्या अनधिकृत झोपड्यांना आळा घालण्यासाठी कायमस्वरूपी ठोस उपाययोजना हाती घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.

६८ ३२५ **ॲड. अनिल परब, वि. प. स.** **कित्ता**

मुंबईमधील अंधेरीस्थित सेव्हेन हिल्स रुग्णालय लवकरच बंद होण्याच्या मार्गावर असणे, त्यामुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या भवितव्याविषयी गंभीर परिस्थिती निर्माण होणे, सदर रुग्णालय सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर बांधलेले असणे, सदर भागीदारीत रुग्णालयाची जमीन महापालिकेच्या मालकीची असणे तर इमारत रुग्णालयाच्या मालकीची असणे, परंतु सद्यस्थितीत २०१८ पासून रुग्णालय दिवाळखोरीत निघालेले असणे, दिवाळखोरीमुळे आजतागायत २२ अर्जदारांनी सदर रुग्णालय अधिग्रहीत करण्यासाठी स्वारस्य दाखविलेले असतानादेखील सर्वोच्च न्यायालयाच्या १५ डिसेंबर २०१९ च्या आदेशानुसार सदर रुग्णालय अधिग्रहीत

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		करण्यासाठी मुंबई महापालिकेची परवानगी आवश्यक आहे असे आदेश दिलेले असणे, परंतु महापालिका प्रशासन याबाबत कोणतीही संमती देत नसणे, तसेच सदर रुग्णालय महापालिका स्वतः देखील खरेदी करीत नसणे, रुग्णालय कर्मचाऱ्यांनी कोविड काळात अत्यंत समर्पित भावनेने कर्तव्य बाजविलेले असतानादेखील सद्यःस्थितीत रुग्णालय प्रशासनाच्या बिकट परिस्थितीमुळे मागील १० वर्षांपासून नोकरी करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना मागील ५ वर्षांपासून कोणतीही पगारवाढ न मिळणे, त्यामुळे स्थानिक नागरिकदेखील आरोग्य सुविधेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण होणे, सदर विषय लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी शासनाने केलेली वा करावयची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.		
६९	३३४	**श्री. जयंत पाटील वि. प. स.**	**कित्ता**	
		मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सदनिका हस्तांतरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून ठाणे ते दिवा पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिका विस्तारीकरणामध्ये मोफत सदनिका मिळविण्यासाठी काही बनावट झोपडीधारकांनी खोटे दस्तऐवज बनवून शासनाची दिशाभूल करत फसवणूक करण्यात येत असणे, सन २०१५ एमएमआरडीएने ठाणे ते दिवा पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिका विस्तारीकरणामध्ये आवश्यक जागा ताब्यात घेत ती संबंधित प्रशासनाकडे हस्तांतरीत केली असणे व निष्कासन कारवाई होण्याआधी आणि कारवाई नंतर संबंधित प्रशासनाकडून झालेल्या जागेचा सर्व्हे अहवाल, पंचनामा, झोपडपट्टीधारकांच्या नावे क्षेत्रीय तक्रार निवारण समितीकडे अर्ज करून सुनावणी आयोजित करून खोटे दस्तऐवज बनवून		

मोफत सदनिका लाटण्याचा प्रयत्न केला जात असणे, मोफत सदनिका लाटण्यासाठी दलालांपासून झालेली साखळी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत जात असून अशा मोफत सदनिकांसाठी लाखोंची बोली लागत असणे, मात्र प्रकल्पामध्ये बाधित झालेला गरजू माणूस शेवटपर्यंत हक्काच्या घरापासून वंचित राहणे, मात्र प्राधिकरणाकडून याबाबत काहीच कारवाई केली जात नसणे, सदर प्रशासकीय यंत्रणेतील या गैरव्यवहाराबाबत अनेक तक्रारी येऊनही तसेच प्रकल्प बाधितांची आंदोलने होऊनही ज्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित असते त्यांच्यावर कारवाई न होणे, परिणामी संबंधित दोषी अधिकारी तथा दलालांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तसेच मोफत सदनिका वितरित करण्याचे दिलेले आदेश रद्द करावेत अशी मागणी सातत्याने करण्यात आली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

७० ४४९ **डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे**, श्री. प्रसाद लाड **वि. प. स.** **कित्ता**

राज्यात महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषदांमध्ये ठेकेदारांमार्फत असंख्य कुशल-अकुशल कंत्राटी सफाई कामगार आपल्या कौशल्याने दिवस-रात्र, ऊन-पावसात शहरातील कचरा उचलणे, परिसर स्वच्छ करणे, गटारे-नाले साफ करणे, भूमिगत शौचालय नलिका साफ ठेवणे, मेलेली-कुजलेली जनावरे उचलणे, रोगराई पसरू नये याकरिता जीव धोक्यात घालून औषध फवारणी करणे, इत्यादी कामे दिवस-रात्र करीत असणे, आपले शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवणे, दि. २२ जून, २०२३ रोजी कल्याण येथील तिसगांव गावठाण परिसरातील सिकंदर कॉलनीनजीक

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असलेल्या गटाराची सफाई करीत असताना एक कामगार, दि. २४ जून, २०२३ रोजी गोवंडीतील दोन कामगार असे तीन कामगार महानगरपालिका मलनिःस्सारण वाहिनीची साफ-सफाई करीत असताना विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस येणे, विशेषतः चेंबर मध्ये उतरून हाताने मैला साफ करण्याची पद्धत कायद्याने कायमस्वरूपी बंद केलेली असताना सुद्धा या कंत्राटी कामगारांना प्रत्यक्ष चेंबर मध्ये उतरून काम करावे लागणे, त्याचप्रमाणे या कामगारांना कोणतीही सुरक्षा साधने पुरविली गेलेली नसणे, त्यामुळे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व प्रतिबंध पुनर्वसन अधिनियम, २०१३ नुसार कायद्याचे उल्लंघन झालेले असणे, ऋतिक कुरकुटे या कंत्राटी कामगारांचा विद्युत यंत्रणांच्या विजेचा तीव्र धक्क्याने मृत्यू होणे, अशी परिस्थिती संपूर्ण राज्यभर असल्याने या सफाई कामगारांना, इमारत बांधकाम कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा-सुविधांचा लाभ व नुकसान भरपाई त्वरित उपलब्ध होण्यासाठी अनेक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, संबंधित प्रधान सचिव, नगरविकास विभाग, अपर सचिव, गृह विभाग येथील प्रशासनाकडे माहे जून, २०२३ वा त्या दरम्यान पत्रव्यवहार केलेला असणे, असे असूनही अद्याप पर्यंत वरिष्ठ पातळीवर कोणतीही ठोस कृती किंवा सकारात्मक उपाययोजना शासनाकडून न होणे; परिणामी स्थानिक जनता, कामगार वर्ग आणि मृतांचे नातेवाईक यांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चिंता; याबाबतीत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.		

७१ ४८६ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. राजेश राठोड, श्री. अभिजित वंजारी, श्री. जयंत आसगावकर **वि. प. स.** **कित्ता**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी या तालुक्यातील भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रात कचरा उचलण्यासंबंधी बोरीवलीच्या आर.एन. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. यांना ठेका देण्यात आलेला असून सदरचे कामात ठेकेदार हलगर्जीपणा करत असल्याने सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले असणे, ठेकेदारामार्फत उचलण्यात येणारा कचरा नागरीवस्तीमध्ये इदगाह रोड वसती तसेच तीन बत्ती भाजी मार्केट व चाविंद्रा येथील आरक्षित असलेल्या गार्डन या ठिकाणी टाळण्यात येत असणे, सदरचे ठेकेदार हे कचऱ्याचे वजन वाढविण्यासाठी एकत्र दोन गाडीचे वजन करीत असून त्यात कचऱ्यासोबत माती व दगड टाकण्यात येत असून ठेकेदाराचे या भ्रष्टाचारात मनपाने संबंधित विभागाचे अधिकारी यांचे देखील संगनमत असणे, कचरा न उचलता बीले काढण्याचा प्रकार केला जात असून त्यामुळे मनपाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान करण्यात येणे, तसेच यापुर्वीच्या ठेकेदाराने कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने चाविंद्रा येथील डंम्पिंग ग्राऊंडवर ठेकेदारामार्फत काम सुरु केले असून सदर ठेकदार यांच्यासोबत महानगरपालिकेने संपूर्ण वर्षाचा करार केला असताना ६ महिन्यातच कंत्राटदार सोडून गेल्याने त्यास संपूर्ण रक्कम अदा केलेली असल्याने सदरची रक्कम १४ व्या वित्त आयोगाकडून देण्यात आलेली असल्याने यासंबंधी घोटाळा झाल्याचे उघड झालेले असणे, यामध्ये

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याने भिवंडी शहरातील नागरिकांमध्ये आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन रोगराई पसरत असल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्यशासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.		
७२	५०४	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि. प. स.** मुंबईतील एल विभागातील नौवपाडा कुर्ला पश्चिम येथील साधू मेडीकल जवळ हाऊस नंबर -११ सिटी सर्व्हे नं. ५९६ प्लॉट एरिआ ८६२ चौ.मी. ही जागा सार्वजनिक शौचालयासाठी आरक्षित असतानाही या जागेवर तळ + दोन मजली सी.सी व ओ.सी न घेता महापालिकेतील अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृतरित्या बांधकाम करण्यात आल्याबाबत तक्रार करण्यात आली असता झोपडपट्टी दादांनी तक्रार दारांना जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार पोलीस स्टेशन, वर्तक नगर ठाणे शहर केलेली असणे, पोलीसांकडून कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे संबंधित तक्रारदारांनी मा.मुख्यमंत्री यांना दि. ३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन देणे, हिवाळी अधिवेशन २०२२ सभागृहात प्रश्न उपस्थित केला असता चुकीचे उत्तर दिल्याने सदर प्रश्नावर कोणतीही कार्यवाही झाली नसणे, त्यामुळे हे अनधिकृत करण्यात आलेले बांधकाम लवकरात लवकर हटविण्याबाबत तसेच तक्रारदारांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या झोपडीपट्टी दादांवर (गुंडांवर) शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्यामुळे तक्रारदार व स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन संबंधित झोपडपट्टी दादा	**कित्ता**	

(गुंडांवर) यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करुन शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

७३ ५१३ **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि. प. स.** **कित्ता**

मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात स्थानिक औषध पुरवठादारांना हाताशी धरून तब्बल १०० कोटी रुपयांचा औषध खरेदी घोटाळा झाला असल्याची धक्कादायक बाब माहे जून २०२३ च्या अंतिम सप्ताहात वा त्या सुमारास उघडकीस येणे, मुंबई महापालिकेने २६७ वैद्यकीय उत्पादने निर्धारित केली असून, त्यात ६० उत्पादने अंतिम केली असणे, मात्र यातही इंजेक्शन, आयबी, ग्लोव्हज, टॅबलेट, लहान मुलांना देण्यात येणारे सिरप, ओआरएसचा साठा उपलब्ध नसणे, औषधे उपलब्ध नसतानाही पालिकेच्या मध्यवर्ती खरेदी विभागाने नवीन निविदा मागवलेल्या नसणे, त्यामुळे पालिकेची पाच वैद्यकीय महाविद्यालये, २० पेरिफेअल रुग्णालये, ३० मॅटर्निटी होम व १५० 'आपला दवाखान्यातील रुग्णांचे मोठ्या प्रमाणावर हाल होणे, पालिका रुग्णालयांत सुमारे २५ हजार रुग्ण बाह्य ओपीडीत उपचारासाठी येणें, परंतु पालिकेकडे इंजेक्शन, औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असणे, पालिकेकडून निविदा प्रक्रिया राबवली जात नसल्याने स्थानिक विक्रेत्यांकडून औषध खरेदी करण्यात येणे, तीन वर्षांपूर्वी निविदा प्रक्रिया पारदर्शक असणे, परंतु आता स्थानिक औषध पुरवठादारांना हाताशी धरून ही खरेदी होत असल्याने त्यात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा सुरू असणे, या प्रकरणात मध्यवर्ती खरेदी विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असणे, मध्यवर्ती खरेदी विभागातील अधिकारी परदेशी कंपन्यांना प्राधान्य देण्यासाठी देशी

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		औषध पुरवठादारांना त्रास देणे, तसेच निविदा प्रक्रिया उशिरा राबवली जात असल्याने पालिकेला १५० कोटींचा तोटा सहन करावा लागणे, यास्तव सदरहू घोटाळ्याची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.		
७४	५२०	**श्री. सुनिल शिंदे वि. प. स.** मुंबईच्या मध्यवर्ती भागात मोक्याच्या ठिकाणी असलेल्या महालक्ष्मी रेसकोर्सच्या तब्बल २२० एकर जमिनीचा वापर 'रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड' या संस्थेकडून मागील नऊ वर्षांपासून एक दमडीही न देता सुरू असणे, त्यामुळे सरकारी तिजोरीचे होत असलेले प्रचंड नुकसान, ही भव्य जमीन कोणा खासगी संस्थेची नाही, तर ती सरकारी जमीन असणे, सदरहू संस्था नियम आणि अटींचा भंग करून रेसकोर्स मैदानावर विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम राबवित असणे, या संस्थेच्या माध्यमातून या ठिकाणी नियमांचा भंग करून वेगवेगळी लहान हॉटेल्स आणि पब्स सुरू करण्यात आले असणे, त्यासाठी राज्य शासन अथवा गृह विभागाची परवानगी घेण्यात आली नसणे, या ठिकाणी असलेल्या घोड्यांची योग्य प्रकारे निगा राखण्यात न येणे, तसेच या संस्थेने तब्ब्ल ६ कोटींहून अधिक रुपयांचे भाडे थकविले असून ते वसूल करण्यात पालिकेला आलेले अपयश, याकडे महानगरपालिका अधिकाऱ्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या संस्थेला देण्यात आलेल्या मोफत रेसकोर्सवरुन मानवाधिकार आयोगाने ओढलेले ताशेरे, महालक्ष्मी रेसकोर्स नूतनीकरणाचे नवे धोरण आखणार	**कित्ता**	

असल्याचे, या ठिकाणी सुरू असलेल्या नियमबाह्य कारभाराची सखोल चौकशी करण्याची, तसेच कोट्यवधी रुपयांचे थकीत भाडे तातडीने वसूल करण्याची घोषणा मा. नगरविकास मंत्र्यांनी दि. ८ मार्च, २०२३ रोजी विधानपरिषद सभागृहात करून देखील आजतागायत त्यादृष्टीने कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, त्यामुळे मुंबईकर जनतेत शासनाप्रति पसरलेली तीव्र संतापाची आणि नारंजीची भावना, यास्तव 'रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड' या संस्थेकडून संभाव्य भाडेपट्ट्याच्या फरकाची रक्कम व्याजासह वसूल करण्यासह सदरहू संस्थेने मैदानात नियम व अटी भंग करून हॉटेल्स आणि पब्स सुरू केल्याप्रकरणी संस्थेवर आणि महानगरपालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.

७५ ५४९ **श्री. प्रसाद लाड वि. प. स.** **कित्ता**

वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील ६९ गावांचा पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तब्बल रुपये ८५ कोटी खर्च होऊनही अद्याप पाण्याचा प्रश्न सुटलेला नसणे, सदर योजनेतून जलकुंभ तयार करून पाण्याच्या टाक्या, पाईप लाईन टाकण्यात येऊनसुध्दा पाणी पुरवठा न होणे, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील विशेषतः नालासोपारा (पूर्व) येथील गालानगर परिसरात एक दिवसा आड होणारा पाणी पुरवठा पुरेशा प्रमाणात व नियमित होत नसणे, नालासोपारा शहरात दिवसेंदिवस वाढत्या लोकसंख्येमुळे पाणी टंचाईची निर्माण झालेली गंभीर समस्या, पाण्याची टंचाईमुळे तेथील सर्वसामान्य नागरिकांना नाईलाजाने पाणी विकत घेण्याची वेळ येणे,

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		याबाबत तेथील नागरिकांच्या मनात निर्माण झालेली चिडीची व संतापाची भावना, याबाबत शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करून तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.		
७६	४९१	**श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील**, श्री. अभिजित वंजारी, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सुधाकर अडबाले, श्री. धीरज लिंगाडे **वि. प. स.** कोल्हापूर बायोमेडिकल वेस्ट विल्हेवाटीसाठी मे.एस.एस.सर्विसेस कोल्हापूर महानगरपालिका व मे.एस.एस. सर्विसेस इचलकंरजी महानगरपालिका या कंपनीकडे कंत्राट असणे, याशिवाय ही कंपनी स्थानकांनी नगरपालिका अंतर्गत काही तालुक्यात बायोमेडिकल वेस्टच्या विल्हेवाटीचे काम सक्षमपणे करीत असणे, याशिवाय श्री. गोविंद बायोमेडिकल प्रा.लि., कुडाळ (सिंधुदूर्ग) ही कंपनी बायोमेडिकल वेस्टचे विल्हेवाट करण्यासाठी पूर्ण क्षमतेने काम करीत असणे, या तीनही कंपन्या सक्षम, अनुभवी व कुशल कर्मचारी याबाबतीत स्वयंपूर्ण असणे, या कंपन्यांची प्रत्येकी १० हजार बेडची क्षमता कमी असणे, मात्र वास्तवात जैववैद्यकीय कचरा विल्हेवाटीसाठी प्रकल्पात १० हजार बेड उपलब्धता कमी असेल तर नवीन कंपनीस मान्यता देणे नियमबाह्य असणे, याशिवाय नवीन कंपनीस परवानगी देताना ७५ कि.मी.ची मर्यादा असणे, असा नियम असतांना येथे आरोग्यम वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.ला प्लॉन्ट उभारणीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मान्यता देणे, खरेतर या कंपनीकडे पुरेशी क्षमता, अनुभव नसणे, त्यांना परवानगी देताना कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता केली नसताना व निविदा प्रक्रिया न राबविता मान्यता दिलेली असणे, तसेच नवीन इन्सीनरेटरची १५० किलो प्रती तास	**कित्ता**	

क्षमतेच्या उभारणीची मागणी केली असता, २५० किलो प्रती तास क्षमतेचा इन्सीनरेटरची नियमबाह्य उभारणी करण्यास संमती देणे हे चुकीचे असणे, त्यामुळे ही परवानगी देताना आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चा असणे, या प्रकल्पास मान्यता देताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर गदा आणून मान्यता देणे, त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी करुन या कंपनीची मान्यता काढून घ्यावी, अशी येथे मागणी होत असतानाही त्यावर कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

७७ ११९ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.** **कित्ता**

" महाराष्ट्रातील मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने माहे मे, २०२३ मध्ये रद्द केल्यानंतर पुनर्विचार याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळण्यात येणे, राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरु झालेली तीव्र स्वरूपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरू असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरु राहवी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया.		
७८	१८३	**श्री. धीरज लिंगाडे, श्री. अरुण लाड, श्री. सत्यजीत तांबे वि. प. स.** राज्यातील शासकीय नोकरीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेतल्या जात असणे, अशा प्रकारच्या परिक्षा घेण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग खाजगी यंत्रणाकडून परिक्षा घेत असणे, या परीक्षेला अर्ज करण्यासाठी सध्या उमेदवारांकडून सर्वसाधारण ६०० ते १००० रूपये इतके शुल्क ऑनलाईन आकारले जात असणे, विविध विभागांसाठी व वेगवेगळ्या पदांसाठी हे शुल्क स्वतंत्र आकारले जात असल्याने एका विद्यार्थ्यांला साधारण परीक्षा शुल्क म्हणून किमान ५ हजार ते ६ हजार इतके शुल्क भरावे लागत असणे, इतक्या मोठ्या प्रमाणावर परिक्षा शुल्क भरणे सर्वसामान्य, गरीब व होतकरु उमेदवारांना अशक्य नसल्याने अनेक उमेदवारांना परिक्षेपासून वंचीत रहावे लागत असल्याने राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या व विविध विभागांच्या परिक्षांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांमध्ये/ विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून सर्वसामान्यांना परवडेल असे परीक्षा शुल्क आकारण्याबाबत संबंधित विभागांना आदेश देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.	**कित्ता**	

७९	२७९	**श्री. सत्यजीत तांबे वि. प. स.**	**कित्ता**

राज्यातील सरळ सेवा पद भरती प्रक्रियेमध्ये अनेक गैरव्यवहार सुरू असल्याचे सातत्याने निदर्शनास येणे, विविध परीक्षांचे पेपर फोडणाऱ्या वेगवेगळ्या टोळ्या कार्यरत असणे, या गैरप्रकारांमुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांमध्ये नैराश्य भावना निर्माण होणे, तलाठी भरती २०१९, आरोग्य पदभरती २०२१, म्हाडा भरती, पिंपरी चिंचवड पोलीस भरती, मुंबई पोलीस भरती, अशा अनेक नोकर भरतीचे पेपर या टोळ्यांनी फोडलेले असणे, या पदभरतींमध्ये शेकडो जणांवर गुन्हे दाखल असणे, एकाच आरोपीवर एकापेक्षा जास्त गैरप्रकार केल्याचे गुन्हे दाखल असणे, गैरव्यवहारासाठी या टोळ्यांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सूक्ष्म कॅमेरे व मायक्रो ब्लूटूथ चा वापर करण्यात येणे, या पदभरतीसाठी टीसीएस व आयओएन या कंपन्यांचे नियुक्ती केलेली असणे, मात्र या कंपन्यांची प्रत्येक जिल्ह्यात परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्याने खाजगी महाविद्यालय, सायबर - आयटी सेंटर परीक्षा केंद्र म्हणून घेण्यात येणे, त्या ऐवजी या कंपन्यांचेच परीक्षा केंद्रे ठेवण्याची गरज असणे, परीक्षा केंद्रांवर मोबाईल जामर बंधनकारक करणे आवश्यक असणे, उमेदवारांच्या अंग तपासणी साठी विशेष नियमावली तयार करण्याची गरज असणे, बायोमेट्रिक आणि सीसीटीव्ही बंधनकारक करणे आदी मागण्यांबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

८०	३६	**श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. अभिजित वंजारी, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. जयंत आसगावकर,**	**कित्ता**

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सुधाकर अडबाले, श्री. धीरज लिंगाडे, वि. प. स.		
		राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळांना मंजूर करावयाच्या अनुदानासंबंधी रिट याचिका क्र.३०५१/२०१९, दिनांक ६.९.२०२१ अन्वये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर न्यायालयाने आदेश दिनांकापासून सहा महिन्यामध्ये शासनास धोरण निश्चित करणेबाबत निर्देश दिलेले असणे, परंतु आजपावेतो शासनाने कोणताही ठोस निर्णय न घेणे, अनुदानासंबंधीत धोरण निश्चित करण्यासाठी शासन वारंवार निकष बदलत असणे, त्यामुळे संभ्रमावस्थेत असलेल्या शाळा, संस्थांचे अधिकारी व कर्मचारी, याबाबत शासनाने दिव्यांगांच्या विशेष शाळांना मंजूर करावयाच्या अनुदानासंबंधी ठोस निर्णय घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया.		३०२
८१	५७३	**श्री. एकनाथराव खडसे वि. प. स.**	**कित्ता**	
		भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातून निघणा-या राखेच्या विक्रीसाठी सन २०१२ मध्ये निविदा काढण्यात येणे, या निविदे प्रक्रीयेद्वारे पात्र ठरलेल्या ॲडव्हेन्चर प्रोसेसिंग या कंपनीने राखेची उचल न केल्यामुळे त्यांची बँक गरेन्टी जप्त करण्यात येणे, सदर कंपनी कडून र.रु.३७,८३,६४७ एवढी रक्कम दंडापोटी येणे बाकी असताना सदर कंपनीस काळ्या यादीत न टाकता, नव्याने राख विक्रीची परवानगी देण्यात येणे, सदर कंपनीकडून मातोश्री एंटरप्रायजेस या कंपनीस चढत्या भावाने राखेची विक्री करून करारातील अटीचा भंग करणे, २०१८ ह्या वर्षात EOI (अभिव्यक्तीत) पात्र धरण्यात आलेली अजिंक्यतारा एंटरप्राइजेस, मातोश्री एंटरप्राइजेस कम्पनी ह्या कंपन्यांचे GST नंबर GST पोर्टलनुसार फक्त गुड्स ट्रान्सपोर्टट बाबतची नोंदणी आढळून		

फ्लाय ॲशवर आधारित कोणताच व्यवसाय करीत नसणे, २०१८ ह्या वर्षात EOI (अभिव्यक्तीत) पात्र धरण्यात आलेली वंडर सिमेंट, नरडाना, ही कंपनी मातोश्री एंटरप्राइजेस, भुसावळ, ह्या कंपनीला नियमित विकत असणे भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकाऱ्यांकडून कोणतीच तपासणी झालेली नसणे, १०० कि.मी. परीघ मध्ये राख वापरणाऱ्या उद्योगांना विद्युत केंद्राच्या खर्चाने राख पोहचवण्याचे नमूद असतानाही २०% लघु उद्योजक ह्यांना पण चढ्या दराने राख विकणे, डिलाईट फ्लॉक लिमिटेड ही कंपनी जिल्हा उद्योग केंद्रात मध्यम उद्योग म्हणून नोंदणी असतांना संबंधित कंपनीला लघु उद्योग च्या कोट्यातून कमी दराने राख वितरित करणे, ठरावानुसार फक्त २०% कोट्यात राख उचल करणारे व पौण्ड ॲश ह्यांचाच लिलाव होत असणे, ८०% कोट्यात राख उचल करणाऱ्या कंपन्यांचे करारातील क्लौज नंबर ३.७ नुसार करार रद्द होऊन ह्याचे पण लिलाव पद्धतीने राखेचे वाटप होण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

८२ १६ **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे **वि. प. स.** **कित्ता**

मध्यरात्रीही महिला एकट्या दुकट्या बिनधास्त जाऊ शकतात, हा पुण्याचा लौकिक इतिहास जमा झाल्याची शंका येणाऱ्या घटनांची मालिकाच गेल्या काही दिवसांत समोर येणे, कधी काळी शांत, सुसंस्कृत मानल्या जाणाऱ्या पुण्याच्या सदाशिव पेठेत पोलिस चौकीपासून हाकेच्या अंतरावर भरदिवसा महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न २१ वर्षांच्या तरुणाने केला असल्याची धक्कादायक घटना दिनांक २७ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, दिल्लीत अशाच एका

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		घटनेत भीतीमुळे किंवा बघ्याची भूमिका घेतल्याने एका तरुणीचा जीव गेला असणे, पुण्यात मात्र जीव धोक्यात घालून धावून गेलेल्या दोघा तरुणांमुळे या मुलीचा जीव थोडक्यात वाचला असणे, नागरिकांनीच या हल्लेखोर तरुणाला पकडून पोलिस चौकीत नेले असणे, ही घटना पोलिसांचा धाक संपल्याचे ढळढळीत निदर्शक असणे, एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले या दुर्मीळ घटना म्हणून त्यांकडे सोयीस्कररित्या करण्यात येत असलेली डोळेझाक, माहे जून, २०२३ मध्ये पुण्यातीलच राजगडाच्या पायथ्याशी राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या एका तरुणीची एकतर्फी प्रेमातून करण्यात आलेली हत्या, सर्वसामान्यांना दैनंदिन जीवनात तोंड द्यावे लागणाऱ्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यात पोलिसांना आलेले अपयश, त्यामुळे पुण्यातील मुली-महिलांमध्ये पसरलेले दहशतीचे साम्राज्य, यास्तवव विद्येच्या माहेरघरातील मुली-महिलांना सुरक्षित ठेवण्यासाठी उक्त प्रकरणांचा काटेकोर तपास करून गुन्हेगारांना विनाविलंब कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने करावयाची ठोस कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.		
८३	७७	**श्री. गोपिचंद पडळकर वि. प. स.**	**कित्ता**	
		जालना जिल्ह्यासह राज्यात क्रिप्टो करन्सी जीडीसी कॉइनच्या नावाखाली हजारो लोकांची कोट्यवधी रुपयांची खोटे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याचे माहे जून २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, क्रिप्टो करन्सी जीडीसी कॉइन ह्या अभासी चलनात गुंतवणूक केल्यास अधिक परतावा मिळेल असे अमिष दाखवून		

आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी १२२ तक्रारी जालना आर्थिक गुन्हे शाखेकडे आजपर्यंत करण्यात आलेल्या असणे, परंतु अद्याप या सर्व घोटाळ्यातील मुख्य आरोपी इरफान मदुद्दिन सय्यद हा आजही लोकांची आर्थिक फसवणूक करत बिंदासपणे फिरत असून त्याकडे तीन वेगवेगळ्या नावाचे पासपोर्ट असून १४ वेगवेगळ्या देशात राज्यात तो वावरत असणे, या मुख्य सूत्रधारावर एवढे आरोप असताना देखील दिनांक २५ मे, २०२३ रोजी मिरज येथील एक पोलिस अधिकारी राज कथिब यांच्या वाढदिवसामध्ये लाखो रुपयांची बक्षीसे वाटून स्पॉन्सरशिप दिल्याचेही निदर्शनास येणे, सदर पोलीस अधिकारी यांचा ह्या मुख्य सूत्रधारावर वरदहस्त असल्याचे सर्वसामान्य तक्रारदारांचा आरोप असून या पोलीस अधिकाऱ्यांची देखील चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांकडून होत असणे, तसेच मुख्य सूत्रधार यांचे सहकारी आमोद मेहेतर, शर्वरी मेहेतर, रमेश उतेकर यांच्यावर फसवणुकीचे गुन्हे दाखल असून अद्याप यांच्यावर कोणतीही कठोर कार्यवाही करण्यात आलेली नसणे, त्यामुळे उक्त प्रकरणाची गांभीर्यरित्या दखल घेऊन त्याबाबत चौकशी करून ते बाहेर देशात फरार होण्याआधी दोषींना ताब्यात घेऊन त्यांची संपत्तीचा निलाव करून सर्वसामान्यांना पैसे परत करण्याची मागणी गुंतवणूकदारांकडून होत असणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

८४ ३४० **श्री. गोपिचंद पडळकर वि. प. स.** **कित्ता**

" विटा (जि. सांगली) पोलिसांनी खोटा गुन्हा दाखल करून दोन किलो सोने हडप केल्याची घटना माहे एप्रिल, २०२३ रोजी निदर्शनास येणे, दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी विटा पोलीस ठाण्याचे अधिकारी व सुरज मुल्ला यांनी संगनमत करून सागर

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		जगदाळे यांच्यावर बोगस गुन्हा दाखल करून दोन किलो सोने हडप केल्याची तक्रार खुद्द तक्रारदार सागर जगदाळे यांनी केलेली असणे, यासंदर्भातील सर्व पुरावे देखील तक्रारदारांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दिलेले असणे, तसेच दिनांक १२ मे, २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री सांगली व विधान परिषद सदस्यांनी सदर प्रश्न उपस्थित केला असता पोलीस अधीक्षक सांगली यांनी याबाबतचा तपास अंतिम टप्प्यात असल्याचे सांगत आठ दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन देऊनही आजमितीस दोषींवर कारवाई झालेली नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पोलीस खात्याबाबत निर्माण झालेला संभ्रम याबाबत शासनाने तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.		३७६
८५	४१३	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अमोल मिटकरी, वि. प. स.** वाशी, नवी मुंबई सेक्टर-१० ए येथील " सेंट मेरीज मल्टिपर्पज हायस्कूल " या शाळेमध्ये दि. १५ जुलै, २०२३ रोजी इयत्ता ६ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनला शाळेमध्ये मधल्या सुट्टीमध्ये स्वच्छतागृहाचा दरवाजा अतिशय जुना व खराब असल्यामुळे उघडता न येणे, सदर विद्यार्थीनी वर्गात उपस्थित नसल्याचे वर्गशिक्षीकेला उशीरा समजणे, शाळेचे सफाई कर्मचाऱ्यांना स्वच्छतागृह सफाईसाठी गेले असता समजणे, शाळेचे सफाई कर्मचारी स्वच्छतागृह सफाईसाठी गेले असता सुमारे दोन तासानंतर स्वच्छतागृहात मुलीचा मृतदेह निदर्शनास येणे, ही बाब शाळेने विद्यार्थीनीच्या पालकांना न सांगणे, या प्रकरणी वाशी पोलीसांनी केलेल्या चौकशी अहवालात विसंगत व	**कित्ता**	

दिशाभूल करणारी माहिती नमूद करणे, परिणामी विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व संशयाचे वातावरण, या प्रकरणी शासनाने चौकशी करून केलेली वा करावयाची कार्यवाही व संबंधित विद्यार्थीनीच्या पालकांना शासनातर्फे केलेली आर्थिक मदत व सदरचे घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनातर्फे केलेली वा करावयाची उपाययोजना.

८६ ५८५ **श्रीमती उमा खापरे वि. प. स.** **कित्ता**

मिरा-भाइर्दर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत ओमसाई शक्ती को.ऑ.हौसिंग सोसायटी रूम नं. १०, बेवली पार्क, बेयानी चर्च जवळ, मिरारोड (पूर्व) येथे राहणारे रहिवाशी यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी आपल्या राहात्या घरी आत्महत्या करणे, त्यांची पत्नी, तिचा भाऊ व तिचे आईवडील यांनी संगनमताने केलेला खून असल्याचे निदर्शनास येणे, उपरोक्त व्यक्तिनी यांनी आत्महत्या केली असे भासवून पंख्याला लटकवल्याचा प्रकार निदर्शनास येणे, त्यांची पत्नी व तिचे आईवडील व भाऊ हे त्यांना सतत मानसिक त्रास देत असल्याची व त्यांना जिवे मारण्याची धमकी देत होते ही बाब आता उघडकीस आली असणे, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२२ रोजी मृत व्यक्तिच्या आईवडीलांना त्यांच्या पत्नीच्या कुटुंबियांनी मारहाण करणे, त्यात आईच्या हाताला गंभीर दुखापत होणे, याबाबत स्थानिक पोलीस स्थानकात तक्रार करुनही कोणतीही कारवाई न होणे, आत्महत्या केली त्यावेळी शेजारी राहणाऱ्या मुलाने मृत व्यक्तिला खाली उतरवले होते तो मुलगा तीन दिवसानंतर ते ठिकाण सोडून जाणे, सदर व्यक्तीची पत्नी हिचे संशयास्पद वागणे आढळून येणे, या संपूर्ण

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		प्रकरणात काही स्थानिक राजकीय लोकांचा पोलीसांवर असलेला दबाव त्यामुळे पोलीस यंत्रणा आरोपींना पाठीशी घालत असल्याबाबत स्थानिकांमध्ये निर्माण झालेली शंका, हे संपूर्ण प्रकरण गंभीर असून याची सखोल चौकशी करून गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मागणी, दिवंगत व्यक्तिच्या आई-वडीलांनी यांनी मिरा-भाईंदर वसई-वरारच्या पोलीस आयुक्तांकडे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रान्वये केली असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने केलेली व करीत असलेली कारवाई.		
८७	६४५	**ॲड. अनिल परब, श्री. अंबादास दानवे वि. प. स.** महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक विकास महामंडळाच्या मरोळ मुंबई औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ९९ निवासी सदनिकांमध्ये घुसखोरी आणि केलेले अतिक्रमण,घुसखोरांनी सदनिकेचा घेतलेला ताबा, उप अभियंता, मरोळ यानी एम.आय.डी.सी पोलिस ठाणे गु.नं ७५/२०२० अन्वये नोंदविलेला गुन्हा, गुन्ह्याचा तपास करून पाठविण्यात यावा अशी औद्योगिक विकास महामंडळाने दि.११/११/२०२०, दि ४ एप्रिल,१७ मे,२ जून आणि २ सप्टेंबर,२०२१ च्या पत्रावर पोलीस स्टेशनकडे केलेली मागणी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी चौकशी करण्यासाठी पोलीस स्टेशनकडे केलेली वारंवार मागणी , तसेच पॉकेट क्र.५ मधील इमारत क्र १ व २, पॉकेट क्र.३ मधील इमारत क्र.५ यांचे संयुक्त सर्वेक्षण करून अहवाल पाठविण्याबाबत पोलीस स्टेशनला कळवूनही पोलीस स्टेशनने त्याकडे केलेले दुर्लक्ष, यामध्ये विकासक, घुसखोर आणि पोलीस स्टेशन यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात झालेला आर्थिक व्यवहार,	**कित्ता**	

अतिक्रमणाबाबत चौकशी करून अहवाल पाठविण्याबाबत पोलीस स्टेशनमार्फत हेतुपुर्वक व जाणीवपूर्वक करीत असलेली टाळाटाळ, रहिवाशांना हक्कांचे घर जाण्याची निर्माण झालेली भिती, पोलीस स्टेशन चौकशी करीत नसल्यामुळे व कोणतीही कार्यवाही करीत नसल्यामुळे मूळ झोपडीधारकांमध्ये औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी व पोलीसाबद्दल निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

८८ २२१ **श्री. आमश्या पाडवी, ॲड. अनिल परब, श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, श्री. सचिन अहिर, वि. प. स.** **कित्ता**

मौ. टोकरतळे (जि.नंदुरबार) शिवरातील शेत सर्व्हे नं १२८ क्षेत्र १०.९१ आर हा सर्व्हे नंबर हा तापी पाटबंधारे विकास महामंडळचे माजी उपाध्यक्ष यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या खाजगी मालकीचा असणे, सदरचा सर्व्हे नंबर हा शासनाने शिवण माध्यम प्रकल्पासाठी भूसंपादन करून त्याचा मोबदला रु.१२.६२ लक्ष दि. २८/०९/२००१ रोजी संबंधित जमीन मालकास अदा केलेला असणे, तदनंतर सदरची जमीन ही शिवण मध्यम प्रकल्प यांच्या मालकीची झाली असून तशी नोंद ७/१२ वर देखील झालेली असणे, जमीन संपादित केल्याचा मावेजा स्वीकार करून देखील सदर माजी उपाध्यक्ष यांनी जमिनीवरचा ताबा हसतांतरित न करता त्या जागेवर सुमारे २००८-०९ वर्षात प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आल्यानंतर सिंचन प्रकल्पात पाणी साठवणूक झाल्यावर बुडीत क्षेत्रात सर्व्हे नंबर १२८ मध्ये ४३ X ४५ फूट चे पक्के बांधकाम दर्शवून जमिनदोस्त करू नये याकरिता सहदिवाणी न्यायालय स्तर, नंदुरबार यांचे

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०२१ दि. २८/०२/२०११ रोजी निरंतरचा मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात येणे, सदर दाव्याचा निकाल मे. न्यायालयाने दि. ०८/०७/२०१३ रोजी नामंजूर करणे, मे. न्यायालयाने दावा नामंजूर केल्यानंतर उपरोक्त दाव्यातील महाराष्ट्र शासन तर्फे मा. जिल्हाधिकारी, मा. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, मा. अधीक्षक अभियंता, नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे, मा. कार्यकारी अभियंता, धुळे मध्यम प्रकल्प विभाग क्र. ०२, नंदुरबार यांचेवर सदरचे अतिक्रमण काढून जागा संपादित करणेची जबाबदारी असणे, परंतु, उपरोक्त सर्व अधिकारी यांनी आजतोवर सदर जमीन ताब्यात न घेणे, परिणामी उक्त अधिकाऱ्यांकडून मे.न्यायालयाच्या निकालाचा होत असलेला अवमान, फार्म हाऊस चे बांधकाम असल्याने त्याची स्थिती तपासून सदरची जागा ताब्यात घेणे अथवा सदरची वास्तू पाडून जमीनदोस्त करावे किंवा कसे असा अभिप्राय मा. कार्यकारी अभियंता क्र. ०२ यांनी मा. अधीक्षण अभियंता, नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांच्याकडे दि. २३/०२/२०११ रोजी मागितला असणे, म्हणजेच सदर वास्तू ही अतिक्रमित असल्याचे सिद्ध होत असणे, शासनाने याप्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करून सदरचे अतिक्रमण काढून जागा ताब्यात घेण्याची आवश्यकता, तसेच शासनाकडून जमिनीचा मोबदला घेऊन उक्त जागेवर अतिक्रमण करून शासनाची फसवणूक करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.		

८९ २३३ **श्री. अमोल मिटकरी, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** **कित्ता**

राज्यातील अमरावती विभागातील सर्वात मोठ्या सिंचन प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा सिंचन प्रकल्पाला सन १९७६ मध्ये मान्यता मिळालेली असणे, या प्रकल्पासाठी अमरावती व वर्धा या जिल्ह्यातील ६७ गावांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन देवून प्रकल्पासाठी जमिनी संपादित करण्यात आलेल्या असणे, सदर प्रकल्पाला ४५ वर्षा पेक्षा अधिक कालावधी होऊनही अद्याप प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले नसणे, शासनाच्या नियमानुसार पुनर्वसीत गावापासून ७ ते ८ कि.मी. च्या आत जमीन उपलब्ध करून देणे आवश्यक असतानाही अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक ४० ते ५० कि.मी. दूर जमीन देण्यात आल्याने प्रकल्पग्रस्तांनी सदर जमिनी घेण्यास नकार दिलेला असणे, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येऊनही अद्याप ६० टक्के पेक्षा जास्त प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरी देण्यात आलेली नसणे, सन १९८९ च्या तत्कालीन महसूल मंत्री यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, १९८९ च्या अहवालानुसार व समितीच्या २००१-०२ च्या शिफारशींची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात आलेली नसणे, प्रकल्पग्रस्तांमध्ये नोकरीकरीता वयोमर्यादा ओलांडली आहे अशांना तसेच ज्या प्रकल्पग्रस्तांनी प्रमाणपत्राचा उपयोग घेतलेला नाही किंवा जे नोकरी करू इच्छित नाही अशा व्यक्तींना २५ लक्ष रुपये अनुदान देण्याबाबत तसेच १९७६ ला मंजुर झालेला जमिनीचा मोबदला सन १९८४ मध्ये देण्यात येत असल्याने आठ वर्षात जमिनीच्या

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		वाढलेल्या दराप्रमाणे रक्कम व्याजासहीत मिळण्याबाबत अशा विविध मागण्यांबाबत शासनास निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने प्रकल्पग्रस्त समिती अप्पर वर्धा धरणग्रस्त कृति समितीद्वारे माहे मे, २०२३ पासून मोर्शी तहसिल कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलन करण्यात येत असणे, परंतु शासनाकडून अप्पर वर्धा सिंचन प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, त्यामुळे शासनाने अप्पर वर्धा सिंचन प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पुर्ण करण्याबाबत व शासनाच्या निकषानुसार जमीन उपलब्ध करून न देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.		
९०	४०३	**श्री. शशिकांत शिंदे वि. प. स.** सातारा जिल्ह्यातील खटाव-माण तालुक्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी सन ११९७ मध्ये जिहे कठापूर योजना मंजूर होणे, या मंजूर योजनेचा खटाव, माण तालुक्याना पूर्ण लाभ मिळण्याची २५ वर्षांपासून शेतकऱ्यांची मागणी असून लोकप्रतिनिधीनी सुद्धा आपल्या परिसरातील लाभक्षेत्रामध्ये वाढ करावी व नविन लाभांक्षेत्राचा समावेश करावा अशी केलेली मागणी, नेर तलावाच्या वरील बाजूस असलेली गावे यामध्ये समाविष्ट होणेबाबत शासनाने घेतलेला निर्णय, नेर तलावाच्या खालील बाजूस विसापूर, जाखणगाव, नेर, कातळगेवाडी, रनसिंगवाडी, रामोशीवाडी, राजापूर, निढल, दरजाई यामध्ये बंदिस्त पाईपलाईन पाणी देण्याची होत असलेली मागणी त्यासाठी निधी	**कित्ता**	

मंजूर केल्यास त्याठिकाणचा कायमचा दुष्काळ संपविण्याबाबत करावयाची उपाययोजना, धोम धरणात गाळणारे पाणी चारमाही असल्यामुळे या योजनेचा उपयोग न होणे, त्यामुळे ही योजना बारमाही करण्याबाबतची आवश्यकता, तसेच उपलब्ध पाणी साठ्याचा संबंधित अधिकारी यांनी या योजनेचा सर्वे करणे, यामुळे पाणी उपलब्ध नसतांना सर्वे केल्यामुळे लोकांना पाणी मिळेल अशाप्रकारचे शासनाने दिलेले आश्वासन, साधारणत: वाढीव ९ टीएमसी पाणी वाढीव क्षेत्रात लागणार असल्याने हे पाणी उपलब्ध होणार की नाही याबाबत तेथील जनतेत पसरलेले संभ्रमाचे वातावरण, चुकीचे सर्वे करून अधिकाऱ्यांनी लोकांत निर्माण केलेले संभ्रमाचे वातावरण, या संदर्भात चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर करावयाची कारवाई तसेच चुकीच्या पद्धतीने काढलेल्या निविदा त्यामुळे होत असलेला विलंब, याप्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

९१ ४५२ **श्री. रामराव पाटील वि. प. स.** **कित्ता**

नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यात बाभळी उच्चपातळी बंधारा बुडीत क्षेत्रातील प्रलंबित असलेली ३६५ हेक्टर जमीन संपादन करून मावेजा द्या अशी मागणी लाभक्षेत्रातील शेतकरी बंधाऱ्याच्या निर्मितीपासून करीत असल्याचे निदर्शनास येणे, बाभळी बंधारा लोकार्पण होऊन बराच कालावधी होऊन देखील बाभळी बंधाऱ्याच्या जलसाठ्याचा वापर होत नाही तरीही बाभळी बंधाऱ्याच्या बॅक वॉटरमुळे लाभ क्षेत्रातील शेतीचे प्रतिवर्षी अतोनात नुकसान होत असल्याचे निदर्शनास येणे, बॅक वॉटरमुळे जी शेती पाण्याखाली जाते ती शेती अधिग्रहीत करून त्यांना योग्य तो मोबदला देणे

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		गरजेचे असणे, सन २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या गोदावरी व उपनद्यांच्या महापुरामुळे आणि त्या दरम्यान तेलंगणा राज्यातील पोचमपाड धरणाचे दरवाजे लवकर न उघडल्याने नांदेड जिल्ह्यातील शेतपिकांचे अतोनात नुकसान झाले असणे, तसेच धर्माबाद सह चार तालुक्यांतील शेती पाण्याखाली बुडून खरिपाची सर्व पिके व जनावरांचा चारा कुजून नष्ट झाल्याचे निदर्शनास आले असणे, रब्बी पेरणीनंतर अतिवृष्टी झाल्याने हरभरा या प्रमुख पिकाची उगवण योग्य न झाल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असल्याचे निदर्शनास येणे, अशा परिस्थितीत या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पुरग्रस्त म्हणून घोषित करून विशेष निकष लाऊन आर्थिक मदत करण्याची आवश्यकता, या बाबीकडे तेथील लोकप्रतिनिधींनी सातत्याने मागणी करत असूनही शासन यंत्रणेकडून अद्यापही कार्यवाही न झाल्याने तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.		३२४
९२	४८२	**श्री. एकनाथराव खडसे वि. प. स.** तापी पाटबंधारे महामंडळाअंतर्गत वाघुर धरण विभाग जळगांव यांची ई निविदा क्र. ५ सन २०२२-२३ अंदाजपत्रकिय किंमत रु. १९४ कोटी १८ लक्ष ५६ हजार १११ नुसार वाघुर उपसा सिंचन योजना ता. जामनेर, जि. जळगांव अंतर्गत लाभक्षेत्रात विकेंद्रीत जलसाठे निर्मिती करून चक-विमोचक ते विकेंद्रित जलसाठे-शेततळे पाईपलाईनद्वारे जोडणे, व नदीनाल्यावर गाळरोधक बंधारे बांधणे, ही निविदा प्रकाशित होणे, सदर निविदेसाठी विहित कालावधीमध्ये एकूण सहा कंत्राटदारांनी ऑनलाईन सहभाग नोंदवून निविदा भरणे, निविदा प्रसिद्धीनंतर निविदेच्या अटींमध्ये वारंवार हेतुपुरस्कर बदल	**कित्ता**	

करणे, शासनाच्या दिशा निर्देश यांचे पालन न करता स्पर्धात्मक निविदा टाळण्यासाठी विशिष्ट अटींचा समावेश करणे, या निविदेतील पान क्र. १५ अट क्र ब/ब नुसार जलसंपदा विभागाचे पाईपलाईनचे १७ कोटींचे काम केलेले असणे, हे अनिवार्य असे नमूद करून ही जाचक अट फक्त ठराविक कंत्राटदार पात्र ठरावे म्हणून वेळेवर टाकण्यात येणे, विदर्भ पाटबंधारे, कृष्णाखोरे पाटबंधारे महामंडळांतर्गत निविदांमध्ये मात्र समकक्ष कामे केल्याबाबत नमूद असणे, प्राप्त निविदांच्या तांत्रिक पात्रता पडताळणीत काही ठराविक कंत्राटदार पात्र व्हावे, या उद्देशाने टाकलेल्या नियमबाह्य अटी वगळण्याची आवश्यकता, महाविर सिव्हील इंजिनियरींग सर्वीसेस यांनी कोळसा उत्खननाचे खाजगी कामाचे प्रमाणपत्र जोडूनही त्यांची निविदा पात्र ठरविणे, अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा कमी किंमतीच्या निविदा जाणीवपूर्वक फेटाळणे, निविदेतील समतुल्य काम हे फक्त जलसंपदा विभागाचेच असावे, ही अट शिथिल करून स्पर्धात्मक निविदा पद्धती राबवून समकक्ष कामाचा विचार होण्याची आवश्यकता, तोपर्यंत निविदा प्रक्रिया स्थगीत करण्याची आवश्यकता, पारदर्शक पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविल्यास शासनाची १५ ते २५ कोटीची होणारी बचत, निविदा प्रक्रिया पुन्हा झाल्यास त्याचा शासनाच्या तिजोरीवर पडणारा भुर्दंड हा संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

९३ ५८३ **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे वि. प. स.** **कित्ता**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील उल्हास नदीवर पूर नियंत्रण रेषा म्हणजेच रेड लाईन व ब्लू लाईन आखण्यात येणे, त्यामुळे बदलापूर मधील आठ गावांमध्ये पूर

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नियंत्रण रेषा टाकल्यामुळे एकूण ५९८ एकर निवासी क्षेत्र नगरपालिका हद्दीतील बाधित होत असणे त्यामध्ये ६६ एकर जमीन ही रिझर्वेशन खाली असलेलीही बाधित होत असणे, यामुळे बदलापूर मधील स्थानिक शेतकरी व्यावसायिक यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने बदलापूरचा विकास पूर्णपणे ठप्प झालेला असणे सदर पुररेषा हि पाटबंधारे विभाग यांनी पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने टाकलेली असल्याने शहरातील टेकडीच्या भागावर जिथे नाले नाही तिथे तसेच बदलापूर मधील गांधी टेकडी, वालवली, गट क्रमांक १४० लगत सोनवली गावठाण एरंजाड शेतकरी सोसायटी, बदलापूर गाव, चिंतामणी चौक जोवली नाका जोवली एमआयडीसी इत्यादी ठिकाणी निश्चित केलेली पूररेषा ही वस्तुस्थितीप्रमाणे आखण्यात आलेल्या नसणे, पूररेषेत बांधकामास मंजुरी न मिळाल्याने बदलापूरचा विकास ठप्प झालेला असणे त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दिनांक १२.८.२०२२ रोजी शासनास अहवाल सादर केला असून उल्हासनदीच्या पोषीर उपनदीवर पोषिर येथे धरण बांधल्यास उल्हासनदीला पूरच येणार नाही व पुरावर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवता येईल असे मत सादर केलेले असणे, त्यासाठी शासनाने तात्काळ उपायोजना करून बदलापूर शहरातील थांबलेली विकास कामे व उल्हासनदीच्या धोक्याची पुराची पातळी १७.५० मीटर असल्याने या पातळी प्रमाणे पूररेषा आखण्यात याव्या व त्याप्रमाणे म्हणजेच १७.५० मीटरवर बांधकाम परवानगी देण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची उपायोजना व कार्यवाही.		

९४ १३८ **श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रामदास आंबटकर, श्री. निलय नाईक वि. प. स.** **कित्ता**

राज्यात गोंदिया जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या माध्यमातून जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला तब्बल ७००० क्विंटल धान संबंधित संस्थांच्या गोदामात उपलब्ध नसल्याची बाब राज्यस्तरीय भरारी पथकाने केलेल्या तपासणीत माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाअंतर्गत शासकीय धान खरेदी केंद्रावरून धान खरेदी केली जात असणे, फेडरेशन सहकारी संस्थांना कमिशन तत्वावर धान खरेदी करण्यास परवानगी देते यासाठी संबंधित संस्थांकडून बँक गॅरंटी व दहा लाख रुपये डिपॉझिट घेतले जात असणे, मात्र त्यानंतर ही मागील वर्षी जिल्ह्यातील पाच संस्थांनी शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या धानाची परस्पर विल्हेवाट लावणे, याप्रकरणी कारवाई चालू असतानाच याही वर्षी हजारो क्विंटल धान गायब झाल्याने या संस्थांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची उपायोजना व कार्यवाही.

९५ ३६९ **श्री. गोपिचंद पडळकर वि. प. स.** **कित्ता**

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये जेएनपीटी बंदरातून आयात केलेले बोगस बायोडिझेलची अवैध विक्री करणारे विक्रेते आणि संबंधित आयतदार यांच्याशी नियंत्रण शिधावाटप यांनी संगनमत करून करोडो रुपयांचा शासनाच्या महसुलाचा अपहार केल्याचे निदर्शनास येणे, बोगस बायोडिझेल हे जेएनपीटी बंदरामध्ये मिक्स

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मिनरल हायड्रोकार्बन ऑइल तसेच इंडस्ट्रियल फर्नेस ऑइल अशा विविध नावाने आयातदार इम्पोर्ट करत असणे, सदर पेट्रोलियम पदार्थ हा मोठमोठ्या उद्योगधंद्यांमध्ये फर्नेस ऑइल किंवा बॉयलर फ्युएल म्हणून वापरणे अपेक्षित असतांना सदर बायोडिझेलचा वापर मोठ्या वाहनांमध्ये डिझेल म्हणून पर्यायी इंधन स्वरूपात वापरले जाणे, बाजारातील डिझेलपेक्षा ते खूपच स्वस्त दरात आयात केले जाणे, सन २०२० ते २०२२ ह्या दरम्यान सदर बोगस बायोडिझेलची ठराविक आयतदारांनी मोठ्या स्वरूपात आयात मागवली, सदर आयात केलेले बोगस बायोडिझेल प्रत्येक जिल्ह्यातील छोट्या मोठ्या विक्रेत्यांना विक्री केली, व ह्या विक्रेत्यांनी द्वथेट ग्राहकांना सदर बोगस बायोडिझेलची वाहनांमध्ये पर्यायी डिझेल म्हणून विक्री केलेली असणे,आयातदार व त्यापुढील विक्रेता यांनी चांगला नफा कमवला असणे,सदर काळामध्ये सरकारी पेट्रोलियम कंपन्या hpcl, bpcl, iocl यांच्या डिझेल विक्रीमध्ये जवळपास ५०% तफावत आढळून आल्यानंतर याअनुषंगाने सदर कंपन्यांचे प्रतिनिधी आणि राज्याचे मुख्य सचिव व संबंधित अधिकारी यांनी एकत्रित बैठक घेऊन बोगस बायोडिझेल विक्री करणाऱ्या आयतदार आणि विक्रेता यांच्यावर कारवाईचे निर्देश दिले जाणे, त्यानुसारर नियंत्रण शिधावाटप यांच्या नेतृत्वखाली बोगस बायोडिझेलची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करिता भरारी पथकाची स्थापना करण्यात येणे, परंतु बोगस यांनी सदर बोगस बायोडिझेलचे आयातदार आणि राज्यातील विविध जिल्ह्यातील विक्रेता यांच्याबरोबर संधान साधून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास येणे,बोगस बायोडिझेल मध्ये कारवाई झालेले विक्रेते, पोलीस कर्मचारी यांना सोबत घेऊन त्यांनी मोठे आयातदार व मोठे विक्रेते यांच्याकडून कारवाईची भीती दाखवून मोठ्या रकमा		

स्वीकारल्या असणे, सदर प्रकरणी बोगस यांचे संबंधित कालावधीतील व्हाट्सअप चॅट, व्हाट्सअप कॉल आणि कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज संदर्भात एसआयटी नेमून चौकशी करण्याची आवश्यकता, नियंत्रक शिधावाटप चार्ज घेतल्यापासून खात्यामध्ये मनमानी कारभार सुरू केला असणे,याबाबत त्यांच्या खात्यातील अनेक अधिकारी कर्मचाऱ्यांनी सचिव-अन्न व नागरी पुरवठा यांच्याकडे वेळोवेळी तक्रारी दाखल केलेल्या असणे त्यामुळे उक्त विषयी चक्र नेमून चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

९६ ६५६ **श्री. धीरज लिंगाडे वि. प. स.** **कित्ता**

दि. महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप. क्रेडीट सो. लि., मुंबई ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत असून सदर संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असणे, सदर संस्थेची सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीसाठी पंचवार्षिक निवडणूक घेण्याकरिता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २३.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (३) पश्चिम उपनगरे यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले असणे, सदर संस्थेच्या निवडणूकीमध्ये सहकार पॅनल व एकता पॅनल असे दोन पॅनल निवडणूक लढवत असणे, निवडणुकीमध्ये निवडणूक अधिकारी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून एकता पॅनलला निवडून आणण्यासाठी निवडणूक अधिकारी यांनी घाईघाईने खाजगी वाहनात मतपेट्या सील करणे, मतपेटी सील

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		करताना उमेदवार, पोलिंग एजंट किंवा साक्षीदारांच्या सह्या न घेणे, दुसऱ्या दिवशी सहकार पॅनलच्या वैध मतपत्रिका आकाशवाणी आमदार निवासातील शौचालयाजवळ सापडणे, अशा अनेक प्रकारे निवडणूक अधिकारी यांनी स्वतःच्या अधिकाराचा मनमानीपणे गैरवापर केला असणे, मतदानाच्या पूर्वी निवडणूक अधिकारी यांनी सहकार पॅनलचे प्रमुख यांच्याकडे १० लाखाची मागणी करणे, या संदर्भात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे सप्टेंबर, २०२२ रोजी अपर निबंधक यांच्यामार्फत सविस्तर चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिलेले असतानाही अहवाल अद्यापही प्रलंबित असणे, एकता पॅनलचे प्रमुख हे छत्रपती संभाजीनगर येथील कृषी विभागात शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांनी क्रेडीट सोसायटीची निवडणूक जिंकल्यावर सोसायटीच्या पैशाचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करून गैरमार्गाने मोठी आर्थिक माया जमा केली असणे, त्यांच्या काही जवळच्या व्यक्तींच्या नावे मुंबईतील फोर्ट, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी जमिनी/घरे असणे व त्यांनी निवडणूक अधिकारी यांच्याशी आर्थिक व्यवहार केल्यामुळे एकता पॅनलला निवडणुकीमध्ये मदत मिळाल्याचे सभासदांमध्ये असलेली चर्चा, निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे न राबवता एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणे, याबाबतचे सर्व आक्षेप सभासदांनी नवीन पदाधिकारी यांच्या पहिल्या बैठकीत दि. २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी उपस्थित केले असता त्याबाबत कोणतीच बाब विचारात न घेता बैठकीतून राष्ट्रगीत अर्धवट थांबवून पळून जाणे, याबाबतची तक्रार संस्थेच्या सभासदांनी दि. २ मार्च, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, मा. उप-मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त, मुंबई यांना करणे, एकता		

पॅनल प्रमुख यांनी सोसायटीमधून स्वतःसाठी व जवळच्या व्यक्तींकरिता साक्षीदार न घेता मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करणे, एकता पॅनल प्रमुख हे शिपाई असून त्यांच्या सह संचालक (कृषी), क्रांती चौक छत्रपती संभाजी नगर, औरंगाबाद येथील कार्यालयात हजेरीपट तपासले असता गैरहजर असताना देखील गत १३ वर्षांचे त्यांचे वेतन काढण्यात येत असणे, एकता पॅनल प्रमुख यांनी स्वतःसाठी क्रेडिट सोसायटीमधून १० लाख कर्ज घेताना प्रमाणपत्रावर कृषी संचालक यांच्या खोट्या सह्या करणे, तसेच कर्मचारी टाइम्स च्या वृत्तपत्राची नोंदणी करताना खोटे कागदपत्र सादर कागदपत्र सादर करणे, याबाबतच्या तक्रारी माहे मे-जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान मा. उप-मुख्यमंत्री, कृषीमंत्री, कृषी आयुक्त, सहकार आयुक्त, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मुंबई यांच्याकडे केलेल्या असणे. उक्त प्रकरणी अर्धवट व असमाधानकारक उत्तरे देवून सोयीस्करित्या आरोपींना वाचवण्याचा त्यातून प्रयत्न होत असल्याचे उघडकीस येणे, या सर्व गैरप्रकारामुळे यापूर्वी चांगल्या रीतीने काम करणाऱ्या क्रेडिट सोसायटीचा वापर बिनदिक्कतपणे स्वतःच्या लोभापोटी करणाऱ्या नवीन पदाधिकारी व निवडणूक अधिकारी यांचे बाबत सर्व सभासदांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने या संपूर्ण गैरप्रकाराची चौकशी करून बेकायदेशीरपणे निवडणूक प्रक्रिया राबवून एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणाऱ्या निवडणूक अधिकारी व त्यांना आर्थिक लाभ देणाऱ्या एकता पॅनलचे प्रमुख यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, पुढील निवडणुक होईपर्यंत प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
९७	५८४	**श्री. जयंत पाटील वि. प. स.** रिलायन्स कंपनीचा नागोठणे येथे असलेल्या इथेन गॅस पाईपलाईन प्रकल्पाकरिता रायगड जिल्ह्यातील पेण व खालापूर तालुक्यातील २४८ हून अधिक शेतकऱ्यांच्या शेत जमिनीतून गॅस पाईपलाई टाकून शेतजमिनीचे व पिकाचे अतोनात नुकसान करणे, सन २०१७ रोजी रिलायन्स कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून गॅस पाईपलाईन टाकण्यास जमिन संपादीत करीत असताना शेतजमिनी व पिकाचे नुकसान भरपाईच्या मोबदल्यात वाटाघाटी करून कंपनी व्यवस्थापनाने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधीचे हमीपत्र देवूनही मोबदल्याची रक्कम देण्यास टाळाटाळ करणे, रिलायन्स कंपनीने वाटाघाटी करताना लेखी हमीपत्रात सक्षम प्राधिकारी स्तरावर निश्चित केलेल्या दराव्यतिरिक्त कंपनीच्या स्तरावरून वाढीव दराने जमीन मालकांना ज्या दराने रक्कम वाटप करण्यात येईल त्याच दराने इतर शेतकऱ्यांनासुद्धा मोबदल्याची रक्कम देण्यात येईल असे लेखी हमीपत्राद्वारे लिहून देण्यात येणे, प्रकल्पबाधितांना त्यांच्या नुकसान भरपाईचा देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पेण यांनी सदर कंपनीस पत्राद्वारे नुकसान भरपाईचा मोबदला देण्यात वारंवार कळवूनही कंपनी प्रशासनाने याबाबत कोणतीही दखल घेतली नसणे, रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील देहेन ते नागोठणे येथील इथेन गॅस प्रकल्पातील बांधीत शेतकऱ्यांच्या संपादित शेतजमिनीचा मोबदला व पिकांचे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाईचा मोबदला तातडीने शेतकऱ्यांना मिळण्याची आवश्यकता, याबाबत सदर प्रकरणी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही.	**कित्ता**	

वाशिम तालुक्यामध्ये गौनखनीज लिलाव झालेला नसून अवैध गौणखनीज चोरी / वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असणे, यामध्ये गौणखनिजाची चोरी व अवैध वाहतूक रोखण्यात महसूल विभाग व तहसीलदार अपयशी ठरलेले असणे, गौण खनिजाची मोजणी करून किती चोरी झाली हे तहसीलदार यांनी तपासले नसणे, ज्या तलाठी / मंडळ अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातून चोरी/वाहतूक होत असणे त्यांच्यावर तहसीलदार यांनी काहीही कार्यवाही केलेली नसणे, यामधून तहसीलदार व महसूल विभाग यांचे गौणखनिज चोरी /वाहतूकीस अर्थपूर्ण अभय आहे हे सिद्ध होत असणे, MLRC मधील कलम ८५(२) नुसार तहसीलदार यांना जमीन विभागणीचे अधिकार असणे, या अधिकाराचा तहसीलदार वाशिम यांनी गैरवापर करून चुकीचे आदेश करून अर्थलाभ मिळविलेला असणे, तहसीलदार यांना वर्ग- २ मधीलल गावातील अकृषक चे अधिकार असताना त्यांनी कलम ४२-ड अंतर्गत वरिष्ठांच्या अधिकारावर अतिक्रमण करून चुकीचे आदेश केले असणे, शासनाच्या महत्त्वकांक्षी योजना ७/१२ संगणकिकरण यात तहसील कार्यालय वाशिम यांच्याकडे प्रगती अत्यंत मंद असणे, यासाठी संबंधित तहसीलदार जबाबदार असणे, अनेक गैरव्यवहार करून तहसीलदार वाशिम यांनी खूप मोठी बेकायदेशीर संपत्ती जमा केली असल्याचेही दिसून येत असणे, याबाबत अनेकवेळा येथील नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी तक्रारी केलेल्या असणे, या सर्व प्रकारामुळे वाशिम तालुक्यातील नागरिकांच्या मनामध्ये शासनाप्रती चिडीची व संतापाची

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		भावना निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.		
९९	१५४	**श्रीमती उमा खापरे, श्री.** रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रामदास आंबटकर, श्री. निलय नाईक **वि. प. स.** मुंबईतील महानंद डेअरीमध्ये काम करीत असलेल्या शेकडो कर्मचाऱ्यांना मागील तीन महिन्याचा पगार मिळाला नसल्याने येथील कर्मचारी तणावाखाली असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, महानंद डेअरीने राज्य शासनाच्या भरवशावर कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्ती योजना जाहीर केली त्यानुसार ५३० कर्मचाऱ्यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज दाखल केले असणे, त्यासाठी ११६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असणे, परंतु या कर्मचाऱ्यांना देण्यासाठी निधीच नसल्याने स्वेच्छानिवृत्ती योजना बारगळण्याची शक्यता निर्माण झाली असणे, राज्यातील सहकारी दूध संघाची शिखर संस्था अशी महानंदा डेअरीची ओळख असताना १० वर्षांपूर्वी ८ लाख लिटर एवढी असलेली दुधाची विक्री आज घडीला ७० हजार लिटरवर आली असल्याने डेअरीची घडी पूर्णपणे विस्कळीत झाली असणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन, पुरवठादारांचे पैसे चुकते करणे कठीण झाले असून कर्मचाऱ्यांचा माहे मार्च, एप्रिल,मे आणि जून या महिन्याचा पगार तर माहे फेब्रुवारीचा अर्धा पगार थकीत असणे, महानंदा डेअरी पूर्णपणे चालवण्यासाठी शासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज असणे, यावर शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाय योजना.	**कित्ता**	

महाराष्ट्रात सद्या दररोज सुमारे २ कोटी दुधाचे संकलन होत असणे, शेतकऱ्यांकडुन खरेदी करण्यात येत असलेल्या दुधाच्या दरात गेल्या काही दिवसांपासून घसरण होत असणे,गायीच्या दुधाचा खरेदी दर प्रति लिटर ३९/३८ रुपयांवरुन ३०/३१ रुपये लिटर एवढा घसरलेला असणे, एकीकडे पशुखाद्यात दरवाढ झालेली असणे,तर दुसरीकडे दुधाचे दर कमी झालेले असणे यामुळे पशुपालकांवर दुहेरी संकट येणे, यावर उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारकडुन समिती गठीत करण्यात येणे, किमान प्रति लिटरला ३५ रुपये दर कायम राहावा यासाठी उपाययोजना करण्याचे जाहीर करण्यात येणे.मात्र खासगी दुध संघांवर कोणतेही नियंत्रण नसल्याने त्याची अद्याप आंमलबजावणी झालेली नसणे, तसेच राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार ३/५ फॅट व ८/५ एसएनएफ नुसार दुध उत्पादकांना दर देणे क्रमप्राप्त असताना त्याची अंमलबजावणी होत नसणे, त्यामुळे दुधाचा उत्पादन खर्च आणि मिळणारा दर यातील विसंगतीमुळे दूध धंदा तोट्यात जात असल्याने दूध उत्पादक शेतकरी त्रस्त झालेले असणे, परिणामी शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष यासाठी दुध उत्पादक शेतकऱ्यांना किफायतशीर दर मिळण्यासाठी इतर राज्याच्या धर्तीवर सहकारी दुधसंस्थांना व दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी व त्यावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०१	४३४	**श्री. किशोर दराडे वि. प. स.** नाशिक जिल्ह्यातील वन विभागामध्ये शासनाच्या विविध लेखाशीर्षाखाली करण्यात आलेली कामे व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून केलेल्या कामांमध्ये सन २०२० पासून ते आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर कामामध्ये अनियमितता झालेली असणे, तसेच वनविभाग अंतर्गत मृद व जलसंधारणाची पाणी-अडविणे, पाणी साठविण्यासाठी वनतळे, बंधारे इत्यादी कामे करण्यात आली ती कामे अतिशय निकृष्ट दर्जाची करण्यात आलेली असणे, कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे निदर्शनास येणे, सबब सदर प्रकरणी उपवनसंरक्षक पूर्व उपवनसंरक्षक, पश्चिम आणि उपवनसंरक्षक मालेगाव यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी झालेल्या कामासंदर्भातील माहिती मागितली असता ती अद्याप प्राप्त झालेली नसणे, तसेच ममदापूर संवर्धन राखीवला पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले असून ममदापूर संवर्धन करण्यात आले ते तत्कालीन वन विभागाचे सचिव आणि मंत्री वने यांचा उद्देश चांगला असणे, परंतु अधिकारी वर्गाने अतिशय मोठ्या प्रमाणावर सदर कामांमध्ये अनियमितता केलेली असणे, परंतु वनविभागाअंतर्गत मृद व जलसंधारची कामे करण्यात आली ती कामे चांगल्या दर्जाची झालेली नसणे, त्यामुळे वनविभागाच्या हद्दीमधील मोठ्या प्रमाणावर पाण्याची साठवण होत नसल्याने वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची उपलब्ध होत नसल्याने हरणे, मोर इत्यादी वन्यप्राणी शेतकऱ्यांच्या शेताकडे पाण्याच्या शोधात जाणे, त्यामुळे शेतकऱ्याच्या पिकांचे नुकसान होणे, सबबब सन २०२० ते आजपर्यंत झालेल्या कामांची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	**कित्ता**	

कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्रप्रकल्पाने बाधित झालेल्या सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यातील मौजे वेळे, ढेण धनगरवाडा. पोस्ट ठोसेघर येथील रहीवाश्यांचा पुनर्वसनाचा प्रश्न सन १९८५ पासून प्रलंबित असणे, कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्रप्रकल्पातील अधिका-यांनी येथील ग्रामस्थांना या ठिकाणावरून बाहेर जावे लागणार असल्याची आणि मागेल त्या ठिकाणी पुनर्वसन करण्याची दिलेली ग्वाही, तदनुसार या ठिकाणच्या ग्रामस्थानी रायगड जिल्ह्यातील पनवेल व खालापूर तालुक्यात त्यांचे पुनर्वसन करण्याची केलेली आग्रही मागणी, तदनुसार स्थानीक ग्रामपंचायतीने दि. २३ ऑक्टोबर, २००७ रोजी याबाबत केलेल्या ठराव, मा. मुख्य वनसंरक्षक, कोयना अभयारण्य व सह्याद्री व्याघ्रप्रकल्प, कोल्हापूर यांनी या ग्रामस्थांच्या मागणीनुसार त्यांचे पुनर्वसन पनवेल व खालापूर तालुक्यात करण्याबाबतचा प्रस्ताव मा. उपवन संरक्षक, अलिबाग यांचेकडे पाठविला असून त्यांनी सुमारे २२५ हेक्टरचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविलेला असणे, केंद्रीय अधिकारी यांनी रायगड जिल्ह्यातील पळस्पे, नेरे, ता. पनवेल व रिस, ता. खालापूर या क्षेत्राची पाहणी करून ८५ हेक्टर क्षेत्रास मान्यता दिली असणे, मौजे वेळे, ढेण धनगरवाडा येथील १२ खातेदार व ४ भूमिहीन व त्यांच्या कुटुंबातील १८ वर्षावरील ३० कुटुंबे यांनी पळस्पे येथील फॉरेस्ट सव्हे क्र. १३७/१ मधील २६ हेक्टर जागेत पुनर्वसन करण्याची केलेली मागणी, परंतु अजूनही या ग्रामस्थांच्या पुनर्वसनाबाबत शासनाचे सुरू असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे या ग्रामस्थांच्या जीवीतस निर्माण झालेला धोका, यास्तव कोयना अभयारण्य

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		व सह्याद्री व्याघ्रप्रकल्पाने बाधित झालेल्या सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यातील मौजे वेळे, ढेण धनगरवाडा. पोस्ट ठोसेघर येथील रहीवाश्यांचा पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.		
१०३	११७	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि. प. स.** खारघर (नवी मुंबई) येथील महाराष्ट्र भूषण प्रदान कार्यक्रमात नियोजनशून्य आयोजनामुळे निष्पाप १७ जणांचा उष्माघात आणि चेंगराचेंगरीमुळे मृत्यू झाल्याची घटना दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी घडणे, लाखो लोकांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासनाने आप्पासाहेब धर्माधिकारी यांना शासनातर्फे महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात येणे, शासकीय पुरस्कार सोहळा रखरखत्या उन्हात आयोजित केल्याने यात तब्बल १७ जणांचा मृत्यू झाला असणे, या घटनेमुळे शासनावर टीका करण्यात येणे, या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रत्यक्षदर्शीकडून तसेच समाजमाध्यमे, प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून या कार्यक्रमात चेंगराचेंगरी झाली असल्याचे निदर्शनास येणे, उपस्थित श्री सदस्य सात तास उन्हात अन्नपाण्याशिवाय होते तसेच कार्यकामाचे आणि गर्दीचे योग्य नियोजन करण्यात आलेले नसल्याची माहिती समोर येणे, या घटनेतील दोषींविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची होत असलेली मागणी त्यादृष्टीने शासनाने तातडीने याप्रकरणी सखोल चौकशी करुन मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कडक कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया.	**कित्ता**	

सन २०२१ पासून अरबी समुद्रात होणारी वारंवार चक्रीवादळे, वादळी पाऊस सतत हवामानात होणारे बदल तसेच परप्रांतीय बोटी, अवैध मासेमारी या कारणामुळे रायगड जिल्ह्यासह कोकण किनारपट्टीवरील समुद्रात पारंपारीक मच्छिमारांना मच्छिच मिळत नसणे, त्यावर अवलंबून असलेले मच्छिमार म्हणजे कारगील, मगरच्छ डोलकर, दादली, बुडीवाले व जाळीने मच्छि पकडणारे छोट्या बोटी असणारे मच्छिमार यांचे उदर निर्वाहाचे साधनच नष्ट होणे, यामुळे मच्छिमार नौका मालकांचे, नौकेवर असलेले खलाशी, मच्छि विक्रेते व त्यावर अवलंबून असलेले यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे बहुतेक मच्छिमारांनी कर्ज काढून बोटी बांधलेल्या असून मच्छिची मरतूक (मच्छि मिळत नसल्यामुळे) होत नसल्यामुळे त्यांचे कर्जाचे हप्ते थकलेले असणे, त्याच प्रमाणे मच्छिमारीसाठी लागणारे डिझेल, बर्फ, जेवणासाठी लागणारे साहित्य व इतर वस्तू हा सर्व खर्चाचा बोजा नौकामालकांवर पडत असल्यामुळे मच्छिमार कर्जबाजारी होत चाललेला असल्यामुळे अशा परिस्थितीत मच्छिमारांचे दिवस हालाखीचे असून त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले असणे, समुद्रामध्ये मच्छि मिळत नसल्याने मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली असून आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्यामुळे शासन ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना वादळी पाऊस, पूर, गारपीट, चक्रीवादळे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाच्या नुकसानीपोटी तात्काळ मदत जाहिर करते त्या आधारे शासनाने रायगड जिल्ह्यासह कोकण किनार पट्टी वरील मच्छिमारांना मच्छिचा दुष्काळ जाहीर करून भरीव आर्थिक मदत करण्याची

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)

आवश्यकता, सन २०१९-२० मध्ये मच्छिमार नौका व मच्छि विक्रेत्या महिला यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान (कोकण पॅकेज) मंजूर करण्यात आलेला असणे, परंतु रायगड जिल्ह्यातील काही नुकसानग्रस्त मच्छिमार नौकाधारक व ४० टक्के महिला मच्छी विक्रेत्यांना अद्यापपर्यंत सदर अनुदानापासून वंचित राहिलेल्या असणे, सदर सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले असून अद्याप ते शासनाच्या अनुदानापासून वंचित राहिले असून त्यासाठी सुमारे ४ कोटी २५ लाखांची आवश्यकता असणे, शासनाच्या या अनुदानापासून वंचित राहिलेल्या रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांना शासनाने मंजूर केलेल्या सानुग्रह अनुदानाची (कोकण पॅकेज) रक्कम तातडीने देण्याची आवश्यकता असणे, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ कलम ४ चे १ अन्वये पावसाळ्यात मासेमारी साठ्याचे जतन तसेच मच्छिमारांचे जीवीत व बीजहानी यांचे संरक्षण या हेतूने दि. १ जून ते ३१ जुलैपर्यंत जलाधी क्षेत्रात मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आलेली असणे, परंतु मे अखेर व जूनच्या सुरवातीला मच्छिमारांना जवळा, करंदी, खाडे इत्यादी लहान मच्छि सुकवण्यासाठी बऱ्यापैकी मिळत असल्यामुळे मच्छिमारांचे पावसाळ्यातील दोन महिन्याचा उदरनिर्वाह चालणे, मच्छिचे स्त्रोत्र हे हंगामी असल्याने आणि मान्सून बरेच वर्ष उशिरा होत असल्याने शासनाने पावसाळी मच्छिमारी बंदीचा कालावधी हा पूर्वीप्रमाणे दि.१५ जून ते १५ ऑगस्ट पर्यंत करण्याबाबत होत असलेली मागणी, रायगड जिल्ह्यातील मच्छिमार संस्थांचा आजतागायत ३४ कोटी डिझेल परतावा (विक्रीकर) प्रलंबित असणे, रायगड जिल्ह्यात मच्छिचा दुष्काळ असल्याने मच्छि मिळत नसल्याने मच्छिमार पूर्णपणे हवालदिल झालेला असणे, तर

काही मच्छिमार संस्थांचा तर एप्रिल २०१९ पासून डिझेल परतावा शासनाकडून मिळालेला नसणे, सदरच्या मच्छिमार दृष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या मच्छिमारांना डिझेल परतावा (विक्रीकर) मिळाला तर मच्छिमारांना दिलासा मिळेल. शासनाने रायगड जिल्ह्यातील मच्छिमार संस्थांचा ३४ कोटी डिझेल परतावा (विक्रीकर) तातडीने देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सबब रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांना दुष्काळ जाहीर करणेबाबत तसेच डिझेल परतावा वेळेवर मिळण्यासह इतर मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याकरिता निर्माण झालेली आवश्यकता सबब सदर प्रकरणी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही.

१०५ ५२७ **श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे वि. प. स.** **कित्ता**

उच्च शिक्षणसंस्थांच्या राष्ट्रीय क्रमवारीत महाराष्ट्राची पीछेहाट झाल्याचा अहवाल नुकताच जाहीर झाला असतानाच मुंबई विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेवर नियमबाह्य नेमणूका करण्यात आली असल्याची गंभीर बाब दि. १७ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ अन्वये युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि शैक्षणिक औद्योगिक कार्यक्षेत्रातील जागतिक प्रवाहांचा सखोल अनुभवाचा उपयोग होण्यासाठी विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेवर ख्यातनाम उद्योगपती सल्लागार परिषदेचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करावयाची तरतूद असणे, विद्यापीठाच्या कुलपतींकडून सल्लागार परिषदेच्या अध्यक्षांचे नामनिर्देशन करण्यात येणे, तर संशोधन व विकास विषयक धोरणे व कृतियोजना यासंबंधात कार्यवाही करणाऱ्या राष्ट्रीय आणि जागतिक संस्थामधील

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कार्याचा अनुभव असलेले ख्यातनाम व्यक्तींना विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात येणे, शिक्षण, संशोधन आणि विकास, प्रशासन यासंबंधीचे अहवाल कृतियोजना सादर करून त्याद्वारे कुलगुरूना सल्ला देणे, वित्तीय साधनसंपत्ती व सुशासन निर्माण करणे, त्याचबरोबर विद्यापीठ व्यवस्थेच्या संपूर्ण कामकाजाचे संनियंत्रण करण्यासाठी एक कार्यतंत्र व धोरण निश्चित करणे आणि कार्याचा लेखाजोखा ठेऊन विद्यापीठाची प्रगती आणि त्याच्या कार्यात्मक सक्रियतेचे परिणाम आणि समाजातील त्याची अनन्यता याबाबतची माहिती देणे आणि सुक्ष्म विश्लेषण करुन भाष्य करणे यासाठीही सल्लागार परिषदेचे महत्व असणे, सद्यःस्थितीत एक अभिमत विद्यापीठाचे विश्वस्त असलेल्या डॉ. निरंजन हिरानंदानी यांना मुंबई विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे अध्यक्ष म्हणून केलेले नामनिर्देशन हे नियमबाह्य असणे, तसेच सल्लागार परिषदेचे सदस्य म्हणून नामनिर्देशन देण्यात आलेल्या विद्या येरवडेकर या सिमबॉयसिस विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू असून त्यांची देखील नेमणूक नियमबाह्य असणे, मुंबई विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेवर द्वनिमंत्रित सदस्य नेमण्याची कायद्यात कोणतीही तरतूद नसताना श्री. सिंह यांची बेकायदेशीरपणे नेमणूक करण्यात आली असणे, त्यामुळे मुंबई विद्यापीठाकडून अल्लागार परिषदेवर करण्यात आलेल्या नेमणुका नियमबाह्य असल्याने विद्यार्थी आणि पालकवर्गात मोठ्या प्रमाणावर नाराजीची भावना पसरली असणे, यास्तव मुंबई विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेवर नियमबाह्य नेमणूका करण्यात आल्याने सदरहू परिषद तातडीने बरखास्त करून फेरगठित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.		

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट मधील कुपोषण व मातामृत्यु रोखण्यासाठी शासनाकडून मेळघाटात विविध अशासकीय संस्थेमार्फत उपाययोजना राबविल्या जात असणे, विशेष केंद्रीय सहाय्य योजना २०१७-१८ मध्ये महान ट्रस्ट (उतावली) या संस्थेला कुपोषण व मातामृत्यु रोखण्यासाठी साडेचार कोटी मंजूर झाले असणे, पैकी सदर संस्थेला साडेतीन कोटी प्राप्त झालेले असणे, त्यांना मेळघाट मधील एकूण ३०अतिदुर्गम गावांमध्ये संस्थेला विशेष सहाय्य योजनेअंतर्गत कुपोषण रोखण्यासाठी उपाययोजना राबवायची असणे. परंतु स्थानिक आदिवासी संघटनेच्या तक्रारीवरून आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालयाव्दारे चौकशी केली असता सदर संस्थेने कुठल्याच प्रकारची उपाययोजना राबविल्या बाबतचे दस्तऐवज सदर संस्थेकडून मिळालेले नसणे. मागील चार वर्षातील जन्म मृत्यु दर, गावातील आजाराबाबतची माहीती, कुपोषण रोखण्याकरीता केलेल्या उपाययोजना, बालकांच्या पोषण आहाराची गुणवत्ता, इतर याचे कुठलेच कागदपत्रे चौकशी समितीला मिळालेली नसणे, एकूण सदर संस्थेने शासनाचा मिळालेल्या निधीचा गैरवापर करून आदिवासी बांधवांची फसवणूक केल्याचे चौकशी समितीव्दारे स्पष्ट झालेले असणे, करीता महान ट्रस्ट (उतावली) या संस्थेवर शासनाची दिशाभूल करुन निधीचा दुरुपयोग केल्यामुळे फैजदारी कार्यवाही करण्याबाबतची आदिवासी बांधवांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१०७	१५७	**श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे वि. प. स.** शहापूर तालुक्यात (जि. ठाणे) माहे जानेवारी ते एप्रिल, २०२३ या कालावधीत आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येणाऱ्या ५० हजार क्विंटल भात खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात गैरव्यवहार झाला असणे, खरेदी केंद्रावरील रजिस्टरमध्ये भात खरेदीच्या नोंदीच नसणे, भाताचा साठा करण्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आलेली नसणे, शेतकऱ्यांच्या ऑनलाईन फोटोबाबत निर्माण झालेली शंका, गोदामाची संख्या किती, प्रत्यक्षात भाताच्या किती गोण्या ठेवण्यात आल्या, भरडाईसाठी किती भात उचलला यामध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आलेली विसंगती, यासर्व गैरव्यवहाराबाबत आयुक्त, जिल्हाधिकारी यांचेकडे मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेल्या तक्रारी, शेतकऱ्यांनी याप्रकरणी चौकशी करण्याची केलेली मागणी, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी दोन पथकांची नियुक्ती झालेली असणे, चौकशी पथके नेमूणही अद्याप दोषींवर कारवाई करण्यात शासनाकडून होत असलेली चालढकल, परिणामी शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली असंतोषाची भावना, सदर गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करुन दोषींविरुद्ध कारवाई न झाल्यास माहे जुलै, २०२३ मध्ये आंदोलन करण्याचा शेतकऱ्यांनी शासनाला इशारा दिलेला असणे, याबाबत शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींविरुद्ध करावयाची कारवाई व प्रतिक्रिया.	**कित्ता**	

१०८ १७० **श्री. रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. निलय नाईक, श्री. रामदास आंबटकर वि. प. स.** **कित्ता**

राज्यातील आदिवासींसाठी असणारी एकमेव खावटी कर्ज योजना मागील अनेक वर्षापासून बंद असल्याने हजारो आदिवासी लाभार्थी खावटी कर्जापासून वंचित असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर योजनेत एक ते चार सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबीयांना २ हजार रुपये, पाच ते आठ सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबीयांना ३ हजार रुपये, पाच ते आठ सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबीयांना ४ हजार रुपये आणि आठ च्या पुढे सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबीयांना ४ हजार रुपये खावटी कर्ज अनुदान मिळत असणे, त्यात ७० टक्के कर्ज आणि ३० टक्के अनुदान मिळत असून ते अत्यल्प असल्याने त्या कर्जात लाभार्थ्यांना पावसाळ्यात उपजीविकेसाठी किमान २५ हजार रुपयाचा खर्च लहान कुटुंबास अपेक्षित असून त्यामुळे ते एक ते चार कुटुंब सदस्य संख्येला किमान १० हजार रुपये पाच ते आठ कुटुंबसंख्या सदस्य संख्या असणाऱ्यांना १५ हजार रुपये व आठ व त्यापेक्षा जास्त सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबीयांना २५ हजार रुपये शासनाने कोणतेही व्याज न घेता देण्याची गरज असतानाही न देणे, खावटी कर्ज योजनेची सन २०१९ मध्ये सर्व कर्जे शासनाने माफ केल्याने व सन २०१३ पासून २०२३ पर्यंतच्या मागील १० वर्षात खावटी कर्ज वितरित न केल्याने दरवर्षी वाटण्यात येणारे खावटी कर्ज शासनाकडे प्रलंबित असल्याने ती सर्वव कर्ज वाटून त्यांना अनुदान देऊन आदिवासी समाजातील नागरिकांना न्याय द्यावा अशी आदिवासी

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		समाजाची व लोकप्रतिनिधींची मागणी असतानाही प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असणे, खावटी कर्ज अनुदानात वाढ करून सलग तीन वर्ष ही रक्कम देण्यात यावी आणि त्यानंतर कर्जाची बिनव्याजी वसुली करणे, त्यासाठी शासनाने पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.		
१०९	३८६	**श्री. रमेशदादा पाटील वि. प. स.**	**कित्ता**	
		राज्यात धुळे जिल्ह्यातील आदिवासी कोळी ढोर -टोकरी कोळी ,मल्हार कोळी, महादेव कोळी आदी समाज बांधवांवर अन्याय होत असून त्यांना सलगतेने अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी विरंगणा झलकारी बाई कोळी श्री शक्ती सामाजिक संस्थेच्या वतीने गीतांजली कोळी यांनी सुरू केलेले उपोषण दहाव्या दिवशीही सुरू असल्याची बाब माहे मे २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, टोकरे कोळी समाज बांधवांचा आदिवासी अनुसूची यादी क्रमांक २८, २९, ३० या क्रमांकावर समावेश असतानाही जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळवताना अडचणी येत असल्याने या प्रमाणपत्रा अभावी सवलती मिळत नसणे, याआधीही १५ फेब्रुवारी २०२३ रोजी मोर्चा काढून ही गेल्या अडीच महिन्यात प्रशासनाने त्यावर कुठलीच कारवाई केली नसल्याने पुन्हा बेमुदत उपोषण या समाज बांधवांनी सुरू केले उपोषण सुरू करणे, त्यामुळे अनेक अनुसूचित जमातिचे बांधव मुलं प्रमाणपत्र अभावी शिक्षणापासून आणि लाभापासून वंचित असणे, धुळे जिल्ह्यातील		

आदिवासी कोळी ,ढोर -टोकरे कोळी, मल्हार कोळी ,महादेव कोळी आदी समाज बांधवांवरील होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही.

११० ६७६ **श्री. रामराव पाटील वि. प. स.** **कित्ता**

आदिवासी विकास विभागाच्या अप्पर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे स्थरावर पदस्थापनेच्या ठिकाणावरून मुदतपूर्व बदली होणे करिता गट - क संवर्गातील अनेक अर्ज प्राप्त होणे, सदर अर्जंची एकत्रित संचिकेस आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी मान्यता देऊन प्रसिद्ध केलेल्या यादीत पुनः अंशतः बदल होणे करिता त्याच उमेदवारांचा पुनः अर्ज प्राप्त होणे, अश्या अर्जंना मा. आयुक्त यांची परवानगी घेणे बंधनकारक असणे, तथापी आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांची सुस्पष्ट मान्यता प्राप्त नसतांना देखील अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांनी परस्पर अंशतः बदलाचे आदेश माहे जुलै, २०२३ मध्ये पारीत करून मूळ मान्यता प्राप्त आदेशात बदल करणे, त्यामुळे सदर बदल करतांना मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाली असल्याची शक्यता निर्माण होणे, बदली अधिनियमनुसार ३०% पेक्षा जास्त अधिकारी/कर्मचारी यांची एकाच वर्षात बदली करता येणे शक्य नसतांना देखील अप्पर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे स्थरावर बदल्या झालेल्या असणे, उपरोक्त सर्व प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याने त्याची चौकशी होणे गरजेचे असणे, या प्रकारणी आर्थिक गुन्हे शाखा व आदिवासी विकास विभाग यांचे मार्फत विशेष पथकन्वये चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१११	२५	**श्री. सतिश चव्हाण,श्री. विक्रम काळे वि. प. स.** मौजे देवळाणा (ता.खुलताबाद, जि. औरंगाबाद) या गावाच्या जवळून गिरजा नदी वाहत असणे, नदीचे पात्र किमान २०० फुटाचे असणे, या नदीवर मागील सन २०१६-१७ या वर्षी नळकांडी पुलाचे बांधकाम करण्यात आले असणे, सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने ग्रामस्थांनी तक्रारी केल्या असणे, परंतू या तक्रारीची विभागाने दखल घेतली नसणे, सन २०२० मध्ये अति पावसामुळे नदीतील नळकांडी पुल वाहून गेला असणे, नदीच्या पलीकडील किनाऱ्यावर जिल्हा परिषदेच्या इयत्ता ७ वी पर्यंत मराठी व उर्दु शाळांचे ईमारती असणे, सदर नदीस बारमाही पाणी वाहत असल्याने विदयार्थ्यांना नदी ओलांडून शाळेत जाता येत नसणे, विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून देवळाणा गावातील मंदिर, मस्जिद, शादीखाना व समाज मंदिरात शाळा भरवल्या जात असणे, तसेच शेतकऱ्यांनाही दळणवळणाची अडचण निर्माण होत असणे, विद्यार्थ्यांची व शेतकऱ्यांची होणारी अडचण लक्षात घेता देवळाणा येथील गिरजा नदीवर पुलाचे बांधकाम करण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया.	**कित्ता**	
११२	५२९	**श्री. विलास पोतनीस, श्री.** सुनिल शिंदे **वि. प. स.** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील हेदूचापाडापासून मुख्य रस्त्याला जोडणारा पक्का रस्ता उपलब्ध नसल्याने एक ओहोळातून शाळकरी विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याची धक्कादायक बाब दि. १६ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, स्थानिक ग्रामस्थानी या ओहोळावर	**कित्ता**	

काठ्या टाकून लाकडी कच्चा पूल बनविला असणे, दरवर्षी पावसाळ्यात हा पूल ओहोळाला भरती आल्याने पाण्याखाली जात असल्याने या वाडीचा गावाशी संपर्क तुटत असणे, हेदूचापाडा या पाड्यात आदिवासी बांधवांची एकूण १९ घरे असून २३ शालेय विद्यार्थी या पाड्यावर वास्तव्य करीत असणे, पावसाळ्यात शाळेत जाण्यासाठी अन्य रस्ताच उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, ग्रामस्थांना देखील रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी सदरहू मार्गावरून जीवघेणा प्रवास करावा लागणे, या आदिवासी पाड्यावर ग्रामस्थांची पिढ्यानपिढ्या लोटली, तरी अद्यापही पक्का रस्ता तयार करण्यात आला नसणे, स्थानिक ग्रामस्थानी सदरहू पाड्यावर पक्का रस्ता तयार करण्यासाठी अनेकदा तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला असणे, परंतु त्यांच्याकडून कोणतीही सकारात्मक कर्यवाही झाली नसल्याने ग्रामस्थांची होत असलेली परवड, यास्तव ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील हेदूचापाडापासून मुख्य रस्त्याला जोडणारा पक्का रस्ता तयार करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

११३ ६६९ **श्री. सचिन अहिर वि. प. स.** **कित्ता**

वेल्हे तालुक्यातील (जि. पुणे) भार्गासनी येथील जगदंबा, खांबवाडी येथील विघ्नहर्ता, करंजावणे येथील जलक्रांती आणि ओसाडे येथील श्री ओसाडजाई माता पाणीपुरवठा सहकारी संस्था यांनी स्थापन केलेल्या बोगस सहकारी संस्था, मंजूर केलेले बोगस पाणी परवाने, संस्था नोंदणीसाठी आणि पाणी परवान्यासाठी सादर केलेली बोगस

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कागदपत्रे , पाणी परवान्यात केलेले फेरफार, उपविभागीय स्तरावर पाणी परवाने आणि नोंदणी प्रमाणपत्रांची न केलेली तपासणी, प्रशासकीय मंजूरी बोगस पाणी परवान्याच्या आधारे आणि तांत्रिक मार्गदर्शन नसतांना दिलेली तांत्रिक मंजूरी, या संदर्भात स्थानिकांनी केलेली तक्रार तसेच तक्रारीच्या अनुषंगाने केलेली चौकशी व चौकशी आढळलेल्या अनियमितता चौकशी अहवालावरुन वेल्हा पोलिस स्टेशनला दिनांक २९ मे, २०२३ रोजी नोंदविलेली तक्रार, तथापि पोलिस स्टेशनने अद्याप न केलेली कोणतीही कार्यवाही, पोलिस स्टेशन आणि संबधिताचे असणारे संगनमत , त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, पोलिस स्टेशन संबधितांना पाठीशी घालीत असल्याचे शेतकऱ्यांची भावना, परिणामी शासनाने यावर तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना.		०४३
११४	३०	**श्री. अभिजित वंजारी, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. राजेश राठोड,** डॉ. वजाहत मिर्झा,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. सुधाकर अडबाले,श्री. धीरज लिंगाडे, श्री. जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रामदास आंबटकर, श्री. निलय नाईक, श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे,श्री. सत्यजीत तांबे **वि. प. स.** राज्यामध्ये नागपूर ते मुंबई येथील वाहतुकीला जलदगतीने अनेक जिल्ह्याशी जोडत व सर्वांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी या ठिकाणाहून मुंबईपर्यंत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने जलदगती समृद्धी महामार्ग तयार करण्यात येणे, वर्षभरापूर्वी मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या मार्गाचे उद्घाटन झाले असणे, समृद्धी महामार्गाचे लोकार्पण झाल्यापासून त्यावर अपघातांचे सत्र सुरू असणे, हा महामार्ग तयार करताना जलदगती	**कित्ता**	

महामार्गाचे जे जे निकष पाळणे आवश्यक होते त्यानुसार या महामार्गावर जाणाऱ्या प्रवाशांकरिता ठिकठिकाणी प्रसाधनगृह, रेस्टॉरंट, हॉटेल व इतर अनेक गोष्टींचे प्रावधान करणे गरजेचे असणे, परंतु तशा सुविधा अद्यापही न करणे, तसेच ग्रीन झोनमध्ये आवश्यकतेनुसार झाडे लावण्याकरिता आणि दुभाजकामध्ये सुद्धा झाडे लावणे हे क्रमप्राप्त असताना सुद्धा या सर्व गोष्टींची आणि सोयीसुविधांची उभारणी न करता हा महामार्ग नागरीकांकरिता खुला असणे, या महामार्गावर अद्याप विश्रांती थांबे, पोलिस चौक्या बांधण्यात आलेल्या नसणे, विश्रांती थांबे नसल्याने चालक अनेक तास वाहन चालवतात तसेच पोलिस नसल्याने अपघातानंतर लगेच मदत मिळत नसल्याने हे बळी जात असणे, या सर्व सोयीसुविधांच्या अभावी गेल्या वर्षभरात हजारोपेक्षा जास्त अपघात झाल्यामुळे अनेकांना आपले जीव गमवावे लागणे, गेल्या काही महिन्यात खासगी स्लिपर कोच बसला आग लागून अपघातांच्या घटना वाढल्याचे समोर येणे, स्लिपर कोच बसच्या अंतर्गत रचनेतील बदल, अपुऱ्या सोयी-सुविधा, अप्रशिक्षित चालक यामुळे स्लिपर कोच मधून प्रवास करणे धोकादायक होत चालले असणे, दिनांक १ जुलै, २०२३ रोजी खासगी विदर्भ ट्रॅव्हल्स स्लिपर कोच बसला अपघात झाल्यामुळे २६ प्रवासी ज्यामध्ये तरूण मुले-मुली, वृद्ध आणि इतर महिला प्रवास करीत असताना झालेल्या अपघातामुळे जळून मृत्यूमुखी पडणे, सदरील घटनेनंतर सर्व स्लिपर कोच वर बंदी घालण्याची होत असलेली मागणी, अनेक अपघातांमध्ये कारमध्ये प्रवास करणारे अख्खे कुटुंब या समृद्धी महामार्ग अपघातामध्ये दगावणे, या सर्व अपाघाताची जवाबदारी शासनाने समजून जलदगती महामार्गाचे निकषाप्रमाणे आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		शासनाला क्रमप्राप्त असणे, परंतु ते न झाल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत असल्याने समृद्धी महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य व प्रवाशांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, समृद्धी महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी चालकाचे समुपदेशन, टायर तपासणी, जनजागृतीचे फलक, रिफ्लेक्टर तपासणीचे नियोजन, वेगावर नियंत्रण, डावीकडून ओव्हरटेक न करणे आदी समस्या तातडीने सोडवणे गरजेचे असणे, तसेच समृद्धी महामार्गावरील अपघाताचे सत्र रोखण्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करुन अपघात रोखण्याची आवश्यकता यास्तव सुरू झालेला समृद्धी महामार्ग सर्व सोयीसुविधा उपलब्ध होईस्तव तसेच जीपीएस प्रणालीद्वारे यावर सर्व वाहनाची वाहतूक नियंत्रण करण्यासाठी आवश्यक त्या सॉफ्टवेअरचा उपयोग करून घेण्यासाठी आणि तशा प्रकारच्या इंन्फ्रास्ट्रक्चर्स सुरू करेपर्यंत हा महामार्ग बंद करण्याची गरज, ज्या विभागामुळे जलद मार्गाचे निकष पूर्ण न करता हा महामार्ग सुरू केल्यामुळे आणि अनेक प्रकारचे अपघात घडल्यामुळे संबंधित विभागावर तसेच दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया.		
११५	१८२	**श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस वि. प. स.**	**कित्ता**	
		मुंबई-गोवा महामार्गाचे गेल्या १३ वर्षापासून काम प्रलंबित असून त्यात पडलेल्या खड्ड्यांमुळे यंदाच्या पावसाळ्यात देखील वाहनचालकांचा खडतर प्रवास सुरु असल्याची बाब दिनांक १० जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, गत काही दिवसांपासून कोकणात पडत असलेल्या पावसामुळे मुंबई-गोवा महामार्ग पुनःश्च		

खड्डेमय बनला असणे, त्यामुळे या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांचा प्रवासात बराच वेळ वाया जात असून आबालवृद्ध प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागणे, या महामार्गावरील पनवेल ते महाडपर्यंतच्या प्रवासासाठी प्रवाशांना तीनऐवजी तब्बल सहा तासांचा कालावधी लागणे, वाशी नाका ते वडखळ बायपास पूल, कासू ते इंदापूर, महाड, वाकन, माणगाव, नागोठाणे, चिपळूण, परशुराम घाट आणि संगमेश्वर या ठिकाणी रस्त्यावर सर्वाधिक खड्डे असणे, मुंबई, ठाणे, पालघरमधून कोकणच्या दिशेने आणि कोकणातून महानगराच्या दिशेने असंख्य वाहनांची ये-जा या महामार्गवरून सुरु असणे, मुंबई-गोवा महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणवर वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागणे, या महामार्गावरील रस्ते बुजविण्याचे काम संबंधित रस्ते विभागाने पावसाळ्याआधी माहे जानेवारी ते मे, २०२३ या कालावधीत हाती घेतले असणे, याकरिता तब्बल १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, तरीदेखील या महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य मोठ्या प्रमाणावर पसरले असल्याने मोठा अपघात होवून जीवितहानी होण्याची निर्माण झालेली दाट शक्यता, त्यामुळे सदर मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चाची आणि कामाच्या दर्जाची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता असणे, परंतु मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे आगामी गणेशोत्सवापूर्वी दुरुस्त करून महामार्गावरील वाहतुक सुरळीत करण्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, कोकणवासीय जनतेत शासनाप्रती पसरत चाललेली नाराजीची भावना, यास्तव मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्यासह या महामार्गाचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
११६	५६८	**श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या रेवस ते रेड्डी या सागरी मार्गाचा आरखडा तयार करण्यात आला असणे, सदरहू आरखड्यास शासनाने मंजूरी दिलेली असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुमारे ४९८ कि.मी. चा सागरी मार्ग बांधण्यात येत असल्याने सुमारे ३३ गावे व शहरांचा विकास होणार असणे, तसेच जलद प्रवास होण्यास मदत मिळणार असणे, उक्त सागरी मार्गाला सलगता देण्यासाठी रत्नागिरी जिल्हातील रेवस-रेड्डी सागरी मार्गावरील केळशी खाडीवर पुलाची उभारणी करण्यात येणार असणे, यासाठी तांत्रिक निविदा पूर्ण झाली असून आर्थिक निविदा अद्याप पूर्ण न झाल्याने सदरहू पुलाचे बांधकाम प्रलंबित असणे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केळशी खाडीवर मोठ्या पुलाची आर्थिक निविदा पूर्ण करुन काम तातडीने सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	**कित्ता**	
११७	५७७	**श्री. अमोल मिटकरी, वि. प. स.** मौजे बोर्ली (ता. श्रीवर्धन, जि. रायगड) येथील दांडगुरी-श्रीवर्धन रोड हा वाहतुकीच्यादृष्टीने खूप वर्दीळीचा रोड असणे, दांडगुरी आसुफपासून बोर्लीपर्यंतचा रोड खुप अरुंद असून दोन वाहने मुश्किलीने पास होत असणे, माहे मे,२०२३ मध्ये रस्त्यालगत साईडपट्ट्या खोदन खाजगी मोबाईल कंपनीने भूमिगत केबल टाकण्याचे काम केलेले असणे, साईडपट्ट्या व्यवस्थित पद्धतीने न भरल्या कारणाने पावसाचे पाणी साचून त्या खचल्या	**कित्ता**	

असणे, त्याचा नाहक त्रास वाहनचालकांना व नागरिकांना होत असणे, रात्रीच्या वेळीस पण खचलेल्या साईडपट्टीचा अंदाज येत नसणे, त्यातच रस्त्यावर पथदिवे नसणे, परिणामी मोठा अपघात होण्याची शक्यता असणे, तसेच खुजारे बसस्थानकाजवळ असलेला पूल धसत चालला असणे, सदर रस्त्याबाबत वाहतुकीच्यादृष्टीने रुंदीकरण आणि इतर सोयींबाबत तातडीने उपाययोजना करण्याची गरज असणे, परिणामी तेथील ग्रामस्थ नागरिकांमध्ये तसेंच वाहनचालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

११८ ११ **श्री. गोपिचंद पडळकर, वि. प. स.** **कित्ता**

कोल्हापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मिश्र खतांच्या नावावर भेसळीचे खत विकले जात असून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, कोल्हापूर जिल्ह्यातील खरेदी विक्री संघामार्फत बनवले जाणाऱ्या खतावर माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केंद्रीय भरारी पथकाने धाडी टाकलेल्या असणे, सदर धाडीमध्ये भरारी पथकाने मिश्र खताचे (सॅम्पल) नमुने घेतलेले असणे, दाणेदार व मिश्रित खतांमध्ये माती, वाळू, मीठ आदींची भेसळ असल्याचे अनेक शेतकऱ्यांनी तक्रार केलेल्या असणे, त्या आधारे कृषी विभागाच्या नियंत्रणाखालील ११ तालुका संघाच्या खतांची केंद्रीय यंत्रणेकडून तपासणी केली जाणे, यामधील अनेक संघातील खते मोठ्या प्रमाणात जप्त केली जाणे, रत्नागिरी येथील एका कंपनीने कमी प्रतीचे सुपर फॉस्फेट वापरून मासळी खताऐवजी चक्क माती वापरल्याचे तपासात स्पष्ट होणे, हातमिश्रित खतामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		असताना देखील अद्याप दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, केंद्रीय भरारी पथकाने तपासण्यासाठी पाठविलेल्या नमुन्याचे पुढे काय झाले? त्यात कोण दोषी आढळून आलेत? दोषींवर काय कारवाई करण्यात आली याबाबत कोणतीही पारदर्शकता नसणे, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.		
११९	१५६	**श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस वि. प. स.** महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळाकडून ऑरगॅनिक किटकनाशक खरेदी करण्यासाठी काढण्यात आलेल्या १५० कोटी रुपयांच्या निविदेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, निविदा मर्जीतल्या ठेकेदाराला देण्यासाठी निविदातील अटी-शर्तीचे करण्यात आलेले उल्लंघन, प्राप्त झालेल्या निविदांचे तांत्रिक आणि आर्थिक तपासणी न करता इतर कंपन्यांच्या निविदा रद्दबातल करणे, निविदा पात्र ठरलेल्या दोन्ही कंपन्यांचे संचालक एकच असणे, पुरवठादाराकडे तांत्रिक उत्पादनासाठी फरियाबाद येथील केंद्रीय इनसेक्टीसाईट बोर्डाच्या प्रमाणपत्राची टाकलेली अट, निविदा उघडण्याच्या दिवशी इतर पुरवठादारांना न बोलवता टेंडर मिळालेल्या दोनच पुरवठादारासमोर निविदा उघडण्यात येणे, पात्र ठरविण्यात आलेल्या पुरवठादाराने निविदेतील संपूर्ण अटी व शर्तीची पुर्तता न करणे, तसेच निविदेतच असणाऱ्या नियम व अटीमध्ये अचानकपणे बेकायदेशीर करण्यात आलेले बदल, त्यामुळे निविदा भरणाऱ्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला असंतोष	**कित्ता**	

व वरील प्रक्रियेची चौकशी करण्यात यावी अशी मा.मुख्यमंत्री यांचेकडे करण्यात आलेली मागणी, शासनाने या सर्व गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रया.

१२० ४६४ **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी वि. प. स.** **कित्ता**

परभणी जिल्ह्यात ४ जून २०२३ रोजी वादळ वाऱ्याने केळीचे मोठे नुकसान होणे, जिल्ह्यातील पाथरी, जिंतूर, सेलू, परभणी या तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका सहन करावा लागणे, शासनाने केळी पिक विमा योजना सन २०२३-२४ साठी लागू करणे, त्यात ४० किलोमीटर प्रति तास जास्त वेगाने वारे वाहण्याची नोंद हवामान केंद्रावर होणे गरजेचे असणे, असा प्रकार झाल्यास त्या शेतकऱ्यांनी ७२ तासाच्या आत कृषी विभाग व विमा कंपनीस कळविणे आवश्यक असणे, विमा कंपनी ,महसूल ,कृषी विभाग यांनी वैयक्तिक पातळीवर नुकसाची प्रमाण निश्चित करणे, ४ जून रोजीचे तारखेस ४३.३० किलोमीटर प्रतितास असे जास्त वेगाने वारे वाहिल्याची नोंद हवामान केंद्रावर नोंदणी असणे, तसेच दोन दिवसाचा हवामान खात्याचा रिपोर्ट ग्राह्य धरण्यात यावा, असा शासन निर्णय असणे, परभणी जिल्ह्यासाठी फळ पिक विमा राबविण्यासाठी या कंपनीस नियुक्त करण्यात येणे, सदरील कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करणे, नुकसान होऊनही कंपनी कडून पीक विमा ची संरक्षित रक्कम देण्याऐवजी चुकीचे निकष व नियम लावून शेतकऱ्यांना डावलण्यात येणे, परभणी जिल्ह्यातील कृषी विभागाचे अधिकारी व पिक विमा कंपनीचे अधिकारी यांचे संगनमत असल्याने

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		ते शेतकऱ्या ऐवजी कंपनीचा फायदा करण्यासाठी प्रयत्नशील असणे, शेतकऱ्यांचे नुकसान व कंपनीस फायदा असा प्रकार करून स्व:ताच्या आर्थिक फायद्यासाठी कार्य करत असणे, त्यामुळे जिल्हातील केळी उत्पादक शेतकरी आर्थिक मदती पासून वंचित राहणे, परभणी जिल्ह्यातील कृषी अधिकारी व यांच्या संगनमतची चौकशी करण्याची गरज निर्माण होणे, सदरील कंपनीस ब्लॅक लिस्ट करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येणे, दिनांक ४ जून २०२३ रोजी वादळ वाऱ्यात नुकसान झालेल्या केळी उत्पादक शेतकरी ना फळ पीक विमा योजने तून नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाकडून करण्यात येत असलेली उपायोजना व या प्रकरणी शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.		
१२१	१७७	**श्री. प्रविण दरेकर, श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. गोपिचंद पडळकर, श्री. रमेशदादा पाटील, वि. प. स.** पुणे जिल्ह्यातील पिंपरी येथील मे. टाटा मोटर्स लिमिटेड ही कंपनी 'माथाडी ॲक्ट - १९६९' या माथाडी कायद्यानुसार पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ पुणे या माथाडी मंडळात नोंदीत होणे बंधनकारक असताना नोंदीत न होता मे. प्राज लॉजिस्टीक सर्व्हिसेस प्रा.लि. या ठेकेदाराला मंडळात नोंदीत करून त्यांच्यामार्फत टोळी क्र. ४९५ मधील कामगारांचे लोडींग-अनलोडींगची कामे करून घेत असल्याची बाब माहे जून २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस येणे, तसेच कामगारांच्या मजूरी व लेव्हीची रक्कम पुर्णपणे माथाडी मंडळात भरणा करत नसणे आणि कामगारांच्या मजुरीचे दर पिंपरी-चिंचवड माथाडी मंडळाने निश्चित न केल्यामुळे सदर कामगारांना	**कित्ता**	

प्रचलित दराने मजुरी देण्यास ठेकेदार टाळाटाळ करीत असणे, कामगारांच्या कामाची रोटेशन पद्धत बंद केल्याने इंडिका गेट व मटेरियल गेट येथील कामाचे स्वरूप समान असुनही कामगारांच्या वेतनामध्ये तफावत होत असणे, त्यामुळे कामगारांच्या कामकाजामध्ये पारदर्शकता व सुरळीतपणा येण्यासाठी दैनंदिन जमा होणारी रोख मजूरी, हजेरी पत्रक, बिलींग व नोंदवहीची अंमलबजावणी करण्यासाठी कंपनीच्या आवारात टोळी क्र. ४९५ च्या कामगारांसाठी स्वतंत्र कार्यालय बांधण्याची आवश्यकता असणे हा सर्व गैरव्यवहार लपविण्यासाठी मे. प्राज लॉजिस्टीक कंपनीने टोळी क्र. ४९५ च्या एकूण ५ कामगारांवर दिनांक २१ सप्टेंबर २०२१ रोजी खंडणीचा गुन्हा दाखल केलेला असणे व ज्यांनी नोंदीत कामगारांवर खंडणीचे गुन्हे दाखल केले ते कामगारांची मजूरी बोर्डात भरणा करत नसणे आणि त्यानंतर सहा महिन्यातच म्हणजे दिनांक १६ मार्च २०२२ रोजी टोळी क्र. ४९५ चे मुकादम कै. ज्ञानोबा मुजुमले यांची हत्या झालेली असणे, त्यामुळे न्यायापासून वंचित असलेले भयभीत झालेले कामगार यांना तातडीने न्याय मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

१२२ २२६ **श्री. शशिकांत शिंदे, वि. प. स.** **कित्ता**

मे. होप (इंडिया) पॉलिशींग वर्क्स प्रा.लि., २ रा मजला, मेहरा सेंटर, क्रिशनलाल मारवा मार्ग, साकीविहार रोड, मुंबई ४०००७२ या कंपनीमध्ये हिऱ्यास पैलू पाडण्याचे काम केले जात असून यात काम करणारे कामगार महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्स्पोर्ट आणि जनरल कामगार युनियन (रजि.) या संघटनेचे असणे, या कामागारांनी या

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कंपनीसोबत माहे जुलै, २०२२ रोजी कामगारांसोबत करार केल्याप्रमाणे या करारानुसार कामगारांचे थकित असलेले माहे डिसेंबर, २०२२ ते माहे फेब्रुवारी, २०२३ चे पगार देण्याबाबत तसेच कंपनीत काम करणाऱ्या २ मृत्यू झालेल्या कामगार व ज्या १२ कामगारांनी राजीनामे दिले आहेत, त्यांचे निवृत्ती वेतन व मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना भरपाई देण्याबाबत तसेच कामगारांना पगारवाढ देण्याबाबत करार करण्यात आला असतानासूद्धा त्या कामगारांची देणी कंपनीने अद्यापही न दिल्यामुळे तेथील कामगारात पसरलेला तीव्र असंतोष, या कामगारांच्या इतर मागण्यांसदर्भातसूद्धा कंपनीने दखल घेण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.		
१२३	४६५	**श्री. सुरेश धस, वि. प. स.** धाराशिव जिल्हा अंतर्गत मध्यान्ह भोजन योजनेतील घोटाळ्याच्या चौकशीसाठी नेमलेल्या चौकशी समितीने दि. ३१.०३.२०२३ रोजी आपला अहवाल मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेला असणे,या चौकशी समितीमध्ये अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी,सहाय्यक आयुक्त-समाज कल्याण,सहाय्यक लेखा अधिकारी जिल्हा पुरवठा विभाग यांचा समावेश असणे,अपर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या या उच्चस्तरीय समितीने मध्यान्ह भोजन योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा अहवाल दिलेला असणे, धाराशिव जिल्हा अंतर्गत मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण किती निधी खर्च करण्यात आलेला आहे? एकूण किती रकमेचा अपहार झालेला आहे? किती कामगारांची बोगस संख्या आहे ? या समितीने भोजन	**कित्ता**	

पुरवठा करणाऱ्या यंत्रणे कडून मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा अहवाल दिलेला असुन अनेक गंभीर बाबी उघड केलेल्या असुन मा.जिल्हाधिकाऱ्यांनी कामगार विभागाचे प्रधान सचिव व कामगार कल्याणकारी मंडळाच्या सचिवांना अहवाल पाठविल्याचे लोकप्रिय दै.समयसारथी या वर्तमान पत्राने प्रकाशीत करून संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केलेली असणे,मध्यान्ह भोजन योजनेतील मोठ्या प्रमाणावर झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणी सखोल चोकशी करून सबंधित पुरवठा करणाऱ्या कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करून भ्रष्टाचाराची रक्कम जमीन महसूलाप्रमाणे वसूल करण्यासाठी जनतेत निर्माण झालेला प्रचंड असंतोष व तीव्र संतापाची भावना यांवर शासनाची प्रतिक्रिया व तातडीने करावयाची कार्यवाही.

१२४ ४९९ **ॲड. अनिल परब, वि. प. स.** **कित्ता**

ठाणे जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात केमिकल कंपन्या असणे, सदर केमिकल कंपन्यांमध्ये वारंवार घडत असलेल्या दुर्घटनामुळे एमआयडीसीतील सुरक्षा धोक्यात येणे, या कंपन्यामधून नदी,नाल्यामध्ये सोडण्यात येणाऱ्या केमिकल्समुळे वाहणारे पाणी हे निळे,दुधाळ, सप्तरंगी केमिकलमिश्रित असणे, नुकतेच माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान डोंबिवलीतील एमआयडीसीतील फेज १ मधील जय इंडस्ट्रीज या केमिकल कंपनीमध्ये बॉयलर भट्टीमधील उकळत असलेला वायू व कोळसा कामगारांच्या अंगावर पडून दुर्घटना घडून कामगार होरपळून जखमी होणे, व एका कामगाराचा मृत्यू होणे, बहुतांश एमआयडीसीतील केमिकल कंपन्यामध्ये औद्योगिक सुरक्षा व आरोग्याची काळजी घेण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, कारखान्यांकडून

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अधिनियम १९४८ मधील तरतुदींचा भंग करण्यात येणे, परिणामी एमआयडीसीमधील कारखान्यांमध्ये सातत्याने दुर्घटना घडत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने सर्व एमआयडीसीमधील केमिकल कारखान्यांची तपासणी करून नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर केलेली वा करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.		
१२५	११६	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.** सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. राजेश राठोड, श्री. अभिजित वंजारी, श्री. जयंत आसगावकर **वि. प. स.** रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील नाणार परिसरात सुमारे दोन लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या गुंतवणूकीचा सुमारे साडे चार वर्षापूर्वी शासनामार्फत तेल शुद्धीकरण प्रकल्प (रिफायनरी प्रकल्प) उभारण्याचे प्रस्तावित असणे, या परिसरातील बहुतांश गावातील शेतकऱ्यांनी प्रकल्पास केलेला तीव्र विरोध, त्यामुळे तेथील प्रकल्प रद्द करण्याचा सुमारे तीन वर्षांपूर्वी शासनाने घेतलेला निर्णय, तद्नंतर हा प्रकल्प रायगड जिल्ह्यात उभारण्याचा विचार झाला असता तेथेही गावकऱ्यांकडून झालेला तीव्र विरोध, त्यामुळे त्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील बारसू परिसरातील गावांमध्ये सदर प्रकल्प उभारण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असणे, या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे शेती, बागयती क्षेत्र बाधित होऊन शेतकरी उद्ध्वस्त होणार असल्यामुळे बारसू परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी प्रकल्पास केलेला तीव्र	**कित्ता**	

विरोध, प्रकल्पाविरोधात केलेली व सुरु असलेली आंदोलने, रिफायनरी प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित केलेल्या पंचक्रोशीतील पाच ग्रामपंचायतींनी ग्रामसभेमध्ये प्रकल्प विरोधी ठराव मंजूर केलेले असणे, या बाबी दुर्लक्षित करुन बारसू परिसरातील गावांमध्ये भूगर्भाची तपासणी जबरदस्तीने सुरु केलेली असणे, प्रकल्पाविरोधातील आंदोलनातील काही आंदोलकांना काढलेल्या तडीपारच्या नोटीसा, या परिसरात अनेक महिन्यांपासून लागू असलेली जमावबंदी, त्यामुळे गावकऱ्यांचे दैनंदिन व्यवहार/कामकाज ठप्प होऊन त्यांच्यावर आलेले आर्थिक संकट, अलिकडेच आंदोलकांची मोठ्या प्रमाणात झालेली अटक, त्यांना तुरुंगात टाकण्याच्या घडलेल्या घटना, बारसू परिसरातील गावकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्याचे, भितीचे, घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण, शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याची होत असलली कृती, त्यामुळे पसरलेली संतापाची लाट, याशिवाय या परिसरात मोठया प्रमाणात असलेली कातळ शिल्प, सदर कातळ शिल्प ऐतिहासिक वर्गात असलेल्या (हेरिटेज वर्गात असलेल्या) ऐतिहासिक वास्तू असणे, ही बाब शासनाच्या संबंधित विभागाच्या निदर्शनास आलेली असणे, त्यांचेकडून याची पाहाणी करुन यासंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी युनेस्कोकडे प्रस्ताव सादर केलला असणे, या हेरिटेज वर्गात मोडणाऱ्या पुरातन वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासनाने प्राधान्याने लक्ष देण्याची गरज, हेरिटेज वर्गात येणाऱ्या वास्तूंच्या ठिकाणी अन्य कोणतेही प्रकल्प उभारण्यात असलेली बंधने, त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, तसेच प्रकल्पाविरोधात लिखाण करणाऱ्या एका पत्रकाराची काही दिवसांपूर्वी झालेली हत्या, त्यामुळेही निर्माण झालेली दहशत, या सर्व बाबी विचारात घेता बारसू परिसरात उभारावयाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाच्या (रिफायनरी प्रकल्पाचा) फेरविचार करण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१२६	३६४	**श्री. अमोल मिटकरी, श्री. विक्रम काळे,श्री. सतिश चव्हाण वि. प. स.**	**कित्ता**	

मुंबईतील मुलुंड (पश्चिम) येथील हिमगिरी सहकारी गृहनिर्माण संस्थेत ९० सदनिका असून त्यामध्ये मुंबई पोलीस दलाच्या ४०, महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाच्या १५ तर शासन नामनिर्देशित ३५ जणांचा समावेश असणे, इमारतीच्या बांधकामास ३५ वर्षे झाल्याने व इमारतीची अत्यंत दुरावस्था झाल्यामुळे संस्थेने तज्ञांकडून स्ट्रक्चर ऑडिट (संरचनात्मक परीक्षण) करण्यात येणे, त्यामध्ये इमारतीची जीर्णावस्था झाल्यामुळे प्रत्येक सदनिकेत मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याचे व होत असल्याचे आढळून येणे, त्यानंतर इमारतीचा पुनर्विकास करणेबाबत निर्णय घेण्यात येणे, त्यानंतर गृहनिर्माण संस्थेने निविदा प्रक्रिया राबवून त्यामध्ये प्राप्त झालेल्या निविदांपैकी या निविदाकाराची (कंत्राटदार) निविदा दिनांक ३० जून, २०२१ रोजीच्या बैठकीत मुंबई पोलिस दलाचे सहा. पोलिस आयुक्त, महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळाचे व्यवस्थापक प्रतिनिधी, सहकार विभागाचे उप निबंधक (टी वॉर्ड) आदी अधिकारी वर्ग यांचे उपस्थितीत अंतिम करण्यात येणे, तथापि त्यानंतर मुंबई पोलीस दलाकडून काही आक्षेप नोंदविण्यात येणे, तसेच मुंबई पोलिस दलाने नोदविलेले आक्षेप हेच महा.लघुउद्योग महामंडळाचे आक्षेप असल्याचे महामंडळाने गृहनिर्माण संस्थेस व सहकार विभागास कळविण्यात येणे, घेतलेल्या आक्षेपांची परिपुर्ती करून या दोन्ही शासन यंत्रणाना गृहनिर्माण संस्थेकडून कळविण्यात आलेले असणे, इतकेच नव्हेतर शासनाच्या सहकार विभागाचे उप निबंधक (टी वार्ड विभाग) यांनी देखील प्रत्येक आक्षेपाची पुर्तता करून त्यांचे

दिनांक २१ जून २०२२ रोजीच्या पत्रान्वये गृह विभाग व महामंडळास कळविण्यात येणे, त्यांनतर शासनाने (गृह विभाग) सदर प्रस्ताव मान्य करून दिनांक २६ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये संस्थेस तसे कळविण्यात येणे, परंतु, महा. लघुउद्योग महामंडळाकडून मात्र अद्याप त्याबाबत संस्थेस काहीही कळविण्यात आलेले नसणे, त्यासंदर्भात गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मागील ८ ते ९ महिन्यांपासून महामंडळाचे मॅनेजर तसेच तत्कालीन व विद्यमान व्यवस्थापकीय संचालक यांना अनेकदा प्रत्यक्ष भेटून व प्रस्तावास मान्यता देण्याबाबत निवेदने देण्यात आलेली असणे, तथापि व्यवस्थापकीय संचालक महोदय यांनी, संस्थेच्या प्रस्तावास मान्यता देण्यास टाळाटाळ करून गेल्या ८ ते ९ महिन्यांपासून ते आजतागायत प्रस्ताव लटकवून ठेवण्यात आल्याचे दिसून येणे, वास्तविकत: दोन्ही यंत्रणाचे पुनर्विकासाबाबत सारखेच आक्षेप असताना, तसेच गृहनिर्माण संस्थेत पोलिस दलाच्या ४० सदनिका असताना, १५ सदनिका असणाऱ्या व त्यातील निम्म्यापेक्षा अधिक सदनिका रिकाम्याच असताना महामंडळाने पुनर्विकास प्रस्तावास मान्यता देण्याबाबत करण्यात येत असलेली टाळाटाळ समजण्यापलिकडचे व पर्यायाने संशय निर्माण करणारी असणे, परिणामी दरम्यानच्या काळात इमारत खाली करण्याबाबत महापालिकेकडून लावण्यात येत असलेला तगादा, महामंडळाने घेतलेली अडवणुकीची व संशयातीत भुमिका, त्यामुळे गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.

१२७ ३०७ **श्री. सत्यजीत तांबे वि. प. स.** **कित्ता**

नाशिक जिल्हा रुग्णालयात अनेक सुविधांचा अभाव असणे, दरमहा २२ ते २९ हजार रुग्णांची ओपीडी असताना त्या तुलनेत रुग्णालयात असणाऱ्या सुविधा अत्यंत

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कमी असणे, अतिदक्षता व अत्यावश्यक विभागाच्या आधुनिकीकरणाची गरज असणे, नाशिक जिल्हा रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात एकावेळी केवळ १२ रुग्णांनाच एकावेळी उपचार देता येत असणे, तसेच अत्यावश्यक सेवा विभागात केवळ १६ रुग्णांची क्षमता असणे, पिण्याच्या शुद्ध पाण्याचा अभाव असणे, स्वच्छता नसल्यामुळे रुग्णांची हेळसांड होत असणे, रुग्णालयाच्या मुख्य इमारतीची दुरावस्था झालेली असून छतातून पाणी गळती होत असणे, नवजात अर्भकांसाठी असलेल्या इनक्यूबेटरची संख्या अपुरी असल्याने एका इंक्युबेटरमध्ये ३ अर्भकांवर उपचार करण्यात येणे, रुग्णांच्या नातलगांना बसण्यासाठी व झोपण्यासाठी पुरेशा सुविधा नसणे, एक्स-रे टेक्निशियनसह अनेक डॉक्टर व आरोग्य कर्मचारी प्रतिनियुक्तीवर असणे, रुग्णालयातील अनेक पदे रिक्त असणे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांचा जिल्हा असलेल्या या रुग्णालयाची झालेली दुरावस्था व सदर दुरावस्थेमुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.		
१२८	५७२	**श्री. एकनाथराव खडसे वि. प. स.**	**कित्ता**	
		जळगाव जिल्ह्यात ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रिक्त असलेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांचेवर सुरु असलेला कारभार, सर्वच रुग्णालयात ए. एन. एम. नर्सेसची रिक्त पदे, मुक्ताईनगर येथील रुग्णालयात भिषक (सर्जन), एम.डी. (मेडिसिन) वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे असल्याने या रुग्यालयात शस्त्रक्रिया, सर्प दंश, व		

विष प्राशन करणाऱ्या रुग्णांवर उपचार न होणे, राज्यातील गर्भवती महिलांसाठी वापरण्यात येणाऱ्या १०२ रुग्ण वाहिका वरील वाहन चालक भरती, सफाई कामगार भरतीचे खाजगी कंपनीचा सहा महिन्यांपासून संपलेला करार, नवीन करार न झाल्याने वाहनचालक अभावी रुग्णवाहिका पडून असणे, सफाई कामगार अभावी रुग्णालयात पसरलेले घाणीचे साम्राज्य, वाहन चालक, सफाई कामगार, वैद्यकीय अधिकारी, यांचे वेतन रुग्ण कल्याण समितीचे खात्यातून करण्यास मज्जाव करणारे उप संचालक यांचे पत्र, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच उपकेंद्रात नर्सेस नसल्याने ग्रामीण भागातील महिलांना प्रसूतीसाठी तालुका, जिल्हा पातळीवर जाण्याची वेळ येणे, शासनाने सदर पदे तातडीने भरण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

१२९ २९७ **श्री. महादेव जानकर वि. प. स.** **कित्ता**

अधिक्षक अभियंता सा.बा मंडळ, औरंगाबाद यांच्या गैरकारभार, गैरव्यवहार, निविदा प्रक्रियेत अनियमिता व वागणुकीसंदर्भात अनेक तक्रारी वृत्तपत्रातून तसेच शासनाकडे लोकप्रतिनिधी, ठेकेदार व नागरिकांनी केल्याचे नुकतेच माहे जुलै,२०२३ मध्ये उघडकीस येणे,अधिक्षक अभियंता हे कार्यालयात कमी वेळ उपलब्ध राहत असून त्यांचा विकास कामांवर होत असलेला विपरित परिणाम ,अधिक्षक अभियंता औरंगाबाद कार्यालयात रुजू झाल्यापासून विविध तक्रारी असणे, कंत्राटदाराची कामे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून त्यांना नाहक त्रास देणे ,स्थानिक प्रतिनिधी व लोकप्रतिनिधिंनी यांच्या कामे वेळेवर न करणे, विकास कामांच्या निविदा प्रक्रियेत अनियमिता असणे, उदा. शरणापूर साजापूर राज्य मार्ग रु. ५३ कोटी रकमेचे कामाची निविदा, शासकिय दूध

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		डेअरी औरंगाबाद येथील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत बांधकाम करणे , अंबड जि.जालना येथील हॅम अंतर्गत कामाची निविदा, मा.उच्च न्यायालयातील न्यायमूर्तीकरिता निवासस्थाने बांधकाम करणे निविदा, वैजापूर तालुक्यातील प्रजिमा २३ रस्त्याची कामाची निविदा , सिनथेटिक ट्रॅक बांधकाम करणे मराठवाडा विद्यापीठ येथील निविदा आदि निविदा प्रक्रियेबाबत अनियमितता झालेली असणे, त्याचबरोबर पात्र कंत्राटदारांना अपात्र ठरऊन विशिष्ट व मर्जीतील कंत्राटदाराला काम मिळऊन देणे निविदा प्रक्रियेदरम्यान गैरव्यवहार करणे, निधि वाटपात मर्जीतील कंत्राटदाराला निधी देणे, शासनाकडून मंजूर झालेला निधीचे वाटप करतांना भेदभाव करणे आदि तक्रारी अधिक्षक अभियंता यांच्याविरुद्ध असतांनाही शासनाकडून त्यांना पाठिशी घालण्यात येत असल्याने लोकप्रतिनिधिंबरोबर ठेकेदारांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून विकास कामांना खीळ बसविणाऱ्या दोषी अधिक्षक अभियंता यांच्यावर कडक कारवाई करून त्यांना तात्काळ निलंबित करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.		
१३०	५५७	**श्री. आमश्या पाडवी वि. प. स.**	**कित्ता**	
		तत्कालीन कार्यकारी अभियंता, PMGSY/CMGSY, नंदुरबार यांनी सन २०१७-१८ ते सन २०२२-२३ या कालावधी मध्ये पदाचा व अधिकाराचा गैरवापर करून त्यांच्या मर्जीतल्या कंत्राटदारांना कंत्राट मिळवून देण्यासाठी निविदा प्रक्रियेत अनियमितता केलेली असणे,एकाच निविदा प्रसिद्धी नोटीस मधील एका कामात कंत्राटदारास बात		

करणे तर त्याच नोटीस मधील दुसऱ्या कामात त्याच कागदपत्राच्या आधारे त्याच कंत्राटदारास पात्र केलेले असणे, ई निविदा असूनही त्यांच्या कार्यकाळातील सुमारे ९०% कामे ही अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा जादा दराने त्यांच्या मर्जीतल्या ठेकेदाराला देणे करिता इतर कंत्राटदारांना पदाचा धाक दाखवून स्पर्धेतून बाहेर पडण्यास भाग पाडले असणे, मर्जीतला कंत्राटदारांना देण्यात येणाऱ्या कंत्राटाच्या अंदाजपत्रकात अनावश्यक बाबींचा मोठ्या प्रमाणात समावेश फोन करून ते काम न करता पैसे थेट त्यांच्याकडून आर्थिक स्वरूपात घेणे, अंदाजपत्रकात MPM, WPM, BBM चे दोन लेअर असताना अक्कलकुवा व धडगाव तालुक्यात प्रत्यक्षात मात्र झालेल्या कामात गुणवत्तेत मोठा फरक असणे, कामाच्या कालावधीत दरवाढ झालेली असल्याने त्याचा फायदा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झालेली असणे, दरवाढीचा फायदा हा सर्व कंत्राटदारांना मिळणे अपेक्षित असताना फक्त पैसे मोजणाऱ्या व आर्थिक देवाण-घेवाण करणाऱ्या मोजकेच ठेकेदारांना त्याचा लाभ झालेला असणे, कोणतेही काम न करता तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचे अधिकारात दहा टक्के व अधीक्षक अभियंतांचा अतिरिक्त पदभार असल्याकारणाने त्या अधिकारात २५% अशी प्रशासकीय मान्यता देऊन मर्जीतल्या कंत्राटदारांना मोठी रक्कम त्यांच्याकडून घेत बिले अदा केलेली असणे, प्रत्यक्षात कामे सुरू न करताच लाखोंचे अग्रीम मर्जीतला ठेकेदारांना अदा केलेली असणे व त्याकरिता मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झालेली असणे, शासन अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात आणणे करिता कोट्यावधी खर्च करीत असताना तत्कालीन कार्यकारी अभियंता व त्यांच्या अधिनस्त असलेले उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्याशी संगणमत करून

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		निधीचा मोठे प्रमाणात अपव्य करीत असणे, यामुळे सदर अतिदुर्गम भागात विकास काम करताना मोठ्या प्रमाणात त्रुटी असल्याने कामाचा दर्जा निकृष्ट असणे त्यामुळे या भागातील आदिवासी जनतेत तीव्र असंतोष असल्याने विशेष पथक व आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने तपास होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.		
१३१	६६२	**श्री. शशिकांत शिंदे, वि. प. स.** मौजे कार्ले, (ता. श्रीवर्धन, जि. रायगड) बोर्ली पंचयतन-श्रीवर्धन मार्गावरील कार्ले नदीवरील पूल सन १९८२-८३ मध्ये बांधण्यात आलेला असणे, सदर पूल पूर्णपणे मोडकळीस असणे, सदर पूल नविन बांधण्याविषयी व संरक्षण भिंत बांधणे विषयी येथील स्थानिक रहिवाशी यांनी लोकप्रतिनीधींकडे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी लेखी निवेदन दिलेले असणे, कार्ले नदीवरील पूल मोडकळीस आलेला असून खचला सुद्धा असणे, तो कधीही पडून दुर्घटना होण्याची शक्यता असणे, कार्ले हे सुमारे ५५० लोकसंख्या असलेले खेडेगाव असून या गावामध्ये जाण्यासाठी कार्ले नदीवरील पुलावरून जावे लागत असणे, या पुलाची उंची अतिशय कमी असल्याने पावसामध्ये नदीचे पाणी पुलावरुन वाहत असणे, त्यामुळे गावामध्ये जाण्या-येण्याचा मार्गच बंद होत असणे, यामुळे हे गाव पावसाळ्यामध्ये अनेकदा संपर्कहीन होत असणे, इतर कोणताही मार्ग उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असणे, अडचणीच्या वेळी जीव धोक्यात घालून येथील नागरिकांना ये-जा करावी लागत असल्याने नदीवरील	**कित्ता**	

पुलाची उंची वाढविण्याची मागणी सतत होत असणे, पावसामुळे नदीला पूर आल्यास नागरिकांना मुख्य बाजारपेठ, अत्यावश्यक वैद्यकीय उपचारासाठी तसेच बाळंतीण महिलेस रुग्णालयात नेताना तसेच इतर ही महत्त्वाच्या कामासाठी जाताना जीव धोक्यात घालूनच जावे लागणे, या नदीमध्ये प्रचंड गाळ असल्याने कार्ले गावाकडे जाण्यासाठीचा पूल यामुळे दरवर्षी पावसाळ्यात पाण्याखाली जाणे, ग्रामस्थांनी या पुलाची उंची वाढवून घेण्याची मागणी अनेकदा करुन देखील याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, मौजे कार्ले येथे नविन पूल व त्यास संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. विक्रम काळे वि. प. स.

१३२ ३९४ राज्यातील अल्पसंख्यांक व मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली ते आठवी व त्यानंतर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेणे, या शिष्यवृत्तीमुळे राज्यातील मोठ्या संख्येने अल्पसंख्यांक व मुस्लीम समाजातील मुले मुली शिक्षणाच्या प्रवाहात येणे, हजारो मुले-मुली दरवर्षी डॉक्टर, इंजिनिअरसारख्या उच्च पदावर शिक्षण घेणे, या शिष्यवृत्तीचा फायदा अल्पसंख्यांक व मुस्लीम समाजातील गोरगरीब व शिक्षणापासून दूर राहीलेल्या लाखो विद्यार्थ्यांना होणे, परंतू, केंद्र सरकारने नुकताच निर्णय घेऊन अल्पसंख्यांक व मुस्लीम समाजातील इयत्ता पहिली ते आठवी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेणे, यामुळे राज्यातील सर्वच स्तरावरुन या निर्णयाचा निषेध होणे, शिक्षक, पालक व विद्यार्थी वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाची भावना पसरणे, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. **कित्ता**

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
१३३	१	**श्री. अरुण लाड, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. अभिजित वंजारी, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सुधाकर अडबाले, श्री. धीरज लिंगाडे वि. प. स.**	**कित्ता**	

राज्यात सन २०१२ पासून शिक्षकांची भरती झालेली नसणे, त्यामुळे अनेक ठिकाणी एका शिक्षकावर दोन-दोन वर्ग संभाळण्याची जबाबदारी देण्यात आलेली असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम जाणवत असणे, वास्तविकतः सन २००५ पासून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती झालेली नसणे, सन २०१२ पासून शिक्षक भरतीवर बंदी घालण्यात आलेली असणे, तथापि दरम्यानच्या काळात सन २०१९ मध्ये काही जागा पवित्र पोर्टलमार्फत भरण्यात आलेल्या असणे, तसेच ३० हजार शिक्षकांची पदे भरण्याबाबत माहे जून, २०२३ मध्ये शासनाने केवळ घोषणा केली असून देखील अद्याप कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास येणे, कोल्हापूर जिल्ह्यात ७ अनुदानित आणि १० विनाअनुदानित अशी डीएडची १७ कॉलेजस असून या कॉलेजमध्ये एकूण ७७७ प्रवेश क्षमता असणे, तसेच बीएडची १३ कॉलेजस असल्याने त्यामध्ये सुमारे ७०० प्रवेश क्षमता असणे, ही प्रवेश क्षमता लक्षात घेता दहा वर्षांत सुमारे १४ हजार जणांनी पदवी (डिग्री) घेतली असल्याचे निदर्शनास येणे, परंतु पदवी घेऊनही अनेकांना रोजगार न मिळणे, याशिवाय जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि माध्यमिक विभागात सुमारे १ हजार ६८३ जागा रिक्त असणे, परिणामी, शिक्षण व्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडत असल्याने गुणवत्ता ढासळत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे

शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया तातडीने राबविण्याची होत असलेली मागणी, परंतु अद्याप शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात येत नसल्यामुळे उमेदवारांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिंतेची भावना, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.

श्री. किरण सरनाईक, श्री. जयंत आसगावकर, वि. प. स.

१३४ ६९ राज्यातील अनुदानित शाळा व तुकड्यावरील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना समायोजनासह सेवा संरक्षण मिळत असणे, परंतु अंशतः अनुदानित शाळा /कमवि व तुकड्यावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना समायोजना बाबत शासन निर्णय निर्गमित असणे,परंतु त्यात वैयक्तिक मान्यताप्राप्त अंशतः अनुदानित कर्मचाऱ्यांचे समायोजन केवळ अनुदानाच्या समान टप्प्यावर पद उपलब्ध असल्यास समायोजन अनुज्ञेय असणे,मात्र अनुदानाच्या टप्याचे पद उपलब्ध नसल्यास सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन होत नसणे.त्यामुळे रिक्त असलेल्या पदावर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात यावे व त्यांना जो टप्पा सुरु आहे त्या वेतनास संरक्षण देण्यात यावे असा प्रस्ताव मंजूर करून संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. **कित्ता**

श्री. प्रसाद लाड, वि. प. स.

१३५ २१७ जत (जि. सांगली) येथील सीमावर्ती भागातील मराठी माध्यमिक शाळा रद्द केलेल्या शाळांचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आलेली असणे, राज्याच्या सीमावर्ती **कित्ता**

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		भागात मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा उपलब्ध नसल्याने ३६ मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला असणे, या शाळांना विशेष बाब म्हणून अनुदान तत्वावर मान्यता देऊन खाजगी शिक्षण संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेली असणे, त्यानुसार अनेक शिक्षण संस्थाचालकांनी रीतसर अर्ज केलेले असणे, अर्ज करूनही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याने मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा चालकांमध्ये पसरवलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाची लाट, सीमावर्ती भागातील मराठी भाषिक बांधवांची व विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊनन सीमावर्ती भागात ३६ माध्यमिक शाळा त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका.		
१३६	२९३	**श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. प्रसाद लाड, वि. प. स.** राज्यातील खासगी इंग्रजी शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश घेवून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळण्याचा मार्ग झाला असला तरीदेखील शिक्षण हक्क कायद्यातून (आरटीई) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांबाबत खासगी शाळा दुजाभाव करीत असून त्यांना शैक्षणिक साहित्यापासून वंचित ठेवले जात असल्याची गंभीर बाब दि. ३० जून, २०२३ रोजी उघडकीस येणे, पाठ्यपुस्तकाच्या झेरॉक्स काढून विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात, असा अजब सल्ला या शाळांकडून पालकांना देण्यात येणे, याबाबत एकट्या मुंबई विभागातून	**कित्ता**	

२०० हून अधिक पालकांनी शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केल्या असणे, ठाणे शहरातील दोन शाळांविरुद्ध तक्रारी दाखल करण्यात आल्या असणे, पालकांनी केलेल्या तक्रारीनुसार मुंबई आणि ठाणे शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित शाळांना नोटीसी बजावल्या असणे, सदर नोटीसीत शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेतलेल्या बालकांना अन्य बालकांपेक्षा वेगळी वागणूक न देता त्यांना हक्काचे मोफत साहित्य, पाठ्यपुस्तके,गणवेश, खेळ, माहिती तंत्रज्ञान सुविधा यांत भिन्न वागणूक न देण्याची समज या शाळांना देण्यात आली असणे, परंतु या शाळांनी या नोटीसीला केराची टोपली दाखवत शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना सापत्न वागणूक देणे सुरूच ठेवले असणे, त्यामुळे शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची निर्माण झालेली दाट शक्यता, परिणामी, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.

१३७ ३९१ **श्री. विक्रम काळे, वि. प. स.** **कित्ता**

राज्यातील अशासकीय अनुदानित शाळेतील दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या परंतु, ती शाळा किंवा वर्गतुकडी विनाअनुदान, अंशतः अनुदान किंवा टप्पा अनुदानावर असणे व दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर ती शाळा किंवा वर्गतुकडी १००%

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अनुदानावर येणे, या शिक्षकांची जुन्या पेन्शन योजनेची खाती उघडणे, त्या खात्यावर जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे वेतनातून जी.पी.एफ. हप्त्याची रक्कम कपात होणे, यामधील सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणे, त्यानंतर काही शिक्षकांची तोंडी आदेशाने जी.पी.एफ. कपात बंद करणे, परंतु जुन्या पेन्शनची खाते सुरु ठेवणे, दि. १ नोव्हेंबर, २००५ पासून नविन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेणे असे असतांना नियमानूसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची शाळा किंवा वर्गतूकडी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानावर नाही म्हणून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करणे, हे अन्यायकारक असणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे पाठपूरावा करणे, शासनाने यासंबंधिची काढलेली दि. १० जुलै,२०२० ची अधिसूचना रद्द करणे, शासनाने यासाठी सम्यक अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, परंतु तरीही आजपावेतो शासनाकडून सकारात्मक निर्णय न होणे, पेन्शन हा विषय शिक्षकांच्या जिवनाशी व कुटुंबाशी निगडीत असल्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.		
१३८	४८१	**श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि. प. स.** राज्यातील विना अनुदानित प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा तुकड्यांचे अनुदान देण्यासाठी शासनाने ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी आदेश पारित केला असणे, त्यात विना अनुदानावर राज्यातील अनेक वाणिज्य शाखेच्या तुकड्या अनुदानापासून	**कित्ता**	

वंचित असणे, वाणिज्य या शाखेचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून दिले जात असणे, अशा शाखांना मान्यता देताना शासनाने सदरची शाखा इंग्रजी माध्यम म्हणूनच दिली असणे, शासनाने अनुदानासाठी पारित केलेल्या आदेशामध्ये इंग्रजी माध्यम वगळून कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याचे आदेशात म्हटले असणे, परंतु वाणिज्य ही शाखा इंग्रजी भाषेमधून शिकवली जात असणे, अधिकाऱ्यानी सदर शाखांचे मूल्यांकन करताना वाणिज्य शाखा इंग्रजी माध्यम असा अर्थ लावून अशा कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानापासून वंचित ठेवले असणे, असे अनेक प्रस्ताव शिक्षण संचालक कार्यालयाकडे सादर असणे, सदरचे क महाविद्यालय माध्यमिक अनुदानीत शाळांना जोडून असणे, त्यामुळे त्यांना अनुदान देण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करून अनुदान देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, घ्यावयाचा निर्णय व शासनाची प्रतिक्रिया.

१३९ ३३८ **श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, वि. प. स.** **कित्ता**

वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) भारतनगर एसआरए प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींच्या सदनिकांबाबत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या गैरव्यवहारात सहभागी असलेल्या अनेकांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात बनावट कागदपत्रे दिली असणे, त्यासाठी एका वकीलाशी संगनमत करून कागदपत्रे खरी असल्याचे हमीपत्र देण्यात आले असून त्या माध्यमातून सुमारे ३४ लाख ६० हजार रुपयांचा अपहार करण्यात आला असणे, अनेक एसआरए सोसायट्यांचा हा भव्य प्रकल्प पूर्वी एचडीआयएल कंपनीकडे असताना पुनर्वसन इमारतींतील सदनिकांच्या बाबतीत अनेक गैरप्रकार घडले असणे, ही कंपनी दिवाळखोरीत गेल्यानंतर सध्या हा प्रकल्प सद्यःस्थितीत बुधपूर बिल्डकॉन

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		कंपनीकडे असणे, मृत्यू झालेल्या मूळ पात्र झोपडीधारकाच्या कागदपत्रांवर अन्य व्यक्तीचे छायाचित्र लावून लालबागमधील सिंधुदुर्ग सहकारी बँकेत बचत खाते सुरू करून तीच कागदपत्रे एसआरए प्राधिकरणात देण्यात येणे आणि झोपडी रिक्त केल्याबद्दल विकासकाकडून भाडे मिळविण्यात आले असणे, मूळ पात्र झोपडीधारक अन्यत्र राहायला गेलेला असताना त्याच्या नावे बनावट कागदपत्रे तयार करून याच सिंधुदुर्ग बँकेत बचत खाते उघडल्यानंतर प्राधिकरणात कागदपत्रे जमा करून देखील भाडे मिळविण्यात आले असणे, मूळ झोपडीधारकाने झोपडी विकलेली असतानाही अशाचप्रकारे त्याचे नाव असलेल्या कागदपत्रांवर आपली छायाचित्रे लावून भाड्याची रक्कम मिळविण्यात आली असणे, एसआरए प्राधिकरणाच्या तब्बल ९५ पथकांनी सदरहू प्रकल्पात केलेल्या तपासणीनुसार प्रकल्पातील एकूण ८,६७९ सदनिकांपैकी केवळ ३,४८३ सदनिकात मूळ लाभार्थी राहत असल्याचे उघड होणे, उर्वरित सदनिकात मूळ लाभार्थ्यांचे वारसदार राहत असल्याचे, २,३५३ सदनिकात नातेवाईक अथवा भाडेकरू राहत असल्याचे आणि १,४८४ सदनिका मूळ लाभार्थ्यांनी विकल्या असल्याचे वास्तव समोर येणे, यास्तव सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि प्रतिक्रिया.		
१४०	४७३	**ॲड. अनिल परब वि. प. स.**	**कित्ता**	
		मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदर प्रकल्पासाठी माहे जुलै च्या दुसऱ्या आठवड्यात शासन		

निर्णय जारी होणे, सदरहू प्रकल्पासाठी सन २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये सेकलिंक टेकनॉलॉजी कंपनी सर्वात जास्त म्हणजेच रुपये ७२०० कोटी रुपयांची बोली लावत प्रथम क्रमांकावर असणे तर अदानी समुह दुसऱ्या क्रमांकावर असणे, तथापि सदरहू प्रकल्पासाठी रेल्वेची अतिरिक्त ४५ एकर जमीन उपलब्ध झाल्याचे सांगून सन २०१८ मधील निविदा प्रक्रिया रद्द करणे, राज्य शासनाद्वारे अशा प्रकारे मनमानी पद्धतीने व कुहेतूपूर्वक सन २०१८ मधील निविदा प्रक्रिया रद्द करणे म्हणजे राज्य शासनाने प्रॉमिसरी एस्पॉटल नैसर्गिक न्यायाचे तत्त्वांचे भंग झाला असल्याचे कायदे तज्ञांचे म्हणणे असणे, सन २०२२ मध्ये नव्याने राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये सेकलिंक टेक्नोलॉजी कंपनीला सहभागी होता येणार नाही यादृष्टीने निविदेच्या व अटींमध्ये व शर्थींमध्ये बदल करणे, त्यामुळे सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेत अदानी समूहाने रुपये ५०६९ कोटी रुपयांची बोली लावत प्रथम क्रमांक असणे, परिणामी सन २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत सेकलिंक टेक्नोलॉजी कंपनीने रुपये ७२०० कोटींच्या बोलीच्या तुलनेत अदानी समूहाच्या रुपये ५०६९ कोटींच्या प्राप्त बोलीमुळे राज्य शासनाचे २१३१ कोटी रुपयांचे नुकसान होणे, सदरहू निविदेमध्ये शासन निर्णय विकास नियंत्रण नियमावली यात फेरबदल करण्यात न येणे, पुनर्विकासानंतर राहत्या जागेत घर मिळण्याची शक्यता कमी असणे, तसेच सभासदांना मोफत पार्किंग व जेथे आहे त्याच ठिकाणी संक्रमण शिबिर बांधून त्यांचे स्थलांतरण करण्यात येणार नसणे, कॉरपस फंड २००० प्रति चौ.फू. न मिळणे, पुनर्विकास झाल्यानंतर घर मालकी हक्काने देण्यात येणार नसणे, तसेच व्यावसायिक गाळेधारकांचा पुनर्विकास नियमाप्रमाणे न होणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्प राबविताना, मूळ रहिवाशांना विश्वासात न घेणे, त्यांचे

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		म्हणणे ऐकून न घेणे, अदानी उद्योग समूहाची घसरलेली विश्वासार्हता व त्यामुळे धारावीतील जनतेच्या मनात पुनर्विकासाबाबत निर्माण झालेली साशंकता परिणाम स्थानिकांमध्ये शासनाविषयी प्रचंड नाराजी असणे. सदरहू प्रकल्प शासनाचा व स्थानिक जनतेच्या हिताचा होईल या दृष्टीने सन २०२२ मध्ये काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया.		
१४१	३४१	**श्री. गोपिचंद पडळकर, वि. प. स.** राज्यात महाज्योती मार्फत UPSC १७५० विध्यार्थी आणि MPSC मार्फत १००० विद्यार्थी तसेच combine मध्ये १००० विद्यार्थी इतक्या विद्यार्थ्यांची संख्या २०२३ मध्ये निवडली जाणार असणे, परंतु निवड झालेल्या विद्यार्थ्यांमधील बऱ्यापैकी विद्यार्थींनी आधीच इतर वेगवेगळ्या खाजगी कोचिंग मध्ये लाखो रुपयांचे क्लासेस केलेले असण्याची शक्यता असणे, तर महाज्योतीने हे पैसे एखाद्या कोचिंग क्लासेस ला देण्या ऐवजी हे जर विद्यार्थ्यांना डायरेक्ट (DBT मार्फत) त्यांच्या खात्यात दिले तर त्याचा अधिक फायदा विद्यार्थ्यांना होऊ शकतो अशी मागणी यातील बहुतांश विद्यार्थ्यांची असणे, यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक संतुलन होईल व महाज्योती मधील UPSC व MPSC विद्यार्थ्यांचा वाटा मोठ्या प्रमाणात वाढणार असणे, परंतु जर काही नवीन विद्यार्थ्यांना क्लास करायची इच्छा असेल तर फक्त त्याच विद्यार्थ्यांना तसा पर्याय उपलब्ध करून देण्याची देखील विध्यार्थ्यांची मागणी असणे, खाजगी क्लास चा खालावत चाललेला गुणवत्तेचा दर्जा, यामुळे क्लास मध्ये प्रत्यक्षात जाऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ५०% पेक्षा कमी असणे त्यामुळे शासनाचे मानधन हे	**कित्ता**	

केवळ खाजगी क्लासच्या फायद्यासाठी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येणे, उक्त विषयी तात्काळ चौकशी करून शासनाने विद्यार्थ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने योग्य त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

१४२ २४३ **श्री. प्रसाद लाड, श्री. प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री. प्रवीण दटके, प्रा. राम शिंदे वि. प. स.** **कित्ता**

कोरोना काळात आई किंवा वडील दगावले असे एकल पालक असलेले किंवा दोघांच्या आई मृत्यूमुळे जे अनाथ झाले अशा मुलांच्या शिक्षणासाठी व्यवस्था केलेल्या बाल न्याय निधीचे वाटप बहुतांश जिल्ह्यामध्ये संथगतीने सुरु असल्याचे माहे मे, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याकडे जमा झालेला दंड किंवा तत्सम रकमेतून कोरोना काळात पालक दगावलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रति विद्यार्थी १० हजार रुपयांची रक्कम बाल न्यायनिधीच्या माध्यमातून केली असणे, साधारण १ कोटीच्या आसपास प्रत्येक जिल्ह्यासाठी ही रक्कम राज्य शासानाकडे जमा केली असून राज्य शासनाने ही रक्कम जिल्हाधिकाऱ्यांकडेही बाल संगोपनांतर्गत पाठीवली असतानाही काही जिल्ह्यामधील महिला व बाल विकास विभागाकडून अनेक एकल मुलांच्या नावावर १० हजार रुपयांची रक्कम जमा झाली नसल्याचे समोर येणे, सदर मुलांना त्यांच्या शिक्षणासाठी दिलेले पैसे त्यांना वेळेत मिळत नसतील तर प्रशासन त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवत असल्याचे समजते, सदरहू

विवरण क्रमांक २१–(पुढे सुरू)

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		योजनेचे अंमलबजावणी प्रभावीपणे राबवून अशा एकल पालक किंवा अनाथ मुलांना सदरची अनुदानित रक्कम तातडीने मिळण्याची आवशकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.		
१४३	३८४	**श्री. एकनाथराव खडसे, वि. प. स.** नंदुरबार जिल्ह्यात मागील दोन वर्षांत तब्बल १५३९ बालमृत्यु व ३८ मातांचा प्रसुतीदरम्यान कुपोषण मृत्यु होणे, तसेच अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात १५७ बालकांचा एप्रिल,२०२२ ते जानेवारी,२०२३ या दहा महिन्याच्या कालावधीत कुपोषणामुळे मृत्यु होणे, नंदुरबार जिल्ह्यात बालकांचा मृत्यु इतर कारणांमुळे झाल्याची नोंद करुन शासकीय यंत्रणाचा शासनाचे अपयश झाकण्याचा प्रयत्न करीत असणे, कुपोषणामुळे झालेले बालमृत्यु व अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे प्रसुतीदरम्यान महिलांचा मृत्यु होणे, आदिवासी भागात अँब्ल्युलन्स पोहचू शकत नसल्याने आदिवासींकडून अँब्ल्युलन्स तसेंच रुग्णाला डोलीतून प्रवास करावा लागत असणे, स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनंतरही आदिवासींची सोयीसुविधांअभावी होणारी परवड, कुपोषण व बालमृत्यु रोखण्यास आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग तसेंच आदिवासी विभागाला आलेले अपयश, कोट्यावधींचा निधी खर्चूनही कुपोषणावर मात करण्यास सरकारला आलेले अपयश, राज्याच्या मा.ना.मुख्यमंत्र्यांच्या ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक १८६९ बालक कुपोषित आढळून येणे, त्यापैंकी ५३१ चिमुकल्याची मृत्युशी झुंज सुरु असणे, शहापूरा तालुक्यात १३९ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यु झाल्याची गंभीर घटना उघडकीस	**कित्ता**	

येणे, आदिवासीं बालके व स्तनदामाता यांना सकस आहार घरपोच पुरविण्याची आवश्यकता, तसेंच रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, आहार तज्ञ इत्यादि पदे तातडीने भरण्याची आवश्यकता, कुपोषणावर कायमस्वरुपी मात करण्यासाठी संबंधित सर्व विभागाचा समावेश असलेले कृतीदल (टास्क फोर्स) निर्माण करुन कुपोषण निर्मूलनाचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

१४४ ४३८ **डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे वि. प. स.** **कित्ता**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात बेघर मुलांसाठी हक्काचा निवारा उभारण्याचे काम शासनाकडून घोषित करण्यात आलेले असणे, सदर बाबतीत महिला व बाल विकास विभागांतर्गत सर्वेक्षणाच्या मोहिमेत सुमारे २००० बेघर मुले आढळून आल्याची नोंद असणे, या गोष्टीला एक ते दीड वर्ष होऊनही आजपर्यंत बेघर मुलासाठी उभारण्यात येणाऱ्या निवाऱ्याच्या बांधकामाला सुरुवात केलेली नसणे, परिणामी या गंभीर विषयाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, बेघर मुलांना हक्काचा निवारा मिळावा यासाठी मागील वर्षी मोठ्या प्रमाणात जाहिराती प्रसिद्ध करून प्रत्यक्षपणे ही कामे कागदावरच असून अद्याप याची अंमलबजावणी झालेली नसणे, परंतु असे असताना ठाणे जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागांतर्गत पुन्हा एकदा बेघर मुलांचे सर्वेक्षणाला नव्याने सुरुवात केलेली असणे, त्यामुळे आत्तापर्यंत ही सर्व मुले बेघर राहिलेली असणे, ठाणे जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागाकडून योग्य तो पाठपुरावा करण्यात आलेला नसल्याने स्थानिक प्रशासनाच्या या बेजबाबदारपणाबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेले चिडीचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २२

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ अन्वये अशासकीय ठराव

(१) आलेल्या सूचनांची संख्या - ९६

(२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - ७५

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - –

अ.क्र.	सदस्यांचे नांव व विषय	ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
१	२	३	४
	(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) –		
१.	**डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५५ –** "दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यामुळे खरोखरच दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत आहे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण झाली आहे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".	शुक्रवार, २१ जुलै व ४ ऑगस्ट २०२३	ठरावावर चर्चा झाली नाही.

विवरण क्रमांक २२–चालू

(१)	(२)	(३)	(४)
२.	**श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६० –** "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुद्धा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरिता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ. फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षांपासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".	शुक्रवार, २१ जुलै व ४ ऑगस्ट २०२३	ठरावावर चर्चा झाली नाही.

विवरण क्रमांक २२–समाप्त

(१)	(२)	(३)	(४)
३.	**श्री. जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४९ –** "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".	शुक्रवार, २१ जुलै व ४ ऑगस्ट २०२३	ठरावावर चर्चा झाली नाही.

विवरण क्रमांक २३

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ अन्वये शासकीय ठराव

अ.क्र.	मंत्री व विषय	ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
	निरंक		

विवरण क्रमांक २४

तारांकित व अतारांकित प्रश्नांच्या सूचनांवरील कार्यवाही

प्रश्नांचा प्रकार	आलेल्या सूचना	जादा सूचना	कार्यवाहीत घेतलेल्या सूचना	अस्वीकृत सूचना	मागे घेतलेल्या सूचना	सदस्य/ विभाग निर्देशित केलेले	अतारांकित म्हणून स्वीकृत	सम्मिलित	स्वीकृत केलेले	तोंडी उत्तरीत झालेले	सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित	व्यपगत	सभागृहात उत्तरीत झालेल्या प्रश्नांची एकूण टक्केवारी
तारांकित प्रश्न	२०९६	१४८	१९४८	७२	५	-	२४९	६६१	७८३	६४	-	१७८	८.१७%
अतारांकित प्रश्न	२१	-	२१	५	-	१	१४*	१	-	-	-	-	-

* मूळ अतारांकित म्हणून प्राप्त झालेल्या स्वीकृत सूचना

विवरण क्रमांक २५

अल्प सूचना प्रश्नांवरील कार्यवाही

आलेल्या सूचना	अस्वीकृत	मागे घेतलेल्या सूचना	सदस्य/ विभागाकडे खुलाशासाठी पाठविलेले प्रश्न	सम्मिलीत केलेल्या सूचना/ अतारांकित स्वीकृत	स्वीकृत सूचना	उत्तरीत झालेल्या सूचना	व्यपगत झालेल्या आलेल्या सूचना	सदस्यांकडून विचारण्यात न टक्केवारी	उत्तर दिलेल्या सूचनांची	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
-	-	-	-	-	-	-	-	-	-	-

निरंक

विवरण क्रमांक २६

तारांकित प्रश्नांची विभागनिहाय सांख्यिकीय माहिती

अ.क्र.	विभाग	आलेल्या प्रश्नांची संख्या	जादा प्रश्न	मागे घेतलेले	अस्वीकृत	सदस्य/विभाग निर्देशित केलेले	सम्मिलीत	अतारांकित स्वीकृत	तारांकित स्वीकृत	तोंडी उत्तरीत प्रश्न	सदस्य अनुपस्थितीमुळे झालेले अतारांकित	वेळे-अभावी अनुत्तरीत	व्यपगत	तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण
१	उच्च व तंत्र शिक्षण	८७	७	-	७	-	२५	१४	२५	२	-	२३	९	८%
२	शालेय शिक्षण	२४६	३४	-	११	-	१०६	२०	५०	५	-	४५	२४	१० %
३	युवक कल्याण	१	-	-	-	-	-	१	-	-	-	-	-	-
४	क्रीडा	७	-	-	-	-	१	१	५	२	-	३	-	४० %
५	महिला व बालविकास	३४	-	-	२	-	२३	-	७	२	-	५	२	२९ %
६	पशुसंवर्धन	७	-	-	-	-	१	१	४	-	-	४	१	-
७	दुग्धविकास	७	-	-	-	-	-	-	२	-	-	२	५	-
८	मत्स्यविकास	६	-	-	-	-	-	१	४	-	-	४	१	-
९	सामान्य प्रशासन	४२	३	-	१	-	१०	६	१७	१	-	१६	५	६ %
१०	नगर विकास	२७४	४८	-	६	-	५७	३४	१०५	१२	-	९३	२४	११ %
११	गृहनिर्माण	५५	९	-	१	-	२३	४	१६	१	-	१५	२	६ %
१२	राज्य उत्पादन शुल्क	१	-	-	-	-	-	-	१	-	-	१	-	-
१३	परिवहन	४४	४	-	१	-	१२	३	२३	-	-	२३	१	-
१४	बंदरे	४	-	-	-	-	३	-	१	-	-	१	-	-
१५	गृह	१४६	२	२	४	-	५४	२०	४५	२	-	४३	१९	४ %
१६	मराठी भाषा	७	-	-	-	-	३	-	४	-	-	४	-	-
१७	विधी व न्याय	९	-	-	१	-	२	१	४	-	-	४	१	-

विवरण क्रमांक २६–पुढे चालू

अ.क्र.	विभाग	आलेल्या प्रश्नांची संख्या	जादा प्रश्न	मागे घेतलेले	अस्वीकृत	सदस्य/विभाग निर्देशित केलेले	सम्मिलीत	अतारांकित स्वीकृत	तारांकित स्वीकृत	तोंडी उत्तरीत प्रश्न	सदस्य अनुपस्थितीमुळे झालेले अतारांकित	वेळे-अभावी अनुत्तरीत	व्यपगत	तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण
१८	उद्योग	३२	२	-	-	-	१०	२	१५	-	-	१५	३	-
१९	ऊर्जा	५०	३	-	२	-	१९	३	१८	-	-	१८	५	-
२०	कामगार	४७	-	-	-	-	१७	७	२०	-	-	२०	३	-
२१	नवीन व नवीकरणीय उर्जा	१	-	-	-	-	-	-	-	-	-	-	१	-
२२	पर्यटन	६	१	-	-	-	-	२	३	-	-	३	-	-
२३	सांस्कृतिक कार्य	३०	-	-	१	-	१६	५	८	१	-	७	-	१३ %
२४	अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण	२२	२	-	१	-	८	१	१०	-	-	१०	-	-
२५	पाणीपुरवठा व स्वच्छता	४०	४	१	-	-	११	१	२२	२	-	२०	१	९ %
२६	सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण	११२	२	-	१	-	२५	१६	५७	६	-	५१	११	११ %
२७	पर्यावरण व वातावरणीय बदल	३०	१	-	-	-	११	३	१०	-	-	१०	५	-
२८	जलसंपदा	५४	१	-	४	-	६	९	३१	-	-	३१	३	-
२९	वैद्यकीय शिक्षण	३३	-	-	१	-	१४	३	१३	२	-	११	२	१५ %
३०	अन्न व औषध प्रशासन	१६	४	-	१	-	५	१	४	-	-	४	१	-
३१	महसूल	१०१	-	-	५	-	३४	१८	४०	३	-	३७	४	८ %
३२	वने	२३	१	-	-	-	३	६	१३	-	-	१३	-	-
३३	मदत व पुनर्वसन	५२	५	-	१	-	२२	१	१३	२	-	११	१०	१५ %

विवरण क्रमांक २६–पुढे चालू

अ.क्र.	विभाग	आलेल्या प्रश्नांची संख्या	जादा प्रश्न	मागे घेतलेले	अस्वीकृत	सदस्य/विभाग निर्देशित केलेले	सम्मिलीत	अतारांकित स्वीकृत	तारांकित स्वीकृत	तोंडी उत्तरीत प्रश्न	सदस्य अनुपस्थितीमुळे झालेले अतारांकित	वेळे-अभावी अनुत्तरीत	व्यपगत	तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण
३४	आपत्ती व्यवस्थापन	३	–	–	–	–	–	१	२	–	–	२	–	–
३५	नियोजन	७	२	–	–	–	१	१	२	–	–	२	१	–
३६	रोजगार हमी	१९	–	–	–	–	६	४	९	–	–	९	–	–
३७	कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता	१९	–	–	२	–	७	४	६	१	–	५	–	१७ %
३८	माहिती व जनसंपर्क	३	–	–	–	–	२	–	१	–	–	१	–	–
३९	दिव्यांग कल्याण	१४	–	–	–	–	४	३	७	१	–	६	–	१४ %
४०	कृषी	५८	–	–	३	–	१७	११	२३	३	–	२०	४	१३ %
४१	फलोत्पादन	७	–	–	–	–	३	१	३	१	–	२	–	३३ %
४२	ग्रामविकास	७९	३	१	५	–	१८	१३	३३	१	–	३२	६	३ %
४३	आदिवासी विकास	४७	१	–	१	–	१६	५	१५	१	–	१४	९	७ %
४४	इतर मागास बहुजन कल्याण	२७	–	–	१	–	१२	२	१२	३	–	९	–	२५ %
४५	वित्त	२३	१	–	१	–	८	३	७	–	–	७	३	–
४६	अल्पसंख्यांक विकास	५	१	–	–	–	१	–	३	–	–	३	–	–
४७	मृद व जलसंधारण	३	–	–	–	–	–	१	२	१	–	१	–	५० %
४८	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)	५०	१	–	५	–	६	६	२९	३	–	२६	३	१० %
४९	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)	१३	३	–	–	–	३	१	४	–	–	४	२	–

विवरण क्रमांक २६–समाप्त

अ.क्र.	विभाग	आलेल्या प्रश्नांची संख्या	जादा प्रश्न	मागे घेतलेले	अस्वीकृत	सदस्य/विभाग निर्देशित केलेले	सम्मिलीत	अतारांकित स्वीकृत	तारांकित स्वीकृत	तोंडी उत्तरीत प्रश्न	सदस्य अनुपस्थितीमुळे झालेले अतारांकित	वेळे-अभावी अनुत्तरीत	व्यपगत	तोंडी उत्तरांचा शेकडा प्रमाण
५०	सहकार	२२	१	-	-	-	६	३	१०	१	-	९	२	१० %
५१	पणन	१०	-	-	-	-	५	-	५	२	-	३	-	४० %
५२	वस्त्रोद्योग	३	-	-	-	-	१	१	१	-	-	१	-	-
५३	सामाजिक न्याय	५८	२	-	३	-	२४	५	१९	३	-	१६	५	१६ %
	एकूण	**२०९६**	**१४८**	**५**	**७२**	**-**	**६६१**	**२४९**	**७८३**	**६४**	**-**	**७१९**	**१७८**	**८.१७ %**

विवरण क्रमांक २७

अतारांकित प्रश्नांची विभागनिहाय आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र

अ.क्र.	विभागाचे नाव	गत सत्रात प्रलंबित राहिलेल्यांपैकी लेखी उत्तर प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नांची संख्या
(१)	(२)	(३)
१.	अन्न व औषध प्रशासन विभाग	१
२.	अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग	**२**
३.	अल्पसंख्यांक विकास विभाग	**२**
४.	आदिवासी विकास विभाग	**६**
५.	इतर मागास बहुजन कल्याण विभाग	**२**
६.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	**११**
७.	उद्योग विभाग	**१**
८.	ऊर्जा विभाग	**९**
९.	कामगार विभाग	**२**
१०.	कृषी विभाग	**४**
११.	कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग	**५**
१२.	क्रीडा विभाग	**१**
१३.	गृह विभाग	**२०**
१४.	गृहनिर्माण विभाग	**५**
१५.	ग्रामविकास विभाग	**१२**
१६.	जलसंपदा विभाग	**३**
१७.	दुग्धविकास विभाग	**२**
१८.	नगर विकास विभाग	**३७**

विवरण क्रमांक २७–समाप्त

(१)	(२)	(३)
१९.	नियोजन विभाग	२
२०.	पणन विभाग	१
२१.	परिवहन विभाग	३
२२.	पर्यटन विभाग	१
